# १

## वैचारिक गद्य

अ) आशय, अभिव्यक्तीच्या अंगाने वैचारिक गद्याचे ललित साहित्यापासूनचे वेगळेपण

आ) स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक गद्यामागील प्रेरणा- राजकीय, सामाजिक प्रेरणा, प्रबोधन चळवळी

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१अ वैचारिक गद्याचे ललित साहित्यापासूनचे वेगळेपण

- १अ.१ ललित साहित्याचे स्वरूप
- १अ.२ ललितेतर साहित्याचे स्वरूप
- १अ.३ वैचारिक गद्याचे स्वरूप
  - १अ.३.१ वैचारिक गद्य : गद्यलेखनाचा एक प्रकार
  - १अ.३.२ विचार हाच वैचारिक गद्याचा गाभा
  - १अ.३.३ विशिष्ट विषयाची मांडणी
  - १अ.३.४ वैचारिक गद्याला वास्तवाचा आधार
  - १अ.३.५ उद्देश : माहिती, ज्ञान आणि प्रबोधन
  - १अ.३.६ तर्कशुद्ध प्रतिपादन
  - १अ.३.७ ससंदर्भता हा वैचारिक गद्याचा विशेष
  - १अ.३.८ निष्कर्षाप्रत जाणारा लेखनप्रकार
  - १अ.३.९ बुद्धिप्रामाण्यवादाला महत्त्वाचे स्थान
- १अ.४ वैचारिक गद्याचे वेगळेपण
  - १अ.४.१ आशयाच्या अंगाने वेगळेपण
  - १अ.४.२ अभिव्यक्तीच्या अंगाने वेगळेपण

१आ. स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक गद्यामागील प्रेरणा

- १आ.१ राजकीय प्रेरणा
- १आ.२ सामाजिक प्रेरणा
- १आ.३ प्रबोधन चळवळी

१.३ समारोप

१.४ सरावासाठी प्रश्न

१.५ संदर्भ ग्रंथ

munotes.in

## १.१ उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येईल.

१. वैचारिक गद्याचे स्वरूप समजून येईल.

२. वैचारिक गद्याचे ललित साहित्यापासूनचे वेगळेपण समजेल.

३. स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक गद्यामागील प्रेरणा समजून येईल.

४. स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रबोधन चळवळ समजून येईल.

## १.२ प्रस्तावना

मानवाने निर्माण केलेल्या अनेक बाबींमध्ये भाषा आणि साहित्य ह्या दोन बाबी फार महत्त्वाच्या आहेत. आपले विचार, आचार आणि भावना मौखिक वा लिखित स्वरूपात व्यक्त करण्याचे एक माध्यम म्हणजे साहित्य. कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, चरित्र, निबंध, वैचारिक गद्य हे गद्य साहित्यप्रकार तर कविता, गीत, भारूड, लावणी, पोवाडा, गवळणी, अभंग हे पद्यप्रकार. ललित आणि ललितेतर साहित्य असेही वर्गीकरण केले जाते. ललित साहित्य हे कल्पनाशक्तीवर आधारलेले असते. व्यक्ती, घटना आणि प्रसंग हे वास्तवातील असले तरी त्यातले अनुभवविश्व ही कल्पक निर्मिती असते. कविता, कथा, कादंबरी आणि नाटक हे ललित साहित्याचे प्रमुख प्रकार आहेत. ललितेतर साहित्य हे वास्तवाला, तथ्याला प्राधान्य देते. वस्तुनिष्ठ, बुद्धिप्रेरित, तर्कानुमानावर ते आधारलेले असते. त्यात कल्पनाविलासाला थारा नसतो. वैचारिक, शास्त्रीय, संशोधनात्मक, तत्त्वमीमांसात्मक लेखन हे ललितेतर साहित्यात येते. ललित आणि ललितेतर यांच्या सीमारेषेवर चरित्र, आत्मचरित्र, इतिहास, निबंध असे साहित्यप्रकार असतात.

वैचारिक गद्य हा ललितेतर साहित्याचा एक महत्त्वाचा लेखनप्रकार आहे. त्याचे ललित साहित्यापासूनचे वेगळेपण सहज लक्षात येते. मराठीत वैचारिक गद्यलेखन हे इंग्रजी साहित्याच्या परिचयातून आले असले तरी त्याला स्वतःचा मराठी चेहरा मिळालेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात वैचारिक गद्य कोणत्या प्रेरणेने आविष्कृत झाले, याचाही शोध घेतला पाहिजे. या सर्व बाबींचा उहापोह पुढीलप्रमाणे करता येईल.

## १अ. वैचारिक गद्याचे ललित साहित्यापासूनचे वेगळेपण

गद्य आणि पद्य हे साहित्याचे मुख्य प्रकार आहेत. त्याप्रमाणेच ललित व ललितेतर हेही प्रकार आहेत. वैचारिक गद्याची गणना ललितेतर साहित्यात केली जाते. याचा अर्थ ललितेतर साहित्याचे जे गुणविशेष असतात ते वैचारिक गद्यात येतात. शिवाय ललित साहित्याचे जे गुणविशेष आहेत, ते वैचारिक साहित्यात आढळत नाहीत. येथे ललित साहित्य, ललितेतर साहित्याचे स्वरूप पाहून त्या पार्श्वभूमीवर वैचारिक गद्याचे वेगळेपण शोधता येईल.

### १अ.१ ललित साहित्याचे स्वरूप:

वाङ्मय आणि साहित्य हे शब्द सारख्याच अर्थाचे आहेत असा बहुतांश समज रूढ झाला आहे. शिवाय साहित्य म्हणजेच 'ललित साहित्य' असाही समज आपण करून घेतला आहे. 'काव्य' आणि 'कविता' हेही एकाच अर्थाने वापरले जाणारे दोन शब्द आहेत. काव्य हे फक्त कवितेत असते असेही वाटते. त्यामुळे या सर्व संकल्पनांचा नेमका अर्थ शोधण्याचे राहून जाते.

मानवी जीवन हा वाङ्मयाचा विषय असतो. माणसाचे जगणे आणि त्याविषयीचे भान ज्यावेळी व्यक्त होते, तिथे वाङ्मयाची निर्मिती होते. वि. का. राजवाडे म्हणतात, "मनुष्यजातीच्या मुखातून जे जे म्हणून सार्थ व संपूर्ण विधान शब्दरूपाने भूत, वर्तमान व भविष्यकाली बाहेर पडले ते ते सर्व वाङ्मय होय." (राजवाडे : १९५९, पृ. १०५) 'वाङ्मय' हा शब्द 'वाक्' म्हणजे बोलणे तर 'मय' म्हणजे युक्त, असा तयार झाला आहे. त्यामुळे बोलण्याने जे युक्त आहे, ते म्हणजे वाङ्मय होय.

साहित्य हा शब्द फारच व्यापक अर्थाचा आहे. तो साधनसामुग्री या अर्थाने वापरला जातो तसा विविध लेखनप्रकारासाठीही वापरला जातो. 'साहित्य' या शब्दापूर्वी 'ललित' हे विशेषण जोडले की 'साहित्य' या शब्दाचा अर्थ बदलून तो 'ललित साहित्य' असा विशेष होतो. साहित्य हे ललित असते म्हणजे काय? हे समजून घेतले पाहिजे.

ललित हे विशेषण आहे. ललित या शब्दास इंग्रजी भाषेत 'फाइन' असे म्हटले जाते. फाइन म्हणजे सुंदर. जिथे सौंदर्य आहे तिथे कलात्मकता असते. व्यवहार आणि प्रत्यक्ष जीवनात सौंदर्याचा उपयोग होत नसतो. सौंदर्य ही एक मानसिक गरज असते. त्यासाठी अनेक कलांचा जन्म झाला. उदा. संगीत, नृत्य, चित्र. त्यांपैकी साहित्य ही एक कला आहे. ज्या साहित्यात कलात्मकता असते, सौंदर्यपूर्णता असते, म्हणेजच लालित्य असते, त्या साहित्यास ललित साहित्य म्हटले जाते.

ललित साहित्याच्या अंगांचा विचार लक्षात घेतला पाहिजे. ललित साहित्याला भाषिक, आशयात्मक, संरचनात्मक, कल्पनाकेंद्रीत, प्रकारात्मक आणि सौंदर्यात्मक अंगे असतात. त्यामुळे ललित साहित्यातील प्रत्येक साहित्यकृती ही रचलेली असते. ती व्यवहारातील आहे तशी नसते.

ललित साहित्याचा सर्वात महत्त्वाचा विशेष म्हणजे सर्जनशीलता. सर्जनशील म्हणजे नवनिर्माणशीलता. संवेदना, विचार आणि कल्पना यांची सहेतूक बांधणी केली की त्यातून नवनिर्मिती होत जाते. सृजन म्हणजे निर्मिती. बुद्धी, भावना आणि कल्पना यातून अनुभूती व्यक्त करताना चाकोरीपेक्षा काही वेगळे, नवे, ताजे, अनोखे आणि स्वतंत्र निर्माण होते.

ललित साहित्याचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे अर्थवैविध्य आणि अर्थवाहित्व रचना. व्यवहारात विशिष्ट व्यवहार पूर्ण होण्यासाठी संवाद केला जातो. ललित साहित्यातील रचनेत विशिष्टतेच्या पलीकडे जाऊन अभिव्यक्ती होत असते. शब्दांची, वाक्यांची अथवा परिच्छेदांची मांडणी ही व्याकरणिक नसते. त्यामुळे ती रचना अर्थाच्या विविध पातळ्या सूचित करते.

ललित साहित्याची भाषा ही व्यवहार भाषेपेक्षा वेगळी असते. ती प्रतीकात्म असते. उपमा, प्रतिमा आणि रूपकांचा अवलंब केला जातो.

ललित साहित्यात भावाभिव्यक्तीला महत्त्व मिळते. भावनांची अनेकविध चित्रे लेखक रेखाटत असतो. सभोवतालच्या घडामोडीला दिलेली भावात्मक प्रतिक्रिया म्हणजे ललित साहित्य. त्यातील व्यक्ती, घटना, प्रसंग यांकडे लेखक आपल्या परीने पहात असतो. भावनात्मकतेमुळे ललित साहित्य रसपूर्ण आणि सौंदर्यपूर्ण बनते.

ललित साहित्यात सूचकता असते. साहित्यात व्यक्त झालेल्या अनुभवातून विविध बाबींचे सूचन होत असते. त्यामुळे स्पष्टता टाळली जाते. सूचकतेच्या वाटा जितक्या अधिक तितके ललित साहित्य सौंदर्यपूर्ण बनते.

व्यक्तिनिष्ठता हा ललित साहित्याचा अत्यंत महत्त्वाचा विशेष आहे. त्या त्या लेखक-कवीला आलेले वैयक्तिक अनुभवविश्व साहित्यात प्रतिबिंबित होत असते. एकाच घटना-प्रसंगाकडे प्रत्येक लेखक आपापल्या दृष्टिकोनातून पहात असतो. त्यामुळे वस्तुनिष्ठता टाळली जाते. कथा, कविता, कादंबरी आणि नाटक यांतील व्यक्तिनिष्ठ अनुभवामुळे साहित्य हे ललित बनते.

एकूणच ललित साहित्य हे वाचकांच्या बुद्धीला आणि भावनेला आवाहन करीत असते. सौंदर्याची अनुभूती देते. मानवी जीवनातील सुख-दुःखाचे चित्रण करते. मानवी मनातील विविध भावांचे दर्शन घडविते. संवेदनशीलतेचे संस्कार करते. सूचकतेच्या आधारे अर्थाच्या विविध पातळ्या दाखवते.

### १अ.२ ललितेतर साहित्याचे स्वरूप:

ललित साहित्य आणि ललितेतर साहित्य हे दोन्ही साहित्याचेच भाग आहेत. त्यामुळे ते परस्परांपासून फारच भिन्न आहेत, असा गणितीय विचार करून चालणार नाही. दोन्ही साहित्यात साहित्यिक मूल्ये समान असतात. आशय, अभिव्यक्ती आणि हेतूमुळे त्यात काही एक फरक पडत जातो.

कथा, कविता, कादंबरी आणि नाटक या साहित्यप्रकारांचा समावेश ललित साहित्यात केला जातो. हे साहित्यप्रकार वगळून इतर साहित्यप्रकार ललितेतर साहित्यात येतात. सौंदर्यनिर्मिती, व्यक्तिनिष्ठता, सर्जनशीलता, अर्थवैविध्यता, काल्पनिकता, सूचकता आणि भावनिकता यांचे ललितेतर साहित्याला वावडे नसते. मात्र ते फारच दुय्यमतेने ललितेतर साहित्यात येत असते. त्या दृष्टीने ललितेतर साहित्याचे स्वरूप समजून घेतले पाहिजे.

ललितेतर साहित्यात वैचारिक लेखन, निबंध लेखन, संशोधनात्मक लेखन, तत्त्वमीमांसात्मक लेखन, अग्रलेख असे विविध लेखनप्रकार येतात. ललितेतर साहित्याचे म्हणून जे काही विशेष असतात, त्याचे दर्शन प्राधान्याने या लेखनांमध्ये आढळतात.

ललितेतर साहित्य हे वास्तवावर आधारलेले असते. वास्तवाला भौतिक, लौकिक, प्रत्यक्ष घटित आणि प्रत्यक्षदर्शी पुराव्यांचा आधार असतो. त्यामुळे आपोआपच काल्पनिकतेला दूर ठेवावे लागते. उदा. अग्रलेख लिहिताना एखाद्या घटनेचा संदर्भ द्यावयाचा असेल तर ती

घटना प्रत्यक्षात कुठे तरी घडलेली असली पाहिजे. ललितेतर साहित्याचा लेखक हा वास्तवाचा आधार घेत घेत लेखन करीत असतो.

ललितेतर साहित्यात लेखकाच्या तटस्थ भूमिकेला महत्त्वाचे स्थान मिळालेले असते. त्यामुळे घटना-प्रसंगांच्या विविध अंगांचा शोध लेखकाला घेणे गरजेचे ठरते. अशा वेळी आप-पर भाव गळून पडतो. संशोधनपर लेखनात तटस्थ वृत्ती उपयोगी पडते. त्यातून निःपक्षपातीपणा तयार होतो.

ललितेतर साहित्यात रंजनप्रधानता दुय्यम-तिय्यम अंगाने येते. वस्तुनिष्ठ माहिती वाचकांच्या पुढ्यात ठेवली जाते. त्यामुळे वाचकांचा अनुनय करणे, त्यांच्या भावनांचा विचार करणे, त्यांची अभिरुची लक्षात घेणे अशा बाबींना आपोआप फाटा मिळतो. उदाहरणार्थ निबंध लिहीत असताना विशिष्ट विषयाची सांगोपांग चर्चा केली जाते. त्यातून वाचकांचे मनोरंजन होईल, याकडे लक्ष दिले जात नाही.

ललितेतर साहित्यात इतिहास आणि वर्तमानातील व्यक्ती त्यांच्या खऱ्या नावासह येतात. म्हणजेच ललितेतर साहित्यातील जग हे खरेखुरे जग असते, ते रचलेले नसते. कल्पित व्यक्तींचे कल्पित जीवन टाळलेले असते. वाचकांचा गोंधळ उडत नाही. त्या त्या व्यक्तीची शहानिशा वाचक करू शकतात. त्यातून नेमका आशय पोहचविण्याचे कार्य होते. त्यामुळे ललितेतर साहित्य हे इतिहाससमांतर वाटचाल करीत आहे असे वाटू शकते.

ललितेतर साहित्य हे शास्त्रसमांतर वाटू शकते कारण विशिष्ट विचार आणि विषयाच्या सिद्धतेतून ते आविष्कृत होत असते. ते नेहमीच विचारांना आवाहन करीत असते. विचार आणि विषय प्रतिपादन हा अशा साहित्याचा गाभा असतो. स्फूट लेख असो वा दीर्घ लेख असो, त्यातली विषयसिद्धता सोडली जात नाही. त्यामुळे ते शास्त्रसमांतर वाटू शकते.

ललितेतर साहित्याची भाषा ही वाच्यार्थप्रधान असते. शब्दाला मिळालेला वाच्यार्थ हा मुख्य असतो. त्यापेक्षा वेगळ्या अर्थाचे सूचन ललितेतर साहित्यात होत नसते. तर्कशुद्ध प्रतिपादन केले जाते.

ललितेतर साहित्याची रचना ही सुसंघटित असते. प्रत्येक वाक्य हे कार्यकारणभाव तत्त्वाने जोडलेले असते. विवेचन, विश्लेषण करीत आणि आधार देत विषयाची सिद्धता केली जाते. त्यात आरंभ असतो, मध्य असतो आणि शेवट असतो. त्यामुळे रचनेला ठरीव रूप प्राप्त होते.

### १अ.३ वैचारिक गद्याचे स्वरूप:

वैचारिक गद्याचा समावेश हा ललितेतर साहित्यात होतो. वैचारिक गद्याला 'वैचारिक साहित्य' असेही म्हटले जाते. 'निबंध', 'माहितीपर लेख', 'स्फूट लेख', 'संशोधनात्मक लेख', 'अग्रलेख', 'अहवाल लेखन' असे काही लेखनप्रकार वैचारिक गद्याचा भाग आहेत. या सर्व लेखनप्रकारात काही विशेषांबाबत साम्य आढळते तर काही बाबतीत वेगळेपणा आढळतो. असे असले तरी वैचारिक गद्याचे म्हणून असलेले काही विशेष पाहिले तर त्याचे स्वरूप लक्षात घेता येते.

### १अ.३.१ वैचारिक गद्य : गद्यलेखनाचा एक प्रकार:

वैचारिक गद्य हा गद्यात्म लेखनाचा एक प्रकार आहे. गद्यलेखनाची भाषा वेगळी असते. गद्यलेखनात शब्दांचा व्यापक पट असतो. गद्यभाषा ही सरळ अर्थ व्यक्त करणारी असते. विस्तृत विवेचन असते. अनेक परिच्छेद असतात. प्रत्येक मुद्याचे विश्लेषण केले जाते. वाक्यरचनेत कर्ता, कर्म आणि क्रियापदांचा व्याकरणिक क्रम पाळलेला असतो. त्यामुळे वाक्याला ठराविक असाच अर्थ प्राप्त झालेला असतो. शब्दांचा थेट वापर केलेला असतो. संदिग्धता टाळली जाते. त्यामुळे अर्थप्रकटीकरणात नेमकेपणा येऊन सूचकता टाळली जाते.

वैचारिक गद्य हा गद्याचाच प्रांत असतो. गद्य ही बोलण्याची वा लिहिण्याची शैली असते. सहज संवाद करणे, भाषण करणे वा अहवाल तयार करणे यासाठी गद्यशैलीच उपयोगी पडते. गद्यलेखनासाठी मात्रांचे बंधन नसते. संरचनेच्या दृष्टीनेही बंधन नसते. विचार आणि माहिती सहजतेने पोहचली की गद्याचा उद्देश पूर्ण होतो.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी गद्याचा उपयोग होतो. लेखकाच्या लेखनाचा हेतू विनाअडथळा साध्य करण्यासाठी गद्य उपयोगी पडते. पत्रकार, बातमी लेखक गद्याच्या आधारेच बातमी पोहचवू शकतात. पारदर्शकता हा गद्याचा विशेष गुण असतो. त्यामुळे वैचारिक गद्यात गद्यलेखनाचे आणि गद्यभाषेचे सर्व गुण एकवटलेले असतात, असे म्हणता येते.

### १अ.३.२ विचार हाच वैचारिक गद्याचा गाभा:

वैचारिक गद्य हे केवळ गद्यमय असून चालत नाही. कथा, कादंबरी, नाटक आणि पत्राची भाषासुद्धा गद्यमय असते, म्हणून ते लेखन वैचारिक होत नाही. विचार हा वैचारिक गद्याचा गाभा असतो किंवा ते एक प्राणतत्त्व असते. त्यामुळे विचारप्रतिपादन हा वैचारिक गद्याचा मुख्य हेतू असतो. विषय कोणता असावा यावर बंधन नसते मात्र त्यात विचार आहे की नाही, याकडे लक्ष दिले जाते. विचार म्हणजे काय? याचाही विचार होणे गरजेचे आहे.

विचार ही एक प्रक्रिया असते; ती मानवी मनात सतत चाललेली असते. विचार ही एक चर्चा असते; ती सारासार पाहून केली जाते. विचार हा एक तर्क असतो; तो वास्तवाच्या आधारे मांडला जात असतो. विचार ही एक कल्पना असते जिला वैज्ञानिकतेचा आधार असतो. ते एक चिंतन असते; ज्याच्या मुळाशी पद्धतशीरपणा असतो. 'विचार' या शब्दास इंग्रजीमध्ये 'Thought' असे म्हणतात. 'Thought means the act of process of thinking.' 'Think' म्हणजे विचार करणे. थिंकर म्हणजे विचार करणारा. त्यामुळे ज्या गद्यलेखनात विशिष्ट विचार हा केंद्रस्थानी असतो त्यास वैचारिक गद्य असे म्हणता येते.

निबंध हा वैचारिक गद्यातील एक लेखनप्रकार आहे. त्याची व्याख्या करताना अनेक अभ्यासकांनी विचार हा निबंधाचा कणा आहे, असे मत व्यक्त केले आहे. म. मा. अळतेकर यांनीही हीच भूमिका घेतली आहे. ते म्हणतात, "एखादा विचार किंवा एखादा मुद्दा सुसंगतपणे ज्यात मांडलेला असतो त्याला निबंध म्हणावयास हरकत नाही." (अळतेकर : १९६३, पृ.५) त्यामुळे वैचारिक गद्यात विचाराला अनन्यसाधारण महत्त्व मिळते, हे लक्षात घेतले पाहिजे.

वैचारिक गद्यातील विचार हा व्यक्ती आणि समाज यांच्या संदर्भाने केलेला असतो. व्यक्ती ही समाजव्यवस्थेमधील विविध संस्था आणि संस्कृतीच्या विविध प्रथा-परंपरांनी बांधलेली असते. उदा. धर्मसंस्था, कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, न्यायसंस्था, शिक्षण, इतिहास, विज्ञान, राज्यव्यवस्था, साहित्य, कला, क्रीडा, निसर्ग आणि जीवसृष्टी इ. या सर्वांचा व्यक्ती आणि समाजावर परिणाम होत असतो. वैचारिक लेखन हे अशा विविध अंगांचा विचार करीत असते.

एकूणच वैचारिक गद्याचा विचार हा प्राण असतो. विशिष्ट विचाराचे प्रतिपादन केल्याशिवाय काही एका निष्कर्षाप्रत जाता येत नाही. विचार हा विचारवंतांच्या चिंतनाचा परिपाक असतो, त्याप्रमाणेच तो वाचकांच्या बुद्धीलाही आवाहन करीत असतो. त्यामुळे 'साधार, सप्रमाण आणि ससंदर्भ विचारप्रतिपादन करणारे लेखन म्हणजे वैचारिक गद्य होय.'

### १अ.३.३ विशिष्ट विषयाची मांडणी:

वैचारिक गद्यात विशिष्ट एक विषय असतो. विषय कोणता असावा यावर बंधन नसते. विशिष्ट विषयाच्या अनुषंगाने वैचारिक गद्य आकारास येत असते. विषय म्हणजे इंद्रिये, मन आणि ज्ञानाच्या आधारे माहीत होणारी कोणतीही बाब किंवा गोष्ट. उदा. साहित्य, समाज, धर्म, शिक्षण, संस्कृती, इतिहास, विज्ञान वगैरे. विषय या शब्दास इंग्रजीमध्ये Theme असे म्हटले जाते. Theme means subject. विषय हा बोलण्याचा असतो वा लिहिण्याचा असतो. विशिष्ट विषयाशिवाय वैचारिक गद्य आकारास येऊ शकत नाही.

विषय म्हणजे प्रश्न किंवा समस्या असेही म्हणता येते. जीवन जगताना मानवी समूहापुढे निर्माण झालेली प्रतिकूल परिस्थिती, निर्माण झालेले विविध अडथळे, कोसळलेली आपत्ती आणि लादलेली बंधने यातून प्रश्न वा समस्या निर्माण होतात. प्रश्न वा समस्या ह्या मानवनिर्मित असतात, तशा निसर्गनिर्मितही असतात. समस्या ह्या स्थानिक, वैयक्तिक असतात तशा जागतिक पातळीवरीलही असतात. वैचारिक गद्यात मानवापुढील विविध प्रश्न आणि समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला जातो.

वैचारिक गद्यात विशिष्ट विषय वा समस्या असल्याशिवाय विचार मांडता येत नाही. लेखक सभोवताल न्याहाळतो, त्यातून विषयाचे स्वरूप लक्षात येते. त्यातील धग आणि काच समजून आल्यानंतर त्यामागील कार्यकारणभाव शोधला जातो. त्यासाठी लेखकाला त्या त्या विषयाचे ज्ञान असले पाहिजे. अभ्यास, निरीक्षण आणि व्यासंग यातून विषयाचे ज्ञान होते. विषयातील विविध पैलू वाचकांपुढे स्पष्ट केले जातात. त्यातून विषय सिद्ध होत जातो.

वैचारिक गद्याचा कोणताही लेखनप्रकार असो, विषय हा महत्त्वाचा असतो. अग्रलेख, निबंध, शोधनिबंध, लेख, प्रकल्प वा पीएच.डी., एम. फिल.चा प्रबंध असा कोणताही लेखनप्रकार असो विषय हा असावाच लागतो. विषय आणि विचार या दोन संकल्पना एकमेकांत सामावलेल्या असतात. जिथे विषय असतो, तिथे विचार असतोच. विषयाच्या अनुरोधानेच विचारप्रक्रिया सुरू होत असते. त्यामुळे वैचारिक गद्य हे विशिष्ट विषयाच्या अनुषंगाने निर्माण होत असते, हे लक्षात घेतले पाहिजे.

### १अ.३.४ वैचारिक गद्याला वास्तवाचा आधार:

वैचारिक गद्याचा अतिशय महत्त्वाचा पैलू म्हणजे वास्तवता. वास्तव म्हणजे काय? हेही समजून घेतले पाहिजे. वास्तव म्हणजे खरे, सत्य, वस्तुनिष्ठ, न्यायपूर्ण, प्रत्यक्ष, भौतिक. म्हणजेच मानवाच्या सभोवताली घडणाऱ्या वास्तव घटनांचा आधार वैचारिक साहित्यात घेतला जातो. कोणत्या ना कोणत्या कालावकाशात त्या घटना घडून गेल्या असल्या पाहिजे. केवळ कल्पनेने एखादी घटना घडवून तिचा संदर्भ वैचारिक गद्यात देता येत नाही. उदा. असे असेल, तसे नसेल, असे वाटले, असू शकेल अशा शक्यतेचे स्वरूप टाळावे लागते.

वास्तव हे इंद्रियानुभव साक्षी असते. कल्पनेचा वा कल्पिततेचा आधार न घेता वास्तवाचा आधार घेतला तर प्रश्न वा समस्येची उकल करणे शक्य होते. जे अस्तित्वातच नाही, त्याविषयी विचारमंथन करणे म्हणजे हवेत वार करण्यासारखे असते. उदा. स्वर्गसुख, नरक, पुनर्जन्म. अशा किती तरी संकल्पना वास्तवातील नाहीत, त्या काल्पनिक आहेत. वैचारिक गद्यात काल्पनिकतेला फाटा दिलेला असतो.

वास्तव हे वास्तव आहे की आभासी वास्तव आहे याचाही विचार झाला पाहिजे. वैचारिक गद्यात आभासी वास्तवाला थारा नसतो. खोटे असूनही खरे वाटावे असे जे जे असते, ते ते आभासी वास्तव असते. चित्रपटातील माणसे खरी वाटतात, तंत्रज्ञानाच्या साह्याने ती आपल्या पुढ्यात येतात, प्रत्यक्षात मात्र ती जिवंत नसतात. आभासी म्हणजे सादृश्य, भ्रमस्वरूपी. प्रत्यक्ष व्यक्ती आणि तिचे आरशातले प्रतिबिंब, यांपैकी प्रतिबिंब हे आभासी असते. वैचारिक गद्य हे वास्तवाच्या आधारे आविष्कृत होत असते, आभासी वास्तवाचा विचार केला जात नाही.

एकूणच वैचारिक गद्यात वास्तवाला प्रमाण मानले जाते. त्यामुळे व्यक्तिनिष्ठतेऐवजी वस्तुनिष्ठतेला प्राधान्य दिले जाते. लेखक आणि त्याचे व्यक्तिमत्त्व यापेक्षा वास्तवाचा प्रभाव लेखनावर पडतो. इंग्रजी भाषेत त्यास ऑबजेक्टिव किंवा फॅक्च्युअल असे म्हणतात. प्रश्न वा समस्येकडे वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहिले जाते. वस्तुस्थिती मांडायची असेल तर कल्पितता उपयोगी पडत नाही.

### १अ.३.५ उद्देश : माहिती, ज्ञान आणि प्रबोधन:

वैचारिक गद्याचे लेखन का केले जाते? त्यामागे कोणता उद्देश असतो? हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. त्यामुळे वैचारिक गद्याचे प्रयोजन लक्षात येते. ललित साहित्य हे भावाभिव्यक्ती, रंजन आणि आत्मशोध या गरजेतून निर्माण होते. अशी गरज वैचारिक गद्याला नसते. वैचारिक गद्य हे विचारप्रधान असते. विशिष्ट विषयाच्या अनुषंगाने ते वाचकांपुढे येत असते. त्यामुळे त्या त्या विषयासंदर्भातील माहिती लेखक देत असतो. त्यातून ज्ञानरचनेची प्रक्रिया सुरू होते. लेखक समजावून सांगत असतो. वाचक समजून घेत असतो.

वैचारिक गद्यात विषय स्पष्ट होणे गरजेचे असते. असे नाही झाले की वाचकांच्या मनात अनेक शंका निर्माण होतात. विषयातील काही बाजू झाकल्या गेलेल्या असतात. त्यामुळे विषय समजावून सांगणे गरजेचे असते. शिक्षक ज्या भूमिकेतून विद्यार्थ्यांपुढे येत असतो, तीच भूमिका वैचारिक गद्य पार पाडत असते. एखादा विषय घेऊन त्यावर सांगोपांग चर्चा

केली जाते. त्यामुळेच 'वैचारिक गद्यास सहेतूक आणि मुद्देसूद विषयनिरूपण करणारे साहित्य' म्हटले जाते.

ज्ञान आणि माहिती देणे हा वैचारिक गद्याचा हेतू असतो. त्यातून समाजप्रबोधनाचे कार्य आपोआप साध्य होते. त्यामुळे समाजप्रबोधनाचे एक साधन म्हणून वैचारिक गद्य समोर येते. आहे त्या स्थितीत बदल झाला पाहिजे, व्यवस्थेला सम्यक वळण मिळाले पाहिजे, समाजमनाला सुयोग्य दिशा मिळाली पाहिजे, वस्तुस्थिती समोर आली पाहिजे, असे किती तरी हेतू उराशी बाळगून वैचारिक गद्य आविष्कृत होत असते.

### १अ.३.६ तर्कशुद्ध प्रतिपादन:

वैचारिक लेखनात तर्कशुद्ध प्रतिपादन असते. तर्क म्हणजे अनुमान. शुद्ध याचा अर्थ निर्दोष किंवा स्वच्छ. तर्कशुद्ध म्हणजे मांडलेले अनुमान, कल्पना, विचार किंवा सिद्धांत यात शुद्धता असणे. तर्कशुद्धता येण्यासाठी कार्यकारणभाव दृष्टीची गरज असते. प्रतिपादन म्हणजे विविध बाबींचे निरसन करून विशिष्ट निष्कर्ष प्रतिष्ठित करणे. त्यामुळे तर्कशुद्ध प्रतिपादन करणे हा वैचारिक गद्याचा फार मोठा विशेष आहे.

वैचारिक साहित्यात एखादा विषय वा विचार स्पष्ट करताना तार्किक संगती लावणे आवश्यक असते. एका वाक्याचा आशय दुसऱ्या वाक्यावर अवलंबून असतो. पहिल्या मुद्यावर पुढचा मुद्दा आधारलेला असतो. कार्यकारणाची ही शृंखला शेवटपर्यंत टिकवून ठेवलेली असते. उदा. 'सुशिक्षित बेकारी वाढत आहे.' हे विधान सिद्ध करण्यासाठी अनेक कारणे द्यावी लागतात. ती कारणे विविध पुराव्यानिशी स्पष्ट करावी लागतात. पुराव्यांना वास्तवाचा आधार असला पाहिजे. यातून तर्कशुद्ध प्रतिपादन होते.

तर्कशुद्ध प्रतिपादनात लॉजिक असते. काही घटितांचा आधार असतो. घटितांना सहा प्रश्न विचारून वस्तुस्थिती तपासली जाते. काय, कुठे, कधी, कोणी, का, कसे? अशा प्रश्नांची उत्तरे शोधली तर तर्कशुद्ध प्रतिपादन करता येते. प्रश्न विचारून सत्य हे सत्य आहे का? वा असत्य हे असत्य आहे का? याचा शोध घेतला जातो. ग्रीक तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस याने 'डायलेक्टिक पद्धती' चा अवलंब करून सत्याचा शोध घेता येतो, याविषयी चर्चा केली.

एकूणच वैचारिक गद्यात प्रतिपाद्य विषयाचे प्रत्येक अंग तपासले जाते. एका ठाम निष्कर्षाकडे वाचकांना घेऊन जाण्यासाठी तर्कशुद्ध प्रतिपादन आवश्यक असते. तार्किकतेमुळेच वैचारिक गद्य हे गंभीर स्वरूप धारण करते. त्यामुळेच वैचारिक गद्य हे शास्त्रीय लेखन नसूनही शास्त्रीय वाटू शकते.

### १अ.३.७ ससंदर्भता हा वैचारिक गद्याचा विशेष:

वैचारिक गद्याचे लेखन हे ससंदर्भ होत असते. त्यासाठी आवश्यक ते संदर्भ द्यावे लागतात. एखादा विषय वा एखादी समस्या समजावून सांगण्यासाठी एखादा पुरावा, साक्ष, उदाहरण किंवा घटना द्यावी लागते. असे नाही केले तर प्रतिपाद्य विषय पुरेसा स्पष्ट होत नाही. संदर्भाचे स्वरूप दोन प्रकारचे असते. विशिष्ट संदर्भात व्यक्त होणे, याचा अर्थ स्थल-काल-परिस्थिती यांचे भान ठेवून विषयाची मांडणी करणे. दुसरा संदर्भ हा पुरावा किंवा साक्ष

munotes.in

म्हणून येतो. आपले मत वा निष्कर्ष मांडण्यासाठी कोणत्या ना कोणत्या पुराव्याची गरज असते; तो पुरावा म्हणजे संदर्भ.

एखादा विषय स्पष्ट करताना फक्त विधान करून चालत नाही. विधान स्पष्ट करण्यासाठी एखाद्या मताचा आधार द्यावा लागतो. इतिहासातील एखादी घटना असेल, व्यक्ती असेल, वास्तू वा वस्तू असेल, पत्र वा नोंद असेल, दाखले-प्रमाणपत्र वा मानपत्र यांचा संदर्भ म्हणून वापर केला जातो. इतिहास लेखकाचे मतही संदर्भ म्हणून घेतले जाते. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र अशा अनेक शास्त्रांतील सिद्धांताचा संदर्भ म्हणून उपयोग केला जातो. उदा. डार्विनचा उत्क्रांतवाद, अल्बर्ट आईन्स्टाईनचा सापेक्षतावाद. संदर्भाशिवाय लेखन झाले त्यावर विश्वासार्ह मानता येत नाही.

जोतीराव फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकात ‘मनुस्मृती’मधील काही दाखले देऊन विचार स्पष्ट केला आहे. पुराणातील विविध अवतार ही कल्पना लौकिक स्वरूपात स्पष्ट करताना विज्ञानाचा आधार दिला आहे. एखाद्या मताचे खंडन करण्यासाठी वा मताची बाजू घेण्यासाठीसुद्धा संदर्भांची गरज भासते. त्यामुळे वैचारिक गद्य हे ससंदर्भ असते, हे लक्षात घ्यावे लागते.

### १अ.३.८ निष्कर्षाप्रत जाणारा लेखनप्रकार:

वैचारिक गद्याचा आरंभ हा विशिष्ट विषय, प्रश्न वा समस्येतून झालेला असतो. मधल्या भागात विषय सिद्ध करण्यासाठी विविध संदर्भ आणि दाखले देऊन विश्लेषण केले जाते. शेवट मात्र निष्कर्षरूपात होत होतो. त्यामुळे त्या त्या विषयासंदर्भात वाचकांचे पूर्ण समाधान होते. विवेचनातून लेखक निवडलेल्या समस्येवर काही उत्तरे, उपाय वा मार्ग सांगतो. त्यालाच निष्कर्ष असे म्हटले जाते.

निष्कर्ष हा वैचारिक गद्याचा अंतिम भाग असतो. साररूपाने लेखक त्याने घेतलेला शोध वा चिकित्सा मांडत असतो. त्यानंतर विश्लेषण करण्याची गरज भासत नाही. त्यामुळे निष्कर्ष हा वैचारिक गद्याची पूर्णत्वाची निशाणी आहे, असे म्हणता येते. वाचकांच्या मनात काही शंका बाकी असतील तर ते लेखन अपूर्ण वा आणखी कच्च्या स्वरूपात राहिले आहे, असे मानावे लागते. ती त्या लेखकाची मर्यादा वा दोष मानावा लागतो.

एकूणच वैचारिक गद्याचा शेवट हा विशिष्ट निष्कर्ष किंवा उत्तर स्वरूपात होणे अपेक्षित असते. वाचकांना विषय, प्रश्न वा समस्येतून बाहेर काढणे आवश्यक असते. अर्धवट माहिती दिली तर ते कार्य साध्य होऊ शकत नाही. त्यामुळे रचनेत निःसंदिग्धता येते. क्रमशः विषय मांडत असताना एखादा विचार अर्धवट सोडून दिला तर आशयदृष्ट्या विस्कळीतपणा येतो. गृहीत निष्कर्षाप्रत जाणे अवघड होते.

### १अ.३.९ बुद्धिप्रामाण्यवादाला महत्त्वाचे स्थान:

वैचारिक गद्यात अनेक तत्त्वांचा निर्देश होतो. उदा. व्यक्तिवाद, विवेकवाद, इहवाद, विज्ञाननिष्ठा आणि बुद्धिवाद. या तत्त्वांचे साररूप म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद. वैचारिक गद्यात बुद्धिप्रामाण्यवाद असतो. ग्रंथप्रामाण्याचे दुसरे टोक म्हणजे बुद्धिप्रामाण्य. एखाद्या पुराणग्रंथात वा कोणत्याही ग्रंथात दिलेले वचन, विचार, नियम, मत, घटना, दाखला,



munotes.in

उदाहरण हे खरे आहे वा प्रमाण आहे असे मानून विचार-व्यवहार करणे म्हणजे ग्रंथप्रामाण्य. याविरुद्ध बुद्धिप्रामाण्य असते.

बुद्धिप्रामाण्यवाद हा बुद्धीला प्रमाण मानतो. बुद्धीला याचा अर्थ केवळ स्वतःच्या बुद्धीला नव्हे. बुद्धीलाही मर्यादा असू शकतात. बुद्धिवाद ही एक प्रक्रिया असते. इंद्रियानुभव, निरीक्षण, अनुमान, प्रयोग, तपासणी, प्रश्नचिकित्सा, पुन्हा अनुभव आणि सारासार विचार यातून बुद्धिवाद ही प्रक्रिया घडत जाते. जोडीला विवेकवाद असतो. बुद्धी ही विनाशकारी वा संहारी असू शकते. विवेक हा चराचरहितपर विचार-वर्तन करण्यास भाग पाडतो. सोबत विज्ञाननिष्ठ आणि इहवाद असतो. या सर्वांचा परिपाक म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद.

एकूणच वैचारिक गद्यात जी चर्चा करावयाची असते ती निसर्गासह मानवाच्या सुख-दुःखाची. जे कधी पाहिले नाही, अनुभवले नाही अशा पारलौकिक, अभौतिक जगाविषयीचे चिंतन वैचारिक गद्यात केले जात नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती, करुणा, सम्यक परिवर्तन आणि सहिष्णुता अशा मानवी मूल्यांचा पुरस्कार बुद्धिप्रामाण्यवादात केला जातो. त्यामुळे वैचारिक गद्यलेखनात बुद्धिप्रामाण्यवादाला महत्त्वाचे स्थान दिले जाते, हे लक्षात घेतले पाहिजे.

### १अ.४ वैचारिक गद्याचे वेगळेपण:

वैचारिक गद्य हे इतर साहित्यप्रकारांपासून वेगळे असते. हे वेगळेपण आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने शोधता येते. ललित साहित्यापासूनचे त्याचे वेगळेपण समजून घेतले तर वैचारिक गद्याची मूळ प्रकृती लक्षात येते. वस्तुतः यापूर्वी वरील मुद्यांच्या माध्यमातून वैचारिक गद्याच्या स्वरूपाचे केलेले विश्लेषण हे त्याचे ललित साहित्यापासूनचे वेगळेपण सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहे. असे असले तरी स्वतंत्रपणे वैचारिक गद्याच्या वेगळेपणाची नोंद घेता येईल. यातून ललित साहित्य आणि वैचारिक गद्य यांची तुलना होऊ शकते.

### १अ.४.१ आशयाच्या अंगाने वेगळेपण:

वैचारिक गद्य आणि ललित साहित्य यात आलेला आशय हा एकसारखा वाटू शकतो. मात्र त्यात काही एक फरक असल्याचे लक्षात येते. कथा, कविता, कादंबरी आणि नाटक हे ललित साहित्याचे प्रमुख प्रकार मानले तर त्यातला आशय आणि एखाद्या वैचारिक गद्यातला आशय यात कमालीचा फरक असल्याचे लक्षात येते.

प्रत्येक साहित्यकृतीला आशय आणि अभिव्यक्ती, अशी दोन अंगे असतात. आशय हे साहित्यकृतीचे अंतरंग तर अभिव्यक्ती हे बहिरंग असते. साहित्यकृतीमधील मध्यवर्ती संकल्पना, विचारसूत्र, विचारप्रणाली किंवा आशयद्रव्य म्हणजे आशय. तो आशय वाचकांपर्यंत कशा पद्धतीने, कोणत्या रूपात आणि कोणत्या माध्यमातून पोहचवायचा, त्यास अभिव्यक्ती किंवा आविष्कार असे म्हणतात. लेखक, साहित्यप्रकार, परिस्थिती किंवा काळ यानुसार आशयाभिव्यक्तीत बदल होत असतो. हा बदल साहित्यकृतीलाही बदलवून टाकत असतो.

ललित साहित्यातील आशय हा आत्मनिष्ठ असतो. त्यात लेखकाचा आत्मिक अनुभव असतो. तो लेखकाच्या जीवनजाणिवांशी निगडित असतो. लेखकाचे व्यक्तिमत्त्व ललित

munotes.in

साहित्यात दिसते. आत्मानुभूतीच्या आधारे ललित साहित्य आकारास येत असते. वैचारिक गद्यातील आशय मात्र वस्तुनिष्ठ असतो. सभोवतालच्या घडामोडिंकडे लेखक हा अभ्यासक, निरीक्षक आणि संशोधकाच्या दृष्टिकोनातून त्रयस्थपणे पहात असतो. वैचारिक गद्यात लेखक दिसत नाही, त्याने मांडलेला आशय लक्षात येतो. साहित्य वास्तवाच्या आधारे आकारास येत असते.

ललित साहित्याचा लेखक आलेल्या अनुभवाचे आंतरिकीकरण करीत असतो. रंगनाथ पठारे यांच्या 'नामुष्कीचे स्वगत' या कादंबरीतील जागतिकीकरणाचा अनुभव हा आंतरिकीकरण होऊन आला आहे. वैचारिक गद्याचा लेखक हा अनुभवाचे सामान्यीकरण (जनरलायझेशन) करतो. त्यामुळे अनुभूतीला सार्वजनिकतेची पातळी मिळते. उदा. जोतीराव फुले यांच्या लेखनात शेतकऱ्यांविषयी आलेला अनुभव हा सामान्यीकरण होऊन सार्वत्रिक स्वरूपात वाचकांपुढे आला आहे.

ललित साहित्यील जग हे कल्पित जग असते. व्यक्तिरेखा, घटना-प्रसंग, स्थळ-ठिकाण आणि वातावरण यांना लेखक स्वतःचे रंग देत असतो. त्यामुळे ललित साहित्यातील आशयाला भावात्म, कथनात्म आणि नाट्यात्म स्वरूप प्राप्त होते. वैचारिक गद्यातील जग मात्र वास्तवातील असते. लेखक सभोवतालच्या घडामोडींना स्वतःचे रंग देऊ शकत नाही. त्यामुळे वैचारिक गद्यातील आशय हा विचारप्रतिपादन, विषयविश्लेषण रूपाने वाचकांपुढे येतो.

ललित साहित्यातील कथा, कादंबरी आणि नाटकात विविध आशयसूत्रे असतात. कवितेत भावसूत्रे असतात. आशयाचे अनेक पदर समोर येतात. त्यामुळे आशयसूत्र आणि भावसूत्राच्या अनुषंगाने ललित साहित्य आकारास येत असते. वैचारिक गद्यातील लेखनाचा आशय मात्र बहूपदरी नसतो. विशिष्ट एक विषय, प्रश्न वा समस्या स्पष्ट करण्यातून ते आकारास येत असते. वैचारिक गद्यात आशयाचे विशिष्ट एक केंद्र असते. उदा. 'सामाजिक सुधारणा' हे गोपाळ गणेश आगरकर यांच्या लेखनाचे केंद्र होते.

ललित साहित्यातील आशय हा अनेक वेळा सूचकतेने येतो. ही सूचकता पद्यरचनेत अधिकाधिक येते. शब्दालंकारामुळे रचनेत सौंदर्य निर्माण होते तर अर्थालंकारामुळे आशय सूचक बनतो. उदा. 'आभाळागत'-(उपमा), 'देह देवाचे मंदिर'- (रूपक), 'एक तीळ सातजणांनी खाल्ला'-(अतिशयोक्ती). ही उदाहरणे सूचक आशय व्यक्त करणारी आहेत. वैचारिक गद्यातील आशय मात्र सूचकता टाळून स्पष्ट रूपात येतो. अलंकारांचा उपयोग तारतम्याने केला जातो. त्यामुळे कमित कमी सूचकता येते. उदा. 'घातक वचनावर हरताळ लावा.' (देशमुख : १९६७, पृ.२७४) या वाक्याचा आशय हा स्पष्ट आहे, सूचक नाही. यावरून वैचारिक गद्याचे ललित साहित्यापासूनचे वेगळेपण सहज लक्षात येते.

वैचारिक गद्यात लौकिक आणि ऐहिक पातळीवरील आशय व्यक्त होत असतो. मानवाच्या भूत, वर्तमान आणि भविष्यकालीन प्रश्नांचा वेद घेतला जातो. उदा. शिक्षण, आरोग्य, सुविधा, भ्रष्टाचार, नैसर्गिक आपत्ती, नोकरी, संरक्षण, प्रदूषण, शेती, उद्योग, विज्ञान, वर्तन, स्वातंत्र्य वगैरे. ललित साहित्यात लौकिकासह आध्यात्मिक, अभौतिक आणि श्रद्धेच्या पातळीवरीलसुद्धा आशय व्यक्त होत असतो. उदा. सारी ईश्वराची लेकरे, नैतिकता, कल्याण वगैरे.

एकूणच वैचारिक गद्यातील आशय हा प्रबोधनात्म अंगाने व्यक्त होत असतो. ज्यातून विविध स्वरूपाची आणि विविध क्षेत्रातील माहिती दिली जाते. ज्ञानरचनावादाला पोषक असा आशय मांडण्याकडे अधिकाधिक कल असतो. प्रश्नांची उकल होईल, हे प्रयोजन त्यात असते. संदिग्धता आणि सूचकता टाळली जाते. मानवाच्या ऐहिक प्रश्नांना प्राधान्य दिले जाते. देव, धार्मिक कर्मकांड, प्रथा, परंपरा यांकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहिले जाते. सारासार विचार केला जातो. आत्मनिष्ठेपेक्षा वस्तुनिष्ठतेचा पुरस्कार केला जातो. बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारून लेखन केले जाते. वाचक गोंधळात पडणार नाहीत याची काळजी घेतली जाते.

### १अ.४.२ अभिव्यक्तीच्या अंगाने वेगळेपण:

वैचारिक गद्याचे ललित साहित्यापासूनचे वेगळेपण हे अभिव्यक्तीच्या अंगानेही तपासता येते. साहित्यातील विविध भाग आणि भाववर्णन करण्यासाठी आणि सांगण्यासाठी वापरली जाणारी संकल्पना म्हणजे अभिव्यक्ती. चित्रकलेत रंग आणि रेषांच्या माध्यमातून अभिव्यक्ती होते. शिल्पकलेत दगड वा धातूच्या माध्यमातून अभिव्यक्ती होते. संगीतात स्वर आणि तालाच्या माध्यमातून अभिव्यक्ती होते. त्याप्रमाणे साहित्यात भाषिक रचनेच्या माध्यमातून अभिव्यक्ती होत असते. साहित्यात बाह्यवास्तवाची अभिव्यक्ती असते तशी आंतरिक भावकल्लोळाची, कल्पनांची आणि अशारीर जाणिवांचीही अभिव्यक्ती असते. वैचारिक गद्याची अभिव्यक्ती आणि ललित साहित्याची अभिव्यक्ती यातील फरक लक्षात घेता येतो.

ललित साहित्याची भाषा आणि वैचारिक गद्याची भाषा यात फरक आढळतो. ललित साहित्यात भाषा हे माध्यम ठरते तर वैचारिक गद्यात ते साधन ठरते. साहित्यप्रकारागणिक भाषा ही बदलत जाते. 'भाषेला कुठल्यातरी साहित्यप्रकाराचा एक बाह्य संदर्भ सकृतदर्शनीच प्राप्त होतो.' (नेमाडे : १९९८, पृ.१३) पद्यरचनेत क्रियापदे वगळली जातात. गद्यात पूर्णार्थाची वाक्ये येतात. कथा-कादंबरीत कथनपर आणि वर्णनपर भाषा तर नाटकात संवादमय भाषा येते. वैचारिक गद्यात मात्र भाषा ही विश्लेषण स्वरूपात येते.

वैचारिक गद्याची भाषा विश्लेषण स्वरूपात येते याचा अर्थ व्याकरणिक नियम पाळून येते. वैचारिक गद्यात प्रत्येक वाक्य हे पूर्ण अर्थ व्यक्त करणारे असते. वैचारिक गद्याला अनेकार्थता वर्ज्य असते. त्यामुळे अशीच भाषा वापरली जाते, जिच्यातून संकल्पित विचार वा प्रतिपाद्य विषय विनाअडथळा स्पष्ट होईल. उदा. 'मला मातृभूमी नाही.' किंवा 'माझ्या देशातील लोक मला आपले मानत नाहीत.' या दोन्ही वाक्यांचा अर्थ एकच आहे. असे असले तरी पहिले वाक्य अनेकार्थसूचक आहे तर दुसरे वाक्य एकच अर्थ उघड करते. यावरून वैचारिक गद्याची भाषा एकपदरी संदेशवहन करते तर ललित साहित्याची भाषा ही अनेकपदरी संदेशवहन करते, असे म्हणता येते.

नियमोल्लंघन हा शैलीचा एक विशेष असतो. ललित साहित्यात सातत्याने नियमोल्लंघन होत असते. रूढ वा प्रमाण शब्द, शब्दसमूह वा वाक्यरचना मोडून त्याऐवजी नवीन रूपांचा वापर केला जातो. त्यामुळे प्रभावक्षमता वाढत जाते. उदा. 'प्रौढ' या रूपाऐवजी दणकट, भारदस्त, बलवान, अशी रूपे योजली जातात. वैचारिक गद्यात मात्र हे नियमोल्लंघन चालत नाही, किंबहुना फार मंद गतीने चालते. जोपर्यंत ललित साहित्यातील भाषिक रूपे जनमानसात रूळत नाहीत, स्थिर होत नाहीत, तोपर्यंत ती वैचारिक गद्यात वापरली जात

नाहीत. अभिव्यक्तीच्या प्रभावक्षमतेपेक्षा नियोजित अर्थ व्यक्त प्राधान्य देण्याकडे लेखकाचा कल असतो.

ललित साहित्याची भाषा ही साहित्यभाषा असते. ती अनेकार्थता व्यक्त करीत असते. वैचारिक गद्याची भाषा ही शास्त्रभाषा नसली तरी ती शास्त्रभाषेच्या जवळ जाणारी असते. शास्त्रागणिक पारिभाषिक शब्द हे बदलत जातात. वैचारिक गद्यातील शब्दही त्या त्या क्षेत्रानुसार बदलत जातात. उदा. वृत्तपत्रीय बातम्या, शासकीय अहवाल, राजकारण, शिक्षण अशा विविध क्षेत्रातील शब्द हे वेगळे आणि रूढ झालेले असतात. त्यामुळे वैचारिक गद्याची भाषा ही सुस्पष्ट अर्थ व्यक्त करणारी असते. एका शब्दाला पूर्वनिश्चित असा एकच अर्थ मिळालेला असतो. असे असले तरी वैचारिक गद्याची भाषा लेखकागणिक बदलू शकते. लोकमान्य टिळकांनी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अग्रलेख लिहिले आहेत मात्र दोघांच्या भाषेत कमालीचा फरक जाणवतो. त्यामुळे साहित्यभाषा आणि शास्त्रभाषा या दोन्हींचे गुणविशेष वैचारिक गद्याच्या भाषेत आढळतात.

वैचारिक गद्याची अभिव्यक्ती ही सुसंघटित रूपात होत असते. त्यात विस्कळितपणा नसतो. वैचारिक गद्यातील निबंधाचा घाट स्पष्ट करताना रा. ग. जाधव यांचे प्रतिपादन लक्षात घ्यावे लागते. ते म्हणतात, "केवळ विषयाच्या अंगोपांगाची संयुक्तिक उकल करून हा घाट प्राप्त होईलच असे नाही, तर त्याला ओघवते प्रतिपादन, त्यातील सुबोधता, सुस्पष्टता, मार्मिक दृष्टांतादी अलंकार, चपखल युक्तिवाद, नर्म विनोदस्थळे, वेधक भाषाशैली, विचारांचे नावीन्य व एकूण अभिव्यक्तीचे स्वारस्य इत्यादींनी डौल प्राप्त होतो." (जाधव : १९७९, पृ.६३८) यावरून वैचारिक गद्याची अभिव्यक्ती ही ललित साहित्यापेक्षा वेगळी असते, हे लक्षात येते.

## १आ. स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक गद्यामागील प्रेरणा

स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक गद्यामागील प्रेरणा लक्षात घेत असताना, प्रेरणा म्हणजे काय? याचा शोध घेतला पाहिजे. 'प्रेरणा' या शब्दाला इंग्रजीत 'Motivation' असे म्हणतात. मोटिव्हेशन म्हणजे प्रेरित होणे. प्रेरणा या शब्दात 'स्फूर्ती' देणे वा घेणे, असाही अर्थ अभिप्रेत आहे. चालना देण्यासाठी प्रेरणेची गरज असते. 'एखादा संकल्प, एखादे ध्येय किंवा उद्दिष्ट समोर ठेवून ते पूर्ण करण्यासाठी साधन म्हणून प्रेरणा उपयोगी पडते.

आंतरिक प्रेरणा आणि बाह्य प्रेरणा, अशा दोन प्रकारच्या प्रेरणा असतात. आंतरिक आणि बाह्य. यातील बाह्य प्रेरणा ही परिस्थिती, घटना, कृती आणि व्यक्ती यांच्यापासून मिळत असते. स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक गद्यामागील प्रेरणा ही बाह्य स्वरूपाची आहे याची प्रचीती येते. १८१८ ते १९४७ हा शंभर-सव्वासे वर्षांचा मोठा काळ हा पारतंत्र्याचा काळ होता. या काळातील वैचारिक गद्यामागील राजकीय, सामाजिक आणि प्रबोधन चळवळींच्या प्रेरणा कशा प्रकारच्या होत्या हे अभ्यासता येईल.

### १आ.१ राजकीय प्रेरणा:

राज्यकारभारविषयक घडामोडींतून मिळालेल्या प्रेरणेस राजकीय प्रेरणा म्हटले जाते. इंग्रजांनी १६६१ मध्ये मुंबई बेटाचा ताबा घेतला होता. 'ईस्ट इंडिया कंपनी'चा कारभार

सुरू केला. १८१८ मध्ये पेशवाई संपली, १८२३ पासून सबंध भारतावर ब्रिटिश सत्ता राज्य करू लागली. परकीय सत्तेच्या छायेत भारतीयांचे जीवन सुरू झाले. इंग्रजांनी किती तरी सुधारणा केल्या. राजकीय स्वातंत्र्य मात्र दिले नाही. ब्रिटिश राजवटीत होणारी कोंडी अनेक शिक्षित तरुण अनुभवत होते. त्याविरुद्ध निर्माण झालेल्या चळवळीत कार्य करीत होते. त्यांनी स्वदेश, ब्रिटिश राजवट, राज्यपद्धती, पारतंत्र्य, इंग्रजांची नीती यांचा अनुभव घेतला. त्यावर लेखन केले. त्यामधून वैचारिक गद्यामागील राजकीय प्रेरणा समजून घेता येते.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्वदेशप्रीतीच्या प्रेरणेने खूप लेखन झाले आहे. ब्रिटिश सत्तेने भारतात अनेक सुविधा आणल्या असल्या तरी आपल्या देशावरचे भारतीयांचे प्रेम कमी झाले नाही. स्वधर्म, स्वभाषा आणि स्वदेश याविषयी अभिमान बाळगले जात होते. हरि केशवजी पठारे यांना इंग्रज अधिकाऱ्यांचा सहवास मिळाला. इंग्रजी भाषा, साहित्य, संस्कृती, ख्रिस्ती धर्म यांचा परिचय होऊनही ते इंग्रजी संस्कृतीच्या प्रभावाखाली आले नाही. आपल्या देशावरचे प्रेम व्यक्त करण्यासाठी त्यांनी 'स्वदेश प्रीती' हा निबंध लिहिला. देशात ऐश्वर्य येण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी हव्यात, हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी १८५१ मध्ये 'देशव्यवहारव्यवस्था' हे पुस्तक लिहिले.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या लेखनात स्वदेशप्रीतीबाबतचे विवेचन दिसते. अनेकवेळा ब्रिटिशांच्या सामाजिक सुधारणांविषयी एतदेशीय विचारवंतानी केलेले गौरवीकरण याविषयी त्यांना वैषम्य वाटते. भास्कर बळवंत भोपटकर यांनी सुरू केलेले 'भाला' हे पत्र 'मायदेशाच्या हितासाठी भाला काम करणार' या भूमिकेतून वावरत होते. त्यातील सर्व लेखन हे राजकीय स्वरूपाचे होते. 'भिणार की भिडणार?', 'बाप राष्ट्रवीर तर लेक धर्मवीर' अशा शीर्षकांचे त्यांचे लेख स्वदेशप्रीतीच्या प्रेरणेने लिहिले गेले आहेत.

इंग्रजी राज्यपद्धतीवर टीका करण्याच्या दृष्टीने त्या काळी अनेक विचारवंत लिहीत होते. वैचारिक गद्यलेखनात भाऊ महाजन यांनी स्वदेश आणि स्वभाषेचा अभिमान बाळगला. राजकीय गुलामगिरी लादून स्वदेशाला लुटणाऱ्या इंग्रजांच्या राज्यपद्धतीवर त्यांनी टीका केली. 'हिंदुस्थानातून द्रव्य जाते ते बंद झाल्याशिवाय देशाची बरी गत नाही... नेटिव लोकांस इंग्रज लोक तर केवळ तृणपाय मानतात.' (महाजन : १९८४, पृ.७७) भाऊ महाजन यांनी इंग्रजांची राज्यपद्धती ही आपल्या देशासाठी किती चुकीची आहे, याकडे लक्ष वेधतात. आपल्या लोकांना कमी लेखने ते सहन करीत नाहीत. बाळशास्त्री जांभेकर यांनी 'इंग्लंड देशातील राज्यरीतीत बदल करण्यासंबंधी यत्न' या लेखात सर्वसामान्य माणसाकडे सत्ता असली पाहिजे, ही दृष्टी बाळगली. या पार्श्वभूमीवर लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख, न्या. महादेव गोविंद रानडे यांनी मात्र इंग्रजी राजवटीचे स्वागत केले होते.

जोतीराव फुले यांनीही ब्रिटिश राजवटीचे मूल्यमापन केले आहे. ब्रिटिशांच्या व्यापारी नीतीमुळे इथले कुटीर उद्योग बंद पडले. शेतीवरचा शेतसारा वाढवला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अधोगतीला इंग्रज सरकार कारणीभूत आहे, असा निष्कर्ष जोतीराव फुले काढतात. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी तर ब्रिटिश साम्राज्यवादाला कडाडून विरोध केला. ब्रिटिशांच्या राजवटीमुळे भारतीयांना दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे, अशी भूमिका शि. म. परांजपे यांनी घेतली.

munotes.in

स्वराज्यनीतीचा पुरस्कार करण्याच्या दृष्टीने लेखक लिहीत होते. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' (१८६७) आणि 'वेदोक्त धर्मप्रकाश' (१८५९) या ग्रंथातील 'राजनीति' या प्रकरणात राज्यकारभाराच्या संदर्भाने आपले विचार मांडले आहेत. राज्यकारभार निःपक्षपाती असला पाहिजे. राज्य हे घर तर प्रजा हे कुटुंब असते. खाजगी मालमत्ता संपून सामाजिक मालकी प्रस्थापित होणारे राज्य निर्माण झाले पाहिजे, अशी भूमिका विष्णुबुवा मांडत होते. या मांडणीत स्वराज्यनीतीचा केलेला पुरस्कार आढळतो.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी ब्रिटिश साम्राज्याला विरोध केला होता. या परंपरेत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नाव गडद अक्षरात नोंदवावे लागते. इंग्रजांचे राजकारण आपल्या लोकांना कळावे, या प्रेरणेने ते लिहीत होते. ब्रिटिशांच्या नोकरशाहीवर जहरी टीका केली. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' 'उजाडले पण सूर्य कुठे आहे?' असे प्रश्न त्यांनी ब्रिटिशांना विचारले. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांचा तीव्र अभिमान बाळगून त्यांनी लेखन केले.

शि. म. परांजपे यांनीही राजकीय विषयाच्या अनुषंगाने लेखन केले आहे. ब्रिटिशांची राजवट संपवता येते हा विश्वास त्यांनी आपल्या लेखनातून मांडला. राजकीय स्वातंत्र्य या विषयाने ते प्रेरित झाले होते. न. चि. केळकर यांच्या लेखनातही देशाभिमानाची तळमळ व्यक्त झाली आहे. त्यांनी विचारलेला 'पिशवीचे तोंड कोणाच्या हातात राहणार?' हा प्रश्न टिळकशैलीची आठवण करून देतो.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे विचार ब्रिटिश साम्राज्यावर सरळ सरळ आघात करणारे होते. 'स्वराज्याची शिष्टाई' हा लेख त्यांनी टिळकांचा गुणगौरव करण्यासाठी लिहिला आहे. त्यांचे टिळकांवर लिहिलेले सर्व लेख राजकीय विचारांनी प्रेरित झालेले आहेत.

अ. ब. कोल्हटकर यांचे लेखन हे स्वातंत्र्यप्राप्ती आणि स्वदेशप्रीती या प्रेरणेने लिहिलेले आहेत. राष्ट्रीय हित जोपासण्यासाठी देशभक्ती आणि सत्यनिष्ठा यात वाढ झाली पाहिजे, असे त्यांना वाटत होते. मातृभूमी पारतंत्र्यात असताना तरुण झोपलेले आहेत, अशा तरुणांना ते 'तरुण मनुष्या ऊठ!' अशी हाक देतात. स्वदेशासाठी त्याग करण्यास सांगतात. वि. का. राजवाडे यांचे लेखन इतिहास संशोधनाच्या मार्गाने जात असले तरी त्यात राष्ट्रहिताचाच विचार असल्याचे आढळते.

एकूणच स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय प्रेरणेने लेखन करणारे अनेक विचारवंत होते. इंग्रजी राजवटीमुळे आपल्या लोकांचे कधीही कल्याण होणार नाही, असे त्यांना वाटत होते. इंग्रजांची गुलामगिरी उलथवून टाकली पाहिजे, स्वदेशाविषयी प्रेम वाढले पाहिजे, स्वदेशाचा अभिमान बाळगला पाहिजे, त्यासाठी स्वराज्य निर्माण केले पाहिजे, या विचाराने प्रेरित होऊन लेखन होत होते.

**१.आ.२ सामाजिक प्रेरणा:**

स्वातंत्र्यपूर्व काळात राजकीय प्रेरणेने लेखन होत होते त्याप्रमाणे सामाजिक प्रेरणेनेही लेखक लिहीत होते. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापेक्षा समाजातील घातक चाली संपल्या पाहिजे, हा विचार अनेक लेखक मांडत होते. आपल्या देशावर परकियांनी गुलामगिरी लादली तशी स्वकियांनीही लादली आहे. ती संपून समाजपरिवर्तन झाले पाहिजे. धर्माच्या

नावाखाली माणसांची कोंडी होत आहे. अंधश्रद्धा वाढत आहे. या प्रश्नांतून भारतीयांची सुटका व्हावी असे अनेकांना वाटत होते. समाजातील विविध प्रश्नांवर ते विचार मांडत होते. त्या दृष्टीने वैचारिक गद्याचे लेखन झालेले आढळते.

समाजपरिवर्तनासाठी समाज ज्ञानी झाला पाहिजे. शिक्षण घेण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. अशी दृष्टी बाळगून आरंभीच्या काळात स.का. छत्रे यांनी शालेय अभ्यासक्रमासाठी इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद मराठीत केला. हरि केशवजी पठारे यांचीही अशीच दृष्टी होती. तुलनेने बाळशास्त्री जांभेकर यांनी मात्र आपल्या लेखनात पुरोगामी विचार मांडले आहेत. त्यांनी 'दर्पण'मधून 'विद्या हे बळ आहे', 'हिंदुस्थानातील नाच तमाशे हा गुलामगिरीचा एक प्रकार आहे' अशा अनेक विषयांवर लेखन केले. निरपेक्ष समाजसेवा या भावनेतून ते विचार मांडत होते.

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी धर्मसुधारणेला प्राधान्य दिले. धर्माच्या आधारे समाजात चालत असलेल्या चालीरीती संपणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटत होते. मानवाच्या प्रगतीआड येणाऱ्या अनिष्ठ रूढींवर ते बोट ठेवत. "नवरा मेला असतां त्याच्या बायकोने सती जाणे अथवा तिचे वपन करवावे, असा आमच्या ज्ञातींत कुलाचार आहे; या प्रमाणे जीवांस त्रासदायक असे एकादे कर्म करणे हा आमचा वृद्धपरंपरागत धर्म चालत आला आहे, तो आम्हास केला पाहिजे म्हणून हट्ट घेऊन बसला तर, अशा प्रसंगी त्याजवर बलात्कार करून त्याजकडून ह्या दुष्ट रूढी मोडविल्या पाहिजेत." (तर्खडकर : १९६६, ८४ व ८५) यावरून या काळातील लेखक मंडळी सामाजिक सुधारणेच्या प्रेरणेने भारावून गेले होते, हे लक्षात येते.

गो. ना. माडगावकर यांचे लेखन नव्या पिढीमध्ये नीती आणि ज्ञानाची वाढ व्हावी, या प्रेरणेने झाले आहे. समाजसुधारणेसाठी समाजात नीती वाढावी, जुनाट रीतीत बदल व्हावा, दारू-तंबाकूपासून दूर जावे, उद्योगधंद्यांची सुरुवात करावी असे त्यांना वाटत होते. 'मादक पदार्थ', 'दारुपासून अनर्थ' सारखे निबंध याची प्रचीती देतात.

मिसेस फेरार यांनी 'कुटुंबप्रवर्तननिती' या लेखात कुटुंबातील नीती आणि वर्तन यात योग्य बदल झाला पाहिजे, ही भूमिका घेतली. कुटुंबसंस्थेत सुधारणा म्हणजे समाजात सुधारणा करण्यासारखे आहे, असे त्यांना वाटत होते. तुलनेने लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांनी ‘शतपत्रा’तून मांडलेल्या विचारात समाजसुधारणेची प्रेरणा ठळक रूपात पुढे आली आहे.

लोकहितवादींनी स्त्रीसुधारणेविषयी विचार मांडले. बालविवाह, जरठकुमारी विवाह, सतिप्रथा, स्त्रीदास्य अशा पारंपरिक रूढी, प्रथांना, जातिभेद आणि ग्रंथप्रामाण्याला त्यांनी नकार दिला. “पुनर्विवाह हिंदु लोकांचे सुधारणेचे मूळ आहे.” (देशमुख : १९६७, ३४) असे सांगितले. त्यामुळे व्याभिचार थांबेल, स्त्रियांचे दुःख कमी होईल, तिच्यावर होणारा अन्याय थांबेल, असा विश्वास त्यांना वाटत होता. त्यामुळेच त्यांनी इंग्रजी राजवटीचे स्वागत केले होते. यावरून त्यांच्या लेखनाची प्रेरणा ही सामाजिक होती, हे लक्षात येते.

जोतीराव फुले हे सामाजिक विचारवंत, कर्ते समाजसुधारक आणि लोकशिक्षक होते. त्यांचे सर्वच लेखन हे सामाजिक अंगाने वाचकांपुढे येते. व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, अस्पृश्योद्धार,

कृषकोद्धार आणि सामाजिक समता यासाठी ते लिहीत होते. 'शेतकऱ्याचा असूड'च्या आरंभी ते म्हणतात, “विद्येविना मति गेली, मतिविना नीति गेली, नीतिविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.” (फुले : १९९१, पृ.२६३) या रचनेत जोतीराव फुले यांच्या समग्र लेखनाची प्रेरणा आढळते. शुद्रातिशूद्र, शेतकरी, स्त्रिया यांच्या उत्थानाचा विचार त्यांनी मांडला. सत्यधर्म मांडून निर्मिक ही संकल्पना लोकांना दिली.

या काळातील मुक्ता साळवे हिचा निबंधही सामाजिक विचाराने प्रेरित झालेला आढळतो. ‘मांगमहाराच्या दुःखाविषयी निबंध’ लिहून मुक्ता साळवे यांनी समाजव्यवस्थेची चिकित्सा केली आहे. ताराबाई शिंदे यांनी ‘स्त्री-पुरुष तुलना’ (१८८२) मध्ये पुरुषांची दुटप्पी मानसिकता उघड केली आहे. विष्णुशास्त्री पंडित यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. बाबा पद्मनजी यांनी कुटुंब आणि स्त्रीसुधारणेला महत्त्व दिले. न्या. म. गो. रानडे यांनी जुन्या आणि नव्या मताचा समन्वय साधून इष्ट सुधारणेची बाजू घेतली.

सामाजिक सुधारणेचा पक्ष उचलून धरणाऱ्या लेखकांत गोपाळ गणेश आगरकर यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले, रूढींची निरर्थकता मांडली, धार्मिक कर्मकांड नाकारले आणि संमतीवयाच्या कायद्याचा पुरस्कार केला. समाजव्यवस्थेतील दोष दाखवून दिले. त्यांनी विवेकवादी दृष्टीने लेखन केले. स्पृश्य-अस्पृश्यता ही धर्माबाहेरची गोष्ट आहे, असे मत मांडले. त्यामुळे त्यांचे लेखन हे सामाजिक प्रेरणेने लिहिले जात होते, हे लक्षात येते.

स्वातंत्र्यपूर्व काळात कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, मुकुंद पाटील, भगवंत बळवंत पाळेकर आणि श्रीपतराव शिंदे यांनी सत्यशोधक चळवळीच्या अनुषंगाने लेखन केले आहे. सत्यशोधकी विचार हे सामाजिक प्रेरणेने लिहिले जात होते. त्यामुळे कृष्णराव भालेकर यांच्या लेखनातही ही दृष्टी आढळते. वर्णव्यवस्थेमुळे इथला समाज हिनावस्थेला गेला आहे, असे त्यांना वाटत होते. शिक्षण घेतले तर अनेक प्रश्न सुटतील, यावर त्यांचा विश्वास होता. शेतकरी आणि कामगार यांचे अज्ञान दूर झाले पाहिजे, हा हेतू त्यांच्या लेखनात आढळतो. नारायण मेघाजी लोखंडे यांनी परिवर्तनवादी भूमिकेतून लेखन केले. 'जातिभेद, अपमान व उदारता' हा लेख सामाजिक जाणिवा व्यक्त करतो. ते म्हणतात, “आम्ही विद्या शिकण्यास आपली नाखुशी दाखविली तर ती ब्राह्मणांनी आम्हास का शिकवू नये? कोणी म्हणतील की काही हा जुलमाने विद्यादान देण्याचा न्याय कोठला! यावर आमचे असे उत्तर आहे की, जर रोगी मनुष्य औषध पीत नाही तर त्यास औषधा वाचून मरू देणे बरे किंवा त्यास जुलमाने औषध देऊन त्यास प्राण वाचविणे बरे?” (लोखंडे : १८९३, पृ.२) ब्राह्मण समाजाचे कर्तव्य आणि विद्येचे महत्त्व मांडणारे नारायण लोखंडे पुढे कामगारांचे नेते म्हणून प्रसिद्ध झाले.

श्रीपतराव शिंदे यांनी आपल्या लेखनात सामाजिक प्रश्नांवर चर्चा केली. ‘विजयी मराठा’ मधून त्यांनी लेखन केले. मुकुंद पाटील यांनी ‘दीनमित्र’मधून लेखन केले. कर्मठ लोकांवर घणाघाती टीका केली. ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध परखडपणे लिहिले. भगवंत बळवंत पाळेकर यांनी 'जागृती'मधून लेखन केले. मानव्याची प्रतिष्ठा करण्याच्या हेतूने ते लिहीत होते. शिक्षण हे समाज उन्नयनाचे साधन आहे, यावर त्यांचा विश्वास होता.

स्वातंत्र्यपूर्व काळात गोपाळबाबा वलंगकर 'विटाळविध्वंसन' नावाची पत्रिका १८८८ मध्ये सुरू केली. त्यातून अस्पृश्यांच्या दुःखाला कारणीभूत असलेल्या प्राचीन धर्मग्रंथांविषयी विचार मांडले. स्वकीय बांधवांमध्ये आत्मजागृती व्हावी यासाठी ते लिहीत होते. शिवराम जानबा कांबळे 'सोमवंशीय मित्र' मधून लेखन केले. समाजसुधारणा ही त्यांच्या लेखनाची प्रेरणा होती. किसन फागू बंदसोडे यांनी आपल्या लेखनातून पारंपरिक रूढींचे विध्वंसन केले. या सर्व लेखकांच्या लेखांमागे सामाजिक प्रेरणा होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'समता' मधून लेखन केले. त्यांच्या लेखनात सामाजिक प्रश्नांची चिकित्सा आढळते. चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर आधारित हिंदू समाजाची विषम रचना ते दाखवत होते. त्यांच्या लेखांमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांना विशेष स्थान मिळाले आहे. समाजपरिवर्तनाच्या भूमिकेतून ते लिहीत होते.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' मांडला. 'मुरळी सोडण्याची चाल', 'मुलींचे शिक्षण', 'अस्पृश्यतानिवारण' अशा विविध विषयांवर त्यांनी लेखन केले. 'समाजसुधारणा यशस्वी का होत नाही?' या निबंधात त्यांनी घेतलेली भूमिका ही समाजसुधारकाची आहे. या काळात वि. दा. सावरकर यांनीही सामाजिक जाणिवेने लेखन केल्याचे आढळते. श्री. म. माटे यांचे निबंध हे सामाजिक आशय व्यक्त करतात.

एकूणच स्वातंत्र्यपूर्व काळात वैचारिक गद्य लिहिणाऱ्या कित्येक लेखकांच्या लेखनाची प्रेरणा ही सामाजिक होती. समाजव्यवस्थेतील अनिष्ट प्रथा, परंपरा, रूढी, रीतिरिवाज यांचे खंडन केले. शिक्षणामुळे समाजसुधारणा होईल, हा विश्वास ते व्यक्त करीत होते. धर्माच्या नावाखाली माणसांचे होणारे शोषण थांबले पाहिजे, ही भूमिका लेखक मांडत होते. शेतकरी, कामगार, स्त्रिया, अस्पृश्य आणि एकूणच बहूजन समाज यांचे उत्थान व्हावे, या हेतूने ते लिहीत होते. या काळात राजकीय प्रेरणेच्या तुलनेत सामाजिक प्रेरणेने लिहिले जाणारे वैचारिक गद्य हे संख्येने अधिक असल्याचे लक्षात येते.

### १आ.३ प्रबोधन चळवळी:

स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात विविध चळवळी उदयास आल्या होत्या. या चळवळींचा प्रभाव विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींवर झाला. वैचारिक गद्यात मोलाची भर टाकणाऱ्या अनेक लेखकांचा कोणत्या ना कोणत्या चळवळीशी संबंध आला. त्या त्या चळवळीची प्रेरणा मिळाल्यामुळे त्यांच्या लेखनात ती ती तत्त्वे प्रतिबिंबित झाली. विविध समाज, मंडळी, सभा स्थापन करून कार्य करणाऱ्या प्रबोधन चळवळींचे स्वरूप पुढीलप्रमाणे लक्षात घेता येते.

ब्रिटिश भारतात सर्वप्रथम राजा राममोहन रॉय यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी बंगाल प्रांतात 'ब्राह्मोसमाज' स्थापन केला. पारंपरिक धर्मसुधारणेसाठी निर्माण झालेली ही चळवळ सर्वदूर परिणाम करणारी ठरली. ब्राह्मोसमाज चळवळीने एकेश्वरवादाचा प्रसार केला. मूर्तिपूजेला विरोध केला. सती प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न केले. अनिष्ट प्रथांना विरोध करताना बहुविवाहास विरोध केला. या चळवळीने स्त्रीशिक्षणाला पाठिंबा दिला. ख्रिश्चन धर्माच्या वाढत्या प्रसारकाळात स्वधर्मातील दोष दूर करणे गरजेचे होते.

ब्राह्मोसमाजाचे विचार महाराष्ट्रातही पोहोचले होते. त्याचा प्रभाव मुंबई-पुण्यातील समाजसुधारकांवर होत होता. त्यांच्या लेखनात धर्मसुधारणेच्या विचारांना प्राधान्य मिळत होते.

ब्राह्मोसमाजाचा प्रभाव म्हणून महाराष्ट्रात 'परमहंस सभा' स्थापन झाली. १८५० मध्ये स्थापन झालेल्या परमहंस सभेला दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचे नेतृत्व मिळाले. आरंभी ती गुप्त संस्था होती. सभेत आलेले सदस्य गुप्तपणे दीक्षा घेत असत. धर्मसुधारणा हा मुख्य हेतू होता. मूर्तिपूजेला त्यांनी विरोध केला. जातिभेद पाळू नये असे सांगितले. अस्पृश्य आणि स्त्रियांना विद्या दिली पाहिजे, असा विचार ते मांडत. 'ईश्वर एक आहे व सर्व मनुष्यांची जात व धर्म एकच आहे, अशी परमहंस सभेच्या संस्थापकांची भूमिका होती.' (फडके : १९८९, पृ.४६) ही चळवळ अधिक काळ तग धरू शकली नाही. जोतीराव फुले यांनी या सभेतील विचार आणि आचरणावर, सदस्यांच्या भूमिकेवर टीका केली. असे असले तरी वैचारिक गद्य लेखन करणाऱ्या मंडळींवर एकेश्वरवादाचा प्रभाव होता, हे नाकारता येत नाही.

ब्राह्मोसमाज आणि परमहंस सभेच्या विचारसरणीशी जुळणारी भूमिका घेत ३१ मार्च १८६७ रोजी 'प्रार्थनासमाज' अस्तित्वात आला. या समाजाचे आरंभीचे नाव एकेश्वर उपासक मंडळी असे होते. न्या. महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण भांडारकर, नारायण चंदावरकर यांच्यापुढे ब्राह्मोसमाजाचा आदर्श होता. सर्व धर्मात जे चांगले आहे, सत्य आहे, ते आपल्या विवेचक बुद्धीने स्वीकारले पाहिजे, अशी भूमिका हा समाज घेत होता. मूर्तिपूजेला त्यांनीही विरोध केला. ही चळवळ काही निवडक उच्चविद्याविभूषित सदस्यांपुरती मर्यादित राहिली.

ब्राह्मोसमाज, परमहंस सभा आणि प्रार्थना समाज यांच्या पार्श्वभूमीवर जोतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे 'सत्यशोधक समाज' स्थापन केला. सत्यशोधक समाजाची चळवळ ही अगोदरपासूनच कार्यरत होती. जोतीराव फुल्यांनी शुद्रातिशुद्र आणि स्त्रियांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. त्यांची अज्ञानावस्था संपून जावी यासाठी लेखन केले. पुढे रीतसर समाज स्थापला गेला. शेतकरी, कामगार, अस्पृश्य आणि स्त्रिया यांच्या उन्नतीचा विचार या चळवळीच्या केंद्रस्थानी होता. भक्तीमार्गात पुरोहितांची मध्यस्ती नाकारून कर्मकांडासा या चळवळीने प्रचंड विरोध केला. धर्माची भीती दाखवून बहुजनसमाजाचे शोषण करणाऱ्या भटभिक्षुकांवर तिखट शब्दांत हल्ला केला. वैदिक परंपरेवर जोतीराव फुल्यांनी टीका केली. धार्मिक आणि सामाजिक सुधारणेचा आग्रह धरला. शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यामुळे सत्यशोधक चळवळ ही सर्वसामान्य लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात पसरली. प्रबोधन चळवळींमध्ये सत्यशोधक चळवळीची वाढ आणि प्रसार झपाट्याने झाला.

वैदिक विचारांना केद्रवर्ती ठेवून उदयास आलेली एक चळवळ म्हणजे 'आर्यसमाज'. स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ रोजी मुंबई येथे आर्यसमाज स्थापन केला. आर्यसमाजाने एकेश्वरवादाचा पुरस्कार केला मात्र मूर्तिपूजेला विरोध केला. धर्मसुधारणेला या चळवळीने प्राधान्य दिले. वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. वैदिक काळात जन्माधिष्ठित चातुर्वर्ण्यव्यवस्था नव्हती, त्याऐवजी गुणकर्मावर आधारित व्यवस्था होती, जातिभेद आणि अस्पृश्यतेला थारा नव्हता, असा विचार हा समाज प्रसारित करीत

होता. त्यामुळे बालविवाह, मूर्तिपूजा अशा प्रथांना त्यांनी विरोध केला. त्यांनी सुरू केलेली शुद्धी चळवळ विशेष गाजली. परधर्मात गेलेल्या व्यक्तीला शुद्ध करून स्वधर्मात घेतले जात होते. पुण्यात दयानंद सरस्वती यांच्या मिरवणुकीला जोतीराव फुल्यांनी सहकार्य केले असले तरी समाजाच्या विचारसरणीवर जोरदार टीकाही केली.

स्वातंत्र्यपूर्व काळात दलित-आंबेडकरी चळवळींने आपल्या विशिष्ट विचारसरणीचा प्रसार केला. अस्पृश्यांच्या विविध प्रश्नांसाठी इंग्रज सरकारकडे निवेदन देणे, त्याविषयी विविध पत्रांमधून लेखन करणे, त्यांना शिक्षणासाठी प्रेरित करणे, आपल्यातील अनिष्ट प्रथा नष्ट व्हाव्यात यासाठी प्रयत्न करणे, अशी अनेक उद्दिष्टे घेऊन दलित चळवळ उभी राहिली. प्रारंभीच्या काळात तिला एका कोणाचे नेतृत्व मिळाले नाही. आंबेडकरपूर्व काळात गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे आणि किसन फागू बनसोड आपापल्या परीने दलित चळवळ सुरू ठेवली होती. अस्पृश्यता, रूढी, जातीयता आणि अनिष्ट चालींना नकार देणे, शिक्षणाचा अंगिकार करणे या हेतूने ही चळवळ वाटचाल करीत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सार्वजनिक जीवनात प्रवेश झाला आणि दलित चळवळीला व्यापक रूप प्राप्त झाले. चातुर्वर्ण्यव्यवस्था नाकारून समतेच्या तत्त्वावर उभारलेला समाज निर्माण करणे, अस्पृश्यांमध्ये आत्माभिमान निर्माण करणे, माणूस म्हणून जगण्याच्या हक्कासाठी सत्याग्रह करणे, विविध नियतकालिके सुरू करून त्यातून जागृती घडवून आणणे, आपल्यावर झालेल्या अन्याय मांडणे, अशा उदात्त हेतूने ही चळवळ सुरू होती. या चळवळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व मिळाले. या चळवळीचा परिणाम वैचारिक गद्यलेखनावर झाला.

एकूणच स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रबोधन चळवळीमागे मानवहिताची प्रेरणा होती. लोकांना सत्य कळावे, विविध रूढींची अनिष्टता कळावी, त्यातून त्यांची मुक्तता व्हावी यासाठी या चळवळी उदयास आल्या होत्या. लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि स्वधर्मातील दोष दूर करण्यासाठी चळवळीतील नेते लेखन करीत होते. एका बाजूला स्वराज्यविषयक चळवळी सुरू होत्या, राजकीय सुधारणेचा पुरस्कार केला जात होता, तर दुसऱ्या बाजूला लोक शहाणे व्हावेत, त्यांच्यातील खुळचट कल्पना दूर व्हाव्यात आणि एकूणच सामाजिक सुधारणा व्हावी यासाठी शिक्षित तरुण धडपड करीत होते. या प्रबोधन चळवळींनी वैचारिक गद्य हा साहित्यप्रकार जिवंत ठेवला.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न : वैचारिक गद्याच्या अभिव्यक्तीचे स्वरूप स्पष्ट करा.

munotes.in

## १.३ समारोप

ललित साहित्य आणि ललितेतर साहित्यात वैचारिक गद्याने केलेले कार्य अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. लोकांच्या मनोरंजनापेक्षा त्यांना शहाणे करणे फार आवश्यक होते. अनेक प्रथा, परंपरा आणि रूढींचे संस्कार त्यांच्या मनावर झाले होते. मानसिक गुलामगिरीमुळे जनतेची प्रगती होत नव्हती. नवस-सायास यात अडकलेला समाज बाहेर काढावा यासाठी आंग्लविद्याविभूषित पहिल्या पिढीने फार मोठी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली होती. लोकांचे प्रबोधन केल्याशिवाय काहीही साध्य करता येणार नाही असे त्यांना वाटत होते. त्यासाठी केलेल्या लेखनात जागृतीचा विचार मांडला जात होता.

भारतीय समाजव्यवस्था ही बंदिस्त स्वरूपाची होती. तिला विकसनशील बनवणे अवघड होते. लोकांमधील शिक्षणविषयक अनास्था दूर करणे कठीण होते. अशा काळात इंग्रजी शिक्षण, विज्ञान, विविध शोध, आधुनिक सुविधा, लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक होते. वैचारिक गद्याचा उपयोग साधन म्हणून केला.

वैचारिक गद्य हे इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेत वेगळे आहे. ते रंजनासाठी निर्माण झालेले नाही. प्रबोधन करण्यासाठीच ते निर्माण झाले आहे. त्यामुळे कल्पित वास्तव आणि कलात्मक रचना यापासून ते दूर राहिले. लोकांमध्ये समाजपरिवर्तनाचा विचार रुजावा, धार्मिक कर्मकांड आणि शोषणापासून त्यांची मुक्ती व्हावी यासाठी सरळ आशय व्यक्त करणारे लेखन हवे होते. त्यामुळे वैचारिक गद्य सरळ आणि स्पष्ट स्वरूपात आशय व्यक्त करते.

स्वातंत्र्यपूर्व काळात वैचारिक गद्याने केलेले कार्य अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. लोकांमध्ये देशाप्रती अभिमान निर्माण झाला पाहिजे, परकीय सत्तेच्या जोखडातून त्यांची मुक्तता झाली पाहिजे, आपणच आपली प्रगती केली पाहिजे, ही राष्ट्रीय भावना लोकांमध्ये संस्कारित करण्याचे कार्य वैचारिक गद्याने केले. स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणारे, समाजपरिवर्तनाचा उद्घोष करणारे हे साहित्य रचनेच्या दृष्टीने विस्कळीत स्वरूपाचे असले तरी आशयदृष्ट्या समृद्ध आहे यात शंका नाही.

## १.४ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न:**

१. वैचारिक गद्य हे आशयाच्या अंगाने ललित साहित्यापेक्षा वेगळे कसे ठरते, ते स्पष्ट करा.

२. ललित साहित्य आणि वैचारिक गद्य यांच्या अभिव्यक्तीमधील साम्य-भेद विशद करा.

३. स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक गद्यामागील राजकीय प्रेरणा विशद करा.

४. 'स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक गद्य हे सामाजिक प्रेरणेने लिहिले जात होते', हे विधान साधार स्पष्ट करा.

५. स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रबोधन चळवळींचे स्वरूप स्पष्ट करा.



munotes.in

**ब) लघुत्तरी प्रश्न:**

१. ललितेतर साहित्याचे स्वरूप सांगा.

२. 'विचार हा वैचारिक गद्याचा पाया आहे', हे विधान स्पष्ट करा.

३. आशयाच्या अंगाने वैचारिक गद्याचे वेगळेपण नोंदवा.

४. स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रबोधन चळवळींचे स्वरूप स्पष्ट करा.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा:**

१. 'शेतकऱ्याचा असूड' या लेखाचे लेखक कोण आहेत?

२. स्वदेशप्रीतीच्या प्रेरणेने कोणत्या काळातील गद्यलेखन झालेले आहे?

३. हरि केशवजी पठारे यांनी देशप्रेम व्यक्त करणारा कोणता लेख लिहिला?

४. गो. ना. माडगावकर यांच्या कोणत्याही एका वैचारिक लेखाचे नाव सांगा.

## १.५ संदर्भ ग्रंथ


१. अळतेकर, म. मा., १९६३ : 'मराठी निबंध', सुविचार प्रकाशन, पुणे-नागपूर.

२. जाधव, रा. ग., १९७९ : 'मराठी विश्वकोश', खंड- ८, संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी, म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई.

३. तर्खडकर, दादोबा पांडुरंग, १९६६ : 'धर्मविवेचन', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई.

४. देशमुख, गोपाळ हरि, १९६७ : 'लोकहितवादीकृत निबंध संग्रह', संपा. अ. का. प्रियोळकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

५. नेमाडे, भालचंद्र, १९९८ : 'साहित्याची भाषा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

६. फडके, य. दि., १९८९ : 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', खंड पहिला, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. फुले, जोतीराव गोविंदराव, १९९१ : 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', संपा. य.दि. फडके, म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई.

८. राजवाडे, वि. का., १९५९: 'राजवाडे लेखसंग्रह', संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली.

९. लेले, रा. के., १९८४ : 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

१०. लोखंडे, नारायण मेघाजी, १८९३ : 'दीनबंधू' , अंक ६.


*****

# २अ

# १८७४ ते १९२० या कालखंडातील वैचारिक गद्याची परंपरा

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ विषय विवेचन

२.४ १८७४ ते १९२० या कालखंडातील महत्त्वाचे निबंधकार, लेखक व त्यांच्या लेखनाचे स्वरूप

२.५ समारोप

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ संदर्भ ग्रंथ

२.८ पूरक वाचन

## २.१ उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणांस,

१. १८७४ ते १९२० या कालखंडातील वैचारिक गद्य निर्मितीची पार्श्वभूमी सांगता येईल.

२. १८७४ ते १९२० या कालखंडातील वैचारिक गद्याच्या प्रेरणा व स्वरूप यांचे आकलन होईल.

३. १८७४ ते १९२० या कालखंडातील वैचारिक गद्याचा परिचय होईल.

४. १८७४ ते १९२० या कालखंडातील वैचारिक गद्यामधून आविष्कृत मूल्ये विशद करता येतील.

५. १८७४ ते १९२० या कालखंडातील वैचारिक गद्याची वाङ्मयीन वैशिष्ट्ये सांगता येतील.

## २.२ प्रस्तावना

अव्वल इंग्रजी काळात इंग्रजी शिक्षण व इंग्रजी साहित्याच्या अभ्यासाने मराठीमध्ये वैचारिक गद्य हा लेखनप्रकार अस्तित्वात आला. मराठी गद्यवाङ्मयाच्या प्रारंभिक वाटचालीमध्ये ब्रिटिश सनदी अधिकारी, ख्रिश्चन मिशनरी व श्रीरामपूर छापखाना यांचे मोठे योगदान आहे. 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रसारक', 'विविध ज्ञानविस्तार', 'इंदूप्रकाश' आदी नियतकालिकांनी मराठी वैचारिक साहित्याच्या विकासामध्ये हातभार लावला आहे. समाज जीवनाशी निगडित विविध विषय व त्यांचे आधुनिक मूल्यदृष्टीने विश्लेषण करणारे लेख या

munotes.in

नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाले. ज्ञानवितरण व समाजप्रबोधन करण्याबरोबरच विचारप्रवर्तन व गद्यलेखनशैलीचे विकसन करण्याचे काम नियतकालिकांनी केले.

एकोणिसाव्या शतकामध्ये प्रामुख्याने पुढील विषयांवर अधिक प्रमाणावर वैचारिक लेखन झाले आहे.

१. हिंदू धर्म व समाजव्यवस्था

२. पारतंत्र्य व त्याचे फायदे-तोटे

**या काळात जे वैचारिक लेखन झाले, त्यांच्यामध्ये पुढील प्रवृत्ती व प्रेरणा आढळतात:**

१. वर्णजातिप्रधान सामाजिक विषमता, उच्च जातींना इतरांच्या होणारा विरोध

२. स्त्रीदास्य व स्त्रीगुलामगिरीस विरोध. स्त्रीपुरुष समानतेची आणि स्त्रियांच्या मानवाधिकारांची प्रस्थापना

३. धार्मिक गुलामगिरी, कालबाह्य अनिष्ट रूढिपरंपरा, अंधश्रद्धा, जातिभेद यांना नकार, धर्मचिकित्सा, समाजजागृती व समाजसुधारणा

४. अस्पृश्यतानिर्मूलन

५. ब्रिटिश राजवटीचे मूल्यमापन. ब्रिटिशांच्या उदार लोकशाही शासनप्रणालीचे कौतुक व त्याचबरोबर ब्रिटिशांकडून होणारे शोषण, दमन, अन्याय यांना विरोध इ.

६. स्वातंत्र्यलालसा व आत्मविश्वास निर्माण करणे.

अव्वल इंग्रजी काळातील वैचारिक गद्य वरील प्रेरणांमधून निर्माण झालेले आहे.

बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री पंडित, लोकहितवादी, दादोबा पांडुरंग तर्खडकर, गो. ना. माडगावकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, मिस फेरार, न्या. म. गो. रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर वगैरे या कालखंडातील महत्त्वाचे वैचारिक लेखक व निबंधकार होत. १८३२ ते १८४८ या काळातील निबंधामध्ये लहानमोठ्या विषयावर भाषांतरित वा माहितीपर विचार मांडण्यावर भर होता. धार्मिक व सामाजिक विषयावर चिकित्सापर वैचारिक लेखन झालेले आढळते. पारतंत्र्याची मीमांसा करताना भारतीयांचे अज्ञान व आळस यावर भर दिला. इंग्रजांची उद्यमशीलता व विज्ञाननिष्ठा कशी आत्मसात करता येईल, याबाबतीत उपायही सुचविले गेले. अर्थात पुनरुक्ती, पाल्हाळ, स्वतंत्र व सखोल चिंतनाचा अभाव, सदोष शब्दयोजना, आशय व शैलीतील प्राथमिकता या काही मर्यादाही या काळातील वैचारिक लेखनात आढळतात. १८४८ ते १८७४ या दुसऱ्या टप्प्यात वैचारिक लेखन वैविध्यपूर्ण व विकसित झाले. वैचारिक सुस्पष्टतेमुळे विचारांचा भरीवपणा व चिंतनाचे तेज प्रकटले. विषयांचे क्षेत्र व आशयाचा दर्जा विस्तारला. मराठी गद्याला 'निबंधा' चा घाट लाभला. या काळातील वैचारिक लेखकांनी मौलिक विचार, विश्लेषकता, आधुनिक दृष्टिकोण, शैली या साऱ्या अंगांनी मराठी वैचारिक साहित्याचा भक्कम पाया घातला, असे म्हणता येते.

प्रस्तुत घटकामध्ये आपण १८७४ ते १९२० या कालखंडातील वैचारिक गद्याचा अभ्यास करणार आहोत. अर्थात हा कालखंड काटेकोर नसून केवळ अभ्यासाच्या सोयीसाठी. केलेला आहे. या कालखंडातील काही लेखक सदर कालखंडाच्या प्रारंभ व शेवटाच्या सीमारेषांच्या मागेपुढेही लिहिणारे आहेत. प्रस्तुत कालखंडामध्ये त्यांच्या लेखनाचा काहीएक प्रभाव उमटलेला दिसतो. म्हणून त्यांचा समावेश या टप्प्यात केलेला आहे. १८७३ साली महात्मा फुले यांचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ *गुलामगिरी* प्रसिद्ध झाला. त्याचा तसेच महात्मा फुल्यांच्या एकंदर लेखनाचा मराठी साहित्य व समाजावर खूप प्रभाव पडला आहे. दुसरे असे की, १८७४ साली 'निबंधमाला' हे नियतकालिक विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी सुरू केले. 'माले'तील निबंधांचा त्यापुढील काळातील निबंधलेखकांवर, सामाजिक-राजकीय क्षेत्रातील कर्त्या मंडळींवर काहीएक प्रभाव पडला. महात्मा फुले यांच्या तसेच 'निबंधमाले'च्या प्रभावातून लेखन करणाऱ्या समांतर परंपरा मराठी वैचारिक गद्यामध्ये निर्माण झालेल्या आढळून येतात.

## २.३ विषय विवेचन

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक स्थितीच्या पार्श्वभूमीचा साहित्याच्या निर्मितीवर मोठा परिणाम होत असतो. प्रस्तुत कालखंडातील राजकीय, सामाजिक स्थिती व त्या पार्श्वभूमीवर झालेल्या वैचारिक गद्याचे स्वरूप आपण समजून घेणार आहोत.

**वैचारिक गद्याची पार्श्वभूमी:**

१८७४ पासून १९२० पर्यंतच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक वगैरे परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या काळातील वैचारिक लेखन झाले आहे. ब्रिटिश वासाहतिक सत्ता व राजकीय पारतंत्र्याचे विविध क्षेत्रांवरील दृश्य-अदृश्य परिणाम, पराभूत लोकमानस, विविध समाजगटांचे सामाजिक लढे व त्यांमागील त्यांची भूमिका, तत्त्वप्रणाली, भारतीय उपखंडातील कोट्यवधी जनतेचे स्वातंत्र्य आंदोलन अशा पार्श्वभूमीवर या कालखंडातील लेखन झाले आहे. धार्मिक, सामाजिक गुलामगिरीतून समाजाच्या मुक्ततेसाठी सुधारणावादी चळवळी व समाजसुधारकांनी या काळात अपूर्व कार्य केले. आधुनिकतेच्या नवजाणिवा दिल्या. या सर्व घटनांचा परिणाम या काळातील साहित्यिकांवर, विचारवंतांवर पडणे स्वाभाविक होते. शेवटी लेखक हा काळाचे अपत्य असतो. समकालीन पर्यावरणाचा-वातावरणाचा लेखकाच्या जडणघडणीवर, त्याच्या विचारविश्वावर परिणाम होत असतो. वैचारिक गद्यामधून समकाळाचे प्रतिबिंब पडलेले असते.

## २.४ १८७४ ते १९२० या कालखंडातील महत्त्वाचे निबंधकार, लेखक व त्यांच्या लेखनाचे स्वरूप

**रा. गो. भांडारकर** (१८३७-१९२५) हे मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या पदवीधरांपैकी एक. विचारप्रवर्तनाबरोबर कृतिशीलतेवर भर देणारे तत्त्वनिष्ठ विचारवंत. 'धर्मपर लेख व व्याख्याने' (१९०९) या संग्रहामध्ये त्यांचे धर्मविषयक विचार अभिव्यक्त झाले आहेत. प्राच्यविद्या, इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, व्याकरण अशा विविध ज्ञानशाखांचा सखोल व्यासंग असणाऱ्या भांडारकरांच्या लेखनामध्ये संशोधन, सत्यान्वेषण, शास्त्रीय दृष्टी

व स्वतंत्र चिंतन आविष्कृत होते. प्राचीन भारतीय विचारतत्त्वांचा त्यांनी नव्या दृष्टीने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. 'प्राचीन भारतीय इतिहासावर एक दृष्टिक्षेप' या निबंधामध्ये बौद्ध धर्माच्या उदयापासून गुप्त राजवटीपर्यंतचा इतिहास येतो. 'महाभारताचा काळ' (१८७३), 'हिंदुस्थानातील वेदपठण' (१८७४), 'श्रीकृष्णासंबंधीचे उल्लेख' या लेखांमधून प्राचीन भारतावर प्रकाश पडतो. 'भारताचा सामाजिक इतिहास' या ग्रंथामध्ये भारतातील जातिसंस्थेचा शोध त्यांनी घेतला आहे. 'पतंजलीचा व त्याच्या महाभाष्याचा काळ', 'दक्षिणी हिंदुस्थानची राजघराणी', 'शैव व वैष्णव', 'मराठी व प्राकृत भाषांची भाषाशास्त्राप्रमाणे रचना व उत्पत्ती', 'चिकित्सक, तुलनात्मक व ऐतिहासिक संशोधनपद्धती' या लेखांमधून शास्त्रीय, ऐतिहासिक व तौलनिक दृष्टीने संशोधनपर लेखन झाले आहे. अनेकविध संदर्भ, प्रमाणे यांच्या आधारे विषयविवेचन, तर्कशुद्ध विश्लेषण, प्रतिपाद्य विषयाचे सहज सुलभ स्पष्टीकरण, ओघवती भाषा ही भांडारकरांच्या लेखनाची वैशिष्ट्ये होत.

**महादेव गोविंद रानडे** (१८४८-१९०१) जुन्याचा आणि नव्याचा समन्वय साधून समाजामध्ये इष्ट सुधारणा करू पाहणारे समन्वयवादी विवेकी सुधारक म्हणून म. गो. रानडे यांना ओळखले जातात. त्यांनी स्त्रीशिक्षण, स्त्रीसुधारणा, विधवा पुनर्विवाह, संमतीवय याबाबतीत प्रागतिक व सुधारणापर विचार मांडले. 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' (१९००) हा मराठेशाहीच्या उदयाची ऐतिहासिक व सामाजिक मीमांसा करणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. 'न्या. रानडे ह्यांची धर्मपर व्याख्याने' (१९०२) ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाली आहेत. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास यांच्यावरील त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांमधून संतांच्या कार्याचा व्यापक अन्वयार्थ लावण्याची त्यांची दृष्टी प्रतीत होते.

**विष्णुशास्त्री चिपळूणकर** (१८५०-१८८२) हे एकोणिसाव्या शतकातील मराठीतील एक महत्त्वाचे निबंधकार होत. १८७४ साली त्यांनी 'निबंधमाला' हे मासिक सुरू केले. 'निबंधमाले' चे एकंदर ८४ अंक निघाले व १८८३ साली 'निबंधमाला' बंद झाली. 'निबंधमाले' च्या दुसऱ्या अंकात 'माले' चा उद्देश सांगताना चिपळूणकर लिहितात, "मासिक पुस्तकाचा उद्देश बहुश्रुतपणा होय. म्हणजे ती वाचली असता थोड्या वेळात सहज मौजेने पुष्कळ ज्ञान नानाविध विषयांचे व्हावे. हे ज्ञान त्या त्या विषयातील मोठमोठे ग्रंथ वाचूनही होतेच... पण वाचकांस सामान्यतः हा मार्ग फार कठीण व कंटाळवाणा वाटून त्यांची उमेद खचते व निराश होऊन तो उद्योगच बहुधा सोडून देतात. यास्तव मोठमोठ्या कठीण पहाडातून घाट बांधले असता वाटसरूंची जी सोय होते तीच ज्ञानेच्छू लोकांस मासिक पुस्तकांनी होते." 'निबंधमाले' च्या पहिल्याच अंकात (जानेवारी १८७४) 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती' हा निबंध चिपळूणकरांनी लिहिला. 'माले' च्या शेवटच्या अंकातील निबंधाचे शीर्षक होते, 'आमच्या देशाची स्थिती' यावरून त्यांच्या विचारांची दिशा दिसून येते. 'निबंधमाले' मधून भाषा, वाङ्मय, इतिहास, सामाजिक, राजकीय, मानसशास्त्रीय, परमतखंडनात्मक अशा एकंदर सत्तावीस विषयांवर लहानमोठे निबंध चिपळूणकरांनी लिहिले. 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती', 'भाषांतरे', 'इंग्रजी भाषा', 'लेखनशुद्धी', 'भाषापद्धती', 'भाषादूषण' हे त्यांचे भाषाविषयक निबंध. तर 'विद्वत्व व कवित्व', 'वाचन', 'मोरोपंतांची कविता', 'डॉ जॉन्सन' हे वाङ्मयविषयक निबंध. 'आमच्या देशाची स्थिती', 'संपत्तीचा उपभोग', 'लोकभ्रम' हे त्यांचे सामाजिक विषयावरील काही निबंध. स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांचा पुरस्कार त्यांनी केला. वाङ्मयीन दृष्टीने शैलीदार निबंधलेखनाचा प्रयत्न त्यांनी केला. वक्रोक्ती, उपरोध, युक्तिवादचातुर्य, वक्तृत्व, आक्रमकता, बांधीव,

ठाशीव, समर्पक शब्दयोजना, भाषाप्रभुत्व, संस्कृत किंवा इंग्रजी भाषेतील समर्पक अवतरणे, प्रौढ विनोदबुद्धी चिपळूणकरांच्या निबंधांची वैशिष्ट्ये होत. त्यांच्या भाषेला ओज, सौष्ठव, बहुअर्थता लाभली होती. त्यांच्या गद्यात साहित्यगुण ओतप्रोत भरले होते. अर्थात त्यांच्या आत्मकेंद्रित वृत्तीमुळे त्यांच्या विचारांची क्षितिजे अवास्तव व संकुचित राहिली. समाजसुधारकांवर त्यांनी द्वेषपूर्ण व असभ्य टीका करून प्रतिगामी विचारांचे आक्रमकपणे प्रवक्तेपण केले. ही त्यांची मोठी मर्यादा होती. 'लोकहितवादी', 'सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट' या निबंधांमधून त्यांच्या प्रतिगामी विचारांचे दर्शन घडते. इंग्रजीचे कृत्रिम अनुकरण, पुनरुक्ती, पाल्हाळ, अनौचित्य, क्लिष्ट वाक्यप्रयोग, सम्यकदृष्टीचा अभाव असे दोष त्यांच्या लेखनात आढळतात.

**गो. ग. आगरकर** (१८५६-१८९५) यांनी 'इष्ट असेल ते बोलणार आणि शक्य असेल ते करणार' या प्रतिज्ञेने 'सुधारक' वृत्तपत्र १८८८ साली सुरू केले. "आमच्या समाजव्यवस्थेत अनेक दोषस्थलें दिसणार आहेत, हे उघड आहे. ही दोषस्थले वारंवार लोकांच्या नजरेस आणावी, ती दूर करण्याचे उपाय सुचवावे, आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखे काय आहे, ते पुनः पुनः दाखववावे, यास्तव हे सुधारक पत्र काढले आहे." असे 'सुधारक' काढण्याचा उद्देश आगरकरांनी सांगितला आहे. त्यांच्यावर मिल्ल व स्पेन्सर यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. सामाजिक सुधारणेचा जोरदार पुरस्कार त्यांनी केला. आगरकरांनी 'महाराष्ट्रीयास अनावृत्त पत्र' या लेखात म्हटले आहे की, "दुष्ट आचाराचे निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धी, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार या गोष्टी विचार कलहाखेरीज होत नाहीत. आजपर्यंत या देशात हा कलह माजावा तितका कधीच न माजल्यामुळे व बहुधा आमचे लोक गतानुगतिक असल्यामुळे, हे भरतखंड इतकी शतके अनेक प्रकारच्या विपत्तीत खितपत पडले आहे... पाश्चिमात्य शिक्षणामुळे ज्या दिवशी या वादास आरंभ झाला तो दिवस हिंदुस्थानच्या भावी इतिहासात महोत्सव करण्यासारखा होईल." बौद्धिक विचारमंथनास आगरकर किती महत्त्व देत होते, हे यावरून स्पष्ट होते. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, शिक्षण, स्त्री, राजकीय पारतंत्र्य, आर्थिक शोषण अशा विविध अंगोपांगांबाबत आगरकरांनी परखड, प्रगतिशील व बुद्धिवादी विचार मांडले होते. प्रामाण्यवादाला नकार देऊन बुद्धिवादाचा आग्रह त्यांनी धरला. वर्चस्ववादास त्यांचा विरोध होता. आगरकरांनी 'केसरी' तून सात वर्षे व 'सुधारका' तून सात वर्षे असे एकंदर चौदा वर्षे वृत्तपत्रांमधून संपादकीय लेखन केले. 'केसरी' मधील 'अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार', 'बालविवाहापेक्षा सतीच बरी', 'भारतीय शास्त्रकलांचे पुनरुज्जीवन', 'सासूरवास', 'मलबारशेटजींच्या सुधारणाविषयक सूचनांच्या निमित्ताने लिहिलेले 'बालविवाहा' वरील लेख इत्यादी विषयांवरील आगरकरांचे लेख आहेत. 'सुधारक' मधील 'तरुण सुशिक्षितांस विज्ञापना', 'आमचे काय होणार?', 'सोवळ्याची मीमांसा', 'आमचे अजून ग्रहण सुटले नाही', 'स्त्रियांस चरितार्थ संपादक शिक्षण देण्याची आवश्यकता', 'विवाहनिराकरण अथवा घटस्फोट', 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार', 'होऊ द्या तर दोन हात', 'सुधारणा आणि कलह', 'प्राथमिक शिक्षण सरकारचे आवश्यक कर्तव्य आहे', 'स्त्री-पुरुषांना एकच शिक्षण द्यावे व तेही एकत्र द्यावे' यांसारख्या लेखांच्या शीर्षकावरूनही विषय-आशयाची कल्पना येते. 'देवोत्पत्ती', 'भारतीय कलांचे पुराणत्व', 'धर्मकल्पना आली कोठून?', 'थडगे व देवळे', 'मूर्तिपूजेचा उद्भव' इत्यादी विषयांमधून संशोधनपर ज्ञानप्रसाराचा प्रयत्न आगरकरांनी केला. प्राचीन भारतीय संस्कृतीतील आचारविचारांकडे बुद्धिनिष्ठ दृष्टीने

पाहून त्याचे इष्टानिष्टत्व त्यांनी लोकांसमोर मांडले. स्त्रियांच्या पराधीनतेचे परखड वर्णन करून स्त्रीउन्नतीकारक विचार त्यांनी मांडले. वैचारिकता, तात्त्विकता, चिंतनशीलता, वक्तृत्व, तळमळ, आत्मविश्वास, सचोटी, प्रगल्भ भाषा, ओजस्वी लेखनपद्धती या गुणविशेषांमुळे त्यांचे वाङ्मय अभ्यासनीय झाले आहे. नवीन शब्दांची घडण, मार्मिक विनोद, उपहास-उपरोध, पल्लेदार वाक्ये, तर्कशुद्ध, मुद्देसूद विवेचन, अन्वर्थक अलंकार ही त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये सांगता येतील. 'निबंधसंग्रह भाग १ व २', 'केसरीतील निवडक निबंध भाग १ व २' मध्ये त्यांचे संकलित लेखन प्रसिद्ध झाले आहे.

**बाळ गंगाधर टिळक** (१८५६-१९२०) हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वाचे नेते, प्राच्यविद्या, धर्मशास्त्रे आणि संस्कृत भाषेचे जाणकार, 'केसरी', 'मराठा' या वृत्तपत्रांचे संपादक, संशोधक असे चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व. लोकमान्य टिळकांचे 'केसरीतील लेख खंड १ ते ४', 'वेदकालनिर्णय' (ओरायन या इंग्रजी ग्रंथाचा ओगलेकृत संक्षेप, १९०८), 'आर्य लोकांचे मूलस्थान' (आर्क्टिक होम इन दि वेदाज) हा इंग्रजी ग्रंथाचा ओगलेकृत अनुवाद, १९१०), 'गीतारहस्य' (१९१०) हे त्यांचे महत्त्वाचे वैचारिक लेखन. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' तील समग्र लेखांची एकूण पृष्ठसंख्या २४४७ इतकी मोठी आहे. टिळकांच्या लेखनाने जीवनाची बहुतेक सर्व क्षेत्रे व्यापलेली आहेत. 'आधी कोण? राजकीय की सामाजिक?', 'सामाजिक सुधारणेचे मार्ग', 'हिंदुत्व आणि सुधारणा', 'ब्राह्मण व ब्राह्मणेतर', 'स्वराज्य, ब्राह्मण व ब्राह्मणेतर' यांसारख्या लेखांमधून टिळकांची सामाजिक विचारसरणी आविष्कृत होते. राजकीय स्वातंत्र्याबाबत जहाल भूमिका स्वीकारणाऱ्या टिळकांनी सामाजिक सुधारणेबाबत प्रतिकूल भूमिका घेतली. त्यांच्या राजकीय विषयांवरील 'राजद्रोह', 'इंग्रजी राज्यांत आम्हांस फायदा काय झाला?', 'आमच्यावर जुलूम कसा होतो?', 'राजद्रोह कशाला म्हणतात?', 'पुनश्च हरि ॐ', 'नवी विटी, नवे राज्य!', 'स्वराज्य आणि सुराज्य', 'उजाडले पण सूर्य कुठे आहे?', 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' इत्यादी लेखांमधून पारतंत्र्याचा धिक्कार आणि स्वातंत्र्याचा उच्चार व्यक्त झालेला आहे. 'खरे विद्यापीठ कोणते?', 'युनिव्हर्सिट्या उर्फ सरकारी हमालखाते', 'हे आमचे गुरूच नव्हेत!', 'चतकोर भाकरीची गुलामगिरी' या लेखांमधून शैक्षणिक प्रश्न व राष्ट्रीय शिक्षणाचा विचार मांडला आहे. 'शेतकऱ्यांचा कायदा', 'हिंदुस्थानातील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावे लागेल काय?', 'शेतकऱ्यांच्या कमिशनाने काय केले?' 'आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले?', 'राष्ट्रीय बहिष्कार', 'स्वदेशीवरील आक्षेप' या लेखांमधून पारतंत्र भारताच्या आर्थिक समस्या - शेती, स्वदेशी व बहिष्कार या संदर्भातील टिळकांची मते व्यक्त झाली आहेत. 'शिवाजी उत्सव, गणेशोत्सव व राष्ट्रीय उत्सवाची आवश्यकता', 'धर्म व तत्त्वज्ञान', 'शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव', 'आपला धर्म', 'अज्ञेयवाद' इत्यादी लेखांमधून टिळकांचे विविध विषयांसंदर्भातील दृष्टिकोण प्रकट झाले आहेत. संस्कृत, इंग्रजी, मराठी अशा भाषांवर प्रभुत्व असणाऱ्या टिळकांचे गद्यलेखन साध्या, सोप्या, सरळ, हुकमी, अनलंकृत व प्रसंगी मर्मभेदक शब्दांनी युक्त आहे. वृत्तपत्राद्वारे लोकजागरण करावयाचे असल्याने, लोकांना सहज समजणारी, त्यांच्या अंतःकरणाला भिडणारी आणि त्यांना सरकारी अन्यायाविरुद्ध प्रक्षुब्ध करणारी भाषा असली पाहिजे, याची स्पष्ट जाणीव टिळकांच्या वैचारिक लेखनात दिसून येते. तत्त्वज्ञान व गणित यांवरील प्रभुत्वामुळे टिळकांच्या लेखनात युक्तिवाद, विश्लेषण, चिंतनशीलता, विवेक हे गुण लाभले आहेत. स्वभावोक्ती, प्रसाद, ओज, इत्यादी गुण त्यांच्या लेखनात आहेत. सरकारला जरब बसावी अशी मर्मभेदक टीका,

munotes.in

निश्चयात्मक विधाने, निःसंदिग्ध शब्दांचा वापर, बिनतोड युक्तिवाद, सारभूत, काटेकोर भाषा, मुद्देसूद व नेमकेपणा, समर्पक दाखले इत्यादींमुळे टिळकांच्या लेखनशैलीने स्वतःचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

**शि. म. परांजपे** (१८६४-१९२९) हे चिपळूणकरांच्या परंपरेतील एक प्रभावी निबंधकार, प्रखर राष्ट्रीय बाण्याचे पत्रकार, साहित्यिक, प्रभावी वक्ते म्हणून ओळखले जातात. शि. म. परांजपे यांनी १८९८ साली 'काळ' हे पत्र सुरू केले. "लोकांत दृढमल व रूढ झालेल्या कित्येक राजकीय कल्पनांच्या उच्छेदासाठीच काळाचा जन्म आहे," असे त्यांनी आपले उद्दिष्ट जाहीर केले होते. राजकीय स्वातंत्र्यभावनेची जागृती लोकांमध्ये करावी, त्यासाठी सामान्य माणसांमध्ये प्रक्षोभ निर्माण करावा, राज्यकर्त्या वर्गाबद्धल उपहासप्रचुर अनादर लोकमानसात ठसवावा, स्वदेश आणि स्वधर्म आदर्श मानावा व इतर सर्व गोष्टी उपेक्षणीय ठरवाव्यात, अशी वृत्तपत्रांमधून शिकवण देणे हे त्यांनी संपादकीय कर्तव्य मानले. राजकीय, सामाजिक, धर्मविषयक, ऐतिहासिक, वाङ्मयीन, निसर्गवर्णनपर अशा विषयांवर शिवरामपंतांनी लेखन केले असले तरी 'स्वातंत्र्य' हेच त्यांच्या लेखनामागचे मुख्य प्रयोजन आहे. 'एक चमत्कारिक खेडेगाव' या रूपकात्मक लेखात एका खेड्याची कल्पना करून इंग्रजांचा या देशातील कारभार कसा द्रव्यशोषक आणि स्वाभिमानभंजक आहे, हे दाखविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. 'सह्याद्रीच्या तावडीत सापडलेली कल्पनाशक्ती', 'हिंदुस्थानात काय संतोष माजला आहे?', 'आपले सुख काय झाले?', 'ध्रुवाची गोष्ट खोटी असली पाहिजे', 'विषासाठी कंठशोष', 'अर्जुनाचा वेडेपणा', 'एका खडी फोडणाराची गोष्ट', 'इंग्रज आणि ठग', 'दिल्लीचे तख्त आणि भाऊसाहेबांचा घण', 'शिवाजीची एक रात्र', 'अर्जुनाचा वेडेपणा', 'जुनी मढी नवी अंतःकरणे', 'पशूंच्या साम्राज्याचा इतिहास' इत्यादी लेखांमध्ये शिवरामपंतांच्या लेखनाचे सामर्थ्य प्रकटते. आपल्या लेखनात त्यांनी वक्रोक्ती, व्यंगोक्ती, व्याजोक्ती, उपहास, उपरोध, छद्मीपणा इत्यादी लेखनविशेषांचा प्रत्ययकारी वापर केला. वर्तमानपत्री लेखनाला त्यांनी वाङ्मयीन जोड देऊन त्यातून शैलीदार वैचारिक साहित्य निर्माण करण्याची प्रथा पाडली.

**राजारामशास्त्री भागवत** (१८५१-१९०८) ग्रीक, लॅटिन, अरबी, फारशी, अवेस्ता, इंग्रजी, मराठी, संस्कृत अशा भाषांचा अभ्यास असणाऱ्या राजारामशास्त्रींनी राजकारण सोडून सर्व क्षेत्रांत अनिरुद्ध संचार केला. लेख, व्याख्याने, पुस्तके, वादविवाद यांमधून त्यांच्या वैचारिकतेचे दर्शन घडते. पुरातत्त्व, वेदवाङ्मय, उपनिषदे, विविध धर्म-पंथ, विवाहादी आचारधर्म, संस्कृत-प्राकृत भाषा, इतिहास, संत-पंडिती वाङ्मय-अलंकार, व्याकरण, सामाजिक इत्यादी विषयांवर संशोधनपर लेखन केले. 'राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक लेख' दुर्गा भागवतांनी संपादित केले असून त्यामधून राजारामशास्त्रींच्या स्पष्ट, निर्भीड, सुधारणावादी, स्वतंत्र बुद्धीचा आविष्कार होतो. 'ब्राह्मणपण हिंदू नव्हे' अशा सहीने ते लेखन करीत. 'शिवछत्रपतींच्या चरित्रा' स (१८९२) त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेमधून शिवकालीन राजकीय, सामाजिक, भाषिक परिस्थिती कशी होती, याचे आकलन होते. 'आमची देशीभाषा', (१८९२), 'प्राकृत भाषेची विचिकित्सा' (१८९६), 'मराठीचा एक कॅथेलिक भक्त' (१९०६) आदी निबंधांमधून त्यांचे भाषाविषयक संशोधन व चिंतन येते. 'चातुर्वर्ण्यमया सृष्टम', (१९०२), 'चातुर्वर्ण्य' (१८९६) या लेखांमधून त्यांची चातुर्वर्ण्यविषयक अनुकूल भूमिका प्रकटते. 'विधवाविवाह सशास्त्र की अशास्त्र' (१८८५), 'ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म' (१८८९), 'ब्राह्मण म्हणविणारांस सवाल' (१८९९) हे वैचारिक ग्रंथ.

'मराठ्यांसंबंधी चार उद्गार' (१८८७) हा मराठ्यांचा ऐतिहासिक दृष्टिकोणातून समीक्षा करणारा महत्त्वपूर्ण वैचारिक ग्रंथ आहे. विद्वत्ता, बहुश्रुतता, सूक्ष्म दृष्टी, कुशाग्र बुद्धी, स्पष्ट व ठाम विचार ही राजारामशास्त्रींच्या लेखनाची वैशिष्ट्ये होती. 'दीनबंधु', 'विविधज्ञानविस्तार', 'ज्ञानप्रकाश', 'पुणे वैभव' 'केरळ कोकिळ' वगैरे नियतकालिकांमधून त्यांचे लेखन प्रकाशित झाले. संस्कृतचे प्रकांड पंडित असूनही मराठी बोलीभाषेचा त्यांना विलक्षण अभिमान होता.

**वि. का. राजवाडे** (१८६३-१९२६) हे व्यासंगी संशोधक, इतिहासकार व भाषाशास्त्रसंवर्धक म्हणून प्रख्यात. त्यांनी आपले विद्यार्थी दशेतील अनुभव 'कनिष्ठ, मध्यम व उच्च शालांतील अनुभव' (१९०४) या निबंधात नमूद केले आहेत. त्यामधून तत्कालीन शिक्षणसंस्थांचे दर्शन घडते. १८९५ साली त्यांनी 'भाषांतर' हे मासिक सुरू केले. 'ज्या ज्ञानाच्या प्रकाशाने युरोप हा अंधकारमय मध्ययुगातून जागा झाला तें ज्ञान भारतालाही प्राप्त होणें जरूर आहे. त्यायोगेच येथील बौद्धिक व मानसिक अवनती संपून पुनरुज्जीवन सुरू होईल. नव्या ज्ञानाचा प्रकाश येथील लोकांना लोकभाषेतून मिळावा', या उद्देशाने त्यांनी 'भाषांतर' सुरू केले होते व ते दोन वर्षे चालले. 'विश्ववृत्त', 'ग्रंथमाला', 'सरस्वतीमंदिर', 'इतिहास व ऐतिहासिक', 'रामदास व दामदासी', 'केसरी', 'भारतेतिहास संशोधक मंडळाचे वार्षिक संशोधनवृत्त' इत्यादींमधून त्यांचे काही लेखन प्रसिद्ध झाले आहे.

मराठ्यांचा इतिहास, मराठी भाषेचे व संस्कृतचे ऐतिहासिक व्याकरण, जुन्या मराठी वाङ्मयाचा इतिहास, भारतीय वा हिंदू समाजाच्या इतिहासाची समाजशास्त्रीय मीमांसा या संबंधात राजवाडे यांचे संशोधनपर लेखन व त्यांनी संपादित केलेले ग्रंथ यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' त्यांनी २२ खंडांमध्ये प्रसिद्ध केली असून त्यातील नऊ खंडांत ऐतिहासिक विवेचनात्मक स्वरूपाच्या प्रस्तावना लिहिल्या आहेत. पहिल्या खंडाची प्रस्तावना १२३ पृष्ठांची असून त्यामध्ये मराठ्यांच्या इतिहासातील काही महत्त्वपूर्ण भाग उलगडला आहे. तसेच त्यांचा इतिहासविषयक दृष्टिकोणही प्रकट झाला आहे. 'राधामाधवविलासचंपू' व 'महिकावतीची बखर' या ग्रंथांच्या प्रस्तावनांमधून भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाचे तात्त्विक दर्शन घडते. त्यांची इतिहासाची कल्पना विज्ञाननिष्ठ व जीवननिष्ठ होती. मानवाच्या सार्वदेशिक व सार्वकालिक स्थित्यंतरांचा समावेश करणाऱ्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा संपूर्ण अर्थ त्यांच्या इतिहासकल्पनेत समाविष्ट होता, 'लहान व्यक्तींचीं चरित्रें व मोठ्या व्यक्तींची चरित्रे मिळून समाजाचा संपूर्ण इतिहास होतो' असा व्यक्तीसमुदाय केंद्रित इतिहासाचा अर्थ त्यांनी सांगितला आहे. (जोशी (संपा.) : २००१ : पृ.३१-३२) इतिहासलेखनाची आचारसंहिता सांगताना ते लिहितात, "निर्लेप व निरहंकारपणाने इतिहासाचा विचार करावयाला लागणें ही इतिहासाचे खरें स्वरूप जाणण्याच्या मार्गाला लागण्याची पहिली पायरी आहे. ह्या मार्गाला लागण्याची दुसरी पायरी सर्व प्रकारचे अर्धवट ग्रह सोडून देणें ही होय... वैयक्तिक मते बाजूस सारून व स्वदेशाभिमानाचा दर्प बाजूला ठेवून हे काम केलें तरच शुद्ध व विमल तत्त्व हस्तगत होण्याचा संभव आहे." (वि. का. राजवाडे : १९२८ : पृ. ३१२)

राजवाड्यांच्या विपुल संशोधनपर लेखनापैकी काहींचे स्वरूपविशेष पुढीलप्रमाणे - 'विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांति', 'प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास', 'मराठीतील शुद्धलेखनासंबंधी व विरामचिन्हांसंबंधी काही सूचना', 'मराठीतील अनुनासिकांची पूर्वपरंपरा', 'मराठीतील नामविभक्ती', 'राष्ट्रीय मराठी कोश', 'कादंबरी'

इत्यादी निबंधांमधून त्यांचे भाषा व साहित्यविषयक संशोधन व चिंतन येते. 'इतिहास म्हणजे काय?', 'इतिहासाच्या दोन बाजू - अधिभौतिक व आध्यात्मिक', या लेखांमधून राजवाड्यांच्या ऐतिहासिक तत्त्वमीमांसेचे दर्शन घडते. 'हिंदू समाजात हिंद्वतरांचा समावेश' या निबंधात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन समाजांच्या सामाजिक विस्ताराच्या संस्थात्मक पद्धतीचे विवेचन केले आहे. भारतीय सामाजिक इतिहासावरील हा एक महत्त्वपूर्ण निबंध आहे. 'हिंदुस्थानातील आर्य लोकांचा वर्ण', 'आमची पुराणें व आसीरियांतील नवे शोध', 'मगध', 'नेट व निच्छवि', 'मग ब्राह्मण कोण?' या लेखांमधून अतिप्राचीन भारताच्या वंशविषयक इतिहासाची रूपरेषा येते. 'महाराष्ट्राची वसाहत' व 'महाराष्ट्र व उत्तर कोकणची वसाहत' या लेखांत महाराष्ट्राच्या अतिप्राचीन इतिहासाचे विवेचन भाषिक, वांशिक व सामाजिक संस्थारूप प्रमाणांच्या आधारावर केलेले आहे... 'मराठी राज्याचा हेतू', 'मराठ्यांच्या इतिहासाचे कार्य व पराभव', 'मराठी राज्याचा हेतू', 'मराठेशाहीचा पाया घालणारा शहाजी', 'शिवाजीची गुणसंपदा' या लेखांमधून मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाची तात्त्विक मीमांसा येते. 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' (१९७६) हा त्यांचा महत्त्वपूर्ण संशोधनपर लेखसंग्रह आहे. राजवाड्यांच्या लेखनात मुबलक माहितीमुळे काहीसा विसकळीतपणा, दुसऱ्याबद्दल तुच्छताभाव आढळतो. निःसंदिग्धता, नियमबद्धता, रेखीवपणा, मुद्देसूद व सिद्धांतवजा वाक्ये हा त्यांच्या लेखनशैलीचा विशेष होता. त्यांची भाषा संस्कृतप्रचुर असल्याने काही अपरिचित शब्द त्यांच्या लेखनात येतात. प्रसंगी ग्राम्य शब्दांचा वापरही ते बिनदिक्कत करत.

**ल. रा. पांगारकर** (१८७२-१८४१) संशोधक व निबंधकार म्हणून परिचित असणाऱ्या पांगारकरांनी स्वभाषा, स्वधर्म आणि स्वसंस्कृतीच्या अभिमानातून लेखन केले. 'मुमुक्षू' (१९०७) हे साप्ताहिक सुरू करून त्यांनी पारमार्थिक, धार्मिक, सामाजिक व नैतिक विषयांवर वैचारिक लेखन केले.

**श्रीधर व्यंकटेश केतकर** (१८८४-१९३७) समाजशास्त्रज्ञ, संशोधक व कादंबरीकार असणाऱ्या केतकरांनी 'ज्ञानकोशा' चे खूप मोठे काम एकहाती सिद्ध केले. प्राचीन महाराष्ट्र व भारतीय जातिव्यवस्था, समाजरचना वगैरेंसंदर्भात त्यांनी अभ्यासपूर्ण लेखन केले. ज्या विषयांच्या वाट्याला सहसा कोणी जात नाही, ते विषय हाताळण्याचा, ज्ञानक्षेत्रातील प्रस्थापित मतांना धक्के देऊन नवे विचार मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांचे लेखसंग्रह ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले असून त्यांमधील विषयांचे वैविध्य व केतकरांची समाजशास्त्रीय विश्लेषक पद्धती थक्क करणारी आहे. 'महाराष्ट्राची काव्यग्राहकता', 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण', 'सामाजिक परिस्थिती', 'ग्रंथपरीक्षण आणि ग्रंथदोष', 'स्त्रियांचे वाङ्मय आणि स्त्रियांच्या चळवळी', 'राजकीय चळवळी आणि वाङ्मयवृद्धी', 'काव्यपरीक्षण आणि जनता', 'वाङ्मयोपासनेचा धंदा' यांसारख्या लेखांमधून त्यांचे वाङ्मयीन विचार व्यक्त झाले आहेत. 'स्त्रियांचे संसारशास्त्र', 'मुंबई शहरातील शरीरविक्रय', 'सिनेमाचा धंदा', नगरसंवर्धन व नगरसौंदर्य, 'बालसंरक्षण' यांसारख्या लेखांतून त्यांचे समाजशास्त्रीय आकलन प्रकटते. 'इतिहासविषयक प्राचीन कल्पना', 'भारतीय संस्कृती विकासाचे अवलोकन', 'समाजशास्त्र आणि धर्म यांचा परस्परसंबंध', 'सामाजिक क्रांती आणि तिची तयारी', 'वात्सायन' यांच्या 'रतिशास्त्र मीमांसा' या पुस्तकाची प्रस्तावना वगैरे लेखांमधून केतकरांच्या आंतरविद्याशाखीय व्यासंगाचा, सूक्ष्म चिकित्सक विवेचक दृष्टीचा व समाजशास्त्रज्ञाचा प्रत्यय येतो.

केतकरांच्या विचारविश्वाचे व लेखनशैलीचे दर्शन त्यांच्या पुढील लेखनांतून घडते - राष्ट्रीय एकात्मतेसाठी सर्व जातीच्या व सर्व धर्मांच्या लोकांसाठी एकच कायदा करण्याची आवश्यकता ते सांगतात. "विविध समाजाचे पृथकत्व ज्या समाजविशिष्ट कायदेपद्धतीमुळे विनाकारण उत्पन्न होते, त्या प्रकारच्या कायद्याविषयी अधिक विचार करून व अनवश्य भिन्नता काढून टाकून सर्व समाजास सामान्य कायदा निर्माण करण्याकडे देशाची एकंदर प्रवृत्ती असावी, का की येणेकरून अधिक सारखेपणा वाढून राष्ट्रीयत्वाचा विकास होईल." (फडके (संपा.): १९९४ : पृ.१७) केतकरांनी भाषावार प्रांतरचनेचा जोरदार पुरस्कार केला होता. "प्रांतिक राज्यकारभार देशी भाषेत व्हावा, तो देखील इतका की गव्हर्नरने इंग्रजीत सही केली तर ती बेकायदेशीर ठरावी. देशभाषेत हायकोर्टाचे निवाडे व्हावेत. म्हणजे देशी सामान्य भाषांना कायदेशीर भाषेचा संस्कार होईल आणि इंग्रज कायदेपंडितांचे देशात प्रामुख्य राहणार नाही." (पृ.४५) केतकरांच्या विचारांच्या वरील काही अंशावरून त्यांचे सामाजिक आकलन व दूरदृष्टी यांचे प्रत्यंतर येते.

**वासुदेवशास्त्री खरे** (१८५८-१९२४) यांनी 'ऐतिहासिक लेखसंग्रह' हे मासिक १८९७ साली सुरू करून इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात भरीव काम केले. त्यांच्या संशोधनपर लेखांचे बारा खंड असून त्यातूनच त्यांचा व्यासंग, चिकित्सक, समतोल दृष्टिकोण दिसून येतो. न. चिं. केळकरांच्या 'मराठे व इंग्रज' या ग्रंथाला खरेशास्त्रींनी लिहिलेली प्रस्तावना मराठी निबंधाचा एक उत्कृष्ट नमुना आहे. त्यांची भाषा रूपगुणसंपन्न होती. चिं. वि. वैद्य (१८६१-१९३५) यांच्या 'निबंध आणि भाषणे' या ग्रंथामधून त्यांचे मराठी भाषा, वाङ्मय व महाराष्ट्राविषयीचे विवेचन येते. स्त्रियांच्या विवाहविषयक प्रश्नांवर 'अबलोन्नती' या लेखमालेतून त्यांनी चर्चा केली आहे. 'अबलोन्नती लेखमाले' त त्यांनी सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नांची हकीकत आणि सुधारणा यशस्वी करण्याचे मार्ग, लग्नाच्या चालीरीतींचा संक्रमणेतिहास, लग्नाचे खरे उद्देश व त्याचे महत्त्व, बालविवाहापासून होणारे दुष्परिणाम अशा अनेक प्रश्नांचे धर्मशास्त्रविषयक ग्रंथांच्या आधारे विवेचन केले आहे. त्यांच्या निबंधांपैकी 'मराठी भाषा आणि तिच्यावर इतर भाषांचा परिणाम', 'मराठी भाषेचा इतिहास', महाराष्ट्र देश, 'महाराष्ट्र भाषा व महाराष्ट्र वाङ्मय', 'मराठी गद्यरचना' हे अभ्यासपूर्ण लेख त्यांच्या शोधक व चिकित्सा बुद्धीचे निदर्शक आहेत. वि. गो. विजापूरकर (१८६३-१९२६) यांनी 'ग्रंथमाला' (१८९४), 'विश्ववृत्त' (१९०६) ही नियतकालिके सुरू करून राजकारण, धर्म, शिक्षण, साहित्य या विषयांवर राष्ट्रवादी व परंपरानिष्ठ भूमिकेतून वैचारिक लेखन केले.

**अ. ब. कोल्हटकर** (१८७९-१८३१) – हे 'संदेश' (१९१५) या पत्राचे संपादक. त्यांनी इतरही अनेक पत्रांतून लेखन केले. त्यांचे वृत्तपत्रीय अग्रलेख व इतर लेखन 'अ. बा. कोल्हटकर स्मारक ग्रंथ' या नावाने तीन खंडांमध्ये प्रकाशित झाले आहेत. राजकीय स्वातंत्र्य, स्वदेश प्रेम, समाजजागृती या उद्देशाने कोल्हटकरांनी लेखन केले. त्यांचे अग्रलेख विशेषत्वाने गाजले. तत्कालीन जीवनव्यवहाराबाबत खूप महत्त्वाचे निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे. "सुशिक्षितांची भाषा लोकसमाजापासून फार लांब राहू लागलेली आहे. सुशिक्षितांची व्याख्याने, त्यांची वर्तमानपत्रे, त्यांची काव्ये व त्यांचे विचार लोकसमाजाच्या अंतःकरणात मुळीच नसतात! ते काय बोलतात हे लोकसमाजास मुळीच कळत नाही व लोकसमाजाच्या अंतःकरणात काय चाललेले आहे याची त्यांना दादही नसते... ही दोन अगदी निरनिराळी जगे आहेत. ज्या जगात सुशिक्षित लोक वावरतात त्या जगात बहुजन समाज वावरत नाहीत

व ज्या जगात बहुजन समाज वावरतो त्या जगात सुशिक्षित लोक वावरत नाहीत. ह्याप्रमाणे सुशिक्षित लोक व बहुजन समाज यांच्यामध्ये तुटकपणा आला आहे. ते एकमेकांपासून अलग झालेले आहेत. एकमेकांची एकमेकांना ओळखही नाही." एकंदर मध्यमवर्गीय वाङ्मयीन सांस्कृतिक व्यवहाराच्या सर्व मर्यादा त्यांनी इथे नोंदविल्या आहेत. बहुजन समाजाला समजेल, आकलन होईल अशी लोकांच्या नित्यपरिचयाची साधी सोपी भाषा त्यांनी वापरली. भा. ब. भोपटकर (१८७४-१८४९) यांनी 'भाला' (१९०५) हे पत्र 'मायदेशाच्या हितासाठी काम' करण्याच्या उद्देशाने काढले. त्यांचे लेखन मुख्यतः जहाल राजकारणाचा व हिंदूधर्माभिमानाचा पुरस्कार करणारे आहे.

**स्त्रियांचे वैचारिक गद्य:**

**पं. रमाबाई** (१८५८-१९२२) या विद्वान व बहुभाषिक विदुषीने 'स्त्रीधर्म-नीति' (१८८२) हे पुस्तक वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी लिहिले. त्यांनी इंग्रजी व मराठीतून तेरा ग्रंथ लिहिल्याची नोंद आढळते. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत पं. रमाबाई लिहितात, "सांप्रतकाळी आमच्या हतभागी देशातील स्त्रीजातीची दशा किती शोचनीय आहे, हे सांगता पुरवत नाही. या देशातील स्त्रिया अगदी असहाय आणि ज्ञानशून्य आहेत. त्यामुळे त्यास आपले हित कसे प्राप्त करून घ्यावे, हेही समजत नाही. याजकरिता ज्ञानी लोकांनी त्यांचे हित काय केल्याने होईल? हे सांगून त्यांजकडून त्याप्रमाणे आचरण करविले पाहिजे." स्त्रियांनी कसे वागावे, कसे राहावे यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी हा ग्रंथ त्यांनी लिहिला. 'पाया', 'विद्या', 'मर्यादा', 'धर्म', 'गृहकृत्य', 'बालकाचे पालन', 'इतिकर्तव्यता' या आठ प्रकरणांतून स्त्रियांना 'आत्मोद्धारा' चा मार्ग दाखविला आहे. उत्कर्षाचा पाया आत्मावलंबन आहे आणि स्त्रीने जर आत्मावलंबनाचा मार्ग पत्करला तर तिची उन्नती ती स्वतःच करू शकेल, असे त्या म्हणतात. पं. रमाबाईंची भाषा आर्जवी, मृदू आहे. त्या स्त्रियांना स्वावलंबी, कामसू, शिक्षित होण्याचे आवाहन करतात. आदर्श पत्नी, माता, गृहिणी या परंपरागत भूमिकांचे यशस्वी पालन करून स्वतःची उन्नती साधण्याचा उपदेश करतात. रमाबाईंचा 'स्त्रीधर्मनीति' पर उपदेश रूढिग्रस्त, भाबडा नाही. प्रयत्नवादाची आणि विद्याग्रहणाची त्याला जोड आहे.

अमेरिकन मिशनरी **मेरी मिचेल** (१८२७-१९०६) यांची 'ख्रिस्ती स्त्रियांच्या कर्तव्याविषयी निबंध' (१८८४), 'शास्त्रात वर्णिलेल्या स्त्रिया,' भाग १ (१८८८), भाग २ (१८९०) ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. १८९६ च्या सुमारास स्त्रियांना लिहिण्यासाठी उत्तेजन देण्याचा प्रयत्न मासिक 'मनोरंजन', 'सुधारक' यांसारख्या नियतकालिकांनी केला. हा कालखंड स्त्रियांच्या घडणीचा होता. डॉ. आनंदीबाई जोशी, डॉ. रखमाबाई, रमाबाई रानडे यांसारख्या कार्यकर्त्या, कृतिशील स्त्रियांनी प्रसंगोपात्त लेखनही केले. या काळात 'पातिव्रत्य विचार' (अनसूया काळे), 'विधवा दुःख निवेदन' (सीताबाई छत्रे), 'तरुण मुलास पत्र' (कमलाबाई किबे), 'भावी आयुष्य सुखमय करण्याची तरुण पिढीवर असलेली जबाबदारी' (मथुराबाई जोशी) यांसारखे वैचारिक लेखन झालेले आहे.

१९०० ते १९२० या काळात स्त्रियांनी पुस्तकरूपाने केलेले वैचारिक लेखन हे अतिशय अल्प आहे. स्त्रीशिक्षण, व्यक्तिमत्त्व घडण, गृहिणी, कर्तव्य, आदर्श स्त्रीत्व अशा विषयांवर प्रामुख्याने वैचारिक लेखन झाल्याचे दिसते.

munotes.in

**सत्यशोधकीय / प्रबोधनपर वैचारिक गद्य:**

**म. फुले** (१८२७-१८९०) हे सामाजिक सुधारणेसंबंधी क्रांतिकारी भूमिका घेणारे आधुनिक महाराष्ट्रातील पहिले विचारवंत. सत्यशोधक समाजाचे संस्थापक. थॉमस पेनच्या 'राईट्स ऑफ मॅन' या ग्रंथाचा त्यांच्यावर विशेष प्रभाव. 'गुलामगिरी' (१८७३) हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ. जन्माधिष्ठित उच्चनीचतेच्या चुकीच्या कल्पनेमुळे शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे स्वरूप या ग्रंथामधून विशद केले आहे. शेतकरी, शूद्र इत्यादिकांच्या अज्ञानाचा, देवभोळेपणाचा गैरफायदा घेऊन त्यांच्यावर वर्चस्व गाजविणाऱ्या ब्राह्मण वर्गाचे सत्य स्वरूप त्यांच्या ध्यानी आणून द्यावे, स्वार्थी ब्राह्मणाच्या जोखडातून स्वतःची मुक्तता करून घेण्याची प्रेरणा त्यांना मिळावी, या हेतूने त्यांनी हा ग्रंथ लिहिला आहे. १८६३ साली अब्राहम लिंकन यांनी अमेरिकेतील गुलामगिरी कायद्याने बंद केली. या घटनेने प्रभावित झालेल्या फुल्यांनी 'युनायटेड स्टेट्समधील सदाचारी लोकांनी गुलामांना दास्यत्वातून मुक्त करण्याच्या कामात औदार्य, निरपेक्षता व परोपकार बुद्धी दाखविली, यास्तव त्यांच्या सन्मानार्थ' हा ग्रंथ परमप्रीतीने अर्पण केला आहे. तसेच 'माझे देशबांधव त्यांच्या या स्तुत्य कृत्याचा कित्ता आपले शूद्र बांधवास ब्राह्मणांच्या दास्यत्वातून मुक्त करण्याच्या कामी घेतील', अशी आशा व्यक्त केली आहे. या ग्रंथात सोळा प्रकरणे असून ती संवादात्मक पद्धतीने लिहिला आहे. जोतीरावांचे सहकारी त्यांना प्रश्न विचारतात व जोतीराव त्यांची उत्तरे देतात. अशी निवेदनशैली आहे. 'ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो, त्या दिवशी त्याचा अर्धा सद्गुण जातो.' या महाकवी होमरच्या वचनाने ग्रंथाचा प्रारंभ होतो. पहिल्या नऊ प्रकरणांमध्ये हिंदुस्थानातील ब्राह्मणी वर्चस्व व अवतारकल्पनेचे विश्लेषण येते. स्वार्थ, अट्टल धूर्तपणा, उर्मटपणा यांचा परिपाक असलेले ब्राह्मण हिंदुस्थानाबाहेरून आले. आणि त्यांनी इथल्या क्षेत्रपतींचा म्हणजे आताच्या शूद्र-अतिशूद्रांचा पराभव केला. स्वजातीचा महिमा वाढावा म्हणून आपल्या धार्मिक पुस्तकात खोट्या कथा घुसडल्या. त्यांनी स्वहितासाठी धर्मशास्त्रे निर्माण केली. 'ब्राह्मणांनी शूद्रांवर जे नीतिनिर्बंध घातले, त्या सर्वांचा उद्देश एवढाच होता की, गरीब, अज्ञानी आणि अशिक्षित शूद्रांना फसवून त्यांच्या मानेभोवती सदा गुलामगिरीचे पाश करकचून आवळता यावेत. जातिभेदाचे मूळ ब्राह्मणांच्या स्वार्थी धर्मांधतेत व अहंकारात आहे' संपत्ती, सर्वाधिकार व सवलती स्वतःच्या हाती राखून शूद्रांना मानवाचे सामान्य अधिकारही ब्राह्मणांनी नाकारले. आपल्या लांड्यालबाड्या उघडकीस येऊ नयेत म्हणून धर्मग्रंथ शूद्रांनी वाचू नयेत, असे निर्बंध घातले. ब्राह्मणवर्गाची सेवा करण्यासाठी शूद्रांचा जन्म झालेला असतो, यासारख्या अंधश्रद्धांवर फुल्यांनी कडाडून हल्ला चढविला. ब्राह्मण खरे देशभक्त असते तर त्यांनी शूद्रांना व अतिशूद्रांना गुलामगिरीत खितपत ठेवले नसते. कनिष्ठ वर्गाने इंग्रजांचे राज्य असेपर्यंत विद्या संपादन करून आपले अज्ञान व पूर्वग्रह दूर सारावे आणि ब्राह्मणांनी त्यांच्या मानेभोवती टाकलेले गुलामगिरीचे पाश तोडून टाकून आपले मानवी हक्क संपादण्यासाठी सिद्ध व्हावे, असे आवाहन फुल्यांनी केले आहे.

'शेतकऱ्याचा असूड' (१८८३) हा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ भारतीय शेतकऱ्यांच्या मागासलेपणाची कारणमीमांसा करणारा व त्यांच्या उन्नतीचे मार्ग सुचविणारा आहे. शेतकऱ्यांचे 'धर्मामिषा'ने भटभिक्षुकांकडून होणारे शोषण व सरकारी नोकरशाहीतील ब्राह्मण कामगारांकडून होणारे आर्थिक शोषण उघड करून शूद्र शेतकऱ्यांना आपला बचाव करण्यास समर्थ करण्याच्या उद्देशाने फुल्यांनी या ग्रंथाचे लेखन केले. शिक्षणाचा अभाव हे

शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे मूलभूत कारण असून त्याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात, 'विद्येविना मती गेली, मतिविना नीती गेली, नीतिविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.' शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे अत्यंत भेदक वर्णन त्यांनी केले आहे तसेच शेतकऱ्यांचे अज्ञान आणि वाईट चालीरीतींनाही फुल्यांनी धारेवर धरले आहे. शेतकऱ्याच्या उन्नतीसाठी शेतीचे आधुनिक ज्ञान, शेतीविषयक ग्रंथ, मासिके, उत्तम बैल, जनावरांसाठी गायराने, पाणलोट क्षेत्राच्या ठिकाणी ताली, बंधारे, तलाव, पिकांच्या संरक्षणासाठी पहारे व नुकसानभरपाईची सोय इत्यादी उपाय त्यांनी सांगितले आहेत. जगभरातील पारंपरिक धर्मतत्त्वांनी मानवजातीला घातलेल्या सर्व प्रकारच्या बेड्या तोडून व्यक्ती व जनसमूहांच्या समग्र विकसनाचा अवकाश खुला करणारा क्रांतिकारी आशय 'सार्वजनिक सत्यधर्म' (१८९१) मधून आविष्कृत झाला आहे. या ग्रंथामध्ये सुख, धर्मपुस्तक, निर्माणकर्ता, पूजा, नामस्मरण, नैवेद्य अथवा अन्नदान, अनुष्ठान, स्वर्ग, स्त्री-पुरुष, पाप, पुण्य, जातिभेद, पशुपक्ष्यादी वगैरे मानवप्राणी यांजमध्ये भेद, धर्म, नीती, तर्क, दैव, आर्यभट ब्राह्मणांचे वेद आणि सार्वजनिक सत्याची तुलना, सत्य, आकाशातील ग्रह, जन्म, मृत्यू, लग्न, नावाचा संस्कार, प्रेताची गती, श्राद्ध या विषयांवर संवादात्मक शैलीने तात्त्विक, वैचारिक आशय सोप्या व सुलभ भाषेत सांगितला आहे. फुल्यांच्या भाषाशैलीसंदर्भात भालचंद नेमाडे म्हणतात, "फुल्यांच्या गद्याचा मुख्य भाग समाजचिंतनाला वाहिलेला आणि हिंदू संस्कृतीची सबंध संरचनाच बदलू पाहणाऱ्या देशीपणाच्या पोटतिडकीने लिहिलेला आहे. विशेषतः 'शेतकऱ्यांचा असूड' (१८८३), 'इशारा' (१८८५) आणि 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' (१८९१) या तीन पुस्तकांतील फुल्यांचे गद्य त्यांच्या पूर्वी अपरिचित असे. अर्थाचे अवाढव्य प्रांत आक्रमताना दिसते. इतके आधुनिक क्रांतिदर्शी विचार एवढ्या झपाट्याने मराठी गद्यात व्यक्त होताना मराठी भाषेच्या सर्व उपव्यवस्था वाकलेल्या दिसतात." (नेमाडे : १९८२ : पृ. ६९८)

**ताराबाई शिंदे** (१८५०-१९१०) यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध १८८२ साली लिहिला. या निबंधामध्ये त्यांनी धर्म, रूढी, परंपरा या नावाखाली पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रियांवर जी बंधने लादली व स्त्रियांचे जे शोषण केले, त्यावर हल्ला चढविला आहे. स्त्री आणि पुरुष निसर्गतः समान आहेत, हा महत्त्वाचा विचार त्यांनी मांडला आहे. धर्मग्रंथ व देवदेवतांची परखड व तर्कशुद्ध चिकित्सा करून त्यांचे पक्षपाती स्वरूप उघडे पाडले आहे. हा निबंध मराठी स्त्रीवादी साहित्याचा प्रारंभबिंदू मानला जातो. ताराबाईंच्यावर महात्मा फुले व सत्यशोधक विचारसरणीचा प्रभाव पडलेला होता

**शास्त्री नारो बाबाजी महाधट पाटील** यांनी १८९२ साली 'सावित्रीबाईंची भाषणे' प्रकाशित केली. सावित्रीबाईं फुले यांच्या भाषणाचे विषय उद्योग, विद्यादान, सदाचरण, व्यसने, कर्ज असे आहेत. विषयावरूनच भाषणांचे सामाजिक महत्त्व लक्षात येते. 'उद्योग' या भाषणामध्ये त्या म्हणतात, "यासाठी न थकता दिवसभर उद्योग करणे हा मनुष्याचा उत्तम धर्म असून तो त्याचा खरा कल्याण करणारा मित्र होय. ...आपल्या देशात थोडेसे इंग्रज लोक व्यापाराला आले आणि त्यांनी एक प्रचंड राज्य स्थापन केले. हा दृढ उद्योगाचा आणि बुद्धिशक्तीचा चमत्कार आहे. त्यात दैवाचा संबंध नाही. दैव, प्रारब्ध यांवर विश्वास ठेवणारे लोक आळशी व भिकारी असून त्यांचा देश नेहमीच दुसऱ्याच्या गुलामगिरीत राहतो. याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे आपला हिंदुस्थान होय." (माळी (संपा.) : १९९८ : पृ. ९४) उद्यमशीलतेचे व्यक्तिगत व सामाजिक महत्त्व अत्यंत यथार्थपणे सावित्रीबाईंनी मांडले आहे.

munotes.in

'विद्यादान' या विचारप्रवर्तक भाषणामध्ये त्या म्हणतात, "आळस, परावलंबन वगैरे दुर्गुण न वाढविण्यास व मनुष्याच्या अंगचे सद्गुण वाढण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल तर विद्यादान होय. विद्या देणारा व विद्या घेणारा असे दोघेही या धर्माच्या योगाने खरीखुरी माणसे बनतात. या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोप होतो. विद्या देणारा धैर्यशाली निर्भय बनून विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो." (पृ. ९७) यावरून सावित्रीबाईंची प्रतिभा, स्वतंत्र व मूलगामी विचारदृष्टी, चिंतनशीलता यांचे प्रत्यंतर येते. सावित्रीबाईंनी जोतीबांस लिहिलेल्या तीन पत्रांमधूनही त्यांच्या गद्यशैलीचे दर्शन घडते. त्यांची भाषा साधी, सोपी असून काळजाचा ठाव घेते. शास्त्री नारो बाबाजी महाधट पाटील यांनी 'महात्मा जोतिबा फुले यांचे अमर जीवन' हे म. फुल्यांचे पहिले चरित्र १८९१ साली लिहिले आहे. याबरोबरच त्यांची 'पूजापद्धती भाग १ व २' (१९०२), 'सत्यशोधक समाज जाहीर खबर' (१९०५), 'सत्यशोधक समाज : ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना', 'सत्यशोधक समाज निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यामधून सत्यशोधक समाजतत्त्वांचे प्रतिपादन केले आहे.

**तानुबाई बिर्जे** यांनी 'दीनबंधु'ची धुरा १९०८ ते १९१३ या काळात समर्थपणे सांभाळली. त्यांनी शिक्षण, स्त्रिया व राजकीय विषयांवर संपादकीय लेखन केलेले आहे. पुणे सत्यशोधक समाजाचे सेक्रेटरी व रामोशी समाजाच्या नेत्या विद्यादेवी सावित्रीबाई रोडे यांची काही भाषणे, निबंध व वैचारिक लेखन उपलब्ध आहेत. 'विद्या शिकल्याचे फायदे' या निबंधामध्ये त्यांनी ब्राह्मण जातीची उत्पत्ती व ब्राह्मण कोणास म्हणावे, याची साधार मांडणी केली आहे. या निबंधाचा एकच भाग आज उपलब्ध आहे (दीनमित्र, २१ जुलै १९१५) त्यांनी 'शिक्षण' (१९१४), 'रामोशी' (१९२१), 'विद्येचा प्रकाश' (१९२३) या विषयांवरील निबंध सत्यशोधक परिषदा व रामोशी परिषदांमध्ये वाचले. सत्यशोधक समाजाच्या विचारकार्यातून आत्मभान आलेल्या पार्वतीबाई महाधट, गंगूबाई खेडकर, लक्ष्मीबाई नायडू, यमुनाबाई गोडेकर, शांताबाई चव्हाण, कमलाबाई जाधव, विमलाबाई देशमुख, जानक्का शिंदे, फुलवंताबाई झोडगे आदी स्त्रियांचे विचार व लेखन सत्यशोधकीय मूल्यदृष्टीतून स्त्रीजीवनाचा व तत्कालीन समाजवास्तवाचा अन्वयार्थ लावते. सत्यशोधकीय स्त्रियांची एक स्वतंत्र परंपरा दाखवता येते.

**कृष्णराव भालेकर** (१८५०-१९१०) सत्यशोधक समाजाचे पहिल्या पिढीतील धडाडीचे कार्यकर्ते असणाऱ्या कृष्णराव भालेकरांनी 'दीनबंधु' (१८७७) तसेच 'दीनमित्र' (१८८८), 'शेतकऱ्यांचा कैवारी' (१८९२), 'अंबालहरी' (१८८९) ही वृत्तपत्रे सुरू करून पुरोहितशाही, सावकारशाही, शोषण, अन्याय यांविरुद्ध आवाज उठवत शेतकरी-कष्टकऱ्यांची बाजू उचलून धरली. 'शास्त्राधार' या पुस्तिकेमध्ये शास्त्राधाराचे बुजगावणे पुढे करून खेड्यातील अशिक्षित, सामान्य शेतकऱ्यांना भट, भिक्षुक इत्यादी मंडळी कसे लुटतात, याचे चटकदार, संवादात्मक शैलीत भालेकरांनी वर्णन केले आहे. 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा', 'शेतकरी आणि उद्योग' आदी भाषणांमधून त्यांनी शेतकऱ्यांना उद्यमशीलतेचा व शिक्षण घेण्याचा संदेश दिला आहे. शेतकऱ्यांना 'विद्येचे पाय' व 'उद्योगाचे हात' नसल्यामुळे त्यांचे जीवन अठराविश्व दारिद्र्याने कसे व्यापले आहे, हे विविध उदाहरणे, दाखले देत, रसाळ, लोकसंवादी भाषेत पटवून दिले आहे. याबरोबरच त्यांचे 'निराश्रीत हिंदू आणि ब्राह्मण, क्षत्रिय, तेलगू तरुणांस उद्देशून', 'ब्राह्मणांवर रागावण्याची कारणे', 'अंतःकाळचे उद्गार', 'शंकराचार्य काय करून असतात?' यांसारखे लेखन तसेच अग्रलेख व स्फुटलेख, पत्रव्यवहार, टिपणे आदी वैचारिक

साहित्य प्रसिद्ध आहे. समाजोद्धाराची विलक्षण तळमळ व अंतरीच्या जिव्हाळ्यामुळे त्यांचे लेखन थेट हृदयाला भिडते. अस्सल मराठी बोली, छोटी, सोपी, सुलभ वाक्यरचना, अर्थपूर्ण म्हणी व वाक्प्रचार, दृष्टांत, कथा यांचा मार्मिक वापर, संवादांचा खुबीने वापर, वास्तवाचे भेदक दर्शन घडविणारी चित्रदर्शी, ओघवती, प्रवाही, अर्थवाहक भाषा आदी भालेकरांच्या लेखनाचे विशेष आहेत.

**नारायण मेघाजी लोखंडे** (१८४८-१८९७) यांनी 'बाँबे मिल हँड असोसिएशन' ही भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन करून व 'दीनबंधु' या पत्राच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न धसास लावले. 'दीनबंधु' मधून लोखंड्यांनी कामगारांच्या विविध प्रश्नांबरोबरच, प्राथमिक शिक्षण, वसतिगृहांची आवश्यकता, बालविवाह, विधवाविवाह, केशवपन, हिंदू-मुस्लीम दंगली, जातिभेद, गणेशोत्सव, सत्यनारायण, शेतकऱ्यांचे विविध प्रश्न, खोतीपद्धत आदी विविध विषयांवर मूलभूत स्वरूपाचे लेखन केले. लोखंड्यांनी 'पंचदर्पण' (१८७६) या पुस्तिकेमध्ये स्त्रीशिक्षण, लग्नाचे वय, पुनर्विवाह, विधवाविवाह, लग्नातील उधळपट्टी, व्यसने, घटस्फोट, सहकार, बचत या विषयांवर परिणामकारक विचार व्यक्त केले आहेत व सामाजिक नियमनाकरिता नऊ नियम तपशीलवार सांगितले आहेत. त्यांच्या लेखनातून शोषित, वंचित, पीडित वर्गाचा मानवाधिकार व्यक्त होतो. **रामय्या व्यंकय्या अय्यावारू** (१८२६-१९१२) यांनी 'ईश्वरास प्रार्थना' (१९०१) या निबंधामध्ये सामाजिक वास्तवाला अधोरेखित करीत थेट ईश्वराविषयीचे प्रश्न विचारले आहेत व ईश्वराचे सर्वसाक्षित्व व सामर्थ्याला प्रश्नचिन्हांकित केले आहे. अय्यावारूंची साधी, सोपी भाषा, व्यवहारातील उदाहरणे देत ईश्वराच्या अस्तित्वावरच शंका उपस्थित करण्याची शैली आणि विवेकवाद, बुद्धिवाद यामुळे हा विचारप्रवर्तक निबंध वाचकांना अंतर्मुख करतो. **गणपतराव सखाराम पाटील** (मृत्यू १८९३) हे 'दीनमित्र' चे १८८८ ते १८९२ या काळात संपादक होते. त्याचे 'दीनमित्र' मधील 'धर्मगुरू म्हणविणारांस ताकिद', 'पंचोक्ती', 'काळे शेतकरी व गोरे शेतकरी', 'आमचे लोक का शिकत नाहीत?', 'तमाशे' इत्यादी लेखन शेतकरी-कष्टकरी जनसमूहांना केंद्रस्थानी ठेवून सामाजिक वास्तवाची परखड चिकित्सा करणारे व साध्या भाषेत समाजप्रबोधन करणारे आहे. **धोंडिराम नामदेव कुंभार** यांनी वैदिक यज्ञसंस्कृतीतील यज्ञांचे प्रकार, हिंसा, मद्यपान वगैरेंची चिकित्सा 'वेदाचार' (१८९६) या पुस्तिकेमध्ये केली आहे. **राजर्षी शाहू महाराज** (१८७४-१९२२) छत्रपती शाहू महाराजांची भाषणे, हुकूमनामे, जाहीरनामे, पत्रव्यवहार, आज्ञा यांतून बहुजन समाजाच्या उद्धाराचे विचार अभिव्यक्त झाले आहेत.

**कृष्णराव अर्जुन केळूसकर** (१८६०-१९३४) हे मराठीतील महत्त्वाचे चरित्रकार, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते. 'संत तुकाराम चरित्र' (१८९६), 'गौतम बुद्धाचे चरित्र' (१८९८), 'रामचंद्र विठोबा धामणकर चरित्र' (१९०२), 'छ. शिवाजी महाराज चरित्र' (१९०६), 'माधवराव रोकडे व जनाबाई रोकडे चरित्र' (१९२७) अशा तीसहून अधिक चरित्रांचे लेखन त्यांनी केले आहे. केळूसकरांनी विविध नियतकालिकांमधून विपुल लेखन केले आहे. त्यांचे निवडक लेख 'विचारसंग्रह भाग १' (१९३४) मध्ये संग्रहित आहेत. त्यामध्ये सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, शेती आदी विषयांवरील त्यांचे लेख समाविष्ट आहेत. 'आमच्या देशाची स्थिती', 'आमच्या निकृष्टावस्थेची कारणे', 'शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारावाचून गती नाही', 'आमची शेती', 'पाऊस पाडता येईल काय?', 'आमच्या समाजातील दुही', 'समाजास धर्माची आवश्यकता आहे काय?' अशा वैविध्यपूर्ण विषयांवर



munotes.in

विचारप्रवर्तक लेखन केळूसकरांनी केले आहे. त्यांच्या लेखनात समाजवास्तवाचे समग्र भान, शोषित वंचितांच्या उद्धाराची तळमळ, विवेक, आधुनिक मूल्यदृष्टी व दूरदृष्टी प्रकटते. **वासुदेव लिंगोजी बिर्जे** (१८६४-१९०८) हे 'दीनबंधु'चे संपादक, ध्येयवादी पत्रकार, व्यासंगी संशोधक होते. त्यांनी बडोदा संस्थानातील ग्रंथपालपदाची नोकरी सोडून सत्यशोधक समाजतत्त्वांच्या प्रचारार्थ 'दीनबंधु' पत्राचे १९०५ साली मुंबईहून पुनरुज्जीवन केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची आवश्यकता विशद करणारे लेखन त्यांनी सातत्याने केले. 'क्षत्रिय आणि त्यांचे अस्तित्व', (१९०३) हा त्यांचा संशोधनपर ग्रंथ मराठ्यांच्या क्षत्रियत्वाचा वेदकाळापासूनचा ऐतिहासिक शोध घेऊन मराठ्यांचे क्षत्रियत्व व त्यांची परंपरा सिद्ध करणारा मौलिक ग्रंथ आहे. बिर्जे यांनी या ग्रंथामध्ये क्षत्रियांची उत्पत्ती, चातुर्वर्ण्यव्यवस्थेतील स्थान, ज्ञानव्यवहारातील भूमिका व क्षत्रियांनी केलेली ग्रंथनिर्मिती, क्षत्रियांचा पराक्रम, वैदिक धर्मातील कर्मठतेला व शोषक तत्त्वांना आव्हान देऊन जैन, बौद्ध आदी कल्याणकारी धर्मांची केलेली स्थापना, परशुराम कथेची चिकित्सा, धर्मशास्त्रांनुसार क्षत्रियांचे स्थान, क्षत्रियांपासून निर्माण झालेला जनसमूह, क्षत्रियांच्या राजवटी, आजच्या मराठ्यांचे आर्यक्षत्रियत्व आदी घटकांचे साधार, सप्रमाण विवेचन केलेले आहे. मराठी, इंग्रजी, संस्कृत भाषांचा व त्यांमधील संदर्भसाधनांचा अभ्यास, अवतरणे, तळटीपा व प्रौढ गंभीर निवेदनशैली यांमुळे विश्वसनीय संदर्भग्रंथाचे मोल या ग्रंथास प्राप्त झाले आहे. भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांनी 'विविधज्ञानविस्तार' मध्ये (१९०५) परीक्षण लिहून या ग्रंथातील मतांचे समर्थन केले होते. विदर्भातील सत्यशोधक समाजाचे मोठे नेते **मो. तु. वानखडे** यांनी 'क्षत्रिय माळी पुढारी' हे मासिक चालविले तसेच 'सत्यशोधक ग्रंथमाला' सुरू केली. त्यांचे 'सत्याचा शोध' (१९०९), 'स्वयंपुरोहित' (१९०९), 'गायत्री मंत्र' (१९१२), ब्राह्मण आणि बहिष्कार (१९१३) आदी पंधरा ग्रंथ प्रसिद्ध. धार्मिक रूढी-परंपरांची चिकित्सा त्यांनी केली आहे. **कृ. क. चौधरी** यांनी 'अज्ञानांजन' (१९०३) या निबंधामध्ये शेतकऱ्यांच्या अज्ञानाची व दुःखाची मीमांसा केलेली आहे. 'शेतकऱ्यांचा दुःखोद्गार' (१९०७) मध्ये शेतकऱ्यांच्या दुःखदारिद्र्यास जबाबदार घटकांची चर्चा केली आहे. 'सत्यासाठी जीव देईन पण असत्याचा गंध नको' (१९०७) मध्ये सत्याचे महत्त्व सांगितले आहे. **मुकुंदराव पाटील** (१८८५-१९६७) यांनी 'हिंदू आणि ब्राह्मण' (१९१०) या पुस्तकामध्ये हिंदू (ब्राह्मणेतर) आणि ब्राह्मण हे एक नव्हेत. ब्राह्मण हे स्वतःला हिंदू धर्मगुरू समजत असले तरी त्यांचे विधी, उत्सव, पोशाख, सोवळे, आचार, रूढी, परंपरा, भाषा, प्रदेश इत्यादी गोष्टी हिंदूंपेक्षा (ब्राह्मणेतर) वेगळ्या आहेत. त्यांचा धर्म आणि हिंदूंचा धर्म वेगळा आहे. त्यांनी हिंदूंना कधीच समानतेची वागणूक दिली नाही, असा दावा केला आहे. संवादात्मक निवेदन तंत्र, उपहास-उपरोधयुक्त जोरकस भाषा, विश्लेषणात्मकता आदी वाङ्मयीन गुणवैशिष्ट्यांनी हा ग्रंथ प्रभावी ठरला आहे. **नारायण मारुतराव नवले** यांनी धर्मभोळेपणाची तुंबडी (१९१०) मध्ये 'धर्माच्या नावाखाली राजरोसपणे भिक्षा मागणारे, वाजवीपेक्षा फाजील आशेने शेतकऱ्यास लुबाडणारे बलुते-आलुते ह्यांचे अंतरंग उलगडले आहेत.' 'संजीवन' पत्राचे संपादक **द. भि. रणदिवे** यांनी 'दारुबाजी आणि गुरुबाजी' (१९२२) मध्ये दारू आणि धार्मिक गुरू यांचा समाजावर होणारा दुष्परिणाम चित्रित केला आहे. ह. ल. चव्हाण यांनी 'पुराणातील गडबडगुंडा' (१९२५), 'अंत्येष्टी व श्राद्ध' (१९२९) **नाथाजी माळी** यांनी 'धर्म आणि ब्राह्मण' (१९१८) यामधून धर्मचिकित्सा केलेली आहे.

munotes.in

सत्यशोधकीय नियतकालिकांमधून वैचारिक गद्य प्रसिद्ध झाले आहे. 'दीनबंधु' (१८७७), 'सत्सार' (१८८५), 'दीनमित्र' (१८८८, १९१०), 'सयाजी विजय', 'बडोदा वत्सल', 'राघवभूषण' (१८८८), 'अंबालहरी' (१८८९), 'शेतकऱ्यांचा कैवारी' (१८९२), 'विश्वबंधु' (१९११), 'जागरुक' (१९१७), 'जागृति' (१९१७), 'डेक्कन रयत' (१९१८) 'विजयी मराठा' (१९१९), 'सत्यप्रकाश' (१९१९) , 'गरिबांचा कैवारी' (१९२०), 'भगवा झेंडा' (१९२०), 'तरुण मराठा' (१९२०), 'राष्ट्रवीर' (१९२१), 'प्रबोधन' (१९२१) आदी नियतकालिकांमधून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, शेतकरी, स्त्री, दलित, कामगार, इतिहास अशा विविध विषयांवर सामान्य शेतकरी-कष्टकरी वर्गातील व्यक्तींनी लेखन केले आहे.

सत्यशोधकीय वैचारिक गद्यामधून प्रामुख्याने धर्मचिकित्सा, अनिष्ट रूढिपरंपरा, अंधश्रद्धा यांचे निर्मूलन, पुरोहितशाही, सावकारशाही यांचे शोषक रूप, शिक्षण प्रसार, शेती व शेतकरी सुधारणा आदी विषयांवर विचार मांडले गेले. काही लेखनामध्ये उथळपणा, आवेश, आक्रमकता, एकाकीपणा, पुनरुक्ती, असभ्य टीका वगैरे दोषही आहेत.

**दलित वैचारिक गद्य:**

मराठीमध्ये दलित वैचारिक गद्याची एक स्वतंत्र परंपरा आहे. दलित वैचारिक गद्याचे स्वरूपविशेष स्पष्ट करताना गंगाधर पानतावणे म्हणतात, "दलित वैचारिकता ही परिवर्तननिष्ठ वैचारिकता आहे. त्यामुळे दलित वैचारिकतेची सर्व प्रकारचे शोषण आणि सर्व प्रकारची गुलामगिरी नाकारणे व झुगारून देणे ही प्रतिज्ञा आहे. दलित, पीडित, शोषित आणि सर्व वंचित समाजाला न्यायसन्मुख करणे, दास्यमुक्त मानसिकतेचा त्याला प्रत्यय देणे, त्यात मानवी स्वातंत्र्याची चेतना निर्माण करणे ही दलित विचारवंतांची परिक्रमा आहे... स्वतःच्या तेजस्वी आणि क्रांतिगर्भ दृष्टिकोनातून पाहायला दलितांना प्रवृत्त करणारा 'आंबेडकरविचार' ही एक मूल्यगर्भ जाणीव आहे. ...दलितांचा विचार हा सर्व काळात क्रियाशीलतेचा, नवतेचा शोध घेत राहिला आहे. जे जे स्थितिवादी आहे ते ते नाकारून नवा आशयसंपन्न विचार रुजविण्याची आकांक्षा त्या मागे आहे. एक प्रकारे जीर्ण मानसिकता आहे, ती नाकारून नवे मन्वंतर घडविण्याची प्रतिज्ञा दलित वैचारिक वाङ्मयाची आहे. हे एक प्रबोधन होय आणि प्रबोधन ही वैचारिक क्रांतीच असते. दलित वैचारिक वाङ्मय प्रबोधनाचे वाहक आहे. म्हणजे ते वैचारिक क्रांतीचे वाहक आहे." (पानतावणे : १९९५ : पृ. २)

आधुनिक दलित चळवळीचा प्रारंभ **गोपाळबाबा वलंगकर** (मृत्यू १९००) यांच्यापासून झाला. 'अनार्य दोष परिहार मंडळी' (१८९०) नावाची संस्था स्थापन करून त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचे काम केले. 'दीनबंधु', 'सुधारक' इत्यादी पत्रांतून त्यांनी लेखन केले. 'विटाळ विध्वंसन' (१८८९) या पुस्तिकेमधून अस्पृश्यांना हिंदू धर्मात भेदभावपूर्ण वागणूक का दिली जाते, हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून त्यांनी आपल्या मताच्या पुष्टीकरणासाठी सव्वीस प्रश्न उपस्थित केले आहेत. वेद, स्मृती, गीता, महाभारत, पुराणे, संतवाङ्मय यांतील दाखल्यांचा त्यांनी आधार घेतला आहे. "आम्ही जी शास्त्रे व पुराणातील वाक्ये उदाहरणार्थ घेऊन आपल्या सर्वांच्या सेवेस सादर केली आहेत, ती खोटी असून सर्व हिंदू धर्माभिमानी त्यास मानीत नसल्यास त्या सर्वांचा एक महायज्ञ करून त्यांच्या शांतर्थ्य पत्र प्रसिद्ध करणाऱ्याचा बळी अर्पण केला तरी तो स्वसंतोषाने बळी जाण्यास सिद्ध आहे, परंतु समक्ष

खरा न्याय करावा." असे त्यांनी पुस्तिकेच्या 'विनंतीपत्रका' त म्हटले आहे. वलंगकरांनी या पुस्तिकेतून जातिभेद, जन्मसिद्ध उच्चनीचता, अस्पृश्यता, ग्रंथप्रामाण्य, रूढिपरंपरा, ब्राह्मणी श्रेष्ठता यांसंदर्भात मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. हिंदू धर्मग्रंथ व ब्राह्मणी दांभिकता यांची तर्कशुद्ध चिरफाड करून त्यांचा परखड समाचार घेतला आहे. हिंदू धर्मरक्षक शंकराचार्यांना ते विचारतात, "महाराची लग्न लाविल्याने, क्रियाकर्म केल्याने व त्यास साधुदीक्षा दिल्याने किंवा छाया स्पर्शादी केल्याने, किती पवित्र हिंदू भ्रष्ट होऊन नरकात गेले व जातात ते शंकराचार्य महाराज यांनी आपणांस पवित्र मानणाऱ्या हिंदूंना यमाजी भास्कराचे लिस्ट म्हणजे (पाप्यांची व पुण्यवान लोकांची स्मरण वही) पाहून प्रसिद्ध करावे." गोपाळबाबांनी अस्पृश्य समाजाच्या अवनतीची पुढीलप्रमाणे कारणमीमांसा केली आहे - जातिव्यवस्थेचा जुलूम, अस्पृश्यता, विद्या, कलाकौशल्य शिकण्यास प्रतिबंध, धर्मशाळा, अन्नपाणी यांचा मुक्त उपभोग घेण्यास मनाई, व्यापार करण्यास प्रतिबंध, नोकऱ्यांचा अभाव, बाजारहाट व व्यापार करताना लुबाडणूक, फसवणूक, स्पर्शबंदी यांसारख्या बाबींमुळे दलितांच्या वाट्यास अमानुष जीवन आल्याचे गोपाळबाबा सप्रमाण दाखवून देतात. जातिव्यवस्थेसंदर्भात ते लिहितात, "हिंदू धर्माच्या सर्व जातींना एक शास्त्र म्हणून नाही. नाना शास्त्रे व नाना पुराणे, नाना मते, नाना पंथ जातीच्या अनेकत्वामुळे झाली आहेत. त्या सर्वांत जाती धर्म हे महाशास्त्र होऊन बसले आहे. हिंदू लोक सहा शास्त्रे व अठरा पुराणे ही एकीकडे गुंडाळून ठेवतील पण जाती नियमरूप शास्त्र त्यांच्या डोळ्यापुढे सर्वदा उघडे असते व त्याचा अंमल त्यांच्यावर निरंतर चालत आहे." हिंदू धर्मशास्त्र व रूढीपरंपरांमुळेच अस्पृश्यता निर्माण झाल्याचे व टिकून राहिल्याचे अधोरेखित करून त्यांनी धर्ममार्तंडांना आव्हान दिले आहे. आपल्यावरील अन्याय दूर झाला नाही तर अस्पृश्य लोक हा प्रदेश सोडून जातील आणि सरकारला विनंती करतील, 'जेथे आम्हाला न्याय, समता आणि माणुसकी मिळेल असा प्रदेश आम्हाला द्या.' गोपाळबाबांची भाषा सडेतोड, जोरकस, तर्कशुद्ध व आवाहनात्मक आहे. त्यांच्या विटाळविध्वंसन चळवळीने व विचारांनी दलित वर्गात विचारजागृतीचे नवे भान निर्माण केले.

**शिवराम जानबा कांबळे** हे गोपाळबाबा वलंगकरांनंतर महत्त्वाचे दलित पुढारी लेखक. हरिश्चंद्र नवलकर यांनी 'शिवराम जानबा कांबळे चरित्र' (१९३०) लिहिले आहे. शिवराम जानबांच्यावर म. फुले, बाबा पद्मनजी, लोकहितवादी यांचे लेखन तसेच भास्करराव जाधवांच्या 'मराठा दीनबंधु' मधील लेखांचा प्रभाव पडला होता, असे त्यांचे चरित्रकार नवलकरांनी म्हटले आहे. मराठीबरोबरच त्यांनी इंग्रजीमध्ये लेखन केले. अस्पृश्यांच्या आत्मस्थितीची जाणीव करून देण्याबरोबरच अस्पृश्यांचे संगठन उभे करणे व अस्पृश्यांच्या प्रश्नांची समाजाला व सरकारला जाणीव करून देणे अशा दुहेरी पातळीवर शिवराम जानबांनी काम केले. त्यासाठी विविध माध्यमांचा प्रभावी वापर केला.

शिवराम जानबांनी धर्मग्रंथांचा अभ्यास करून धर्मशास्त्रांची तर्कशुद्ध चिकित्सा केली. अस्पृश्यांच्या अमानुष स्थितीसाठी धर्मशास्त्रांमधील लेखन कसे कारणीभूत झाले आहे, हे त्यांनी तर्कशुद्ध रीतीने सांगितले. धर्मग्रंथ आणि जातिभेदामुळे अस्पृश्य लोक अमानवी पातळीवर कसे पोचले, हे त्यांनी सांगितले. बाहेरून आलेल्या जेत्या आर्यांनी इथल्या जितांपैकी काही लोकांना नीच कर्मे करण्यासाठी प्रवृत्त केले. त्यांना गावाबाहेर राहण्याची सक्ती केली. आर्यांनी ज्यांना महाआरी म्हणजे महान शत्रू म्हटले, ते महार होत, असा दावा त्यांनी केला. अस्पृश्य हे पूर्वी पराक्रमी होते. याची जाणीव करून देऊन दलितांमधील

स्वत्त्वभान, अस्मिताभान जागृत करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. त्यांनी 'सोमवंशीय मित्र समाज' (१९०४) या संस्थेची स्थापना केली. तसेच 'सोमवंशीय मित्र' (१९०८-१९१०) हे मासिक पत्र सुरू केले. 'स्वसमाजातील दोष परिहार करून त्यांना आत्मोन्नतीची दिशा दाखवावी, या हेतूने सुरू केलेल्या' 'सोमवंशीय मित्र' चे एकूण चोवीस अंक निघाले. यामधून मुरळी प्रथा, वेश्या व्यवसाय, मृतमांसाहार, पशुबळी, अस्वच्छता यांसारख्या अनिष्ट चालींचे उच्चाटन, अस्पृश्यता निर्मूलन व समाजसुधारणा यांसारख्या विषयांवर त्यांनी वैचारिक लेखन केले. तसेच 'फुकट आणि सक्तीचे शिक्षण', 'आमच्या सुधारणेसाठी सरकारने काय करावे?', 'विवाहोत्पन्नी बहुभार्यात्व', 'बहुभर्तृकत्व', 'व्यभिचार' इत्यादी विषयांवरील लेख महत्त्वपूर्ण आहेत. 'दीनबंधु' मधून त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले आहे. प्रस्थापित उच्च वर्ग व त्यांच्या चळवळीच्या मर्यादा दाखविताना 'एका महार गृहस्थाचे उद्गार' या लेखामध्ये ते म्हणतात, "हल्लीच्या सुधारलेल्या काळात देखील ज्या महारांचा पवित्र हिंदूस स्पर्श खपत नाही, त्याच महारांस इतरधर्मीय लोक आपल्या धर्माची दीक्षा देऊन, प्रेमाने वागवून अनेक सवलती देत आहेत. मग अशी त्यांची भूतदया पाहून पुढे काही काळांनी एकंदरीत महार, मांग तुमच्या मतलबी, हिंदू धर्मास धाब्यावर बसवणार नाहीत कशावरून? हल्ली मुंबई इलाख्यात ऐंशी लक्ष व हिंदुस्थानात चार कोटी लोक आम्हां नीच मानलेल्यांची संख्या आहे. ह्या सर्व लोकांशिवाय तुम्ही राष्ट्रसुधारणेची इमारत कच्च्या पायावर बांधू पाहात आहात. या कच्च्या इमारतीस पुढे घूस, उंदीर लागणार नाहीत कशावरून?" (दीनबंधु, ३० जुलै १९०७). सामाजिक, धार्मिक व आर्थिक विषमता कायम ठेवून मिळविलेले स्वातंत्र्य टिकावू होणार नाही, असा इशाराच त्यांनी दिला आहे. जुन्या धर्मशास्त्रग्रंथांची होळी करून बदलत्या कालानुरूप नवधर्मग्रंथ तयार करावा, असे ते म्हणतात. "आज हजारो वर्षे, सहा शास्त्रे, अठरा पुराणे वगैरे प्लेग रूपाने आमच्या मागे लागली आहेत... हा प्लेग नाहीसा करण्याचा एकच उपाय आहे, हिंदू लोकांचा सर्वांस मान्य होईल असा एक धर्मग्रंथ तयार करावा... आमच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांनी राष्ट्रीय सभा मंडपाच्या मध्यभागी एक अग्निकुंड करून त्यात आपल्या घरात असलेल्या सर्व मळक्या शास्त्रांची आहुती द्यावी." (दीनबंधु, १३ एप्रिल १९०७). एकूणच शिवराम जानबा कांबळे यांचे लेखन अभ्यासपूर्ण, तर्कशुद्ध, युक्तिवादाने भरलेले, आवाहनात्मक व आकलनसुलभ होते.

**किसन फागुजी बनसोड** (१८७९-१९४६) हे विदर्भातील महत्त्वाचे दलित नेते. त्यांनी विविध संस्था व नियतकालिके सुरू करून अस्पृश्यता निर्मूलनाचे मोठे काम केले. त्यांनी 'निराश्रीत हिंदू नागरिक' (१९१०), 'विटाळविध्वंसक' (१९१३), 'मजदुर पत्रिका' (१९१८), 'चोखामेळा' (१९३१) ही पत्रे सुरू करून अस्पृश्यता निर्मूलनपर वैचारिक लेखन केले. 'सुबोध पत्रिका', 'ज्ञानप्रकाश', 'केसरी', 'देशसेवक', 'महाराष्ट्र' अशा अनेक पत्रांतून त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांवर विचारप्रवर्तक लेखन केले. अस्पृश्य हे या देशाचे आदिवासी आहेत, अशी दलितांच्या आदिम अस्तित्वाची व अस्मितेची जाणीव त्यांनी करून दिली आहे. सदाचरणी व नीतिमान दलितांवर जातिभेदातून होणाऱ्या अन्याय अत्याचाराचा तीव्र निषेध त्यांनी केला आहे. संघर्षानेच या प्रवृत्तींचा मुकाबला करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. धर्मांतरित महार-मांगांना सवर्ण हिंदू जवळ करतात. त्यांच्याशी सर्व व्यवहार करतात. परंतु हिंदू धर्मातील महार-मांगांना अस्पृश्य ठरवतात. या दुटप्पी व क्षूद्र मनोवृत्तीवर किसन फागुजी बनसोड यांनी कोरडे ओढले आहेत. किसन फागुजी बनसोड धर्मांतरविरोधी होते. हिंदू धर्मातील शास्त्री-पंडितांशी भांडून अस्पृश्यांनी आपली श्रेष्ठता सिद्ध करावी, असे त्यांना

वाटत होते. १९२० साली नागपुरात झालेल्या भारतीय बहिष्कृत परिषदेनंतर त्यांनी अस्पृश्यतानिवारणाची एक नऊ कलमी योजना जाहीर केली होती. त्यात अस्पृश्यांतील पोटजातींचे निर्मूलन, परस्पर रोटीबेटी व्यवहार, शिक्षणप्रसार, वाचनालये, बलोपासना, उद्योगधंदे उभारून स्वावलंबन, संघऐक्य व राजकीय संघटन असे महत्त्वाचे मुद्दे त्यांनी मांडले होते. दलितांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ते महत्त्वाचे होते. त्यांनी दलितोद्धाराबरोबरच तत्कालीन सामाजिक, राजकीय विषयांवर लेखन केले. अस्पृश्यांमध्ये जागृती, आत्मभान निर्माण करण्याबरोबरच सवर्ण हिंदूंच्या सद्सद्विवेकबुद्धीला आवाहन करून समता, समानतेचे बीज रुजविण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या लेखनातून केला. अस्पृश्यांमध्ये स्वाभिमान आणि स्वावलंबन निर्माण झाल्याशिवाय त्यांना आत्मोद्धार करता येणार नाही, अशी त्यांची धारणा होती.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न : १८७३ ते १९२० या काळातील सामाजिक सुधारणेच्या अनुषंगाने येणाऱ्या वैचारिक गद्याचे स्वरूप स्पष्ट करा.

## २.५ समारोप

१८७३-७४ ते १९२० हा कालखंड देशाच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. या कालखंडातील एकूणच व्यवहार राजकीय स्वातंत्र्य व समाजसुधारणा या विषयांभोवती केंद्रित झालेला दिसतो. सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणाऱ्या परंपरेमधून म. फुले व त्यांचे सत्यशोधकीय वैचारिक गद्य, दलित वैचारिक गद्य, राजारामशास्त्री भागवत, गो. ग. आगरकर आदींचे सुधारणावादी वैचारिक गद्य निर्माण झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकर व लो. टिळकांच्या प्रभावातून राष्ट्रवादी वैचारिक लेखन करणारी परंपरा उदयास आली. त्यांनी राजकीय स्वातंत्र्याचा जहाल पुरस्कार केला. परंतु धार्मिक, सामाजिक स्वातंत्र्याबाबत प्रतिगामी भूमिका घेतली. यामुळे वरील दोन्ही परंपरांमध्ये सातत्याने वैचारिक वादविवाद, विचारसंगर होत राहिले. यामधून मराठी वैचारिक गद्य समृद्ध होत गेले. मात्र या काळात स्त्रियांचे वैचारिक लेखन अल्प प्रमाणात आढळते. सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे, तानुबाई बिर्जे, सावित्रीबाई रोडे आदी सत्यशोधक परंपरेतील स्त्रियांनी समाजवास्तवाची चिकित्सा करणारे विचार व्यक्त केले आहेत. नागर मध्यमवर्गीय स्त्रियांचे विचारविश्व कुटुंबकेंद्रित असल्याचे दिसते. थोडक्यात, प्रस्तुत कालखंडामध्ये मराठी वैचारिक गद्य सर्वांगाने समृद्ध झाले. बहुजन, दलित जनसमूहांना नवे

munotes.in

आत्मभान येऊन त्यांचे मुक्तिलढे सुरू झाले व त्यांमधून क्रांतिकारी वैचारिक आशय असणारे गद्य निर्माण झाले. या वैचारिक गद्यानेच आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण केली आहे.

## २.६ सरावासाठी प्रश्न

**अ) बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न:**

१. 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ) रा. गो. भांडारकर

ब) महादेव गोविंद रानडे

क) श्री. व्यं. केतकर

ड) वि. का. राजवाडे

२. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' हा खंडात्मक ग्रंथ कोणी लिहिला?

अ) राजारामशास्त्री भागवत

ब) लो. टिळक

क) वि. का. राजवाडे

ड) वासुदेवशास्त्री खरे

३. म. फुले यांनी शेतकऱ्यांच्या मागासलेपणाची मीमांसा करणारा कोणता ग्रंथ लिहिला आहे?

अ) तृतीय रत्न

ब) गुलामगिरी

क) सार्वजनिक सत्यधर्म

ड) शेतकऱ्याचा असूड

४. स्त्रीवादाची मांडणी करणारा 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध कोणी लिहिला?

अ) सावित्रीबाई फुले

ब) ताराबाई शिंदे

क) तानुबाई बिर्जे

ड) सावित्रीबाई रोडे



munotes.in

५. 'विटाळ विध्वंसन' या पुस्तिकेचे लेखन कोणी केले?

अ) गोपाळबाबा वलंगकर

ब) शिवराम जानबा कांबळे

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ड) किसन फागुजी बंदसोडे

**उत्तरे:**

१. महादेव गोविंद रानडे

२. वि. का. राजवाडे

३. शेतकऱ्याचा असूड

४. ताराबाई शिंदे

५. गोपाळबाबा वलंगकर

**ब) लघुत्तरी प्रश्न:**

१. मुक्ता साळवेंच्या निबंधातून व्यक्त होणारा दृष्टिकोन व मूल्ये सांगा.

२. लो. टिळकांच्या वैचारिक लेखनाचे स्वरूप सांगा.

३. गो. ग. आगरकरांच्या वैचारिक गद्याचे स्वरूप स्पष्ट करा.

४. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील स्त्रियांच्या वैचारिक लेखनाचा थोडक्यात परामर्श घ्या.

**क) दीर्घोत्तरी प्रश्न:**

१. १८७४ ते १९२० या कालखंडातील वैचारिक गद्याचा आढावा घ्या.

२. म. फुले व सत्यशोधकीय वैचारिक गद्याची परंपरा स्पष्ट करा.

३. ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधाचे टीकात्मक परीक्षण करा.

४. विष्णूशास्त्री चिपळूणकर - लो. टिळकांच्या परंपरेतील मराठी वैचारिक गद्याचा परामर्श घ्या.

## २.७ संदर्भ ग्रंथ

१. जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा.), २००१ : 'राजवाडे लेखसंग्रह', पाचवी आवृत्ती, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

२. नेमाडे, भालचंद्र, १९८२ : 'जोतीराव फुले यांची गद्यशैली' – 'महात्मा फुले गौरव ग्रंथ', साळोखे पी. बी. व इतर (संपा.), महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.



munotes.in

३. पानतावणे, गंगाधर, १९९५: 'दलित वैचारिक साहित्य', मुंबई विद्यापीठ, मुंबई.

४. फडके, य. दि. (संपा.), १९९४ : 'केतकर लेखसंग्रह', साहित्य अकादमी, द्वि. आ. नवी दिल्ली.

५. माळी, मा. गो. (संपा.), १९९८ : 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय', महा. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, दु. आ., मुंबई.

६. राजवाडे, वि. का., १९२८ : 'राजवाडे लेखसंग्रह-भाग एक, ऐतिहासिक प्रस्तावना', वरदा बुकस्, पुणे.

## २.८ पूरक वाचन

१. कुलकर्णी, गो. म. (संपा.), २००३ : 'मराठी वाङ्मयकोश', खंड दुसरा, भाग एक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

२. कुलकर्णी, गो. म., कुलकर्णी, व. दि., १९८८ : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड सहावा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

३. कीर, धनंजय व इतर (संपा.), २००६ : 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण.

४. खांडगे, मंदा व इतर, २००२ : 'स्त्रीसाहित्याचा मागोवा', खंड १, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे.

५. जोग, रा. श्री. व इतर, २००२ : 'प्रदक्षिणा'-खंड पहिला, काँटिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण.

६. जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा.), २००९ : 'लोकमान्य टिळक लेखसंग्रह', साहित्य अकादमी, नवी दिल्ली, पुनर्मुद्रण.

७. डहाके, वसंत, २००८ : 'मराठी साहित्य, इतिहास आणि संस्कृती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण.

८. देशपांडे, अ. ना.,१९९२ : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' भाग १ व २, व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती.

९. नातू, म. गं., देशपांडे, दि. यं. (संपा.), १९८६: 'आगरकर वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे.

१०. पानतावणे, गंगाधर, १९९५: 'दलित वैचारिक साहित्य', मुंबई विद्यापीठ, मुंबई.

११. भोळे, भा. ल. (संपा.), २००६ : 'एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य', खंड २, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

munotes.in

१२. भोळे, भा. ल. (संपा.), २०१०: 'विसाव्या शतकातील मराठी गद्य', खंड १, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

१३. लेले, रा. के., १९८४ : 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', काँटिनेन्टल प्रकाशन, पुणे.

१४. शिंदे, अरुण, २०१९ : 'सत्यशोधकीय नियतकालिके', कृष्णा संशोधन व विकास अकादमी, मंगळवेढा.

१५. शिंदे, ताराबाई, १९९७ : 'स्त्री-पुरुष तुलना' (संपा.) खोले, विलास, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

*****

munotes.in

# २आ

## ‘निवडक आगरकर’ - (संपा.) ग. प्र. प्रधान

**घटक रचना**

२आ.१ उद्दिष्टे
२आ.२ प्रस्तावना
२आ.३ गोपाळ गणेश आगरकर यांचा जीवन परिचय
२आ.४ गो. ग. आगरकर यांच्या लेखांतील आशय
२आ.५ गो. ग. आगरकर यांच्या लेखनाचे शैलीविशेष व भाषाविशेष
२आ.६ गो. ग. आगरकर यांच्या वैचारिक लेखनातील तत्त्वनिष्ठा
२आ.७ गो. ग. आगरकर यांच्या लेखनातील मूल्यात्मकता
२आ.८ समारोप
२आ.९ शब्दार्थ
२आ.१० सरावासाठी प्रश्न
२आ.११ संदर्भ ग्रंथ
२आ.१२ पूरक वाचन

## २आ.१ उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपणांस पुढील उद्देश साध्य करता येतील.

१. गो. ग. आगरकर यांच्या वैचारिक लेखांतील आशय ध्यानात येईल.

२. त्यांच्या लेखातील विचारमूल्यांचा परिचय होईल.

३. गो. ग. आगरकर यांच्या लेखातील सामाजिक, राजकीय आदी स्वरूपाच्या संदर्भमूल्यांचा उलगडा होईल.

४. गो. ग. आगरकर यांच्या लेखनशैलीचे विशेष व महत्त्व ध्यानात येईल.

५. गो. ग. आगरकर यांच्या लेखातील विचारांची समकालीन प्रस्तुतता समजेल.

## २आ.२ प्रस्तावना

महाराष्ट्राला ‘पुरोगामी’ हे बिरुद बहाल करणाऱ्या एकोणिसाव्या शतकातील विचारवंतांमध्ये गोपाळ गणेश आगरकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. आगरकरांच्या उक्ती आणि कृती अशा दोहोंत पुरोगामीत्व, आधुनिकत्व दिसून येते. इथे आपण आगरकरांनी मांडलेल्या विचारांचा परिचय त्यांच्या काही निवडक लेखांच्या आधाराने घेणार आहोत.



munotes.in

गो. ग. आगरकरांचा लेखन कालखंड हा एकोणिसाव्या शतकातील आहे. हा कालखंड म्हणजे सामाजिक सुधारणा चळवळींचा कालखंड होय. विविध सामाजिक, धार्मिक व राजकीय सुधारणेच्या चळवळींनी या काळात जोम धरलेला होता. बालविवाह, केशवपन, सतिप्रथा, बाला-जरठ विवाह, विधवा पुनर्विवाह प्रश्न, स्त्री शिक्षण व त्याला असणारा विरोध, जातव्यवस्था आणि स्पृश्यास्पृश्यतेचा प्रश्न, शिक्षणात असलेले मागासलेपण, धर्मात असणारी दांभिकता, अंधश्रद्धाळूपणा, इंग्रजी सत्तेतील हुकूमशाही अशा सर्वच क्षेत्रातून समाज गुलामगिरीत जखडलेला होता. त्यामुळे या प्रत्येक क्षेत्रात नव-विचारांची व कृतीची अपेक्षा नव-शिक्षित लोकांकडून होत होती. त्यासाठी सामाजिक, राजकीय व धार्मिक सुधारणा चळवळी मूळ धरू लागल्या होत्या व जोमही धरत होत्या. यातील समाजाला जागृत करण्याचे काम कोणी कृती करून तर कोणी आपल्या लेखनीद्वारे करत होते. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक विचारवंत, समाजसुधारक या कालखंडाने दिले. यामध्ये मग महात्मा जोतीबा फुले, न्या. ग. गो. रानडे, गो.ग.आगरकर, लोकमान्य टिळक, गणेश वासुदेव जोशी, लोकहितवादी, भाऊ महाजन, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची नावे महत्त्वाची आहेत.

'निवडक आगरकर' - (संपा.) ग. प्र. प्रधान

खंडन-मंडन हा वैचारिक लेखनाचा पाया आहे. एखाद्या विषयावरील इतरांच्या मतांना मांडत जात त्यातील उणिवा, त्रुटी दर्शवत स्वत:चे विचार, युक्तिवाद कौशल्याने मांडून, त्यासाठी पूरक उदाहरणे व संदर्भ देऊन पटवून देणे अशा स्वरूपाचे हे लेखन साकारत असते. यातून तर्कशुद्ध निष्कर्ष काढून विषय विवेचन केले जाते. यामध्ये साहित्य, समाज, धर्मचिंतन, संस्कृती, भाषा, नीतीमूल्ये, अध्यात्म, इतिहास इ. विषयांअंतर्गत चिंतन मांडलेले असते.

आगरकरांचे निबंधलेखन हे सामाजिक व राजकीय विचार-चिंतन स्वरूपाचे आहे. या लेखनातून विज्ञाननिष्ठा, विवेकवाद, बुद्धिवाद, व्यक्तिवाद, स्वातंत्र्य, समता, न्याय व्यवस्था, मानवता, सहिष्णुता, प्रबोधन इ. मूल्य-तत्त्वांचा पुरस्कार त्यांनी केलेले आहे. 'इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार' असा निर्वाळा देऊन ते आपले परखड विचार लेखातून मांडतात.

## २आ.३ गोपाळ गणेश आगरकर यांचा जीवन परिचय

गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म जुलै १८५६ साली सातारा जिल्ह्यातील क-हाडजवळील टेंभू या गावी झाला. घरची अतिशय गरिबी असल्याने ते क-हाडला त्यांच्या आजोळी गेले व तिथेच त्यांचे इंग्रजी तिसरी इयत्ता पर्यंतचे शिक्षण झाले. या काळात नाखुषीने त्यांनी मामलेदार कचेरीत उमेदवारी सुरू केली. परंतु या काळातही त्यांना पुढच्या शिक्षणाची दुर्दम्य इच्छा होती. यासाठी ते ही उमेदवारी सोडून रत्नागिरीला आपल्या नातलगांकडे गेले. माधुकरी मागून व वार लावून ते तिथे शिकू लागले. परंतु अनेक अडचणी त्यांचा पाठलाग करत होत्या त्यामुळे त्यांना तेथील शिक्षणही बंद करावे लागले. ते परत कऱ्हाडला आले व तिथे काही दिवस त्यांनी कंपाउंडरचे काम केले. हे काम त्यांना मनापासून कधीच आवडले नव्हते. त्यांचे मन अधिक रमायचे ते ज्ञानार्जन करण्यात. पण ते त्यापासून वंचित राहू लागले होते. त्यांच्या मामीसोबत ते अकोल्याला आले. तिथे त्यांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय झाली. १८७५ ला ते मॅट्रिक परीक्षा पास झाले. या काळात

भेटलेल्या रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी यासारख्या विद्वान शिक्षकाच्या मदतीने त्यांनी पुण्यात डेक्कन कॉलेजमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला.

पुण्यात आल्यानंतरही आगरकरांचा दरिद्र्याशी सतत लढा सुरू होता. यावर योग्य रीतीने जो उपाय सापडेल तो ते आजमावत होते. नाटक लिहिणे, वर्तमानपत्रात लेख लिहिणे व त्यातून जे पैसे मिळतील ते स्व-शिक्षणासाठी वापरणे हा त्यांचा नवा मार्ग होता. एकदा निबंधस्पर्धेसाठी निबंध लिहिला असता त्यांना पन्नास रुपये मिळाले होते. हेही त्यांना त्यावेळी महत्त्वाचे होते. आगरकरांनी जे विपुल असे वैचारिक लेखन केले त्याची बीजे इथे सापडतात. पण फरक फक्त इतकाच होता की तेव्हा चरितार्थाचे साधन म्हणून त्यांनी लेखनाचा अवलंब केला होता. पण पुढे हेच लेखनकौशल्य त्यांनी पुढच्या काळात महाराष्ट्राची मानसिकता आधुनिक, पुरोगामी बनविण्यासाठी खर्ची घातले होते. अशा परिस्थितीतून वाट काढत त्यांनी पुढे बी. ए. व एम. ए. चे शिक्षण पूर्ण केले. याच दरम्यान त्यांचा आणि लो. टिळकांचा स्नेहही वाढला होता.

एम.ए. नंतर आगरकरांनी सुरुवातील पुणे हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली. पण जनतेत शिक्षणप्रसार व्हावा या उद्देशापोटी त्यांनी ही नोकरी सोडून लो. टिळक व विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यासोबत नवीन हायस्कूल काढण्याचा घाट घातला. ज्याला १ ऑक्टोबर १८७९ साली यश मिळून पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना केली. तरुणांप्रमाणे परिवर्तनवादी विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावे या उद्देशापोटी त्यांनी 'केसरी' व 'मराठा' ही दोन वृत्तपत्रे सुरू केली. ४ जानेवारी १८८१ ला 'केसरी'चा पहिला अंक निघाला. या दोन्हीतून चिपळूणकरांचे जहालवादी व न्या. रानडे यांचे मवाळवादी निबंध प्रकाशित होत होते. ज्यातील जहालवादाचा प्रभाव लो. टिळकांवर व मवाळवादाचा प्रभाव आगरकरांवर अधिकतेने होत गेला.

कोल्हापूरचे महाराज व तेथील दिवणांसंबंधी काही लेख 'केसरी' व 'मराठा'मधून प्रकाशित झाले होते. हे लेख बदनामी करणारे असल्याचे अपील कोल्हापूर संस्थानचे कारभारी श्री. बरवे यांनी मुंबई हायकोर्टात केले. यात आरोप सिद्ध झाल्याने 'केसरी'चे संपादक आगरकर व 'मराठा'चे संपादक लो. टिळक या दोन संपादकांना तीन महिन्याची शिक्षा झाली. त्यांना डोंगरीच्या कारागृहात पाठवले गेले. या शिक्षेच्या कालखंडाबाबतचे व लो. टिळक व स्वतःच्या संबंधावर आगरकरांनी 'आमचे डोंगरीच्या तुरुंगातील १०१ दिवस' हा ग्रंथ लिहिला. यादरम्यानच कॉलेजमध्ये वाटणारा ध्येयवाद हे स्वप्नरंजन होते व वास्तव त्यापेक्षा अधिक प्रखर असल्याची त्यांना जाणीव झालेली दिसून येते. कारण या कारागृहात असतानाच त्यांचे सहकारी चिपळूणकर यांचा अकाली मृत्यू झाला होता. अशा प्रसंगातून सावरत ते अधिकाधिक खंबीर होत गेले. या दोघांच्याही शैक्षणिक कार्यकालातील 'न्यू इंग्लिश स्कूल'च्या पुढचा टप्पा म्हणजे 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना व पुणे येथे 'फर्ग्युसन कॉलेज' (२ जानेवारी १८८५) सुरू करणे होय. पण कालांतराने दोघांमध्ये मतभेद वाढत गेल्यानंतर टिळकांनी डेक्कन एज्युकेशन व फर्ग्युसन कॉलेज चा राजीनामा दिला. १८८७ पासून आगरकरांनी 'केसरी' चा राजीनामा दिला व १८८८ मध्ये त्यांनी 'सुधारक' हे साप्ताहिक सुरू केले. ज्यामधून त्यांनी आपले लेखनकार्य सुरू ठेवले.

आगरकरांच्या शेवटच्या सहा-सात वर्षात त्यांची खूप दगदग झाली. दिवसेंदिवस त्यांचा दम्याचा त्रास वाढत होता. आयुष्यभर व शेवटच्या त्यांच्या वेदानादायी काळात त्यांच्या पत्नी यशोदाबाई यांनी त्यांना फार सोबत दिली. अखेर दम्याच्या विकाराने आगरकरांचा मृत्यू १७ जून १८९५ रोजी पुणे येथे झाला. त्यांना अवघे एकोणचाळीस वर्षे आयुष्य लाभले. त्यापैकी तेवीस-चोवीस वर्षे त्यांनी विद्यार्जन करण्यासाठी व्यतीत केली व बाकी सर्व काळ त्यांनी पाहिलेल्या आधुनिक भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, जनजागृती करण्यासाठी व्यतीत केले.

'निवडक आगरकर' - (संपा.) ग. प्र. प्रधान

**गो. ग. आगरकर यांची ग्रंथसंपदा:**

१. 'डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस' (१८८२),

२. शेक्सपीअर यांच्या 'हॅम्लेट' या नाटकाचे 'विकारविलसित' या नावाने भाषांतर (१८८३),

३. 'वाक्यमीमांसा आणि वाक्याचे पृथक्करण'- मराठी वाक्याचे निरनिराळे अवयव आणि त्यांचे परस्परसंबंधाचा तपशीलवार विचार मांडणारा ग्रंथ,

४. 'वाक्य विश्लेषण' हा व्याकरणावर आधारित ग्रंथ,

५. 'केसरी'तील निवडक निबंध,

६. 'सुधारका'तील वेचक लेख (निबंधसंग्रह) इ. गो. ग. आगरकरांची ग्रंथसंपदा आहे.

## २आ.४ गो. ग. आगरकर यांच्या लेखांतील आशय

'निवडक आगरकर' (प्रतिमा प्रकाशन, पुणे) हा ग. प्र. प्रधान यांनी आगरकरांच्या आकरा लेखांचा संपादित केलेला ग्रंथ आहे. या ग्रंथात आगरकरांचे निवडक लेख असून आगरकरांच्या जीवनावर व त्यांच्या लेखनशैली, विचारचिंतनावर भाष्य करणारी दीर्घ स्वरूपाची प्रस्तावना ग. प्र. प्रधान यांनी लिहिलेली आहे. यात समाविष्ट असणारे आगरकरांचे लेख हे सामाजिक, राजकीय, धार्मिक, चिंतनपर स्वरूपाचे वैचारिक लेख आहेत. या ग्रंथात- 'आमचे काय होणार?', 'आमचे दोष आम्हांस कधी दिसूं लागतील?', 'मूळ पाया चांगला पाहिजे', 'सुधारक काढण्याचा हेतू', 'तरुण सुशिक्षितांस विज्ञापना', 'महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र', 'स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची आवश्यकता', 'इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचें घोर दारिद्रय', 'हिंदुस्थानची तिजोरी आणि घाटत असलेला अन्याय', 'राष्ट्रसभा बंद ठेवता कामा नये', 'वाचन' हे लेख समाविष्ट आहेत.

आगरकरांचे सर्वच लेख हे स्पष्ट आणि सहजतेने ध्यानात येतील अशा स्वरूपाचे आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखांचे अर्थ इथे सांगणे अपेक्षित नाही. त्यांचे आशयात्मक विवेचन इथे आपण करणार आहोत. वर्तमान काळातील अनेक गाष्टींबाबत त्यांना असंतोष वाटत होता आणि हीच गोष्ट त्यांच्या संवेदशील लेखनास कारणीभूत होती. त्यांनी वेळोवेळी तत्कालीन समाजप्रवृत्ती ध्यानात घेऊन त्यावर केलेले भाष्य व त्याबाबत दूरगामी स्वरूपाचे मांडलेले विचार-चिंतन त्यांच्या लेखात समाविष्ट आहेत. या सर्वच लेखातून त्यांच्या जीवनदृष्टीचा

munotes.in

परिचय होऊन जातो. या जीवनदृष्टीचा, विचारांचा परिचय आपण इथे करून घेणार आहोत.

**१. आमचें काय होणार?:**

'मनुष्य सुधारणेचा कल कोठे आहे' हे शोधण्याचा हेतू या लेखातून दिसतो. मिल, कोंट, स्पेन्सर यांनी यासंबंधीचे लेखन पाचशे पानात केले आहे. व आपण स्वतः ते एक, दोन लेखामध्ये घेणार असल्याचे सांगून दीर्घ गोष्ट लघुत्तम करण्याची जोखीम पत्करल्याचे ते सुरुवातीस कबूल करतात. पण हे मांडताना ते स्वतःच्या या कामाच्या पद्धतीस 'फिनिक्सवृत्ती सुधारकबोवा' असे म्हणून टरही उडवतात. स्वतःचा उल्लेख ते 'सुधारकबोवा' असा करतात.

आकाशगंगेकडे दुर्बिणीतून पाहणारी व्यक्ती किंवा तशा पद्धतीचा अभ्यास करणारी व्यक्ती जशी पाहिलेले आकाशगंगेचे दृश्य एकच आणि अंतिम आहे असे म्हणणार नाही. हे उदाहरण ते-प्रत्येक घटकांचा, विचारांचा अभ्यास करणारा तत्त्ववेत्ता आणि अशिक्षित व्यक्ती यांच्याकडे असणाऱ्या दृष्टिभेदासाठी देतात. "विद्यारूपी दुर्बिण ज्या विद्वानास प्राप्त झाली आहे, त्याच्या ज्ञानचक्षूंस फार दूरची मनुष्यावस्था नीट रीतीने न्याहाळता आली नाही, तरी तिच्या उन्नतीला सीमा नाही, येवढे पक्के दिसून येते. अशिक्षिताची तशी खात्री होत नाही." (आगरकर, 3) सामान्य डोळ्यांनी आकाशगंगा पाहणे व दुर्बिणीतून आकाशगंगा पाहणे यात जसा सूक्ष्म भेद असू शकतो तसाच भेद सुशिक्षित व अशिक्षित यांच्यात असल्याचे ते सांगतात.

दीर्घ अशा या लेखात प्रस्तावना, विषयप्रवेश, धर्मविचार, धर्मविचारांची वाढ, त्याची उन्नतावस्था, अन्य सामाजिक प्रवृत्तींचा कल, बलात्कारी विरुद्ध संमति, नवरा-बायको, कुटुंब या उप शीर्षकांतर्गत लेखन त्यांनी केले आहे. मनुष्य सुधारणेस वाव निर्माण करणाऱ्या जागा यातून व्यक्त झाल्या आहेत व त्या संबंधाने वास्तव काय व त्यातील अपेक्षित बदल अशा अनुषंगाने ते व्यक्त झाले आहे. शक्तीशाली प्राणी एकांतवास पत्करतात कारण त्यांच्याकडे स्व-संरक्षणासाठी पुरेसे बळ असते. पण असे बळ नसणारे स्व-संरक्षणासाठी समूहाने राहतात. हे उदाहरण देऊन ते मनुष्य बलहीन असून स्व-संरक्षणासाठी तो समाज निर्मिती करत असल्याचे सांगतात. काम, क्रोध, मध, मत्सर इ. मनोवृत्ती जशा मनुष्यास नैसर्गिक आहेत तशीच धर्मवृत्तीही असल्याचे ते सांगतात. पण इतर कोणत्याही वृत्तीपेक्षा धर्मवृत्तीचा मनुष्याच्या आचरणावर व विचारावर विशेष परिणाम होत असतो आणि त्यातून सुधारणा करण्यास असणाऱ्या जागा ते दाखवून देतात. धर्मकल्पनेची उत्पत्ती व अभिवृद्धी, देवता, परमेश्वर, ब्रह्मांड या कल्पना अस्तित्वात येणे याचे विवेचन त्यांनी केले आहे. 'ईश्वर स्वरूपाचे खरे ज्ञान होण्याचा कधीही संभव नसल्याचा' सिद्धांत अनेक तत्त्ववेत्यानी मांडला. याला आगरकर धर्मसंबंधीचा शेवटचा सिद्धांत मानतात.

**२. आमचे दोष आम्हांस कधी दिसूं लागतील?:**

आगरकरांच्या लेखांचा जो विशेष आहे तो म्हणजे कालातीतता. या लेखामध्ये मांडलेले विचार हे असेच कालातीत आहेत. गोरक्षण, गोमांस खाण्यास बंदी, यावरून हिंदू-मुस्लिम असा वाढणारा द्वेष या समाजचित्राचे विश्लेषण आगरकरांनी त्यांच्या लेखामध्ये केलेले आहे.

अशा कारणावरून धर्मद्वेष वाढीस लागणाऱ्या वृत्तीवर, विचारांवर आगरकर प्रकाश टाकतात. या वृत्तीची ते समीक्षा करतात. सामाजिक समस्येचे चित्रण करत असताना त्यात डोकावणारे राजकीय हेतूही ते स्पष्टपणे मांडतात. "पूर्वी मर्जीविरुद्ध कर द्यावे लागत असले, तर आतां कदाचित् ते कायद्याने द्यावे लागत असतील; पूर्वीचे राज्यकर्ते उघड उघड पक्षपात करीत असले तर आतांचे कदाचित् न्यायाच्या पांघरूणाआड करीत असतील - पण असल्या स्थित्यंतरास स्थित्यंतर म्हणावें किंवा नाहीं याचा आम्हांस संशय आहे." (आगरकर : २०१३ : पृ. ११७) असे ते राजकीय स्थितीची समीक्षा मांडतात.

एककल्ली राष्ट्राभिमान बाळगणारे लोक दुसऱ्या राष्ट्राच्या प्रगतीला कसे नाक मुरडतात, आपणच कसे श्रेष्ठ हे दाखविण्यासाठी आपल्या पूर्वजांच्या कर्तबगारीचेच पोवाडे गाण्यात धन्यता मानतात. ही गोष्ट आगरकरांना मान्य नाही. याचा अर्थ ते आपला इतिहास व त्याचे वैभव नाकारत नाहीत. पण अशा गतकाळापेक्षा वर्तमान काळातील प्रगती व कर्तबगारी याची तुलना होणे त्यांना इथे अपेक्षित आहे. पण या गोष्टीकडे कानाडोळा झाल्याने आपण खोट्या प्रतिष्ठेत गुंतून पडतो. त्यातून स्वदोष दिसेनासे होतात. आपणच सर्वगुणसंपन्न आहोत, आपल्याला कशाचीही उणीव नाही, उद्योग करण्याची हौस नाही, श्रमाचा तिरस्कार, बढाईखोरी असे दोष वाढत जातात.

आपले विचार पटवून देण्यासाठी आगरकर अनेक उदाहरणे देतात. तो विषय वाचकाच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करतात. उदा. 'होमर' व 'वाल्मिकी' या दोन महाकवींनी लिहिलेल्या 'इलीअड'- 'रामायण' या दोन कलाकृतीच्या कथानकात, आशयसूत्रात साम्यत्व दिसते. तर यातील कोणत्या कवीने दुसऱ्याची कॉपी केली असावी याबाबत विचार, खलबतं करतात. इथे यापेक्षा वेगळा विचार पुढे येतो आणि तो म्हणजे अशा आशयाचे काव्य दोन देशात एकाच काळात लिहिली जात आहेत म्हणजे दोन देशांची प्रगती एकाच दिशेने होत होती. असा तर्क मांडून वर्तमानात मात्र ते देश किती पुढे आहे व आपण किती मागे राहिलेलो आहोत, याची जाणीव ते करून देतात.

### ३. 'मूळ पाया चांगला असला पाहजे':

सदरील लेखामध्ये आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा याबाबतचे मंथन आगरकरांनी घडवून आणले आहे. कोणत्याही प्रकारची सुधारणा असेल मग ती राजकीय, सामाजिक वा धार्मिक असेल तर ती करत असताना फायदा-तोटा न पाहता कर्तव्य म्हणून केल्यास भरभराट होईल. बहुतांश लोक फायदा-तोटा पाहून राजकीय सुधारणा व्हावी असे मत मांडतात. पण ते योग्य नाही. हे पटवून देण्यासाठी ते लेखांतून सामाजिक स्वरूपाचे काही प्रश्न वाचकांसमोर ठेवतात व त्याची उकलही मांडतात. भारतीय समाजात स्त्री विधवा झाली असता त्या स्त्रीचे केशवपन केले जायचे. ही गोष्ट आगरकरांना मान्य नाही. त्यामुळे काही रोखठोक प्रश्न विचारून या प्रथेच्या व्यर्थतेचा विचार ते व्यक्त करतात. ''बायकांच्या केसांचा जर मेलेल्या नवऱ्याच्या गळ्यास फांस बसतो, तर पुरुषांच्या शेंडीचाहि मेलेल्या स्त्रीस कां फांस बसूं नये?'' (आगरकर : २०१३ : पृ. १२१) असा प्रश्न ते विचारतात. सामाजिक सुधारणेला नेहमी विरोध करणारा समाज हा राजकीय सुधारणेला मात्र पाठिंबा देतो हे समाजवास्तव आगरकरांना पटत नाही. समाजसुधारणेत अनेक सुधारणा या धर्मातून येणाऱ्या नियमांमध्ये कराव्या लागणाऱ्या होत्या. या नियमांचे पालन

करणे म्हणजे धर्मपरायणता व याचे पालन न करणे होय. म्हणजेच धर्मविरोधी वर्तन होय. अशी भीती लोकांना वाटत होती. म्हणूनच आगरकर या विषयाचे चिंतन करताना धर्माचरणामागे असलेले नफ्या तोट्याचे गणित लोकांना पटवून देतात. “बायकांचें वपन कां करावें तर त्यांच्या कबरीबंधानें नवऱ्यास बांधलें जाऊं नये म्हणून. ऋतुप्राप्तीपूर्वीच कन्येचा विवाह कां केला पाहिजे? तर आपल्या 42 कुळ्या नरकांत जाऊं नयेत म्हणून. सती कां जावें? तर तसें केल्यानें अनंत कालपर्यंत स्वर्गसुख मिळेल म्हणून. तात्पर्य, कांहीं नां कांहीं फायदा होईल अशी खरी किंवा खोटी समजूत झाल्यावांचून, तो तो मनुष्य तें तें धर्माचरण करत नाही” (आगरकर : २०१३ : पृ. १२०) हे सत्य ते लोकांना समजावून सांगतात.

समाजात स्त्री किंवा पुरुषांना कोणत्याही गोष्टीचा अटकाव करायचा असेल किंवा मोकळीक द्यायची असेल तर ती समान पाळीवरची असली पाहिजे असे मत मांडून ते समतेचा पुरस्कार करतात. कोणतातरी धर्माचार म्हणून कर्मठपणे स्त्रियांना एक न्याय व पुरुषांना एक न्याय हे चुकीचे आहे. इंग्रजांच्या न्यायपद्धतीवर टीका करण्याआधी स्व-टीका करावी व नंतर इंग्रजांच्या न्यायपद्धतीवर बोलावे हे ते येथे पटवून देतात. (काळा- गोरा या तत्त्वावर केला जाणारा इंग्रज सरकारचा न्याय) ‘‘महार आणि ब्राह्मण, विधवा आणि विधुर व स्त्री आणि पुरुष यांच्यामधील अन्यायमूलक व्यवहार बंद करणे आपल्या स्वतःच्या हाती असून तें करण्याची ज्यांना नुसती वासनाहि झालीं नाहीं, अशा लोकांनी जिंकणारे व जिंकलेले यांच्यातील भेद मोडून टाकण्याचा विचार मनांत तरी कशास आणावा? व आणला तरी तो सिद्धीस कसा जावा? (आगरकर : २०१३ : पृ.१२१, १२२) अशा प्रश्नाचे उत्तर शोधण्यास ते वाचकांस उद्युक्त करतात. हे पटवून देण्यासाठी ते पुढील उदाहरण देतात. ‘‘सिंहाचे कातडे पांघरणाऱ्या गर्दभाच्या बाहेर डोकावू पाहणाऱ्या लंबकर्णावरून त्याची परीक्षा होते’’ हे उदाहरण वृत्तीनिर्देश करणारे आहे. म्हणूनच महारांस मांडीला मांडी लावून बसण्यास शाळेत मोकळीक द्यावी, पुरुषाप्रमाणे विधवांनाही दुसरा विवाह करण्याची परवानगी हवी, पुरुषांप्रमाणे स्त्रीलाही तिचा नवरा आवडत नसेल तर तिलाही काडीमोड करण्यास वाव असावा असा पुरोगामी विचारांचा आग्रह ते या लेखातून धरतात.

### ४. ‘सुधारक काढण्याचा हेतु’:

आगरकरांचे १८८७ साली ‘केसरी’शी असलेले संबंध संपले. त्यानंतर आगरकरांनी १८८८ साली ‘सुधारक’ हे साप्ताहिक काढले. केवळ ‘केसरी’शी संबंध संपले किंवा संपादकत्व संपले म्हणून आगरकरांनी हे साप्ताहिक सुरू केले नव्हते. यामागची त्यांची भूमिका स्पष्ट करताना ग. प्र. प्रधान म्हणतात, ‘‘आगरकर हे केवळ संधि आली म्हणून संपादक झालेले नव्हते. लेखन हा त्यांच्या जीवनांतील उत्कट प्रेरणांचा आविष्कार होता.’’ (ग.प्र.प्रधान : २०१३: प्रस्तावना- पृ.VI) आणि म्हणूनच ‘इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार’ हे ब्रीद उराशी बाळगून आगरकरांनी ‘सुधारक’ चालविला. नावाप्रमाणेच या साप्ताहिकाची भूमिका ही सुधारकाची होती. हे साप्ताहिक काढण्यामागचा हेतू आपल्या वाचकांच्याही निदर्शनास आणावा, कोणत्या प्रकारचे कार्य याद्वारे अपेक्षित आहे हे सांगण्याप्रत आगरकरांनी हा लेख लिहिला आहे.

‘‘हिंदुस्थानचा पूर्व इतिहास व सांप्रत स्थिति सुधारकांच्या, वाचकांच्या लक्षांत यावी’’ हा हेतू आगरकरांनी सुधारक काढण्यामागचा सांगितला आहे. समाजास उन्नतावस्था येण्यास

जितके बंधने अपरिहार्य आहेत तितकी ठेवून प्रत्येक व्यक्तीस (स्त्री, पुरुष) स्वातंत्र्याचा जितका उपभोग घेता येईल तितका घेऊ द्यावा. हे अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचे तत्त्व आहे. ही तत्त्वे अंगिकारलेल्या लोकांना आपल्या समाजातील दोषस्थळे दिसून येतील. ते दोष लोकांच्या निदर्शनास आणावेत, त्यावर उपाय सुचवावेत, युरोपीय सुधारणेत अनुकरण करण्यासारखे काय आहे हे दाखवावे हा हेतू 'सुधारक' काढण्यामागे असल्याचे ते सांगतात.

आशिया, अमेरिका खंडातील काही देश - ग्रीक, रोमन यांच्या प्राचीनत्वाच्या खुना विरून गेल्या आहेत. त्यातल्या त्यात भारत व चीन हे तसे जुने देश आहेत. पण या जुनेपणाचे वर्णन ते पुढील शब्दात करतात, "अशा प्रकारचें केवळ वांचणें म्हणजे बऱ्याच अंशीं योगनिद्रेत प्राण धरून राहिलेल्या योग्याच्या जगण्यासारखे होय." असे सांगतात.

राष्ट्रउत्पत्तीची संकल्पना ते विविध देशांचा इतिहास डोळ्यासमोर ठेवून मांडतात. इतर राष्ट्रांची निर्मिती परंपरा व भारत देशाची निर्मितीपरंपरा यातील सूक्ष्म अंतर ते निर्देशित करतात. "तिकडे जुन्या वृक्षानें नव्या अंकुरांत आपले गुण ठेवून आपण नाहींसे व्हावें; पुनः त्या नवीन अंकुराने तसेंच करावें व प्रत्येक नवीन राष्ट्रोद्भव पहिल्यापेक्षा बहुतेक गुणांत वरिष्ठ व्हावा, असा प्रकार झाला, इकडे अशा प्रकारची राष्ट्रोद्भवपरंपरा अस्तित्वांत आली नाहीं, मूळ आर्यशाखा येथें येऊन तिच्यापासून जें झाड येथें लागलें, तेंच आजमितीपर्यंत अस्तित्वांत आहे." (आगरकर : २०१३ : पृ.१३१) या आर्यरूपी झाडाला ते 'जरठ' झाड असे संबोधतात. हे जरठ झाड आतून शुष्क होत आले असून त्यास नावीन्यावस्था प्राप्त होण्यासाठी, नूतन शाखा येण्यासाठी अर्वाचीन कल्पनांचे खूप पाणी देणे गरजेचे आहे. समाजाच्या प्रगतीसाठी त्याचे स्थिरतत्त्व सोडून त्याने गतीतत्त्व स्वीकारायला हवे. विकासाच्या दिशेचा विचार करत असताना जीर्ण व्यवस्था व जुन्या सामाजिक संस्था यांचा त्याग हा व्हायलाच हवा. हा समाज, धर्म यामध्ये नव्या, आधुनिक गोष्टी आल्या पाहिजेच हा मूळ विचार त्यांनी या 'वृक्ष' रूपकाच्या माध्यमातून येथे मांडला आहे.

### ५. 'तरुण सुशिक्षितांस विज्ञापना':

प्रस्तुत लेखामध्ये आगरकरांनी पारतंत्र्यातील देशाची स्थिती; विविध सामाजिक, धार्मिक रूढीनियमांमुळे अधोगती होणारा समाज, देश याची चर्चा केली आहे. तसेच हे पटवून देत असताना पाश्चात्त्य देशांतील व स्वातंत्र्याचा अनुभव घेणाऱ्या देशांची तुलना त्यांनी केली आहे. अशा परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी काय केले पाहिजे याची जाणीव ते करून देतात. उदा. भारतातील बालविवाहाची पद्धत ही कशी घातक आहे व त्यातून विकास कसा खुंटला आहे हे ते सांगतात. जर ही पद्धती बंद झाली तर बालविधवांचे प्रमाण कमी होईल, तरुणांस अधिक उद्योग करण्याची हिंमत येईल, ज्याला त्याला आपल्या पसंतीप्रमाणे बायको निवडता येईल, विवाहपूर्व मुलीला शिक्षण घेता येईल, शिक्षण मिळाल्यामुळे अपत्यसंवर्धन व चांगला प्रपंच करण्याची गुणवत्ता त्यांच्याकडे येईल. असे अनेक फायदे केवळ बालविवाहाची अनिष्ठ प्रथा बंद केल्यामुळे होईल. हे काम उत्साहशून्य लोकांकडून व वृद्धांकडून त्यांना अपेक्षित नाही; तर नव-तरुणांकडून त्यांना हा बदल अपेक्षित आहे. सामाजिक सुधारणासारख्या कामात कॉलेजमधील विद्यार्थ्यांसहीत प्रौढ मुलेही त्यात सहभागी झाल्यास हा विकास कसा होईल हे सांगताना ते म्हणतात, "धाग्याशी धागा लागून जाऊन अल्पकाळांत सुंदर सुधारणापट तयार होईल, आणि ज्यांना तो वापरण्यास सांपडेल

त्यांची अनेक प्रकारची आपदा नाहींशी होईल इतकेंच नाहीं, तर त्यांस अननुभूतपूर्व अशा अनेक संसारसुखांचा उपभोग मिळू लागेल.'' (आगरकर : २०१३ : पृ. १५२) अशा उदाहरणाद्वारे ते आपला मुद्दा वाचकाच्या मनात अधिक बिंबवतात व त्यातून सुधारणावादाचा पुरस्कार करतात.

''युरोपीय कल्पनांचा प्रघात इकडे पडत आहे त्यापैकीं जेवढ्या अहितकारक असतील तेवढ्या वर्ज्य करून बाकीच्यांचा अंगीकार करण्यास काय हरकत आहे?'' (आगरकर : २०१३ : पृ. १५०) असा प्रश्न ते सुज्ञ वाचकांना विचारतात. युरोपीय देशात आधुनिक विचारसरणीमुळे प्रगती झाली आहे. तिथे प्रथा, परंपरा यांच्या नावावर स्त्रियांवर अन्याय केला जात नाही. त्यांनाही शिक्षणाच्या समान संधी मिळाल्यामुळे देशाच्या विकासात त्यांचा हातभार लागतो आहे. याउलटचे चित्र भारतात पाहायला मिळते. बालविवाह, केशवपण, सतीप्रथा यामुळे भारतीय स्त्रियांची अवस्था दयनीय आहे. त्यामुळेच स्व-हिताच्या युरोपीय गोष्टींचा स्वीकार आपण केला पाहिजे याचा आग्रह ते धरतात. ही परिस्थिती सुधारण्यासाठी उपायही सुचवतात. सुशिक्षित तरुणांनी एकत्र येऊन 'महाराष्ट्र बालविवाहनिषेधक' नावाची मंडळी स्थापन करावी. यात सभासद होण्यास तयार असणाऱ्या सभासदांकडून ''आम्ही आपले, आपल्या मुलींचे, आपल्या मुलांचे व ज्या मुलींचे व मुलांचे पालकत्व आमच्याकडे येईल त्यांचे अल्पवयांत विवाह करणार नाही.'' (आगरकर : २०१३ : पृ.१५१) अशी शपथ घ्यावी असे ते सुचवितात. याबरोबरच लग्नासाठी मुलींचे वय बारा वर्षे व मुलांचे वय अठरा वर्षे पूर्ण असावे (असा निर्बंध कायद्याने करावा) असे ते प्रतिपादन करतात. एवढेच नाही तर अशा मंडळीमध्ये सभासद होण्यास, त्यातील बंधने स्वतःस निर्बंधित करण्यास स्वतःहून तयार असल्याचे या लेखाच्या शेवटी ते नमूद करतात.

**६. 'महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र':**

आगरकर आणि लो. टिळक या दोघांमध्ये अत्यंत घनिष्ठ मैत्रीचे नाते होते. पुढे अध्यापनाचे कार्य करत असताना दोघांनीही संपादकीयाचे कार्य चालू केले होते. पण दोघांच्या दृष्टिकोणात मात्र कमालीचा भेद होता. पुढे पाचएक वर्षानंतर त्यांचातील हा मतभेद वेगळ्या स्वरूपात बाहेर पडला आणि तो मुद्दा होता- 'बालविवाह प्रतिबंधक कायदा असावा की नाही?' या प्रश्नाशी जोडलेला. 'असा कायदा असावा' असे आगरकरांचे मत होते तर 'सरकारनें सामाजिक बाबतीत ढवळाढवळ करू नये' असे लो. टिळक यांचे मत होते. या मतभिन्नतेमुळे फारकत घेतलेल्या दोन मित्रांचे, समाजसुधारकांचे नाते पुन्हा एकत्र कधीच आले नाही. दोघेही आपआपल्या परीने आपल्या विचारांची मांडणी व त्याचा आग्रह करत राहिले. आगरकर हे पूर्वी 'केसरी' या वृत्तपत्राचे संपादक म्हणून कार्य पाहत होते. पण १८८७ पासून त्यांचा केसरीशी संबंध संपला. पण त्यांचे या सामाजिक स्थितीबाबतचे विचारमंथन सुरूच होते. यातून प्रेरणा घेऊन त्यांनी 'सुधारक' हे साप्ताहिक सुरू केले आणि त्यातून आपल्या विचारांची मांडणी करण्यास सुरुवात केली.

आगरकरांचा प्रस्तुत लेख हा लो. टिळक व आगरकर यांच्यामध्ये असणारे वैचारिक मतभेद व महाराष्ट्रीय जनसमुदायाने तो वैयक्तिक स्वरूपाचा द्वेष मानने याचे खंडन करणारा आहे. लो. टिळक आणि आगरकर यांच्यात कोणत्याही स्वरूपाचा खाजगी द्वेष नाही; उलट दोघांच्याही मतांमध्ये भिन्नता आहे. आपापल्या मतांचा पुरस्कार करण्याप्रत मांडणी व

वर्तन करत असल्याचा निर्वाळा ते वाचकवर्गाला व तमाम महाराष्ट्रीयांना या लेखाद्वारे देतात. विचारकलह होणे खूप महत्त्वाचे असल्याचे ते सांगतात. ते म्हणतात, ''बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतकें कशासाठी भितां? दुष्ट आचारांचे निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहींत.'' (आगरकर : २०१३ : पृ.१५४) त्यामुळे विशिष्ट गोष्टीविषयीचे चिंतनात्मक मत मांडणे व त्या मताशी ठाम असणे, त्याचा पुरस्कार करणे महत्त्वाचे असते. अशा प्रकारच्या भूमिकेतूनच मानवहिताचा नव विचार पुढे येऊ शकतो.

पुढे ते असेही सांगतात की, टिळकांचे विचार हे सर्व सामान्यांना पटतील असेच आहेत. किंबहुना त्यांना मान्य असलेल्या विचाराबाहेर जाण्यास टिळक तयार नसल्यामुळे ते लोकप्रिय आहेत. यासाठी ते कवी भवभूतीने लिहिलेल्या काव्यातील श्लोकांचा दाखला देतात. भवभूतीने हा श्लोक रामाच्या मुखातून वदविला आहे.

''स्नेह दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि

आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा।।"

(आगरकर : २०१३ : पृ. १५६)

**अर्थ:**

स्नेह, दया, सौख्य फार तर काय लोकांच्या संतोषासाठी माता जानकीचा देखील त्याग करावा लागला तरी त्याबद्दल खेद वाटणार नाही!

या श्लोकाप्रमाणे लो. टिळक लोकप्रिय असल्याचे सांगतात. पण आपणास असे करणे उचित वाटत नाही, असे 'लोकछंदानुवर्तन' (लोकांना अपेक्षित असणारे वर्तन) आपणास अशक्य असल्याचे ते सांगतात. या लेखातून आगरकरांची स्व:मतनिष्ठा दिसते. लेखामध्ये पुढे त्यांनी नमूद केल्याप्रमाणे अनेक पत्रांतून त्यांना व त्यांच्या पत्नीस अशा भूमिकेमुळे शिव्या, शापांचा भडिमार सहन करावा लागला आहे. अशी संकटे व लोकापवाद सोसून जनहितासाठी आवश्यक त्या गोष्टीचा पुरस्कार ते करत राहतील हा दृढ निश्चय ते या पत्राद्वारे सबंध जनसमुदायापुढे ठेवतात.

आगरकरांच्या अखेरच्या काळामध्ये लो. टिळक त्यांच्या भेटीला गेले होते. त्यानंतर त्यांनी आगरकरांच्या निधनानंतर 'केसरी'मध्ये लिहिलेल्या मृत्यूलेखात पुढील उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, ''मृत्यूच्या उग्र स्वरूपापुढे बारीकसारीक मतभेदाच्या गोष्टी आपण विसरून गेला व जुन्या आठवणी जागृत होऊन बुद्धि व लेखणी गोंधळून गेली. आगरकर हे मूळचे गरीब स्थितीतील असता त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग द्रव्य न मिळवितां समाजाचे ऋण फेडण्याकरताच केला या गोष्टीला योग्य महत्त्व दिले.'' (संदर्भ-विकिपीडिया) मित्र, सहकारी, सहविचारवंत असा अनेक पदरी ऋणानुबंध दोघांमध्ये होता. वैयक्तिक जीवन व सामाजिक जीवन अशा दोन स्तरावर उभयतांनी आपआपले जीवन विभागून घेतले होते आणि दोघेही आपआपल्या भूमिकांशी ठामही होते.

### ७. 'स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची आवश्यकता':

लेखाच्या सुरुवातीस आगरकरांनी तत्कालीन मुंबई प्रांतात घडलेल्या घटनेविषयीची चर्चा केली आहे. घटना अशी- "मुंबईस कोणी एक मनुष्य मेला, तेव्हां त्याचे बायकोस तें दुःख असह्य होऊन तिनें जीव दिला." (आगरकर : २०१३ : पृ.१७०) या घटनेबाबत अनेक कलमबहाद्दरांनी 'खरी साध्वी कोणास म्हणावे' याबद्दलचे आपले मत मांडले. ज्यामध्ये "नवऱ्याच्या मरणाची बातमी ऐकल्याबरोबर जी स्त्री मूर्च्छित होऊन प्राणोत्क्रमण करते ती पहिल्या नंबरची साध्वी. व जिला प्राण घालविण्यासाठी अफूसारख्या एखाद्या विषारी द्रव्याची, किंवा विहिरीसारख्या एखाद्या उदकसंचयाची प्रार्थना करावी लागते, ती नंबर दुय्यमची साध्वी." (आगरकर : २०१३ : पृ.१९०) असे विधवा स्त्रियांच्या पतीव्रतेबाबतचे श्रेष्ठ-कनिष्ठत्व ठरविले गेले. अशा स्त्रियांना 'अधमाधमा', 'कुलांगारा', 'राक्षसकुलोद्भवा', 'पाषाणहृदया' अशा प्रकारचे निंदाजनक शब्द योजिले गेले. या सर्व घटनेचे व या घटनेवर भाष्य करणाऱ्या प्रतिगामी विचारव्यक्तींच्या मतांचे खंडन आगरकर या लेखात करतात.

पुढे ते कोणासाठी व कोणत्या कारणास्तव देहत्याग करणे उचित किंवा अनुचित आहे याची चर्चा करतात. दुसऱ्याचे किंवा कोणत्याही गोष्टीचे भले होणार असेल तर असा त्याग योग्य असतो. पण कोणाच्यातरी देहत्यागाने काहीच हाशील होणार नसेल उलट त्यातून दुःख निर्माण होणार असेल तर ते योग्य नाही. हे सांगून ते पती निधनानंतर स्त्रियांनी देहत्याग करणे हे साध्वीपणाचे लक्षण सुचविणाऱ्या समाजमनाला काही मूलभूत प्रश्न विचारलेले आहेत. ते म्हणतात, "स्त्री मेल्यावर पुरुषानेहि तिच्याबद्दल प्राण सोडणें, प्राणहत्या करणें, किंवा वैधव्यव्रताचें सेवण करणें प्रशस्त होईल, किंवा झालें असतें! बायको मेल्याची वार्ता येतांच बेशुद्ध होऊन परलोकवासी झालेल्या भार्यारतांची उदाहरणें कधी तरी आपल्या ऐकण्यांत येतात काय?" (आगरकर : २०१३ : पृ.१७१, १७२) म्हणजेच पतीनिधनानंतर केवळ स्त्रीने देहत्याग करावा हे चुकीचे आहे. अशा बाबतीत पुरुषाची निष्ठा कशी मोजावी हे कोणी सांगत नाही. म्हणूनच असे घातक नियम फक्त स्त्रीलाच का हे आगरकरांना रुचत नाही. ते म्हणतात, "जर स्त्रियांची अशा तऱ्हेची वागणूक सतीत्वाची, साध्वीत्वाची, पतीव्रतत्वाची, एकनिष्ठ प्रेमाची व अलौकिक सद्धर्मित्वाची साक्ष देणारी कशी होते, हें कोणीं उघड करून सांगेल काय? जो सांगेल त्यास आम्ही बृहस्पतीचा बृहस्पती मानू!" (आगरकर: २०१३ : पृ.१७२) म्हणजे साध्वीत्व, पतिव्रतत्व सिद्ध करण्याची जबाबदारी केवळ स्त्रियांची आणि हे सिद्ध करण्यासाठीचे नियम, बंधने केवळ स्त्रियांनाच हे योग्य नाही. किंबहुना असा घातक नियम स्त्रीला किंवा पुरुषांनाही नसावा असे मत ते मांडतात. याऊलट अशा घातक श्रद्धा नष्ट करून त्याऐवजी दोघांनाही पुढचे जीवन कंठण्यासाठी चांगले शिक्षण मिळावे असा आग्रह ते धरतात. "जिचा नवरा मेला आहे तिचें होईल तितक्या उत्तम रीतीने संगोपन करण्याची उदार चाल आमच्या देशांत असती, तर सहगमनाची रूढि येथें कधींच न पडत." (आगरकर : २०१३ : पृ.१७२) हा विचार मांडून ते अशा चालीतून येणाऱ्या अमानवी वर्तनाबाबतचा खेद व्यक्त करतात.

कोणत्याही गोष्टीचा अंगिकार हा अंधपणाने न करता डोळसपणे व बुद्धीच्या जोरावर करावा याची शिकवण ते या लेखातून देतात. प्रस्तुत लेखात आगरकरांच्या मतमांडणीत अभिनिवेश असला तरी ते हट्टाग्रही नाहीत हे जाणवते. म्हणूनच ते स्त्रियांना जी बंधने आहेत ती पुरुषांना तशीच करा याचा हट्ट किंवा आग्रह धरत नाहीत तर प्रत्येकाला त्याचे त्याचे

जगण्याचे स्वातंत्र्य अनुभवू द्या, असा सर्वसमावेशक विचार मांडतात. कोणत्याही स्वरूपाच्या आचार किंवा विचाराचे चांगले-वाईटपण जोखण्यासाठी ते बुद्धीला एकमेव प्रमाण मानतात.

## ८. 'इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचें घोर दारिद्र्य':

तत्कालीन मुंबई शहराचे वर्णन लेखाच्या सुरुवातीला आगरकरांनी केले आहे. ''मुंबई शहराचा अफाट विस्तार; राजवाड्याच्या तोडीच्या येथील मोठमोठ्या खाजगी व सरकारी हवेल्या; चारसहा गाड्या एकीला एक लागून जाण्यासारखे टोलेजंग रस्ते; बग्यांची, शिग्रामांची व ट्रॅमवेच्या गाड्यांची सारखी धुमश्चक्री; व्यापाऱ्यांच्या गल्ल्यांत वाट मिळण्यासाठी जाणारा-येणारांची धक्काबुक्की; घटकोंघटकीं उतारूंच्या व मालांच्या आगगाड्यांच्या शिळांचा आणि चाकांच्या खडखडाटाचा त्रासदायक आवाज;'' (आगरकर : २०१३ : पृ.२९९) असे दीर्घ स्वरूपाचे वर्णन येते. ज्यात मुंबईचे चलतचित्र वाचकांच्या नजरेसमोर उभे राहते. मुंबईमध्ये चालणारे विविध उद्योग, व्यापार, रस्ते, शाळा, दवाखाने या मूलभूत सोयींची असणारी भरभराट पाहून भारतातील सर्वच ठिकाणी असे दृश्य असते असे मानू नये असे आगरकर सांगतात. याचे वास्तव म्हणजे- मुंबईतील एकूण संपत्तीच्या अर्ध्याहून अधिकच्या संपत्तीचे मालक हे इंग्रज लोक आहेत. तसेच या शहरात काही श्रीमंत नेटीव (मूळ लोक) व्यापारी असून ते प्रतिदिवशी लाखो रुपयांची उलाढाल करत असतात. पण असे श्रीमंत व्यापारी भारताच्या सर्वच प्रांतात असतील असे नाही. म्हणून ते म्हणतात, "ज्याप्रमाणे जड वस्तूंत गुरुत्वाकर्षणाचा एक बिंदु असतो, त्याप्रमाणें या इलाख्यांत, किंबहुना या देशांत, मुंबई शहर संपत्त्याकर्षणाचें आद्य स्थान होऊन बसलें आहे. या इलाख्यांतील बहुतेक संपत्ति, बहुतेक शहाणपण, बहुतेक कारखाने, बहुतेक व्यापार, बहुतेक जातींचे व धर्मांचे लोक-सारे मुंबईत भरले आहेत." (आगरकर : २०१३ : पृ.३००) मुंबई हे सर्व चांगल्या वस्तूंचे, श्रीमंत लोकांचे केंद्र बनले आहे. पण तशी स्थिती इतर प्रांताची नाही. इतर प्रांताची स्थिती याहून निराळी आहे. त्यामुळे मुंबईवरून इतर प्रांताचा निष्कर्ष लावणे चुकीचे आहे. यासाठी ते पुढील उदाहरण देतात. ''मुंबईची सदा दिवाळी पाहून या आधुनिक व ऐहिक कुबेरनगरींतील लोकांप्रमाणेंच या देशांतील इतर शहरांतले किंवा गांवांतले लोक धनाढ्य असतील असा तर्क करणे म्हणजे लग्नकार्यात आमचे लोक जो शक्तीबाहेर खर्च करतात त्यावरून आमच्या ऐपतीचा अंदाज करण्याइतकें वेडेपणाचें काम होणार आहे!'' (आगरकर : २०१३ : पृ.३००) आर्थिक राजधानी असल्यामुळे मुंबई शहरात इतक्या प्रमाणात उलाढाली होत असतात. बाकीच्या ठिकाणचे तसे नाही. याऊलट मुंबई आणि कलकत्ता ही इंग्रज लोकांची शहरे आहेत असे ते सांगून या शहरावरून देशाची किंवा देशाच्या आर्थिक स्थितीची कल्पना करणे वेडेपणाचे आहे असे म्हणतात. यात देशाचे अंतर्गत चित्र व स्थिती वेगळे असल्याचे ते इथे पटवून देऊ पाहतात. इंग्रजी नोकरांचे राज्यकर्त्यांचे पगार हे भरमसाठ होते. त्यामुळे सुखसमाधानात मश्गूल असणाऱ्या या अधिकारी लोकांना इथल्या प्रजेला समजून घ्यावेसे वाटणे शक्य नाही. मुंबई व कलकत्तासारख्या शहरावरून देशाची कल्पना करणारे अधिकारी पुढे येथून परत गेल्यानंतर तसेच लिहीत व बोलत राहिले. पण यातील काही अधिकारी मात्र देशाच्या अंतर्गत स्थितीबद्दल बोलत होते. ब्रॅडलॉ किंवा मि. वि. डिग्बी इ. नी ही अंतर्गत स्थिती नेमकेपणाने मांडली. ब्रॅडलॉ सारख्या लोकांनी ''आपल्या अपनीत बांधवांच्या ज्ञानचक्षूंवरील भ्रमपटल यत्किंचित दूर करण्याचा प्रयत्न केला'' असल्याचे ते सांगतात. तर डिग्बी यांनी 'इंडिया'

munotes.in

नामक चालविलेल्या मासिकाच्या जानेवारीच्या अंकात, 'हिंदुस्थानांतील ब्रिटिश अमलाचें कृष्णांग' या लेखात 'हौस ऑफ कॉमन्स' या सभेच्या सभासदांस एक 'अनावृत पत्र' लिहिले व देशस्थितीची जाणीव करून दिली आहे. या लेखातून आगरकरांना संपूर्ण देशाची स्थिती शहरांच्या दिसण्यावरून न समजता ती शहरे सोडून इतर प्रांताच्या स्थितीवरून ठरवावी असे ते प्रतिपादन केले. तसेच हिंदुस्थानचे दारिद्र्यनिरसन करण्यासाठी सरकारची व कायद्याची मदत घेतल्याशिवाय गत्यंतर नाही असेही त्यांनी सुचविले आहे.

### ९. 'हिंदुस्थानची तिजोरी आणि घाटत असलेला अन्याय':

प्रस्तुत लेखाचा उद्देश हा तत्कालीन काळात इंग्रज सरकारने विविध वस्तूंवर लादलेला कर हा कसा हिंदुस्थानच्या तिजोरीवर भार देणारा व अन्यायकारी आहे याचे विश्लेषण करणारा आहे. व्यापाराच्या उद्देशाने आलेल्या इंग्रजांनी भारतावर दिडशे वर्षे राज्य केले. त्यांचा मुख्य उद्देश इथे राज्य करणे हा तर होताच पण त्याचबरोबर इंग्लंडच्या व्यापाराला बळकटी मिळवणे हाही होता. त्यामुळेच भारत स्वातंत्र्य मिळवण्याच्या मार्गावर असताना अन्यायी पद्धतीने विविध वस्तूंवर कर लादून भारताची तिजोरी रिकामी करणे म्हणजेच आर्थिक व्यवस्था दुबळी करणे हा कुटील हेतू त्यांच्या कर आकारणीत होता. हे तमाम भारतवासीयांच्या नजरेस आणणारा विचार आगरकरांनी या लेखात मांडला आहे. ''इंग्लंडास गिऱ्हाईक मिळावें व इंग्लंडचा व्यापार वाढावा याच उद्देशाने केलेल्या लढाईचा खर्च एकट्या हिंदुस्थानच्याच तिजोरीवर लादण्यांत यावा.'' (आगरकर : २०१३ : पृ.३२०) ही राजनितीक पद्धती इंग्रजांनी अवलंबिली होती. त्यासाठी तत्कालीन काळात लादलेल्या करांची यादी ते लेखात देतात. जसे की, १.परदेशांतून हिंदुस्थानास येणाऱ्या मालावर शेंकडा पांच जकात असणे. २. १००० पेक्षाही कमी असणाऱ्या व्यक्तीसही इन्कम टॅक्स भरावा लागणे. ३. केरोसीनवर शेंकडा १० जकात ठेवणे. जे केरोसीन भारतातील गोरगरिबांसाठी फार उपयुक्त असते. (हा कर वाजवी नसल्याचे 'मुंबई प्रेसिडेन्सी ॲसोसिएशननें' सांगितले होते.) ४. उद्योग धंद्यासाठी, गिरणीसाठी लागणारा कोळसा व यंत्रसामुग्री यावरही जकात लावणे. या सर्व गोष्टी भारत परदेशातूनच मागवत असे. ज्या गोष्टींसाठी भारत परदेशावर अवलंबून होता त्यावर जकात लावली गेली होती. याऊलट इंग्लडहून सर्वात मोठा व्यापार चालायचा तो कापडाचा. या कापडावरील जकात मात्र माफ केली होती. आणि हिंदुस्थानच्या आयात व्यापारापैकी जवळजवळ निम्मा भाग हा कापडाचा होता. इथे मात्र या कापड आयातीचा अपवाद करून जकात, कर सरकारने लादला होता. ही गोष्ट इंग्रजांच्या अन्यायी व दुटप्पी धोरणाला अधोरेखित करते. हे सरकारचे अन्यायी धोरण आगरकरांनी उदाहरणांसहीत प्रस्तुत लेखातून वाचकांसमोर व सरकारसमोर उघड केले आहे. त्यांचा स्पष्टवक्तेपणा या लेखातून आपल्याला निदर्शनास येतो. केवळ वाचकांना जागृत करणे ऐवढाच हेतू या लेखात नाही; तर सरकारला त्यांचे धोरण कसे अन्यायी आहे हे पटवून देणे, त्यासाठीची उदाहरणे समोर ठेवणे हाही हेतू यामागे दिसतो. अशा प्रकारचा सरकारविरुद्धचा असंतोष, निषेध हा तत्कालीन 'पायोनिअर' व 'इंग्लिशमन' या पत्रांतूनही कडक शब्दातून व्यक्त झाला आहे. या गोष्टीत बदल होण्यासाठी अशा पद्धतीचा निषेध व्यक्त होणे, सभा होणे गरजेचे असल्याचे व तशा पद्धतीचे आवाहन आगरकरांनी या लेखातून जनतेला केले आहे. समकालिनांना डोळसपणे जगण्याची शिवकण आगरकरांनी या लेखातून दिलेली दिसते.

### १०. 'राष्ट्रसभा बंद ठेवतां कामा नये':

राष्ट्रसभा बंद ठेवण्याची सूचना ह्यूमसाहेबांनी दिली होती. (ह्यूम साहेब हे ब्रिटिशकालीन भारतात सिव्हिल सेवेत अधिकारी होते. तसेच ते राजकीय सुधारक व 'भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस'चे संस्थापक देखील होते. याव्यातिरिक्त ते त्या काळात ब्रिटिश सेवेत असूनही भारतीय जनतेशी त्यांची मित्रत्वाचे संबंध होते. (ए. ओ. ह्युम : विकिपीडिया २१ मार्च २०२१) असे त्यांनी सूचित करण्यामागे त्यांची काय धारणा होती याबाबतचा विचारविनिमय आगरकरांनी या लेखातून केला आहे. राष्ट्रसभा ही राष्ट्रीय कामासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारी सभा होती. पण ती ह्यूम साहेबांच्या म्हणण्यानुसार ती काही वर्षे भरू न देणे म्हणजे ती पुढे परत केव्हाही भरणार नाही याची भीती आगरकरांना वाटते. कारण त्यामुळे ती निरंतरपणे बंद होण्याची शक्यता अधिक होती. मुळात ही राष्ट्रसभा राष्ट्रहितासाठी काम करते, हेच बऱ्याच लोकांना माहीत नव्हते. हे माहीत नसणारे लोक म्हणजे मोठमोठ्या पगारावरील नोकरदार, संस्थानिक, व्यापारी असे सधन लोक होते. तर ज्यांना या सभेचे महत्त्व वाटत होते ते निर्धन होते. त्यामुळे सभेची आर्थिक स्थिती तितकीशी चांगली नव्हती.

या लेखाच्या सुरुवातीसच आगरकरांच्या दृष्टिक्षेपातील ह्यूम साहेबांचे वर्णन येते. "अगदीं निरूपाय झाल्याशिवाय कोणतीहि हातीं धरलेली गोष्ट मध्येंच सोडून देणें त्यांना कधींहि रुचावयाचे नाही." (आगरकर : २०१३ : पृ.३३६) असे निग्रही पुरुष राष्ट्रसभा बंद करण्याचे सांगतात म्हणजे त्यामागचे कारण नक्कीच गंभीर आहे का याची चाचपणी आगरकरांनी या लेखाच्या आधारे केली आहे. त्यातील एक महत्त्वाची गोष्ट की, हिंदुस्थानच्या उद्धारकार्यासाठी काम करणाऱ्या ब्रॅडलॉ साहेबांचे स्मारक व्हावे यासाठी राष्ट्रसभेद्वारे वर्गणी, फंड उभा करायचे ठरविले. या 'ब्रॅडलॉ मेमोरिअल' साठी मि. नॉर्टन यांनी ५०० रुपये वर्गणी जमा केली होती. पुढची रक्कम जमा करायची होती. पण खूप प्रयत्न करूनही ही रक्कम जमा न होणे ही लाजिरवाणी गोष्ट तेव्हा घडत होती. आणि म्हणूनच मि. नॉर्टन यांनी आपले पैसे परत मागितले होते. याशिवाय भारतीयांच्या स्थितीबद्दल त्यांनी काढलेले उद्गार फार गंभीर होते. "गचाळ हिंदू लोकांच्या नादास फिरून लागावयांचें नाहीं व त्यांच्या अघळपघळ शुष्क वल्गनांवर कधींहि विश्वास ठेवावयाचा नाही." (आगरकर : २०१३ : पृ.३३६) हा त्यांनी केलेला निश्चय फार गंभीर व भारतीयांसाठी फार लाजिरवाणा होता. इंग्लिश एजन्सीकरिता जे ७०० रूपये जमवायचे होते ते नाटककार गोविंदराव देवल घरोघरी हिंडून जमा करत होते. अशी राष्ट्रकार्यासाठी लोकांची मनस्थिती एकूणच उदासिन होती. याची प्रचिती वारंवार येत होती.

आतापर्यंत पुणे शहरात ही राष्ट्रसभा केव्हाही भरली नव्हती व पुढे शंभर वर्षांनी तरी भरेल की नाही याची शाश्वती नसल्याचे आगरकर इथे सांगतात. कारण पुणे या शहरात आपापसांत जी यादवी होती ती मिटल्याशिवाय लोक एकत्र येऊ शकणार नाहीत. प्रत्येकाची तऱ्हेवाईकपणे वागण्याची पद्धतही या यादवीत भरच टाकत होती. या कारणास्तवच आगरकर पुणे शहराला 'घमेंडखोर' असे संबोधतात. आगरकरांचे या शहराबाबतचे असे मत होण्यामागे अनेक कारणे या लेखात येताना दिसतात. आणि म्हणूनच सर्व लोक एकत्र येतील आणि या राष्ट्रसभेचे आयोजन करतील अशी आशा त्यांना वाटत नव्हती.

लेखाच्या शेवटी आगरकरांनी सभेच्या बाबतीत काही सूचना दिल्या आहेत. राष्ट्रसभा भरविण्याची पाळी ज्या प्रांतावर असेल त्यांनी वर्गणीचा पैसा गोळा करावा आणि ज्या प्रतिनिधींना राष्ट्सभा कामकाजासाठी इंग्लंडला जावेसे वाटते पण पैशाअभावी ते जाऊ शकत नाहीत त्यांना अर्थसाहाय्य करावे. तसेच राष्ट्रसभेसाठी जबलपूरसारख्या एखाद्या सोयीच्या ठिकाणी कायमची इमारत बांधून त्यास 'ह्यूम कॉंग्रेस हॉल' असे नाव द्यावे अशी ते सूचना करतात.

**११. 'वाचन':**

संबंधित लेखामध्ये वाचनाचे महत्त्व आगरकरांनी नमूद केले आहे. ज्ञानाचा संग्रह करण्याचे प्रधान साधन हे 'वाचन' असल्याचे सांगून 'वाचन' ही गोष्ट मानवी आयुष्यात किती महत्त्वपूर्ण आहे याचे चिंतनात्मक विवेचन या लेखातून करतात. हा चिंतनात्मक स्वरूपाचा लेख आहे. ज्ञानसंपादनाची गुरूमुख, वाचन, विचार, अवलोकन, वाद इ. द्वारे आहेत.

मानसिक श्रम हे फार अवघड असल्याने मानवास या श्रमाचा फार कंटाळा आहे. पण असे होणे म्हणजे वाईट आहे. मनाला श्रम करण्याची गरज ते यात नमूद करतात. हे सांगण्यासाठी ते अत्यंत समर्पक उदाहरण देतात. ते म्हणतात, "मनाची लोखंडासाराखी स्थिति आहे. लोखंड वहिवाटींत नसलें म्हणजे त्याला तांबेरा येऊन तें कुचकामाचें होतें. पण जर त्याच्यावर नित्य घर्षण घडत असलें तर तें सतेज राहून फार दिवस टिकतें." (आगरकर : २०१३ : पृ.३५७, निवडक आगरकर) अभ्यासाने बुद्धी सदृढ होते. बैलाचा खांदा, घोड्याची छाती, गाढवाची पाठ व एडक्याचे शिंग ही उपयोगाने मजबूत होत असतात. या शरीराच्या अवयवांप्रमाणेच मनाचे, बुद्धीचे अवयवही मजबूत होत असतात. तशीच अभ्यासाने, वाचनाने बुद्धी सदृढ होत असते. पण वाचन हे चांगल्या पुस्तकांचे असावे असेही ते नमूद करतात. 'कुमित्रांच्या संगतीप्रमाणें दुष्य पुस्तकांच्या वाचनापासून दुर्गुण जडतात म्हणून कुमित्रांप्रमाणें दुष्ट पुस्तकांचा सहवास टाळला पाहिजे.' (आगरकर : २०१३ : पृ.३५७) असे मत मांडून ते पुढे म्हणतात की अशी दुष्ट पुस्तके वाचण्यापेक्षा काहीच न केलेले बरे. इथे 'वाचन' या कृतीमागे आगरकरांना अपेक्षित असणारा विचार आपल्याला ध्यानात येतो.

वाचन ही सहज साध्य होणारी गोष्ट आहे. संवाद करण्यासारखे चांगले मित्र मिळतीलच असे नाही, विद्वान गुरू भेटतीलच असे नाही, बिनचूकपणे विचार करता येण्यासारखे शिक्षण मिळेलच असे नाही किंवा सहजपणे अनुभव वाट्याला येतीलच असे नाही. पण वाचन मात्र स्वल्प खर्चात व थोड्याशा अंगमेहनतीने साध्य होणारी गोष्ट आहे. शाळेत किंवा महाविद्यालयात मिळालेले ज्ञान हे नोकरी मिळविण्याकरिता वापरायचे आणि ती मिळाली की अभ्यासाची सार्थकता संपली म्हणून वाचन बंद करायचे ही वृत्ती घातक असल्याचे ते नमूद करतात. हे पटवून देताना ते म्हणतात की, 'आपणांस 'हें मागल्या पिढीचें' असे म्हणवून घ्यावयाचें नसेल, त्यांनीं वाचनाची संवय नेहमीं जागृत ठेविली पाहजे" हा सल्ला ते देतात. जेणेकरून व्यक्ती अद्ययावत राहत असते. यासाठी ते इंग्लंडमधील लोकांची उदाहरणे देतात. तेथील न्हावी, परीट, तेली, तांबट यांच्या घरीही नित्याची दोन वर्तमानपत्रे येतात व कपाटात दहापांच का असेना पुस्तके असतातच. ज्यामुळे या धंदेवाल्या लोकांचे तत्कालीन राजकीय घडामोडीवर बारीक लक्ष असते. यातून त्यांचे पार्लमेंट व

प्रतिनिधींबाबत नेमके मत असते. त्यामुळे राजकीय गोष्टीवर ते न भांबावता नेमकेपणाने आपले मत नोंदवू शकतात. आपल्याकडे मात्र असे घडत नसल्याची खंत ते इथे व्यक्त करतात.

'निवडक आगरकर' - (संपा.) ग. प्र. प्रधान

या व्यवहारिक उपयोजनाबरोबरच वैयक्तिक स्वरूपाच्या दुःखाचा विसर पडण्यासाठीही 'वाचन' हा चांगला उपाय असल्याचे ते अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट करतात. अनेक राष्ट्रे उभी राहण्यास किंवा मोडून पडण्यास कोणती कारणे साह्यभूत ठरली याचा इतिहास व वर्तमान जाणून घ्यायचा असेल तर त्यासाठी वाचन हा एकमेव पर्याय असतो. सबंध जगाचे ज्ञान करून घेण्यासाठीही वाचन उपयुक्त ठरते. आपण जे वाचू त्याचा परिणाम आपल्या विचार-वृत्तीवर पडत असतो. महान नेत्यांची, संतांची चरित्रे वाचली असता त्यातून प्रेरणा घेऊन तसे बदल स्वअंगी बाणवण्यापर्यंतचा बदल आपल्यात होत असतो. या अशा अनेक कारणास्तव वाचन महत्त्वपूर्ण असते. अशा विविध पैलूंच्या आधारे आगरकरांनी वाचनाचे महत्त्व पटवून दिलेले आहे.

एकूणच एकोणिसाव्या शतकातील सामाजिक, धार्मिक स्वरूपाचे चिंतन गो. ग. आगरकर यांच्या लेखातून येते. भारतीय समाजाला ब्रिटिशांच्या राजकीय गुलामगिरीतून स्वातंत्र्य हवे असले तरी इथल्या सामाजिक, धार्मिक गुलामगिरीतूनही स्वातंत्र्य मिळवणे कसे महत्त्वाचे आहे याची जाणीव आगरकरांनी त्यांच्या लेखातून करून दिली आहे. यासाठी ते स्वपासून संपूर्ण समाजाची चिकित्सा करतात. त्यांच्या लेखनात सत्यप्रियता, सडेतोड प्रतिपादन दिसते. मुख्य विषयाला हात घालण्यापूर्वी त्याची पार्श्वभूमी ते अगोदर सांगतात. ज्यामुळे विषयाचे गांभीर्य ध्यानात येण्यास मदत होते. तत्कालीन स्त्री जीवनाचे रेखाटन करून घातक रूढी, परंपरांचे अवडंबर लक्षात आणून देतात. आधुनिक नवविचार आंगीकरण्यासाठी प्रोत्साहित करतात. समस्येचे मूळ शोधणे, त्याचे वास्तव कथन करून त्यातील गंभीरता ध्यानात आणून देणे आणि त्यावरील उपायांची मांडणी करणे असे एकूण त्यांच्या लेखनाचे स्वरूप दिसून येते.

munotes.in

## २आ.५ गो. ग. आगरकर यांच्या लेखनाचे शैलीविशेष व भाषाविशेष

शैलीविचार म्हणजे मांडणीचे विशेष होय. पण इथे केवळ मंडणीच्या बाह्य रूपाचा विचार करून चालत नाही तर त्याच्याशी जोडलेल्या अंतरंगाचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते. शैलीविचार म्हणजेच लेखकाच्या सृजनशीलतेचा, त्याच्या चैतन्यशील व्यक्तिमत्त्वाचा विचार असतो. एखाद्या लेखकाची लेखनशैली सांगणे म्हणजेच त्याच्या अभिव्यक्ती विशेषांची नोंद करणे होय. लेखकाच्या लेखनशैलीवर तत्कालीन वाचकाभिरुची, जीवनमूल्ये, प्रदेश, परिस्थिती यांचा प्रभाव पडत असतो. आगरकरांच्या लेखनातून आपल्याला या सर्व गोष्टी पाहता येतील. समाजनिष्ठा, निर्भीडता, वास्तववादी दृष्टिकोण, विज्ञाननिष्ठा, सडेतोड मतप्रतिपादन हे आगरकरांच्या गद्यशैलीचे विशेष असून त्यांनी मराठी भाषेच्या वापरातून स्वदेशप्रेम व स्वभाषाप्रेम जोपासलेले दिसते. मुद्देसूद व सिद्धांतमय वाक्ये त्यांच्या लेखनात आपल्याला पहायला मिळतात. एकोणिसाव्या शतकात मराठी भाषेला पुनःजिवित करण्याचे श्रेय आगरकरांकडे जाते आणि निबंधलेखन हा त्याचा पाया होय. आगरकर हे आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते होते त्यामुळे तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीनिर्देशक व

समाजात आधुनिक विचार रुजविणारे लेखन म्हणून आगरकरांच्या निबंधलेखनाकडे पाहिले जाते.

लेखकाची सामाजिक बांधिलकी ही लादलेली नसून ती त्याच्या जगण्याचा अविभाज्य भाग असते. त्याच्या जीवननिष्ठा, मूल्ये यांचे मूलगामी संदर्भ तो वापरत असलेल्या अभिव्यक्तीच्या तंत्रातून दिसत असतात. अनेक समस्या, अडचणी दिसणे व त्या त्यांच्या लेखनाचा विषय होणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. आगरकरांच्या लेखनात या गोष्टी विषय होऊन येतात. आणि हे सर्व विषय विचार मंथनातून, खंडन-मंडन स्वरूपात गद्यातून अवतरताना दिसतात.

अनेक उपवाक्ये एकत्र होऊन दीर्घ स्वरूपाचे रचनात्मक वाक्य हे आगरकरांच्या लेखनशैलीचे खास विशेष आहे. स्वमताची अर्थशृंखला तयार करून अशी पल्लेदार वाक्ये त्यांच्या रचनेत दिसतात. त्यांच्या सर्वच लेखामध्ये अशी अनेक दीर्घ वाक्य पाहता येतील. उदा. "सृष्टीत प्रतिदिवशीं घडणारे कोट्यवधि अपघात, रोग, अज्ञान, दुष्ट लोकांची पीडा, अकालीं मृत्यू, विषारी व हिंस्र प्राण्यांपासून होणारा त्रास, इत्यादीकांमुळे बऱ्याच मनुष्यांस व्हावें तसें सुख होत नाहीं, व कांहींस तर त्यांचें जीवित दु:सह होतें; त्यामुळें जे कोणी स्वत: दु:ख सोसून आमरण दुसऱ्याच्या सुखासाठीं झटत असतात, आणि गरज पडल्यास त्यांसाठी मरण्यासहि तयार होतात, ते मान्यता पावतात हें अगदीं नीट आहे; आणि अशा प्रकारचे लोक अधिकाधिक होत गेले तरच जगांतील बहुतेक विपत्तीचा बींमोड होण्याची आशा आहे." (आगरकर, 'स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची आवश्यकता': पृ. १७१) यामध्ये विविध  उपवाक्य आपल्याला दिसतात. एका विचारात गुंतलेल्या अनेक सम-विचारांचे व त्या विचाराच्या अनेक पैलूंचे दर्शन ही उपवाक्ये करतात. मनात येणारे सलग व अनावर विचार, भावना यातून ही वाक्ये दीर्घ होतात. त्यांच्या काही लेखांमध्ये तर दहा ते पंधरा ओळीपर्यंतची दीर्घ वाक्ये आपल्याला पाहायला मिळतात. आगरकरांच्या लेखनशैलीबद्दल ग. प्र. प्रधान म्हणतात की, "आगरकरांचे मन मृदु, संवेदनाक्षम व भावनाशील होते. अन्यायाची तीव्रता अंत:करणाला जाणवली की त्यांच्या विचारांना गती मिळे. विचार करताना मात्र ते भावनेच्या आहारी कधीही जात नसत. बुद्धिवादाच्या आधाराने त्यांचा विचार निश्चित झाला की तो मांडताना त्याला भावबळाची जोड मिळे व त्यामुळे त्यांचे वैचारिक लिखाण रुक्ष न होता वाचकांच्या अंत:करणाला स्पर्श करी." (ग. प्र. प्रधान : प्रस्तावना : २०१३) त्यामुळेच लयदार आवर्तने घेऊन, वाक्याच्या छोट्या छोट्या अर्थरचना करत एक ठसठशीत अर्थ ते यातून सिद्ध करतात.

तत्कालीन प्रमाणभाषेचा अवलंब त्याच्या लेखनात होतो. नव शब्दांची घडण करणे व त्याचे औचित्यपूर्ण व काटेकोर उपयोजन करणे हे त्यांच्या लेखनाचे खास विशेष दिसून येते. 'बाह्यात्कारे', 'शिलावस्था', 'वर्तनान्तर' अशा काही नव शब्दांची घडण ते करतात. त्यांचे प्रमाणभाषेवर प्रभुत्व असल्याने अभिजन भाषारूप त्यांच्या लेखनात येते. यामुळेच संस्कृत रचनेचे नमुने खंडन-मंडन करताना त्यांच्या विवेचनात येतात. 'आमचे काय होणार?' या लेखातून त्यांचा संस्कृत भाषेचा असणारा अभ्यास ध्यानात येतो. या लेखात अनेक संस्कृत शब्दांचा  अवलंब विवेचनादरम्यान झालेला दिसतो. उदा. 'नग्न चक्षूने क्षीरपथाकडे पाहणे'- असे वाक्य प्रयोजन येते. यातून संस्कृतप्रचुरता दिसून येते. "परोपकाराय भवेदवश्यं । वृद्धस्य भार्या करदीपिकेव" (आगरकर : २०१३ : पृ. २५) (अर्थ-अंधारात कंदील घेतलेल्या

हाताला त्याचा फारसा उपयोग नसतो तो इतरांना अधिक असतो. त्याप्रमाणे लहान वयात लग्न झालेल्या स्त्रीला त्या लग्नाचा फारसा फायदा नसतो उलट तोटाच असतो. तिच्या नवऱ्याला त्याचा जास्त फायदा असतो.) हे संस्कृत वचन हिंदू विवाह संस्थेबद्दल भाष्य करताना ते वापरतात. तसेच 'महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र' या लेखामध्ये- "स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि । आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा।। (आगरकर : २०१३ : पृ.१५६) (अर्थ- स्नेह, दया, सौख्य, फार तर काय लोकांच्या संतोषासाठी मला जानकीचादेखील त्याग करावा लागला तरी त्याबद्दल खेद वाटणार नाही.) अशी लेखांमध्ये सूचक, प्रसंगानुरूप अर्थपूर्ण संस्कृत वचने त्यांच्या विवेचनात येतात.

विवेकाला आवाहन करताना ते आधुनिक पाश्चात्त्य विचारसरणी व भारतीय परंपरागत विचारसरणी याची तुलना करतात. त्याच्या चांगल्या-वाईट बाजू वाचकांसमोर मांडतात. त्याच्या निवडीचे स्वातंत्र्य ही वाचकांसाठी खुले ठेवतात. वाचकांशी सुसंवाद साधण्यासाठी ते काही प्रश्न उपस्थित करतात. या प्रश्नाद्वारे ते त्यांना अंतर्मुख करतात. त्यांना विचार करायला भाग पाडतात. उदा. "बायको मेल्याची वार्ता येताचं बेशुद्ध होऊन परलोकवासी झालेल्या भार्यारतांची उदाहरणें कधीं तरी आपल्या ऐकण्यात येतात काय? किंवा स्त्रीबरोबर सहगमन केलेल्या प्रियैकरतांची उदाहरणे कोणत्याही देशाच्या पुराणांत किंवा इतिहासांत कोणीं वाचलीं आहेत काय? किंवा बायकोस देवाज्ञा झाल्यामुळें, नित्य भगवीं वस्त्रें परिधान करणारे, क्षौराच्या दिवशीं डोक्याच्या किंवा तोंडाच्या कोणत्याही भागावरील केसांची काडीमात्र दयामाया न ठेवणारे, भाजणीच्या थालिपिठाशिवाय दुसऱ्या कोणत्याही आहारास स्पर्श न करणारे, अरिष्ट गुदरल्यापासून चारसहा महिने कोणास तोंड न दाखविणारे, पानतंबाखूची किंवा चिलीमविडीची त्या अत्यंत खेदजनक दिवसापासून आमरण समिधा शेकणारे, व मंगलकार्यांत किंवा कामासाठी घरांतून बाहेर पडणाऱ्या इसमापुढें येण्यास भिणारे नवरे कोणीं पाहिले आहेत काय?" (गो. ग. आगरकर : २०१३ : पृ.१७२) असे एकामागे एक प्रश्न त्यांच्या विवेचनात येतात. व्यवसाय, धर्म, संस्कृती, उद्योग, समाजवृत्ती अशा अनेक बाबींवर ते या प्रश्नातून प्रकाश टाकतात. अशा सूचक प्रश्नातून समाजभान निर्माण करून इतर देशातील विकसित माहिती, ज्ञानसंचय, नवा आधुनिक दृष्टिकोण यांचा परिचय ते करून देतात.

रूपकांची व उपमांची योजना हे विशेष त्यांच्या लेखनशैलीत दिसतात. आपण सांगतो त्याचे योग्य आकलन व्हावे यासाठी समर्पक उदाहरणे, उपमा, रूपके यांचा अवलंब ते करतात. एखाद्या गोष्टीचे महत्त्व पटवून देत असताना सूचकपणे ते अनेक दाखले देतात किंवा रूपकांचा अवलंब करतात. ते देण्याची त्यांची पद्धत लालित्यपूर्ण अशा स्वरूपाची आहे. 'तरुण सुशिक्षितांस विज्ञापन' या लेखात आपल्याला अशी अनेक उदाहरणे पाहता येतील. "इंग्रजी होईपर्यंत आमचे सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघाताने दगडाप्रमाणें कठीण झालेल्या लांकडासारखे किंवा हाडकासारखे शेंकडों वर्षे होऊन राहिंले असें म्हणण्यास हरकत नाही." (आगरकर : २०१३ : पृ.१३१, १३२) इंग्रजांच्या आगमनापूर्वीचे आपणा सर्वांचे व्यक्तिजीवन व राष्ट्रजीवन हे कशा पद्धतीचे होते हे सांगताना ते साच्यात घालून आकारबद्ध झालेले लोखंड, कायम बंदिवासात असलेला बंदिवान, सतत पाणी पडून गोठलेला दगड किंवा हाडे असे रूपक योजतात. ही रूपके असंवेदनशीलतेचा अर्थ प्रतिबिंबित करतात. काही कल्पना, विचारांचे कलात्मक वर्णन करताना अशी रूपके

लेखक वापरत असतो. रूपकात्मक भाषा हे आगरकरांच्या भाषाशैलीचे विशेष म्हणावे लागेल. 'इंग्रज राज्याची उलट बाजू अथवा आमचें घोर दारिद्रय' या लेखात ते तत्कालीन ब्रिटिश अंमलाखाली असलेली भारतीय स्थितीचे वर्णन पुढील शब्दात करतात. "हिंदुस्थानची राज्यसूत्रें खुद्द महाराणीसाहेबांनीं आपल्या हाती घेतल्यापासून हिंदुस्थानचें वित्त कृष्णपक्षांतील चंद्रांप्रमाणें क्षयास लागलें असतां, व थोड्या वर्षांत हिंदुस्थान देश कंगालतेच्या निबिड अंधकारांत गडप होऊन जाण्याची चिन्हें स्पष्टपणे दिसूं लागली असतां, आमचें वित्त शुक्लपक्षातील चंद्रप्रमाणें वाढीस लागलें आहे, व थोड्या वर्षांत पोर्णिमेच्या अतिश्रीमंत चांदण्यांत आम्ही मोठ्या आनंदानें वावरू लागणार आहों" (आगरकर : २०१३ : पृ.३०२) असा भ्रम तत्कालीन लोकाना होऊ लागल्याचे ते वर्णन करतात. या वर्णनात आगरकरांच्या कल्पक बुद्धीचा प्रत्यय येतो. इथे देश स्थितीचे वर्णन ते अत्यंत कलात्मक रूपक वापरून करतात. कृष्णपक्षात चंद्राचा आकार दिवसेंदिवस लहान होत जाऊन आकाशात तो कमी वेळ दिसत असतो, तर शुक्लपक्षात चंद्र आकाशात जास्त काळ दिसत असतो, तर पौर्णिमेला चंद्र पूर्ण दिसत असतो ही बऱ्या-वाईट देशस्थितीची तुलना करण्यासाठी येणारी रूपके अतिशय मार्मिक आहेत. एखाद्या घटनेला, स्थितीला थेटपणे न सांगता समभावी दुसऱ्या घटनेतून किंवा वस्तूतून दर्शवणारी रचना ही रूपकात्मक रचना असते. इथे आगरकर हे देशस्थितीचे वर्णन समभावी चंद्राच्या दृश्यातून मांडताना आपल्याला दिसतात.

वर्णनपरता, चित्रमयता हे देखील आगरकरांच्या लेखनाचे विशेष आहे. एखादी घटना, पाहिलेला प्रसंग हा जसाच्या तसा शब्द कुंचल्यात ते वाचकांसमोर साक्षात करतात. तसेच या वर्णनात वास्तवदर्शी नाट्य, भावना, ताणे-बाणे येतात. 'इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचें घोर दारिद्रय' या लेखात ते ''गिरण्यांच्या चिमण्यांतून निघणाऱ्या काळ्या धुरांचे लोळ आणि इमारतींच्या उदरांत चाललेली मोठमोठ्या यंत्रांची गडबड.'' (आगरकर : २०१३ : पृ.२९९) असे मुंबईच्या वाढत्या व्यापार व विस्तारीकरणाचे वर्णन करतात. प्रस्तुत वर्णनात येणारे नादसंवेदन हे वाचकाला त्या वास्तवाचे भान देते. त्या काळातील मुंबईचे आवाजी जग यातून वाचकाच्या नजरेसमोरून तरळून जाते. 'सुधारक काढण्याचा हेतु' या लेखातून भारताला लाभलेल्या हिंदी महासागराचे वर्णन ''सह्य, विंध्य, व कैलास यांसारख्या प्रचंड पर्वतांनीं ज्याची तटबंदी झाली आहे; सिंधु, भागीरथी, नर्मदा, तापी, कृष्णा इत्यादि नदांनीं व नद्यानीं ज्यांतील क्षेत्रें सिंचण्याचें व उतारूंचीं व व्यापाराचीं गलबतें व आगबोटी वाहण्याचें काम पत्करलें आहे; हिंदी महासागराने ज्याला रशना होऊन शेंकडों बंदरे करून दिली आहेत.'' (आगरकर : २०१३ : पृ.१२९) असे येते. यामध्ये आगरकरांनी भारतभूमीच्या वेगळेपणाचे वर्णन बारकाईने केलेले आहे. भारताच्या दक्षिणेला जो निरंतर समुद्र लाभला आहे त्याला ते रशना म्हणजेच कडदोरा, कमरेचा दागिना असे संबोधतात.

लालित्यपूर्ण वर्णने त्यांच्या लेखात अनेक ठिकाणी दिसतात. टीकात्मक लेख लिहिताना कठोर होणारी भाषा अनेकदा प्रसंगवर्णनात मवाळ व लालित्यपूर्ण होताना दिसते. मुंबई शहराचे वर्णन करत असताना तिथल्या सूर्यास्ताचे वर्णन 'इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचें घोर दारिद्रय' या लेखात ते पुढीलप्रमाणे करतात, ''सर्व दिवसभर नभाचे आक्रमण करून भागलेला रवि पश्चिमसमुद्रांत स्नान करण्यासाठी क्षितिजावर येऊन ठेवला.'' (आगरकर : २०१३ : पृ.२९९) मुंबई शहराच्या गजबजाटातही सायंकाळी दिसणाऱ्या सूर्यास्ताचे मनोहारी वर्णन यापेक्षा वेगळे होऊ शकत नाही. 'सूर्याने थकल्यानंतर

स्नान करण्यास जावे' हे मानवी वर्तनाचे दृकप्रत्ययात्मक स्वरूपाचे आरोपण हे आगरकरांच्या लेखनातील सृजनात्मकता वाचकांच्या ध्यानात आणून देते.

एकूणच आगरकरांच्या लेखनशैलीमध्ये वाक्यरचनेत दीर्घत्व, रूपकात्मता, वर्णनपरता, चित्रमयता, संवेदनशीलता, भाषेचा लालित्यपूर्ण वापर, अभिजन भाषेचे उपयोजन असे विशेष दिसतात. महाराष्ट्रीयांमध्ये आधुनिक मानसिकता निर्माण करण्याचे श्रेय त्यांना जाते. "आधुनिक अभिरुचीला जुळणारी मराठी भाषेची घडण करण्याचे फार मोठे श्रेय आगरकरांकडे जाते... 'केसरी' व 'सुधारक' या पत्रांतील त्यांचे लेखन म्हणजे वैचारिक व चिंतनशील गद्यलेखनाचा नमुनाच म्हणता येईल. पल्लेदार वाक्ये, मुद्देसुद प्रितपादन, अन्वर्थक अर्थालंकार व भाषालंकार, प्रासंगिक व मार्मिक नर्मविनोद, तर्कसंगत युक्तिवाद ही त्यांच्या लेखनशैलीची प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील." (पृ. xxxiv: भा. ल. भोळे (प्रस्तावना) : २०१२) आगरकरांच्या लेखनकौशल्याबद्दल लो.टिळकांनी काढलेले उद्गार खूप मार्मीक आहेत. ते म्हणतात, "देशी वर्तमानपत्रास हल्ली जर काही महत्त्व आले असले तर ते बऱ्याच अंशी आगरकर यांच्या विद्वत्तेचे व मार्मिकतेचे फल होय यात शंका नाही." (संदर्भ- आगरकर : विकिपीडिया : १८ ऑक्टोबर २०२२.) असे गौरवास्पद उद्गार लो. टिळकांनी आगरकरांबाबत काढले आहेत. लेखनामध्ये विचार आणि विवेक यांचा समतोल कसा साधावा याचे उदाहरण म्हणून आपल्याला आगरकरांच्या लेखनाकडे पाहता येईल. त्यांच्या वैचारिक गद्यामध्ये वैचारिकतेसोबतच प्रतिभेचेही दर्शन घडते. त्यामुळेच आगरकरांचे वैचारिक लेखन हे क्लिष्ट, बोजड न होता ते वास्तवाभिमुख, सुलभ वाचनीय व लालित्यपूर्ण होताना दिसते.

## २आ.६ गो. ग. आगरकर यांच्या वैचारिक लेखनातील तत्त्वनिष्ठा

आगरकरांच्या एकूण लेखनाचा विचार केला असता आपल्याला ध्यानात येते की, त्यांचे लेखन हे विशिष्ट तत्त्वांशी निष्ठा बाळगणारे आहे. जी तत्त्वे त्यांच्या लेखनातील प्रगल्भतेची जाणीव करून देतात. तसेच या तत्त्वनिष्ठेमुळेच त्यांच्या वैचारिक लेखनाचा प्रभाव त्यानंतरच्या पिढीवर आपल्याला पहायला मिळतो. बुद्धीनिष्ठा, विज्ञाननिष्ठा, विवेकवाद आदी तत्त्वांमुळे त्यांनी तत्कालीन सामाजिक चळवळींना एकप्रकारचा वैचारिक खुराक पुरविल्याचे दिसते. आगरकरांच्या वैचारिक लेखनातील या तत्त्वांचा विचार आपण इथे थोडक्यात करून घेऊ.

### १.बुद्धिनिष्ठा:

आगरकर हे बुद्धीवादाचा पुरस्कार करणारे विचारवंत होते. त्यामुळे परंपरेने आलेले आहे म्हणून कोणत्याही गोष्टीचा स्वीकार ते करत नसत व तसे कोणी करत असेल तर त्याचे प्रबोधन ते करत असत. किंबहुना तसा स्वीकार कोणीच करू नये असे त्यांचे मत होते. ज्याच्या अस्तित्वाचा प्रत्यय येत नाही आणि येणे शक्य नाही अशा सदैव अज्ञात तत्त्वाचा आधार घेणे ही विचारांची दिवाळखोरी आहे असे आगरकरांचे मत होते. कोणत्याही आचार, विचाराची इष्टनिष्ठता ठरविण्यासाठी बुद्धी ही एकच गोष्ट प्रमाण मानण्यावर ते अधिक भर देत असत. पण बुद्धिलाही मर्यादा असते आणि या मर्यादांची जाणीवही त्यांना होती. बुद्धीच्या साहाय्याने वाटचाल करण्याची सवय व्यक्तीपासून समाजापर्यंत सर्वांना होणे

महत्त्वाचे असल्याचे ते सांगत. "जीवन म्हणजे माणसानें ज्ञानाच्या साहाय्यानें निसर्गावर मिळविलेला विजय (conquest) नसून सत्यशोधनाच्या प्रेरणेमुळे (quest) अज्ञाताच्या कुंपणापलीकडे जाण्याची धडपड होय." (ग.प्र.प्रधान : २०१३: प्रस्तावना-पृ.ix) असे आगरकरांकडे असणाऱ्या बुद्धीनिष्ठतेचे वर्णन ग. प्र. प्रधान यांनी केले आहे. 'आमचे काय होणार?' या लेखात त्यांनी आकाशगंगा पाहणाऱ्याच्या दृष्टीचे उदाहरण देऊन शिक्षित आणि अशिक्षित यांच्या दृष्टिकोणात असणाऱ्या तफावतीचे विवरण केले आहे. तसेच मानवाच्या अप्रगत अवस्थेपासून प्रगत अवस्थेपर्यंतचा प्रवास हा धर्मकारणाच्या अनुषंगाने त्यांनी मांडला आहे. व या सृष्टीतील सचेतन व अचेतन वस्तूंना नाव देण्यापासून त्यांना देवत्व किंवा विघातक अशा रूपात त्याची प्रतिमा तयार करण्याचे व परंपरेने ते पुढे चालवल्याचा इतिहास ते इथे नोंदवितात. आणि मानवाकडे इतरांपेक्षा असणाऱ्या बुद्धी या गोष्टीचा महिमा ते त्यातून वर्णितात.

### २. विज्ञाननिष्ठा:

आगरकर हे विज्ञाननिष्ठ सुधारक होते. धर्मातून व परंपरेतून आलेल्या अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यांना आगरकर विरोध करतात ते विज्ञाननिष्ठ दृष्टिकोणाच्या आधाराने. ज्या श्रद्धा ह्या मानवाच्या प्रगतीत अडथळा निर्माण करत असतात त्याचे पालन केवळ धर्माने किंवा परंपरेने सांगितलेले आहे म्हणून का करावे असा प्रश्न ते लेखनातून उभा करतात. म्हणूनच ते "बायकांच्या केसांचा जर मेलेल्या नव-याच्या गळ्यास फांस बसतो, तर पुरुषांच्या शेंडीचाहि मेलेल्या स्त्रीस कां फांस बसूं नये?" (आगरकर : २०१३ : पृ.१२१) असा प्रश्न उपस्थित करून या केशवपन सारख्या विधवा स्त्रियांबाबत असणाऱ्या रूढीविरुद्ध आवाज उठवतात. त्यांच्या या अशा मांडणीमागे विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण दिसून येतो. याचा पुढचा टप्पा म्हणजे ते संमती वयाच्या कायद्याला पाठिंबा देतात. ते जर पुराणवादी, परंपराप्रिय असते तर त्यांनी या कायद्याला कधीच पाठिंबा दिला नसता. 'स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची आवश्यकता' व 'तरुण शिक्षितांस विज्ञापना' या लेखाद्वारे ते अशा अनिष्ठ परंपरांना विरोध करतात. कोणती साध्वी श्रेष्ठ यासंबंधी चाललेल्या वादाचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून चांगलाच समाचार घेतात. तसेच याच लेखातून स्त्री शिक्षणाचा व त्यांच्या स्वावलंबनाचा आग्रह ते धरतात.

हर्बर्ट स्पेन्सर, मिल या पाश्चात्त्य विचारवंतांप्रमाणे ऑगस्ट कॉम्टे या विज्ञानवादी विचारवंताचा प्रभाव त्यांच्यावर होता. "कॉम्टे हा प्रगतीचा भोक्ता होता आणि सगळ्या जगाची वाटचाल विज्ञानाच्या व विकासाच्या दिशेने होते आहे असे त्याचे मत आहे." आणि त्याचे हे मत आगरकरांना महत्त्वाचे वाटते. (अशोक चौसाळकर : २००५ : पृ.६) प्रा. सेलबी यांच्या मताप्रमाणे 'आधुनिक विज्ञानाचा व तत्त्वज्ञानाचा प्रभाव जसा वाढत जाईल तशी लोकांच्या मनातील धर्मश्रद्धा कमी होत जाईल' हे आगरकरांना मान्य होते. आणि म्हणूनच ते विज्ञानाचा पुरस्कार करत होते. कारण भारतीय समाजस्थितीत वाढत्या धर्मभोळेपणाचा नायनाट करायचा असेल तर विज्ञाननिष्ठेशिवाय तरणोपाय नाही हे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. म्हणूनच ते शिक्षणामध्ये पारंपरिक धर्मशास्त्राच्या अध्ययनाव्यतिरिक्त गणित, भूगोल, विज्ञान व व्यवसायाभिमुख शिक्षण द्यावे याचा आग्रह धरताना दिसतात.

## ३. विवेकवाद:



आगरकर यांचे वाचन अफाट असल्याने अनेक पाश्चात्त्य तत्त्वज्ञानी अभ्यासकांचे, विचारवंतांचे लेखन त्यांनी वाचले होते. त्यांचा प्रभावही त्यांच्यावर होता. त्यापैकी हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारातील विवेकवाद व उत्क्रांतिवादाचा प्रभाव आगरकरांच्यावर अधिकतेने होता. विवेकवाद ही एक मतप्रणाली आहे. “निश्चितपणे आणि आवश्यकतेने सत्य असलेल्या गणिती ज्ञानाला विवेकवादी ज्ञानाचा आदर्श मानतात.” (रेगे, मे. पु. : ‘मराठी विश्वकोश’) विवेकवाद हा एक दृष्टिकोण आहे. हे सांगताना वऱ्हाडपांडे म्हणतात की, “आपण कशावर विश्वास ठेवतो यापेक्षा का विश्वास ठेवतो याला विवेकवादाच्या दृष्टीने जास्त महत्त्व आहे.” (वऱ्हाडपांडे : १९६३ : पृ.७) याचे स्पष्टीकरण म्हणजे- “गतीला दिशा दाखवणारे सुकाणू व प्रसंगी तिचा निरोध करणारे रोधकही आवश्यक असतात. जीवनात गतीदायी शक्तींचे काम भावना करत असल्या तरी दिशा दाखविण्याचे व प्रसंगी निरोध करण्याचे काम बुद्धि करीत असते.” (वऱ्हाडपांडे : १९६३ : पृ.८) एकूणच आपल्याला विशिष्ट सामाजिक, धार्मिक समस्याप्रधान परिस्थितीतून मार्ग काढायचा असेल तर बुद्धी आणि भावना या दोन्हीच्या आधाराने विचार करून निर्णय घ्यावे लागतात. आणि अशा आधाराने निर्णय घेणे हे विवेकवादाचे लक्षण होय.

तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक जीवन हे अनेक समस्यांनी व्याप्त होते. यात सुधारणा करायची असेल आणि संपूर्ण समाजाला प्रगतीपथावर न्यायचे असेल तर त्यांच्या ठिकाणच्या विवेकाची त्यांना जाणीव करून देणे हे काम खूप महत्त्वाचे होते. या विवेकाला संयतपणे आवाहन केले तरच त्यांच्याठायीचा विवेक जागृत होऊन ते योग्य मार्ग अवलंबतील असे त्यांचे मत होते. ही डोळसवृत्ती लोकांमध्ये आली तरच समाजातील बोकाळलेल्या अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, अज्ञान, गुलामगिरी याच्याबाबत जागृती होऊन लोक प्रगतीचा मार्ग धरतील असा विश्वास त्यांना वाटत होता. त्यामुळे याची जाणीव करून देण्यासाठी आगरकरांनी आपली लेखनी कधी मवाळ तर कधी कठोर बानविलेली दिसते. संपूर्ण समाजात अंधःकार माजला असताना कोणतातरी प्रकाशाचा एक किरण दाखवून लोकांच्या मनामध्ये सत्कार्याची जागृती निर्माण करायची, त्यांच्या विवेकाला जागृत करायचे हे त्यांच्या लेखनातून सातत्याने दिसते. ‘तरुण सुशिक्षितांस विज्ञापना’ या लेखातून स्त्री-पुरुष शिक्षण, बालविधवाविरोध हे कसे गरजेचे आहे हे लोकांच्या गळी उतरविण्यासाठी ते त्याच्या चांगल्या–वाईट बाजूची चर्चा करून लोकांमधील विवेकबुद्धीला आवाहन करताना दिसतात. अशा अनेक लेखातून त्यांनी विवेकवादाचा पुरस्कार केलेला दिसतो.

## ४. प्रथम सामाजिक सुधारणा:

आगरकरांच्या एकूणच लेखांमध्ये समाज सुधारणेचा पुरस्कार झालेला दिसतो. त्यांच्या मते राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सर्व समाज एकत्र येऊ शकतो पण तेच सामाजिक सुधारणेसाठी घराघरातून विरोध होऊ शकतो. राजकीय गुलामगिरी काही बाबतीत प्रयत्न केल्यास मिळू शकते पण सामाजिक व धार्मिक स्वरूपाची गुलामगिरी संपवणे महाकठीण आहे. त्यामुळे तिच्यामध्ये प्रथम सुधारणा होणे खूप गरजेचे व महत्त्वाचे आहे. ते समाजशास्त्राचे गाढे अभ्यासक असल्यामुळे भारतीय समाजातील गुलामगिरी, अंधश्रद्धा, स्त्रीदास्य अशा समाजप्रश्नांची चर्चा त्यांनी समाजशास्त्राच्या अनुषंगाने आपल्या लेखांतून

केली आहे. आणि म्हणूनच ते सामाजिक सुधारणाविषयक सुरुवातीस कायदा असावा याचा आग्रह धरतात. पण कायद्याच्या पुढे जाऊन लोकांमध्ये त्याविषयी जनजागृती करून त्यांचे मनपरिवर्तन करावे असाही आग्रह ते धरत होते. "कोणतीही सुधारणा करण्याविषयीं लोकांच्या मनांत दृढ इच्छा उद्भवल्याशिवाय, केवळ कायद्याच्या जुलमानें सुधारणा होऊं शकत नाहीं व ती इच्छा उद्भवली असतां कायदा करण्याची आवश्यकता राहात नाहीं, कारण मग ती लोकांचे लोकच करतात;" (आगरकर, २०१३ : पृ. १४७) अशी त्यांची धारणा होती.

त्यांनी वेदप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य नाकारले होते. कारण ते माणसाचा वर्तमान, वास्तव जरी बदलले तरी त्यातील नियम तसेच असतात. व ते नियम सर्व काळात लागू होऊ शकत नाही. आणि भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात जी गुलामगिरी दिसून येते ती धर्मनिहाय ग्रंथाधिष्ठित होती. त्यामुळे समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी पुराणातील संदर्भ शोधण्यापेक्षा समाजाला प्रखर वास्तवाची व त्यातील दुःखाची जाणीव करून देणे महत्त्वाचे ठरते. "सामाजिक घडामोडींची सुस्पष्ट कल्पना आल्यावरच लोक सुधारणेस अनुकूल होतील असा आगरकरांचा विश्वास होता." (भा. ल. भोळे : २०१२ : संपादकीय) हे आपल्याला इथे ध्यानात घ्यावे लागेल.

आगरकरांच्या लेखनातील स्वातंत्र्य या मूल्याचा अर्थ दुसऱ्यास गुलाम बनवून स्वातंत्र्य मिळविणे हा नाही. इतरांचे शोषण करणारे, गुलाम बनविणारे असे सामाजिक नियम, रूढी, परंपरा याचे पालन करणेही त्यांना अपेक्षित नाही. जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य पद्धती ही व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाच्या विरोधी असल्याने त्यांना ती मान्य नव्हती. सती, बालविवाह, केशवपन यासारख्या रूढी या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या आहेत. त्यामुळे त्याचे उच्चाटन करणे हे स्वातंत्र्याचे मूल्य जपणे आणि सामाजिक सुधारणा घडवून समाज प्रगत करणे असे दुहेरी स्वरूपाचे आहे.

एकूणच बाल-विवाह विधवांची स्थिती यांचे गंभीर परिणाम त्यांनी दाखवून दिले. विधवा स्त्रियांची समाजाकडून होत असलेली विटंबना म्हणजे हिंदू समाजाला लागलेला कलंक आहे असे त्यांचे मत होते. त्यासाठीच त्यांनी केशवपन, सतीची चाल, बालविवाह यासंबंधीच्या कायद्याचा आग्रह धरला होता. संमती विवाह, घटस्फोट, पुनर्विवाह इ. बाबत त्यांनी विचार मांडले.

### ५. 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार':

आगरकरांनी जेव्हा 'सुधारक' हे साप्ताहिक सुरू केले तेव्हा ते सुरू करण्यामागे त्यांचे 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार' हे ब्रिदवाक्य होते. आणि या तत्त्वाचे पालन त्यांनी त्यांच्या अखंड जीवनकालात केले. योग्य असेल तेच करण्याचा त्यांचा निश्चय अनेक ठिकाणी आपल्याला दिसतो. आणि म्हणूनच त्यांनी जे परिवर्तनाचे विचार मांडले ज्यात – स्त्रीच्या समंती वयासंबंधीचा किंवा इतर त्याबद्दल अनेकांकडून त्यांच्यावर टीका झाली. एवढेच नाही तरी त्यांच्या पत्नीलाही याचा त्रास सहन करावा लागला. पण त्यामुळे ते यापासून मागे हटले नाहीत. तसेच प्रथम राजकीय सुधारणा की सामाजिक या विचारद्वंद्वांत त्यांनी नेहमीच सामाजिक सुधारणा करण्याचा आग्रह धरला त्यासंबंधी कार्य ते करत राहिले.

आगरकरांचा दृष्टिकोण हा विज्ञानवादी, सुधारणावादी होता त्यामुळे ग्रंथप्रामाण्य त्यांनी नाकारले. न्या. रानडे यांनीही सामाजिक सुधारणा (स्त्री स्वातंत्र्य) संबंधी आपले विचार मांडले पण ते मांडत असताना अशा सुधारणांचा पुरस्कार याआधी आपल्या परंपरेतील कोणत्या संतांनी, महापुरुषांनी, ग्रंथांनी केला आहे याचे दाखले दिले होते. पण आगरकरांनी असे करणे टाळले. स्त्री स्वातंत्र्य ही गोष्ट बुद्धीला पटल्यानंतर तिचा पुरस्कार करण्यासाठी वेद-उपनिषदांच्या कुबड्यांची काहीच गरज नाही अशी त्यांची धारणा होती. आणि म्हणूनच कोणत्याही ग्रंथांचा आधार किंवा स्वीकार न करता त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार अनेक लोकांचा विरोध पत्करून केलेला दिसतो. (संदर्भ- ग.प्र.प्रधान, २०१३ : प्रस्तावना) 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार' या आपल्या वचनास प्रमाण माणून त्यांनी प्रत्येक सामाजिक सुधारणेत पुढाकार घेतला.

## २आ.७ गो. ग. आगरकर यांच्या लेखनातील मूल्यात्मकता

आगरकरांनी जे वैचारिक लेखन केले आहे ते विशिष्ट हेतूतून. हे हेतू समाजपरिवर्तनाचा, जनजागृतीचा होता. समाजात जी धर्मांधता, शिक्षणाचा अभाव, गुलामगिरी होती याबाबत समाजाला जागृत करण्यास्तव त्यांनी हे लेखन केलेले आहे. त्यामुळे नवी, तत्कालीन समस्या, प्रश्न निर्माण झाल्यास त्याबद्दलचे मंथन त्यांच्या लेखनातून उतरत असे. त्यामुळे त्यांच्या लेखनात सूत्रबद्धता दिसत नाही. पण त्यांच्या लेखनातून विशिष्ट अशा मूल्यांचा पुरस्कार मात्र केलेला दिसतो. त्यांच्या या लेखनस्वरूपाबाबत ग. प्र. प्रधान म्हणतात की, "वास्तवावर त्यांचें लक्ष केन्द्रित झालें होतें व वर्तमानकालाचें सत्यत्व जाणवल्यामुळें अंतिम भविष्यापेक्षा त्यांचें मन तत्कालीन प्रश्नांचाच आधि विचार करीत होतें." (ग. प्र. प्रधान : २०१३ : पृ.X) तर अशा पद्धतीने आगरकरांच्या लेखातून दिसणाऱ्या मूल्यांचा विचार आपण इथे करू.

### १. स्वातंत्र्य:

आपल्या लेखनाद्वारे समाजमनात 'स्वातंत्र्य' हे मूल्य रुजविण्याचा प्रयत्न ते करतात. स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना ते 'सुधारक काढण्याचा हेतु' या लेखात म्हणतात, "समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास, जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत, तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टीत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका घ्यावयाचा, हें अर्वाचीन पाश्चिमात्त्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे." व ते आपणही आपल्या राष्ट्रात अंगिकारले पाहिजे असे त्यांचे मत होते. इथे ते व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करतात. पण हे व्यक्तिस्वातंत्र्य त्यांना अनिर्बंध स्वरूपाचे अपेक्षित नाही. स्वातंत्र्याचा अधिकार हा स्त्री आणि पुरुष या दोघांनाही समान असल्याचे व तसे स्वातंत्र्य अभिप्रेत असल्याचे नमूद करतात. माणूस कधीही स्वखुशीने पारतंत्र्याचा स्वीकार करत नाही. तर असे पारतंत्र त्या व्यक्तीवर समाजनियम व धर्मनियम म्हणून लादले जातात जे योग्य नाही व हे समाजनियम नंतर शृंखलांच्या स्वरूपात येतात तेव्हा त्यामागे पारतंत्र्याचे संकेत दिसतात याची मांडणी आगरकर इथे करतात.

तसेच भारतीय समाज लिंगभाव, जातव्यवस्था व त्यातून येणारी उच्च-निचता यामध्ये विभागलेला दिसतो. ही गोष्ट स्त्रियांना व अ-श्रेष्ठ ठरविलेल्या जातीतील लोकांना

munotes.in

अन्यायकारक आहे. अशा अन्यायग्रस्त व्यवस्थारचितांपासून स्वातंत्र्य मिळाले पाहिजे हा विचार ते 'मूळ पाया चांगला असला पाहिजे' या लेखातून मांडतात. तर संपूर्ण भारत हा इंग्रजांच्या गुलामगिरीयुक्त धोरणामुळे पारतंत्र्यात आहे व यातून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारतीय जनतेच्या मनात जागृती निर्माण करायला हवी. त्यासाठी इंग्रज सरकारचे दुट्टपी धोरण, अन्यायकारी वागणूक जनतेसमोर मांडणे गरजेचे आहे. यासंदर्भात तत्कालीन वास्तवातील अनेक उदाहरणे देऊन आगरकर हे लोकांना पटवून देऊ पाहतात. यासंबंधीचे विचार ते 'हिंदुस्थानची तिजोरी आणि घाटत असलेला अन्याय' या लेखातून मांडतात व स्वातंत्र्य या मूल्याचा पुरस्कार ते करतात.

इथे अनेक संदर्भात स्वातंत्र्याचा आग्रह आगरकर धरताना दिसतात. माणसाला माणूस म्हणून जगता यावे यासाठी सर्वांना समान वागणूक मिळावी असे स्वातंत्र्य इथे आगरकरांना अपेक्षित आहे. या मूल्याचा पुरस्कार ते आपल्या लेखातून करताना दिसतात. व्यक्ती स्वातंत्र्य व समाजाचा विकास या गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा व विचारस्वातंत्र्याचा ते पुरस्कार करतात.

### २. समता:

आगरकरांनी ज्या पद्धतीने स्वातंत्र्याचा, व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह धरला त्याच पद्धतीने त्यांनी समतेचाही आग्रह धरलेला दिसतो. विशेषतः स्त्री-समानता हा विचार त्यांच्या अनेक लेखनाच्या मुळाशी असलेला दिसतो. विविध अंधश्रद्धा, धार्मिक-सामाजिक नियम यामुळे प्रत्येक व्यक्तीला जन्मतः मिळालेल्या समतेच्या अधिकारापासून वंचित राहावे लागते आणि हा अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. हे समाजवास्तव चिंतनीय असल्याचे आगरकर सांगतात. त्यामुळेच समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष अशा अनेक स्तरावर हे विषमतेचे रूप दिसते. तत्कालीन समाजजीवनात कुटुंबापासून समाजापर्यंत हक्क, अधिकार, वर्तणूक या सर्वच बाबतीत पुरुषांना जी मोकळीक होती त्याच्या काही अंशीही मोकळीक स्त्रियांना नसल्याचे वास्तव होते. हे वास्तव विषमता धिष्ठित होते. आणि म्हणूनच अशी हरेक प्रकारची विषमता नष्ट करण्यासाठी 'समता' या मूल्याचा पुरस्कार ते करतात. 'मूळ पाया चांगला असला पाहिजे' यासारख्या अनेक लेखातून ते समतेचा पुरस्कार करताना दिसतात.

### ३. सहिष्णुता:

भारतीय समाज हा विविध जाती, धर्म, वर्ग व्यवस्थेमध्ये विभागलेला आहे. या वर्गवारीमुळेच उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ अशी चढाओढ सुरू होऊन एकमेकांप्रती तेढ, आकस निर्माण झाला आहे आणि हे समजवास्तव आहे. या वास्तवात बदल करायचा असल्यास सहिष्णुता हे तत्त्व अंगिकारणे खूप महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन आगरकर देतात. त्यांना जशी जात-धर्म व्यवस्थेची उतरंड नको आहे तशीच लिंगभावातून स्त्री-पुरुष असा केला जाणारा अन्यायमूलक भेद नको आहे. 'सुधारक काढण्याचा हेतु' या लेखामध्ये ते या गोष्टीचे वर्णन करतात. तसेच हे वास्तव बदलण्यासाठी सहिष्णुता या तत्त्वाचा पुरस्कार करतात.

## आपली प्रगती तपासा

प्रश्नः गो. ग. आगरकर व त्यांच्या समकालीन वैचारिक लेखकांच्या लेखनाची चर्चा करा.

## २आ.८ समारोप

आगरकरांचे वैचारिक लेखन हे गंभीर स्वरूपाचे होते. भवतालाचे भान ठेवून, तिथली लोकांची मानसिकता ध्यानात घेऊन ती बदलण्यासाठी कित्येकदा तिच्या समूळ नाशासाठीची विचारभूमी आगरकरांना तयार करायची होती. त्याप्रत ते अनेक समस्या व त्यावरील उपाय अशा दोन्ही पद्धतीने कधी सौम्य भाषेत तर कधी काटेकोरपणे सांगत असत. त्यांच्या विचारांमध्ये तर्कशुद्धता होती पण ती तर्कशुद्धता व त्याचे विवरण सर्वसामान्यांनाही समजेल अशा स्वरूपाचे होते. यासाठी अनेक उदाहरणांचे साहाय्य ते लेखनीत घेत होते.

आगरकरांचा कालखंड हा सामाजिक चळवळीचा कालखंड होता. अनेक सामाजिक समस्यांना, अंधश्रद्धाना नष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष व वैचारिक स्वरूपाचे कार्य केले जात होते. यात या चळवळींना विचार देण्याचे, बळ देण्याचे व समाजात लेखनाद्वारे जागृती घडवून आणण्याचे कार्य आगरकरांसारखे अनेक विचारवंत करत होते.

आगरकरांच्या एकूणच लेखनातून एका संवेदनशील लेखकाची जाणीव वाचकाला होते. ग.प्र.प्रधान यांनी आगरकरांना 'प्रयोगनिष्ठ बुद्धिवादी' असा उल्लेख केला आहे. इथे त्यांच्या म्हणण्याची यथार्थता आगरकरांच्या लेखनातून आपल्याला सापडते. लेखाच्या आधाराने त्यांनी दांभिक समाजनियमाविरुद्ध विचारलेले प्रश्न, त्याची केलेली चर्चा, समाजविकासासाठी अपेक्षित असणारे गतितत्त्व, त्यावरील उपाय अशा त्यांच्या हरेक मांडणीत बुद्धिवाद डोकावतो. व केवळ विचार मांडून शांत बसण्यापेक्षा ते आंमलात आणण्यासाठीची कृतीची अपेक्षा ते 'स्व' पासून करतात. म्हणूनच ते 'महाराष्ट्र बालविवाहनिषेधक' मंडळीची स्थापना करण्यास सुचवून त्याचे सभासदत्व स्वतःहून स्वीकारण्यास तयार असल्याचे आपल्या लेखनीतून सुचवितात.

एकूणच आगरकरांनी तत्कालीन समाजजीवनाचे कोलमडणारे अंग वाचकांसमोर मांडले. तसेच जात-धर्म व्यवस्थेतून दबलेल्या उपेक्षित स्त्री-पुरुषांचे दुःख सर्वांसमोर मांडले. व लोकांच्या मनातील विवेकाचा दीप प्रज्ज्वलीत करून याबाबत कृती करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याचे कार्य त्यांनी आपल्या लेखनाद्वारे केलेले दिसते. त्यांच्या या एकूणच

कार्यकर्तृत्वाबद्दल ग. प्र. प्रधान यांनी त्यांचा नामगौरव ‘भारतीय लोकशाहीचे एक आद्य पुरस्कर्ते’ अशा शब्दात केला आहे.

## २आ.९ शब्दार्थ

क्षीरपथ= आकाशगंगा-milky way- (‘आमचें काय होणार?’)

आमचे दोष आम्हांस कधी दिसूं लागतील?

रसई= माशाची रसई =कालवण (पृ.११३),

पढम=मिश्रण (पृ.११४),

वृथा=वेगळा/वेगळे (पृ. ११५)

‘मूळ पाया चांगला असला पाहजे’-

गदर्भ = गाढव (पृ. १२१),

‘सुधारक काढयाचा हेतु’-

‘भाषापरिज्ञानप्रवीणांनी’ (पृ. १३०) –भाषेचे ज्ञान असणारी व्यक्ती, अभ्यासक

उदक=पाणी, श्लाघ्यतर मार्ग= थोर मार्ग

मंडन- शोभा, थाटमाट, सुशोभितपणा

शिलावस्था- ‘शिला’-दगड- दगडासारखी स्थिर अवस्था

संवरण- दूर करणे / झाकूण ठेवणे किंवा लपवून ठेवणे, कोई ऐसी चीज जिसमें कोई दुसरी चीज छिपाई जाय (भारतीय साहित्य संग्रह)

रशना- (पृ. १२९) कमी मे पहनने का एक गहना (अमरकोशातील अर्थ), कडदोरा, मेखला, कटिबंध किंवा कमरेची साखळी

‘तरुण सुशिक्षितांस विज्ञापना’- वर्तनान्तर = वर्तनात होणारा बदल

## २आ.१० सरावासाठी प्रश्न

**अ. दीर्घोत्तरी प्रश्न:**

१. 'तरुण सुशिक्षितांस विज्ञापना' व 'मूळ पाया चांगला असला पाहिजे' या लेखांचे आशय स्पष्ट करा.

२. 'इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचें घोर दारिद्र्य' या लेखाचा आशय व आगरकरांची भूमिका स्पष्ट करा.

३. आगरकरांच्या चिंतनात्मक लेखातील चिंतनात्मक विचार तुमच्या शब्दात सांगा.

४. गोपाळ गणेश आगरकर यांच्या लेखनशैलीचे विशेष नोंदवा.

munotes.in

**ब. टीपा लिहा:**

१. आगरकरांचा विवेकवाद

२. 'सुधारक काढण्याचा हेतु' -आगरकर

३. आगरकरांचे सामाजिक विचार

४. 'राष्ट्रसभा बंद ठेवता कामा नये'- आगरकर

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा:**

१. गोपाळ गणेश आगरकर हे कोणत्या वृत्तपत्राचे संपादक म्हणून कार्यरत होते?

२. गोपाळ गणेश आगरकर यांनी कोणत्या कायद्याला पाठिंबा दिला?

३. गो. ग. आगरकर यांनी जबलपूरमध्ये राष्ट्रसभेची इमारत बांधल्यानंतर त्या इमारतीस काय नाव द्यावे असे सुचविले?

४. गो. ग. आगरकर यांचा जन्म कोणत्या गावी झाला?

## २आ.११ संदर्भ ग्रंथ


१. आगरकर, गोपाळ गणेश, २०२२ : विकिपीडिया-१८ ऑक्टोबर २०२२. गोपाळ गणेश आगरकर – विकिपीडिया (wikipedia.org))

२. कुलकर्णी, तुषार, 'बीबीसी मराठा', १७ जून २०२१. गोपाळ गणेश आगरकर: जिवंतपणीच स्वतःची प्रेतयात्रा पाहावी लागलेले समाजसुधारक - BBC News मराठी

३. चौसाळकर, अशोक, २००९ : 'आगरकरांचे राजकीय विचार', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, प.आ. २००५, दु. आ. २००९.

४. प्रधान, गणेश प्रभाकर (संपा.), २०१३. : 'आगरकर लेखसंग्रह', साहित्य अकादेमी, दिल्ली, प.आ. १९६०, पुनर्मुद्रण, २०१३.

५. भोळे, भा. ल. (संपा.), २०१२. : 'एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य-खंड-२', साहित्य अकादेमी, दिल्ली, प.आ.२००६, पुनर्मुद्रण २०१२.

६. रेगे, मे. पु. : 'मराठी विश्वकोश'- विवेकवाद – मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती (marathi.gov.in)

७. लेले, गायत्री : 'आगरकर समजून घेताना' - 'द वायर' इ-नियतकालिक https://marathi.thewire.in/

८. वऱ्हाडपांडे, नी. र., २००१ : 'विवेकवाद', विजय प्रकाशन, नागपूर, प. आ. १९६३, दु. आ. २००१.


munotes.in

९. ह्युम, ए. ओ. २०२१ : विकिपीडिया-२१ मार्च २०२१. ए ओ ह्यूम - विकिपीडिया (wikipedia.org)

## २आ.१२ पूरक वाचन

१. मोरे, गिरीश, २००९ : 'मराठी निबंधः उद्गम आणि विकास', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

२. तुळपुळे, शं. गो., १९६६ : 'मराठी निबंधाची वाटचाल', विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, नागपूर.

३. फडके, य. दि., २०१८. : 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र–खंड ४था', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वि. आ. २०१८.

४. सरदार, गं. बा., १९७५ : 'आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार', पुणे.

५. अळतेकर, म. मा., १९६३ : 'मराठी निबंध', सुविचार प्रकाशन, पुणे-नागपूर.

६. फडके, य. दि., २००२ : 'आगरकर', मौज प्रकाशन, मुंबई. द्वि. आ. २००२.

*****

munotes.in

# ३अ

# १९२० ते १९४७ या कालखंडातील वैचारिक गद्याची परंपरा

**घटक रचना**

३अ.१ उद्दिष्टे

३अ.२ प्रस्तावना

३अ.३ विषय विवेचन

३अ.४ समारोप

३अ.५ सरावासाठी प्रश्न

३अ.६ संदर्भ ग्रंथ

३अ.७ पूरक वाचन

## ३अ.१ उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणांस,

१. १९२० ते १९४७ या कालखंडातील वैचारिक गद्याची पार्श्वभूमी सांगता येईल.

२. १९२० ते १९४७ या कालखंडातील वैचारिक गद्याच्या प्रेरणा व स्वरूप यांचे आकलन होईल.

३. १९२० ते १९४७ या कालखंडातील वैचारिक गद्यामधून आविष्कृत मूल्ये विशद करता येतील.

५. १९२० ते १९४७ या कालखंडातील वैचारिक गद्याची वाङ्मयीन वैशिष्ट्ये सांगता येतील.

## ३अ.२ प्रस्तावना

साहित्यनिर्मितीवर तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थितीचा परिणाम होत असतो. साहित्यामध्ये समाज जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. १९२० साली लो. टिळकांचे निधन झाले व म. गांधीं यांचा भारतीय राजकारणात उदय झाला. १९२० नंतर भारतीय स्वातंत्र्यलढा व गांधीवादाचा प्रभाव समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर मोठ्या प्रमाणात पडला. स्वातंत्र्यलढ्यामुळे समाजजीवनाबरोबरच साहित्याच्या क्षेत्रामध्येही स्वातंत्र्यभान प्रखरपणे अभिव्यक्त होत गेले. स्वातंत्र्यलढ्यातील विविध टप्पे, आंदोलने, दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्यप्राप्ती, संविधाननिर्मिती वगैरे अत्यंत महत्त्वाच्या घटना-घडामोडींनी हा सर्व कालखंड भरलेला व भारलेला होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा ही मूल्ये व मानवी अधिकार हे या काळात प्रकर्षाने पुढे आले व जगभर स्वीकारले गेले. मराठी वैचारिक गद्यामधूनही या मूल्यांची अभिव्यक्ती झालेली आढळते. याच काळात राष्ट्रवाद,

मार्क्सवाद, समाजवाद, गांधीवाद, मानवतावाद, हिंदुत्ववाद वगैरे विचारप्रणालींचा प्रभाव मराठी बुद्धिवंतांवर मोठ्या प्रमाणावर पडलेला आढळतो. या प्रभावामधून मूलगामी स्वरूपाचे वैचारिक लेखन झालेले आढळते. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक चळवळींच्यामुळे धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याचे नवे भान प्राप्त झाले व एक प्रकारे स्वातंत्र्याची संकल्पना मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगांपर्यंत विस्तारली गेली. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलित मुक्तिलढा सुरू झाला. सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ व इतर छोट्या-मोठ्या परिवर्तनवादी चळवळींनी समाजजीवन ढवळून निघाले. सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या चिकित्सेने मराठी वैचारिक गद्यामध्ये प्रबोधनपर, परिवर्तनवादी स्वरूपाचे साहित्य निर्माण झाले. या काळात मराठी जनसमूहांमध्ये व विचारविश्वामध्ये एक प्रकारे विचारकलह सुरू होता. त्यामधून मराठी समाजाचे वैचारिक भरणपोषण झाले. मराठी वैचारिक गद्याची संख्यात्मक व गुणात्मक वृद्धी झाली. मराठी गद्याचे आशयक्षेत्र विस्तारले. मराठीतील अत्यंत महत्त्वाचे राजकीय नेते, लेखक, संशोधक, पत्रकार, सुधारक वगैरे या काळामध्ये निर्माण झालेले आढळतात. स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक साहित्य व सामाजिक चळवळी यांमधून आधुनिक, पुरोगामी महाराष्ट्राची पायाभरणी झाली आहे. म्हणून १९२० ते १९४७ या काळातील मराठी गद्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

या घटकाच्या कालखंडाची १९२० ते १९४७ अशी केलेली विभागणी ही काटेकोर नसून ती अभ्यासाच्या सोयीसाठी केलेली आहे. या कालखंडातील अनेक लेखक, विचारवंत हे या कालखंडाच्या अगोदर व नंतरही लिहीत होते. प्रस्तुत कालखंडातील त्यांच्या लेखनाचा विचार या घटकामध्ये केलेला आहे.

## ३अ.३ विषय विवेचन

१९२० ते १९४७ या कालखंडातील मराठीतील महत्त्वाचे निबंधकार, लेखक व त्यांचे लेखन पुढीलप्रमाणे आहे-

**न. चिं. केळकर** (१८७२-१९४७) 'केसरी', 'मराठा', 'सह्याद्री' या नियतकालिकांचे संपादन. व्यासंग, वाचन, बहुश्रुतता, मार्मिक आणि सूक्ष्म विनोद, रसिकता, नवीन गोष्टी जाणून घेण्याची लालसा, पर्यटन आणि लेखनाची आवड यांमुळे त्यांनी वैविध्यपूर्ण लेखन केले आहे. 'दिल्लीचा बादशाही दरबारी' या निबंधामध्ये दिल्लीचा हजारो वर्षांचा इतिहास मार्मिकपणे उलगडला आहे. 'संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन' या लेखमालेमध्ये या विद्येचा गेल्या दोन-अडीच हजार वर्षांचा इतिहास त्यांनी सांगितला आहे. केळकरांच्या लेखणीला कोणताही विषय व्युत्पन्न व आकर्षक करण्याचे कसब साधले होते. 'अखेर भ्रमाचा भोपळा फुटला', 'लोकमनाने कुस्ती जिंकली', 'कलियुगातील पंधरावी विद्या', 'साम्राज्य म्हणजे शेळीचे शेपूट' या लेखांच्या शीर्षकांमधून दिसणारा उपरोध वाचकांची उत्कंठा वाढविणारा आहे.

**कृ. प्र. खाडिलकर** (१८७२-१९४८) 'केसरी', 'लोकमान्य', 'नवा काळ' या पत्रांचे संपादक हे पद त्यांनी सांभाळले. वर्तमानपत्रातील अग्रलेख स्वरूपाचे बरेचसे गद्यलेखन त्यांनी केले आहे. उपनिषदातील तत्त्वज्ञान आणि इतर धर्मविधीविषयींचे विवेचनात्मक लेखन.



munotes.in

'खाडिलकर लेखसंग्रह' या नावाने त्यांचे लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या लेखातून मुख्यतः राजकीय स्वातंत्र्याची आच, टिळकभक्ती, विभूतिपूजा व प्रतिपक्षावर टीका प्रकटते. 'गनिमी काव्याची लढाई', 'सूरतची राष्ट्रीय सभा', 'म. गांधी यांचा संदेश', 'सर्वांपुढे मुंबईच का?', 'वर्षाच्या आत पारडे फिरले', 'सुराराध्य आणि दुराराध्य' तसेच टिळकांवरील त्यांचे विविध लेख यांसारख्या लेखनातून त्यांच्या राजकीय विचारांचे दर्शन घडते. प्रचारात्मकता, प्रतिपक्षाची निंदानालस्ती, टवाळी करणारी विनोदी शैली, ग्राम्यता, असभ्यता, एकांगीपणा हे त्यांच्या लेखनाचे दोष होत. खाडिलकरांनी लोकांच्या मनातील स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा याबद्दलचा अभिमान जागृत ठेवण्याचे काम केले. नाटकातील विविध भावनांचे उद्दीपक प्रदर्शन करण्याचा गुण त्यांनी निबंधलेखनात रूढ केला, असे वि. वा. आंबेकर यांनी म्हटले आहे. (आंबेकर :१९९९ : पृ. १३३-१४२).

**वा. म. जोशी** (१८८२-१९४३) यांनी सत्य, सौजन्य व सौंदर्य हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून लेखन केले. त्यांचे 'विचारलहरी' (१९४३), 'विचारविकास' (१९२७), 'विचारविहार' (१९४४) हे लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांची तात्त्विक भूमिका 'नीतिशास्त्रप्रवेश' (१९१९) या ग्रंथातून व्यक्त होते. 'सॉक्रेटिसचे संवाद' हा त्यांचा अनुवादपर ग्रंथ आहे. त्यांनी तर्कशुद्ध, सप्रमाण, मुद्देसूद लेखन केले. विरोधी बाजूही सहानुभूतीने समजून घेतली. परमतसहिष्णुता, सहानुभूती, वैचारिक पातळीवरील सात्त्विकता, सत्यभक्ती ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये. प्रत्येक प्रश्नाचा निवाडा करण्यापेक्षा वाचकांच्या मनात प्रश्न, संशय निर्माण करून वाचकांना विचारप्रवण करणारे लेखन त्यांनी केले.

**र. धों. कर्वे** (१८८२-१९५३) यांनी 'समाजस्वास्थ्य' या नियतकालिकाचे संपादन करून संततीनियमनपर शास्त्रीय दृष्टी देणारे मूलगामी स्वरूपाचे लेखन केले. संततीनियमनासारख्या मानवी जीवनाशी थेट निगडित विषयावर सामाजिक रोषाची पर्वा न करता कर्वे यांनी व्रतस्थपणे लेखन केले. 'किर्लोस्कर खबर' (ऑगस्ट १९२५) मध्ये त्यांचा 'अमर्याद संतति' हा लेख प्रसिद्ध झाला. देशाची लोकसंख्या वाढते पण जमीन वाढत नाही. संपत्तीच्या मानाने अतिरिक्त संतती हे दारिद्र्याचे कारण आहे इत्यादी विचार या लेखात व्यक्त झाले आहेत. जुलै १९२७ च्या 'समाजस्वास्थ्य'च्या पहिल्या अंकामध्ये आपली भूमिका स्पष्ट करताना कर्वे लिहितात, "व्यक्तींच्या व समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व त्यासंबंधी उपायांची चर्चा करणे हा या मासिकाचा उद्देश आहे. ...'कामशास्त्र' या शब्दाचा दुरुपयोग झाला आहे. तरीही 'कामवासनेचा शास्त्रीय दृष्टीने विचार' अशा अर्थाने हा शब्द वापरणे आम्हांस भाग पडत आहे, याबद्दल कोणासही क्षुब्ध होण्याचे कारण नाही." या मासिकातून त्यांनी संततीनियमन, लोकसंख्येची वाढ, ब्रह्मचर्य, गर्भपात, वेश्याव्यवसाय, नग्नता, गुप्तरोग, कामशास्त्र, रतिक्रिया, अश्लीलता इ. विषयांवर लेखन प्रसिद्ध केले. 'समाजस्वास्थ्य'मधील लेखांवरून त्यांच्यावर अश्लीलतेचे खटलेही भरण्यात आले. विवाहसंस्थेविषयी त्यांनी परखड विचार मांडले. 'कामशास्त्राचा सामाजिक विचार' या लेखात ते म्हणतात, 'ज्या समागमाने एकापासून दुसऱ्यास कोणताही रोग लागतो तो अनीतीचा समजला पाहिजे. त्याचप्रमाणे ज्या समागमापासून समाजास अनिष्ट अशी संतती उत्पन्न होते, तोही अनीतीचाच समजला पाहिजे. हे दोन्ही नियम इतरांप्रमाणेच पतिपत्नीच्या समागमालाही तितक्याच जोराने लागतात. हे विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहे." कामस्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याच्या मुळाशी कर्वे यांची व्यक्तिस्वातंत्र्यवादी भूमिका होती. १९२३ साली त्यांचे 'संततिनियमन, विचार व आचार' हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

त्यांच्या मांडणीमध्ये परस्परविरोध, आत्यंतिक व्यक्तिवाद वगैरे आढळत असला तरी त्या काळात संततीनियमन आणि लैंगिक शिक्षण या बाबतीत निर्भयपणे आणि एकाकीपणे कार्य करणारे ते एकटेच होते. लैंगिक विषयासंदर्भात लज्जा, संकोच व दडपणुकीची नीती असलेल्या समाजात कर्वे यांनी कामविषयक शास्त्रीय लेखन करून मराठी वैचारिक साहित्यात फारच मौलिक भर घातली आहे.

**वि. दा. सावरकर** (१८८३-१९६६) विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील मराठीतील एक महत्त्वाचे निबंधकार व साहित्यिक. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाने त्यांच्या लेखनात स्वातंत्र्यलालसा व ओज पदोपदी प्रकटते. 'हिंदुत्व', 'हिंदूराष्ट्रदर्शन', 'हिंदूपतपादशाही', 'लंडनची बातमीपत्रे', 'मला काय त्याचे', 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर', 'जात्युच्छेदक निबंध', 'सहा सोनेरी पाने', 'क्ष किरणे', 'हिंदुत्वाचे प्रंचप्राण', 'भाषाशुद्धी नि लिपीशुद्धि', 'रणशिंग', 'जोसेफ मॅझिनी' यांसारखे त्यांचे लेखन पाच भागांमधून प्रसिद्ध झाले आहे. "यांतील बहुतेक सर्व प्रतिपादन स्वातंत्र्यनिष्ठा, विज्ञाननिष्ठा व हिंदुत्वनिष्ठा यांवर अधिष्ठित आहे. इतिहासाचे सूक्ष्म अध्ययन, वर्तमानाचे मर्मग्राही अवलोकन व कालभेदक चिंतन यांचे पाठबळ त्यास असल्यामुळे ते कमालीचे आवेशयुक्त, आक्रमक व ओजस्वी झाले आहे; आणि ते तन्मयमूलक, वक्तृत्वगुणसंपन्न व नाट्यात्म असल्यामुळे पराकोटीचे प्रभावी, भावनोत्तेजक व विचारस्फोटक झाले आहे." (खांडेकर :१९८० : पृ. २१६) असे वि. स. खांडेकर यांनी सावरकरांच्या लेखनाचे विशेष नमूद केले आहेत.

'राजकारण हे परमेश्वरी कर्तव्य' या निबंधामध्ये मॅझिनीच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे विवेचन करीत, 'स्वातंत्र्य संपादन करणे व संरक्षण करणे हे आद्य परमेश्वरप्रणित कर्तव्य होय', 'दास्यमुक्तता, राष्टैक्य, समता-लोकसत्ता हे तत्त्वचतुष्ट्य राष्ट्रोत्कर्षकारक आहे' असा पुकारा त्यांनी केला आहे. इंग्रजी सत्ता व इंग्रजी गुलामगिरीचा त्यांनी प्रखर विरोध केला. त्याचप्रमाणे कालबाह्य अनिष्ट रूढीपरंपरा, कर्मकांडे यांचा धिक्कार केला. 'मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव' या निबंधामध्ये त्यांनी विश्वरचनेचे नियम मानवाने समजून घेऊन त्यांचा मनुष्यजातीच्या हितासाठी व सुखासाठी उपयोग करावा, असे मत मांडले आहे. 'मनुष्यजातीच्या सुखाला अनुकूल ते चांगले, प्रतिकूल तें वाईट, अशी नीति-अनीतीची स्पष्ट मानवी व्याख्या केली पाहिजे.' (सावरकर : १९५० : पृ.१६-२७) अशी बुद्धिवादी, व्यक्तिवादी भूमिका त्यांनी घेतली आहे. 'दोन शब्दात दोन संस्कृती' या निबंधामध्ये त्यांनी युरोपच्या प्रगतीचे रहस्य त्यांच्या 'अपटूडेट' म्हणजे 'अद्ययावत' संस्कृतीत असल्याचे सांगितले आहे. तसेच 'श्रुतिस्मृतीपुराणोक्त प्रामाण्यवादा'त हिंदूंच्या मागासलेपणाचे मूळ असल्याचे अधोरेखित केले आहे. सावरकरांनी पोथीनिष्ठेपेक्षा विज्ञाननिष्ठेला महत्त्व दिले. 'यंत्र' या निबंधामध्ये औद्योगिकीकरणाच्या जोरावर युरोप कसे प्रबळ झाले, भारतीयांचे देवभोळेपण न सुटल्यामुळे आपण दुबळे कसे झालो, आपल्याला यंत्रयुगात मानाने जगायचे असेल तर धर्मशास्त्रातील 'मंत्रबळ' ठोकरून युरोपियन 'यंत्रबळ' अवगत केले पाहिजे, असा विज्ञाननिष्ठ विचार मांडला आहे. यंत्र हा विज्ञानाने माणसाला दिलेला वर आहे. यंत्रामुळे बेकारी वाढत नाही तर संपत्तीच्या विषम वाटपामुळे वाढते, असा यंत्रयुगाचा पुरस्कार 'यंत्राने का बेकारी वाढते' या निबंधामध्ये त्यांनी केला आहे. निषेध, जातिबहिष्कृत होण्याच्या भीतीमुळे पराक्रमाचा झालेला संकोच हा 'हिंदुराष्ट्राच्या अपकर्षाचे मूळ' असल्याचे त्यांनी म्हटले आहे. जातिभेद मोडण्यासाठी 'वेदोक्तबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदी, व्यवसायबंदी, बेटीबंदी' या सात 'स्वदेशी बेड्या' तोडण्याचा पुरोगामी विचार त्यांनी मांडला



munotes.in

आहे. 'गाय-एक पशू, देवता तर नव्हेच नव्हे' या निबंधामध्ये गाय हा एक उपयुक्त पशू आहे, अशी शास्त्रीय भूमिका ते घेतात. 'रणशिंग' या निबंधसंग्रहामधून त्यांची इतिहासविषयक भूमिका व्यक्त होते. भाषाशुद्धीविषयक त्यांचे लेखन अत्यंत महत्त्वपूर्ण असून परकीय शब्दांना त्यांनी दिलेल्या मराठी पर्यायांपैकी काही शब्द आज रुळलेले आहेत.

**श्री. म. माटे** (१८८६-१९५७) १९२० नंतरच्या निबंधकारांमध्ये शैलीकार निबंधलेखक म्हणून श्री. म. माटे ओळखले जातात. 'अस्पृश्यांचा प्रश्न' (१९३३), 'विचारमंथन', 'विचारशलाका' (१९५०), 'विवेकमंडण' (१९५६), 'विचारगुंफा' (१९५५), 'साहित्यधारा' या निबंधसंग्रहांमधून आणि 'विज्ञानबोधाची प्रस्तावना'मधून माटे यांच्या विचारदृष्टीचे दर्शन घडते. सामाजिक, वैज्ञानिक, वाङ्मय व भाषाविषयक, तात्त्विक, व्यक्तिविषयक असे अनेक विषयांवर त्यांनी शैलीदार लेखन केले आहे. जीवनाविषयी, समाजाविषयी असणाऱ्या आस्थेतून त्यांनी चिकित्सापूर्वक, विचारप्रवर्तक लेखन केले. लघुनिबंधापासून चिंतनशील तात्त्विक निबंधांपर्यंत सर्वप्रकारचे निबंधप्रकार माट्यांनी हाताळले. एका बुद्धिवादी, भौतिकवादी, समाजहितचिंतकाने निर्भयपणे मांडलेले प्रवृत्तीपर चिंतन असे त्यांच्या निबंधाचे स्वरूप आहे.

इंग्रजांच्या संपर्काने भौतिकशास्त्रांनी निर्माण करून ठेवलेल्या सुखसोयींचा आपण फक्त उपभोग घेत असतो, परंतु त्यामागील वैज्ञानिक तत्त्व व शास्त्रीयदृष्टी आपण आत्मसात करीत नाही, याची खंत माटे यांना होती. 'शास्त्रज्ञानाचा खुराक' मनापर्यंत पोचवून 'घरचे वारेच बदलले पाहिजेत' या प्रेरणेतून माट्यांनी १९३४-३५ साली चार खंडांमध्ये 'विज्ञान बोध' हा आठशे पृष्ठांचा कोशरूप ग्रंथ अभ्यासकांच्या मदतीने सिद्ध केला. यातील दोनशे पृष्ठांच्या 'प्रस्तावना खंडा' मध्ये त्यांनी पारंपरिक अध्यात्म किंवा ब्रह्मज्ञान यापेक्षा विज्ञानाची महती किती व का आहे, याचे उद्बोधक विवेचन केले आहे. वेदांत्याचे ब्रह्मज्ञान व पाश्चात्त्यांचे शास्त्रीय संशोधन यांची तौलनिक अभ्यासपूर्ण चिकित्सा माट्यांनी केली आहे. भौतिकशास्त्रांची महत्ता अधोरेखित करून ते म्हणतात, "सृष्टिव्यापाराची कारणे शोधणारी ही ज्ञाने आपल्याला सुखसोयींच्या रूपाने आज मिळत आहेत. पण या ज्ञानाचे जिवंत झरे आपल्याच भूमीत उत्पन्न व्हावयास हवेत.' शास्त्रीय शोधामुळे वस्त्रप्रावरणे व खाद्यपदार्थ यांची सुबत्ता, प्रवासाची जलद साधने, रोगनिवारक औषधे वगैरे उपलब्ध झाल्यामुळे मानवी जीवन कसे सुखसोयींनी युक्त झाले आहे, याचे तपशीलवार वर्णन करून आपल्या प्रपंचाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलण्याची गरज माटे व्यक्त करतात. ते लिहितात, 'हे सगळे मायाजाल आहे. ही बायकापोरं आपली कोणी नव्हेत. प्राण्या, मायेचा लोंढा येत आहे, त्याबरोबर वाहून जाशील' अशा प्रकारच्या उद्गारांनी आमची मने कमकुवत बनली आहेत. 'संसार खोटा आहे' हे ब्रह्मवेत्त्यांचे पालुपद यापुढे आपण मानता कामा नये. 'आम्हाला जरा संसाराकडे आपलेपणाच्या भावनेने पाहू द्या.' 'आपण म्हणजे पुरुषाच्या गळ्यातील धोंड' ही स्त्रीच्या मनाला लागणारी रूखरूख अतःपर नष्ट होऊ द्या व मनमोकळेपणाने संसारातील रस चाखू द्या' अशा शब्दांत माट्यांनी इहवादाचा, भौतिकवादाचा जोरदार पुरस्कार केला आहे. शास्त्रज्ञानाची महती सांगताना ब्रह्म, आत्मा, परलोक, ब्रह्मवेत्ते यांची परखड चिकित्सा माट्यांनी केली आहे. ब्रह्मविदांना ब्रह्मज्ञान झाले आहे, अशी समजूत करून घेणे ही आत्मवंचना होय. हे जग हजारो वर्षांपूर्वी निर्माण झाले असून विकसित होत आहे. त्याचा कोणी कर्ता मानण्याचे कारण नाही. ईश्वर मूळचा आहे, हे मानण्याऐवजी हे जग मूळचे आहे, असे मानावे. इतक्या स्पष्ट शब्दांत त्यांनी भौतिकवादाचे प्रतिपादन केले आहे.

संतसाहित्यातील षड्रिपू व अध्यात्मविचारांची चिकित्सा करून पार्थिव (भौतिक) नियमांचे पालन हाच धर्म असे त्यांनी ठामपणे म्हटले आहे. 'शुद्ध अनुभवांनी व तर्कांनी ज्या धर्मसमजुती उद्ध्वस्त केल्या, त्या टाकावयास माणसांनी उद्युक्त झाले पाहिजे. कारण स्वतःस परिपूर्ण समजणे ही धर्मशास्त्राची मुळातच चूक आहे. 'धर्मकल्पनांचे युग' संपून युरोपात 'विज्ञानयुग' सुरू झाले आहे. आम्हीदेखील ब्रह्ममायेची आणि जडसूक्ष्माची किल्मिषे झाडून टाकावयास हवीत. वैराग्याची झापड आणि इहलोकीच्या जिण्याबद्दलची उदासीनता ही फेकूनच द्यायला हवीत. आपण भौतिकशास्त्रांचा अभ्यास करून स्वतःचे जीवन अंतर्बाह्य सुधारण्याच्या उद्योगाला लागले पाहिजे', असा विज्ञाननिष्ठ जीवनसरणीचा आग्रह माट्यांनी धरला आहे.

विज्ञान हाच आजचा धर्म होय, असे माटे निक्षून सांगतात. साक्षात्काराने किंवा ब्रह्मज्ञानाने विश्वाचा प्रश्न सुटत नाही. अनुभवातून निघणारी सामाजिक ज्ञाने हाच आजचा धर्म होय. संशोधक हा ब्रह्मज्ञच होय. तो अज्ञात क्षेत्रातील ज्ञान हस्तगत करतो. त्याच्या ज्ञानाचा, संशोधनाचा फायदा सर्वांना मिळतो. ज्ञानाचे चांगले वा वाईटपण त्याचा उपयोग करणाऱ्यांवर अवलंबून असते. शास्त्रशोध मानवजातीला उपकारक ठरले आहेत. म्हणून आधुनिक शास्त्रांचे स्वागत करून त्यांच्या प्रकाशात समाजाची नवी धारणा करणारा 'नवा धर्म' हवा, अशी भूमिका 'विज्ञानबोधाची प्रस्तावने'मध्ये माटे यांनी मांडली आहे.

माटे यांचा विज्ञाननिष्ठ, बुद्धिवादी दृष्टिकोण त्यांच्या इतर वैचारिक लेखांमधूनही प्रतिबिंबित होतो. 'भाव व श्रद्धा यांच्या बळावर गूढस्थ आत्म्याचे वा ब्रह्माचे सामर्थ्य कसे कळणार? हे गूढ पुढील युगातील मानव बुद्धिबळानेच सोडवील' असा आशावाद त्यांनी 'विचारशलाका'तील लेखात व्यक्त केला आहे. साक्षात्कार, गुरुबाजी यांच्या नादी न लागता माणसाने सरळ 'प्रयोगशाळेला शरण जावे' असा ते सल्ला देतात. 'ही भगवद्गीता अपुरी आहे' कारण अर्जुनाने व्यक्त केलेल्या वर्णसंकरामुळे होणाऱ्या समाजनाशाच्या भीतीवर कृष्णाने उपाय सांगितलेला नाही. अशी धक्का देणारी धर्ममीमांसा ते करतात. 'जातीच्या हरळीचे मूळ' व 'पालीच्या खंडोबा, गोंधळाला या' हे दोन लेख त्यांच्या समाजशास्त्रीय अभ्यासाची साक्ष देतात. 'संधिसमानत्वाचे तत्त्व पाळून वागल्यास जाती कमी होतील आणि हिंदू समाजात ऐक्य भाव वृद्धिंगत होत जाईल' असा विश्वासही ते व्यक्त करतात. 'भांबावलेला समाज' या निबंधामध्ये 'सांपत्तिक अस्वास्थ, वृत्तिछेद, योग्य त्या शिक्षणाची दिरंगाई, संरक्षणाचा डळमळीतपणा, शिक्षणाचा तुटपुंजेपणा ही सर्व कारणे खर्ची पडून एखादी भलतीसलती क्रांति या देशात होईल की काय असा धाक वाटतो' असे ते म्हणतात. 'गिरिजन आणि परिजन' या निबंधामध्ये दलितोद्धाराची हाक ते देतात. 'घोषणांचा जाच'मध्ये समता, लोकशाही संवर्धनासाठी सामाजिक जाणिवांच्या मनाची सार्वत्रिक मशागत करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. जगभरातील धर्मपंथांनी 'बायकांचा दुःस्वास' कसा केला, आहे, याचे अभ्यासपूर्ण विवेचन त्यांनी केले आहे. बलात्कारित स्त्रियांसंबंधी लिहिताना ते कळवळ्याने म्हणतात, "आज भाकरीला मोल आले आहे. जीविताला किंवा अब्रूला नाही." 'गंडे-दोऱ्यांचे चेटूक'मध्ये अंधश्रद्धांचा खरपूस समाचार घेतला आहे. भाषेमध्ये शब्द कसे रूढ होतात, याचे समाजभाषावैज्ञानिक अंगाने स्पष्टीकरण करणारा 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी' हा त्यांचा महत्त्वपूर्ण निबंध आहे.

माटे यांच्या निबंधांमधून विवेकनिष्ठ प्रपंचविज्ञान प्रकटते. त्यांच्या निबंधात आत्मप्रत्यय, अभ्यास, विज्ञाननिष्ठा, वैचारिक सुस्पष्टता, ठाशीवपणा, सुहृदयता या गुणांचे वैपुल्य आढळते. प्रांजळ, बहुविध, ठसठशीत भाषा आणि रेखीव, टोकदार निवेदनशैली हे त्यांचे विशेष. वि. स. खांडेकर म्हणतात त्याप्रमाणे, "चिंतनशीलता, समतोल वृद्धी, सत्यान्वेषाची इच्छा आणि डौलदार शैली यांची जोड विविध विषयांना मिळाल्यामुळे... अव्वल दर्जाचे निबंधकार म्हणून त्यांचा उल्लेख केला पाहिजे." (जोग : २००२ : पृ.२७८)

**द. के. केळकर** (१८९५-१९६९) हे भौतिकवादी व विज्ञाननिष्ठ वैचारिक लेखन करणारे विचारवंत होत. वाङ्मयीन व सामाजिक विषयांवर लेखन करणारे ते व्यासंगी व बहुप्रसू लेखक होत. 'वादळी वारे' (१९४०), 'संस्कृतीसंगम' (१९४१), 'विचारतरंग' (१९५२), 'उद्याची संस्कृती' (१९५३), 'संस्कृती आणि विज्ञान' (१९५८) या त्यांच्या वैचारिक लेखनांमधून त्यांचा विविध विषयांचा अभ्यास, मूलगामी चिंतन व मनोवेधक विवेचन यांचे दर्शन घडते. अनेक सामाजिक प्रश्नांसंबंधी विचारांची वादळे निर्माण करणाऱ्या मतमतांतरांचे सयुक्तिक परीक्षण करणारा 'वादळवारे' (१९४०) लेखसंग्रह वाचकाला धर्म, नीती आणि विज्ञान यांसंबंधी नव्याने विचार करायला लावतो. यांमधील 'धर्म विचारांच्या नव्या लाटा', 'समाजशास्त्रांतील जुना-नवा दृष्टिकोण', 'स्त्री-पुरुष समता आणि अनुवंशशास्त्राचे बुजगावणे' आदी लेख अभ्यासनीय आहेत. 'शास्त्राने शृंगारलेला समाजसंसार' हा लेख भौतिकशास्त्राची महती पटवितो. 'चंचल नीतिमत्तेतील अचल घटक' या लेखामध्ये, भौतिकज्ञानाशी नैतिकतेचा संगम होण्यावरच माणसाचे खरे सुख व समाधान अवलंबून आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. प्राचीन काळात धर्माने काही महत्त्वाचे सांस्कृतिक कार्य केले असले तरी वैराग्यवाद, दुःखवाद, जगन्मिथ्यावाद, दैववाद इत्यादी धर्मप्रचलित वादांच्या प्राबल्यामुळे आपल्यातल्या प्रतिकार वृत्तीचे कसे खच्चीकरण झाले, याचे साधार विवेचन 'धर्माची रेशमी काढणी' या निबंधात येते. प्रारब्धवाद, पुराणप्रियता, अल्पसंतुष्टता इत्यादी मारक शक्तींमुळे विचारस्वातंत्र्याची गळचेपी होऊन आपण कसे दुर्बल झालो, याचे दर्शन 'विचारदौर्बल्याचे शेवाळे' या निबंधात घडते. ऱ्हासाची मीमांसा करण्याबरोबरच 'विज्ञानाची उपासना' करून पुढे जाण्याचा मार्गही केळकरांनी दाखविला आहे. "आता बदलत्या काळानुरूप विज्ञानवृद्धीला अनुसरून इहलोकही आनंदमय करण्यास झटले पाहिजें" असे ते म्हणतात.

पाश्चात्त्य आणि पौर्वात्य संस्कृतींची तुलनात्मक चिकित्सा 'संस्कृती संगम' (१९४१) या ग्रंथामध्ये येते. पाश्चात्त्य संस्कृती ही भौतिकशास्त्रप्रधान असून तिने सगळीकडेच जुन्या धर्मप्रधान संस्कृतीला पराभूत केले आहे. पाश्चात्त्य व भारतीय संस्कृतीच्या संगमाने जागतिक संस्कृतीमध्ये नवी भर पडेल अशी सांस्कृतिक समन्वयाची भूमिका त्यांनी घेतली आहे. तौलनिक साम्यवादाच्या प्रयोगामुळे संस्कृतीविकसनाचा नवा टप्पा कसा असेल, यावर 'उदयाची संस्कृती' (१९५३) मध्ये भाष्य येते. विज्ञानवृद्धीमुळे मानवाच्या विचारसरणीवर व राहणीमानावर झालेल्या परिणामांचे अवलोकन करून विवेकपूर्वक विज्ञानोपासना करणे हितकारक कसे आहे, याचे विवेचन 'संस्कृती आणि विज्ञान' (१९५८) मध्ये येते. केळकरांच्या लेखनात जीवनाभिमुखता, विज्ञाननिष्ठा, विवेचकता यांचे दर्शन घडते. विषयविवेचन उद्बोधक, रंजक होण्यासाठी शास्त्रीय तात्त्विक विचार सोप्या पण सौष्ठवयुक्त भाषेत मोहक शैलीने सजवून व समजावून सांगण्याची त्यांची हातोटीही दिसून

येते. परिणतप्रज्ञ विवेकबुद्धी, समतोल विचारसरणी, प्रतिपाद्य विषयांची समर्पक, सुसूत्र मांडणी व मनोरम भाषाशैली हे केळकरांच्या भाषाशैलीचे ठळक विशेष होत.

**विनोबा भावे** (१८९५-१९८२) गांधीवादी विचारांचा विकास करून सर्वोदय विचारात त्याचे रूपांतर करणाऱ्या विनोबा भावे यांची चाळीसहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांतील अनेक पुस्तके अध्यात्मपर आहेत. 'मधुकर' (१९३६) हा विनोबांचा पहिला निबंधसंग्रह. लहानसहान गोष्टी सांगत आपला विचार पटवून देण्याची विनोबांची पद्धत मोठी परिणामकारक आहे. त्यामुळे अगदी सहज तत्त्वदर्शन घडते. त्यांच्या लेखनात कोठेही विस्कळीतपणा व पाल्हाळ नाही. सूत्ररूप व अर्थगर्भ, छोटी छोटी वाक्ये, साधे, सोपे, मोजके शब्द असे त्यांचे लेखन आहे. "मत म्हणजे स्वतंत्र मनाचे म्हणणे... आपले मत मांडावे, दुसऱ्याचे खंडन करण्याचा मोह टाळावा... दुसऱ्याचे मत खोडून काढणे निराळे आणि दुसऱ्यालाच खोडून काढणे निराळे..." यांसारख्या सुबोध व प्रासादिक भाषेत त्यांचे मौलिक तत्त्वचिंतन प्रकटते. प्रचंड व्यासंग, सखोल विचारांची पारदर्शकता, तत्त्वदर्शी बुद्धिमत्ता आणि स्वतंत्र वैचारिकतेचा प्रत्यय विनोबांच्या लेखनातून येतो. 'गीताप्रवचने' (१९३२), 'जीवनदृष्टी' (१९४६), 'क्रांतदर्शन' (१९४१), 'स्थितप्रज्ञदर्शन' (१९४५), 'सिंहावलोकन' (१९५३), 'सर्वोदय विचार' (१९५३) हे त्यांचे काही प्रकाशित ग्रंथ आहेत. वैदिक तत्त्वज्ञान आणि भारतीय संतांच्या विचारप्रवाहात नवमानवतावादी गांधीवादी-सर्वोदय विचारांची मांडणी विनोबांनी केली आहे. 'क्रांतदर्शन' (१९४१) या लेखसंग्रहातील हिंसेकडून अहिंसेकडे, सर्वधर्मभाव, ग्रामसेवा आणि ग्रामधर्म, श्रमजीविका, अहिंसेचा सिद्धांत आणि व्यवहार, सत्ता आणि सेवा इत्यादी शीर्षकांवरून त्यांच्या गांधीवादी विचारांची प्रचिती येते. 'चिंतनाकडून प्रयोग व प्रयोगातून चिंतन अशी माझी जीवनाची घडण बनली आहे. तिलाच मी निदिध्यास म्हणतो. त्या निदिध्यासातून विचार स्फुरत असतात." अशा शब्दांत विनोबांनी आपली विचारयात्रा उलगडली आहे.

**साने गुरुजी** (१८९९-१९५०) समाजवाद आणि गांधीवाद यांचा संमिश्र प्रभाव असलेले मराठीतील एक संवेदनशील साहित्यिक. मराठीतील 'पहिला सत्याग्रही-साहित्य निर्माता' या शब्दांत आचार्य भागवतांनी त्यांचा गौरव केला आहे. 'भारतीय संस्कृती' (१९३७) या ग्रंथामध्ये भारतीय संस्कृतीतील चिरंतन तत्त्वांचा आणि आदर्शांचा परिचय रसाळ आणि सुबोध भाषेत त्यांनी करून दिलेला आहे. त्यातील एक एक प्रकरण म्हणजे छोटासा निबंधच. अद्वैत, बुद्धीचा महिमा, ऋषी, वर्णन, कर्म, भक्ती, ज्ञान, संयम, चार पुरुषार्थ, आश्रम, स्त्रीस्वरूप, अहिंसा इत्यादी तेवीस प्रकरणांमधून व थोरामोठ्यांच्या अवतरणांमधून भारतीय संस्कृतीचे सारतत्त्व गुरुजींनी विशद केले आहे. याशिवाय त्यांचे निरनिराळ्या विषयांवरील 'गोडनिबंध'ही प्रसिद्ध आहेत. गुरुजींच्या लेखनामध्ये एक जीवनदृष्टी आहे. भा. ल. भोळे यांच्या मते, 'साधी, छोटी व सुटसुटीत वाक्यरचना, अंतःकरणाच्या ओलाव्याने ओथंबलेली भाषा, तिची काळजाचा ठाव घेणारी लय आणि घरगुती वळण, सहजस्फूर्त संवादशैली, स्पष्ट नैतिक भूमिका आणि अतुलनीय उत्कटता ही साने गुरुजींच्या गद्यलेखनाची वैशिष्ट्ये आहेत.' (भोळे (संपा.), २०१० : पृ.२२).

**द. बा. उर्फ काका कालेलकर** (१८८५-१९८१) हे गांधीवादी विचारांचे चिंतनशील लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. भरपूर प्रवास केलेल्या कालेलकरांच्या सौंदर्यलक्षी दृष्टीने जे टिपले, ते प्रचारकी वृत्तीने त्यांनी काव्यात्म शब्दांत व्यक्त केले. त्यामुळे त्यांची प्रवासवर्णने व

वाङ्मयसमीक्षा वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. 'जीवनातील आनंद' या ग्रंथामधील 'निसर्गाचे हास्य', 'निवृत्तीतील निरीक्षण' व 'अनंताचा विस्तार' या तीन भागांतील निबंधांमधून त्यांच्या सुंदर विचारांची व भाषेची अभिव्यक्ती होते. 'हिंडलग्याचा प्रसाद' (१९३४) या तुरुंगातील दैनंदिनीपर पुस्तकात सत्य, दया, सहिष्णुता, इंद्रियनिग्रह व उच्च तात्त्विक जीवनमूल्याचा विचार व्यक्त झाला आहे. 'जिवंत व्रतोत्सव', 'जीवनविहार', 'जीवन आणि समाज', 'समाज आणि समाजसेवा' इत्यादी पुस्तकांमधून कालेलकरांची निकोप, व्यापक सामाजिक दृष्टी प्रकटते. 'नवभारत', 'लोकशिक्षण' इत्यादी मासिकांमध्येही त्यांनी विविध विषयांवर लेखन केले आहे.

**दादा धर्माधिकारी** (१८९९-१९८५) गांधीवादाचे भाष्यकार म्हणून प्रसिद्ध. 'सर्वोदयदर्शन' (१९५७) हा त्यांचा महत्त्वपूर्ण ग्रंथ. यामध्ये सर्वोदयवादाची तात्त्विक मांडणी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. 'अहिंसेची साधना' (१९४५), 'पाकिस्तानी वृत्तीचा प्रतिकार' (१९४८) या पुस्तकांमधून जमातवाद, धार्मिक कलह, अहिंदू आणि गोवधबंदी, हिंदुत्ववाद की शबल राष्ट्रवाद आदी विषय येतात. 'क्रांतिनिष्ठा' (१९४८) हा राजकारण, स्त्रीशिक्षण इत्यादी क्षेत्रांतील आमूलाग्र मांडणी करणारा लेखसंग्रह आहे. विविध विषयांचा व्यासंग, स्वतंत्र विचारदृष्टी, सत्यान्वेषणवृत्ती व विचारांची शास्त्रीय बैठक यांमुळे त्यांचे विचार वाचकांची पकड घेतात. युक्तिवाद, तर्कनिष्ठा, कोटिचातुर्य, वक्तृत्वाचा व बाह्यशैलीचा डौल त्यांच्या लेखनात आढळतो.

**आचार्य स. ज. भागवत** १९०३-१९७३) यांची 'चौफुला' (१९४४), 'जीवन शिक्षण' (१९४५) ही पुस्तके प्रसिद्ध. तसेच 'अचार्य भागवत संकलित वाङ्मय, खंड १ व २' या ग्रंथात त्यांचे लेखन प्रसिद्ध. यांच्या पहिल्या खंडाचे चार भाग असून पहिल्या भागात त्यांच्या वैचारिक भूमिकेवर प्रकाश टाकणारे चौदा लेख आहेत. दुसऱ्या भागात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनासंबंधीचे स्पष्ट आणि परंपरावाद्यांना अप्रिय वाटतील असे परखड विचारांचे लेख आहेत. 'नव्या महाराष्ट्राची जीवननिष्ठा', 'धर्मविचारात क्रांतीची घोषणा', 'सांस्कृतिक अहंकार हा महाराष्ट्राचा शाप' हे त्यांपैकी काही. चौथ्या भागात गांधीविचाराचे मूलग्राही विश्लेषण केले आहे. सामाजिक व आर्थिक विषमतेचे निर्मूलन झाल्याशिवाय शिक्षण फलदायी होणार नाही, असा समाजशास्त्रीय विचार ते मांडतात. भारतीय संस्कृतीच्या आध्यात्मिक आशयाचा गांधीवादी विचारांशी समन्वय साधत त्याला कालानुरूप नवे परिमाण प्राप्त करून देण्याचा प्रयत्न आचार्य भागवतांनी केला आहे. औपनिषिदिक काळापासून आजच्या काळापर्यंतचा वैचारिक आलेख त्यांनी काढला आहे. श्रद्धा, तर्क, बुद्धिवाद हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. "भागवतांची शैली प्रौढ नि पंडिती वळणाकडे झुकणारी असली तरी ती विद्वजड नि नीरस कधीच होत नाही." (शेणोलीकर : १९८८ : पृ. १३१)

**आचार्य शं. द. जावडेकर** (१८९४-१९५५) 'गांधीवादाचे राजकीय भाष्यकार' म्हणून ओळखले जाणाऱ्या आचार्य शं. द. जावडेकर यांचा 'आधुनिक भारत' (१९३८) हा मराठीतील एक महत्त्वाचा वैचारिक ग्रंथ आहे. आचार्य जावडेकर हे १९२० नंतर उदयास आलेल्या विचारवंतांपैकी मूलगामी दृष्टीने, सखोल, अभ्यासपूर्ण, चिंतनात्मक, विश्लेषणपर, तात्त्विक मांडणी करणारे मराठीतील महत्त्वाचे विचारवंत आहेत. 'आधुनिक राज्यमीमांसा' (१९४०), 'राज्यनीतिशास्त्र परिचय' (१९२५), 'लोकशाही' (१९४०), 'शास्त्रीय

समाजवाद' (१९४३), 'लो. टिळक व म. गांधी' (१९४६), 'समाजवाद व सर्वोदय' (१९५७) यांसारखे अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले. तसेच त्यांचे शेकडो लेख वृत्तपत्रांमधून व नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाले. गांधीवादाचे शास्त्रीय स्वरूप त्यांनी मांडले. त्यांचा दृष्टिकोण समन्वयवादी होता. 'आधुनिक भारत'मध्ये त्यांनी पारतंत्र्यापासून स्वातंत्र्यापर्यंतचा इतिहास व त्यामागील तात्त्विक भूमिकांची मांडणी केली आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये जावडेकर लिहितात, "आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये राजाराम मोहन रॉयपासून म. गांधी-नेहरू यांच्यापर्यंत ज्या कोणी भाग घेतला, त्यांच्या प्रयत्नामागे ऐतिहासिक क्रमानुसार व्यक्तिवाद, राष्ट्रवाद व समाजवाद ही तत्त्वज्ञाने उभी होती. व्यक्तिवादी तत्त्वज्ञानातून सर्वांगीण सुधारणापंथ आणि प्रागतिक (नेमस्त) राजकीय पक्ष यांचा उदय झाला. राष्ट्रवादी तत्त्वज्ञानातून आध्यात्मिक राष्ट्रीय भावना व जहाल राजकारण तसेच निःशस्त्र क्रांतिकारक व सशस्त्र क्रांतिकारक राजकीय पक्ष उदयास आले आणि समाजवादी तत्त्वज्ञानातून समाजवादी क्रांतिकारक दृष्टिकोण व भारतीय कम्युनिस्ट पक्ष; तसाच लोकशाही समाजवादी पक्ष ह्यांचा जन्म झाला... वरील तीनही सामाजिक तत्त्वज्ञाने आधुनिक युरोपातून भारतात आली आहेत. त्यामुळे युरोपियन संस्कृतीचे अनुकरण करण्याच्या वृत्तीचे संस्कार त्यावर झाले आहेत. त्यापेक्षा म. गांधींच्या प्रयत्नाने जो चौथा दृष्टिकोण भारतात निर्माण झाला आहे, तो सत्याग्रह व सर्वोदयवाद या नावाने जगभर ओळखला जात आहे." हा दृष्टिकोण भारताच्या प्राचीन परंपरेशी नाळ असणारा तसेच वरील तीनही प्रवाहांना शांतिमय क्रांतिवाद देणारा आहे, असे जावडेकरांचे प्रतिपादन आहे. या ग्रंथातील 'सत्याग्रही क्रांतिशास्त्र' व 'भारतीय संस्कृतीचे अमृततत्त्व' ही प्रकरणे विशेष अभ्यसनीय आहेत. "जावडेकरांच्या लेखनाचे मुख्य आवाहन हे वाचकांच्या तर्कशक्तीला आणि बुद्धीला असते. जावडेकरांचा प्रांजळपणा, विवेचनातील समतोलपणा, अभिनिवेश नव्हे पण आत्मविश्वास, प्रतिपाद्य विषयाचे सांगोपांग ज्ञान यामुळे त्यांच्या प्रत्येक लेखाला भारदस्तपणा प्राप्त झाला आहे." (आळतेकर : १९६३ : २२६) असे म. मा. आळतेकर म्हणतात. मूलगामी व चैतन्यपूर्ण विचार करण्याच्या सामर्थ्यामुळे जावडेकरांच्या लेखनाला वाङ्मयीन मूल्यही प्राप्त झाले आहे, असे आळतेकर नोंदवितात.

**लक्ष्मणशास्त्री जोशी** (१९०१-१९९४) यांनी अनेकविध विषयांवर अभ्यासपूर्ण, चिकित्सक व मौलिक लेखन केले. एकोणिसाव्या शतकापासून प्रारंभ झालेल्या प्रबोधन पर्वाची विधायक चिकित्सा करीत प्रबोधनपर चळवळींना वैचारिक अधिष्ठान देण्याचे लक्षणीय काम लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. प्रागतिक विचारांचा पुरस्कार करणारे स्वातंत्र्योत्तर काळातील ते महत्त्वाचे विचारवंत आहेत त्यांच्या विचारावर प्रसिद्ध तत्त्वचिंतक मानवेंद्रनाथ रॉय यांचा प्रभाव होता. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा भारतीय धर्म, परंपरा, तत्त्वज्ञान यांच्याबरोबरच पाश्चिमात्य ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान यांचा गाढा व्यासंग होता. त्यामुळे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विचारांचा विवेकी संगम त्यांच्या लेखनात जाणवतो. त्यांच्या साहित्यातून बुद्धिनिष्ठा, समाजनिष्ठा व आधुनिक प्रगत जीवनदृष्टी व्यक्त होते. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे महत्त्वाचे लेखन पुढीलप्रमाणे आहे - 'हिंदू धर्माची समीक्षा' (१९४१), 'जडवाद' (१९४१), 'ज्योतिनिबंध' (१९४७), 'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९५१) आदी महत्त्वाच्या ग्रंथामधून त्यांचे विचारदर्शन घडते. धर्म, समाज, तत्त्वज्ञान, राज्य, अर्थ, साहित्य अशा अनेक विषयांवर त्यांनी व्यासंगपूर्ण लेखन केले आहे. 'हिंदू धर्माची समीक्षा' (१९४१) या ग्रंथामध्ये मार्क्सवादी दृष्टिकोणातून हिंदू धर्माचे विश्लेषण

त्यांनी केले आहे. परकीय आर्यांच्या स्थानिक आर्येतरांवर झालेल्या स्वाऱ्या, पुरोहितशाही, गुलामगिरी, धर्म, देव संकल्पना, शब्दप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य या सर्व विषयांची चिकित्सा त्यांनी केलेली आहे. धर्मासंबंधीच्या पारलौकिक कल्पना बाजूस सारून विज्ञानाच्या आधारे नवी समाजरचना निर्माण करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. या संदर्भात ते म्हणतात, "आता धर्मसंस्थेपेक्षा उच्चतर अशा सामाजिक संस्था निर्माण होऊ लागल्या आहेत. पूर्वीच्या धर्मसंस्थेस माहीत नसलेल्या सामाजिक व्यवस्थेची गरज आता उत्पन्न झाली आहे. सर्व मानवांना सर्व विद्याकलांच्या शिक्षणाची तरतूद करणारी समाजव्यवस्था आता पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाचा योगक्षेम नीट चालविता येईल, अशी आणि यांत्रिक-औद्योगिक धंद्यावर सामाजिक मालकी स्थापून निर्मिलेली आर्थिक पुनर्घटना पाहिजे. आर्थिक उत्पादनाच्या साधनांच्या खाजगी मालकीवर उत्पन्न झालेल्या सरंजामदारी व भांडवलदारी वर्गाचे ज्यात अस्तित्व नाही, अशी समाजरचना पाहिजे, समाजवादी तत्त्वावर अधिष्ठित व लोकसत्तेच्या राज्यघटनेने युक्त समाजसंस्था पाहिजे."

'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९५१) या महत्त्वपूर्ण ग्रंथामध्ये वेदकालीन संस्कृती, वेदांची तार्किक प्रज्ञेत परिणती, वैदिकांची कुटुंबसंस्था व समाजसंस्था, इतिहास-पुराणांची व रामायणाची संस्कृती, बौद्ध व जैन यांचा धर्मविजय, आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन या सहा विषयांवरील त्यांची व्याख्याने समाविष्ट आहेत. या ग्रंथाबद्दल मे. पुं. रेगे म्हणतात, "ह्या ग्रंथाद्वारे भारतीय संस्कृतीच्या विकासाचा एक आलेख शास्त्रीजींनी वाचकांपुढे ठेवला आहे. ह्या विकासात क्रियाशील असलेले सर्व घटक, त्यांच्या परस्परसंबंधांतील ताणतणाव आणि गुंतागुंत, भरगच्च तपशिलासोबत, शास्त्रीजींनी उघड केली आहे. ह्या चित्रणात कुठेही सांप्रदायिक अभिनिवेश नाही; तटस्थ आणि विश्लेषणशील दृष्टी आहे... एका अंगाने भारतीय संस्कृतीचा एक लघुज्ञानकोश असे ह्या ग्रंथाचे स्वरूप आहे. तर ह्या संस्कृतीच्या विकासाची संगतवार सांगितलेली हृदयंगम कथा असेही त्याचे दुसऱ्या अंगाने स्वरूप आहे." (रेगे : १९९६, प्रस्तावना पृ. ११)

**द. वा. पोतदार** (१८९०-१९७९) यांच्या 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' (१९२२) या ग्रंथामध्ये एकोणिसाव्या शतकात अव्वल इंग्रजी काळातील मराठी गद्याच्या वाटचालीचा आढावा घेतला आहे. पोतदारांची भाषा खुमासदार, खटकेबाज, आवेशपूर्ण, मार्मिक आहे. ग. त्र्यं. माडखोलकर (१८९९-१९७६) कादंबरीकार आणि पत्रकार म्हणून प्रसिद्ध होत. वृत्तपत्रीय लेखनामधून विविध विषयांवर त्यांनी विचार प्रकटीकरण केले. 'स्वैरविचार' (१९३८), 'परामर्श' (१९४३), 'निर्माल्य' (१९६४), 'पखरण' इत्यादी पुस्तकांमधून त्यांचे वैचारिक लेखन प्रसिद्ध झाले आहे. सूक्ष्म चिकित्सा, सौंदर्यदृष्टी, बांधेसूद, रेखीव, घोटीव लेखन हे त्यांचे विशेष. त्र्यं. शं. शेजवलकर (१८९५-१९६३) इतिहास संशोधक. 'शेजवलकरांचे लेख भाग १' (१९४०), 'शेजवलकरांचे लेख भाग २' (१९५९) हे लेखसंग्रह तसेच 'शिवछत्रपति: संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने' (१९६४), 'शेजवलकर निवडक लेखसंग्रह' (१९७७) यांसारख्या ग्रंथांमधून त्यांची इतिहासाभ्यासाची चिकित्सक, निर्भीड, शास्त्रीय दृष्टी प्रकटते. श्री. ना. बनहट्टी (१९०१-१९७५) यांचे 'भारतीयांची ज्ञानोपासना', 'मराठी रंगभूमीचा इतिहास', 'टिळक आणि आगरकर' (१९५७) इत्यादी ग्रंथ आणि 'एकावली', 'चिंतन आणि चर्चा', 'वाङ्मयविमर्श', 'आदरांजली' (१९५७) आदी निबंधसंग्रह प्रसिद्ध आहेत. सांगोपांग अभ्यास, समतोलपणा हे त्यांचे विशेष. के. एल. दप्तरी यांनी 'धर्मरहस्य विचार' या ग्रंथामध्ये हिंदू धर्मग्रंथाची स्वतंत्र दृष्टीने चिकित्सा केली

आहे. 'वेद अपौरुषेय होते' हे मत त्यांनी खोडून काढले आहे. धर्मातील निवृत्तीविचार हे राष्ट्राच्या अवनतीचे एक प्रमुख कारण असल्याचे त्यांनी म्हटले आहे. "सद्यःस्थितीत राजकारण, समाजघटनानियम व पारलौकिक धर्माचरण ही तीनही अलग राखणे इष्ट होय." असे दप्तरींचे मत आहे. पां. बा. काणे, ना. गो. चापेकर, महादेवशास्त्री दिवेकर, रघुनाथशास्त्री कोकजे आदींनी धर्माला आधुनिक, बुद्धिवादी आशय देणारे वैचारिक लेखन केले. आनंद सदाशिव आळतेकर (१८९८-१९५९) यांचे 'प्राचीन भारतीय शिक्षणपद्धती' (१९३५), 'राष्ट्रकूट साम्राज्याचा इतिहास' (१९३४), 'शिलाहारांचा इतिहास' (१९३५) हे संशोधनपर ग्रंथ इतिहासामध्ये मोलाचे मानले जातात. लालजी पेंडसे (१८९८-१९७३) या मार्क्सवादी विचारवंताचे 'नवमतवाद' (१९३५), 'गुन्हेगार' (१९३४), 'साहित्य आणि समाजजीवन' (१९३५), 'धर्म की क्रांती' (१९४१), 'सप्तपदी' हे उल्लेखनीय लेखन आहे.

**पु. ग. सहस्रबुद्धे** (१९०४-१९८५) स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात लेखन करणारे मराठीतील महत्त्वाचे निबंधकार व विज्ञाननिष्ठ विचारवंत. बुद्धिवाद, ज्ञाननिष्ठा व राष्ट्रभक्ती या प्रेरणांनी त्यांनी लेखन केले. 'विज्ञानप्रणित समाजरचना' (१९३६), 'भारतीय लोकसत्ता' (१९५४), 'माझे चिंतन' (१९५५), 'राजविद्या' (१९५९), 'पराधीन सरस्वती' (१९६२), 'लोकसत्तेला दंडसत्तेचे आव्हान' (१९६५), 'भारतीय तत्त्वज्ञान अथवा राष्ट्रधर्म' (१९६५), 'वैयक्तिक आणि सामाजिक' (१९६३), 'हिंदू समाज संघटना आणि विघटना' (१९६७), 'महाराष्ट्र संस्कृती' (१९७९) इत्यादी त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ आहेत. धर्म, समाज, राज्य, शिक्षण, संस्कृती, विज्ञान अशा समाजजीवनाशी निगडित अनेक विषयांवर त्यांनी चिंतनशील लेखन केलेले आहे. 'विज्ञानप्रणित समाजरचना' (१९३६) या लेखसंग्रहामध्ये त्यांनी नवमतवादाची मांडणी केली आहे. अनुवंश, रक्तसंकर, वृत्तिसंकर, लोकसंख्येचे नियमन, समाजाचे अंतिम ध्येय, भौतिकशास्त्रे व धर्म, विवाहसंस्था व गृहसंस्था यांचे भवितव्य, राष्ट्रकल्पना व लोकशाही शासन अशा अनेक प्रश्नांवर शास्त्रीय दृष्टीने विचारमंथन या लेखसंग्रहामध्ये केलेले आहे. 'लोकसंख्येची वाढ आणि तिचे नियमन' या लेखामध्ये संततिनियमनाच्या आधुनिक कृत्रिम उपायांचा आग्रह धरला आहे. 'अधिभौतिकशास्त्रांचे अधिकार' या लेखामध्ये 'प्रत्यक्षानुभवावर आधारलेली व प्रयोगनिष्ठ असलेली भौतिकशास्त्रे अंतर्दृष्टीसारख्या भ्रामक व अविश्वसनीय साधनांवर अवलंबून असणाऱ्या धर्मग्रंथांपेक्षा विश्वसनीयतेच्या दृष्टीने अधिक प्रमाण होत.' असे त्यांनी म्हटले आहे. हिंदू समाज, राष्ट्र व संस्कृती या साऱ्यांची विज्ञानाच्या पायावर उभारणी केली पाहिजे. पूर्वेचे पश्चिमीकरण झाले पाहिजे. यंत्रोद्योगप्रधान विज्ञाननिष्ठ जडवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्यवादी समतावाद स्वीकारला तरच पूर्वेला प्राचीन काळचे वैभव पुन्हा प्राप्त होईल, असा 'विज्ञानप्रणित समाजरचना' या ग्रंथातील विवेचनाचा सार सांगता येईल.

**गं. बा. सरदार** (१९०८-१९८८) सामाजिक बांधिलकीने अभ्यासपूर्ण, विवेकनिष्ठ व प्रागतिक वैचारिक लेखन करणारे मराठीतील महत्त्वाचे समाजचिंतक व विचारवंत म्हणजे गं. बा. सरदार. विचारनिष्ठा व समाजनिष्ठा हा त्यांच्या लेखनाचा स्थायीभाव. 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' (१९३७), 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' (१९५०) इत्यादी ग्रंथ त्यांच्या वैचारिक व बौद्धिक सामर्थ्याचे दर्शन घडवितात. 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' या महत्त्वपूर्ण ग्रंथामध्ये त्यांनी संतसाहित्याचा मराठी जनसमूहांवरील प्रभाव व संतांचे सामाजिक योगदान यांची मूलगामी मीमांसा केलेली आहे. यामुळे संतसाहित्याकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोण बदलून नवी विचारदृष्टी अभ्यासकांना प्राप्त झाली. सरदार

यांनी समाज प्रबोधनाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून लेखन केले. त्यामुळे त्यांच्या साहित्यातून समाजनिष्ठा, प्रबोधन, परिवर्तन, वैचारिकता, तात्त्विकता, जिव्हाळा यांचा आविष्कार झालेला आढळतो. सरदारांच्या शैलीबद्दल निर्मलकुमार फडकुले म्हणतात, “सरदारांची शब्दकळा घोटीव आहे. तिच्यात जडता नाही, पण साधेपणाही नाही. तात्त्विक विचार पेलताना आपले अंगभूत सौंदर्य दाखविण्याची एक संयमित इच्छा तिच्या ठायी आहे. आपल्या प्रतिपादनाचा मध्यवर्ती आशय सुस्पष्ट आणि समर्थ शब्दांतून प्रकट व्हावा, ही तिची इच्छा असते. शब्दाच्या सुंदरतेपेक्षा शब्दांचे समुचितत्व विशेष आवडते. आशय आणि अभिव्यक्ती यांचा परस्परांशी संवाद करणारी ही लेखनकला सरदारांच्या व्यक्तित्वातूनच आकाराला आली. त्यांचे लेखन हा त्यांच्या लोकाभिमुख वृत्तीचा आविष्कार आहे.” (फडकुले : २००४ : पृ.२७१-२७२)

**प्रभाकर पाध्ये** (१९०९-१९८४) हे महाराष्ट्रातील लक्षणीय संपादक, साहित्यिक, सौंदर्यमीमांसक व समीक्षक. १९३४ ते १९५३ या काळात त्यांनी विविध नियतकालिकांचे काम केले. जवळपास पन्नास वर्षे त्यांनी विविध विषयांवर लेखन केले. ‘आजकालचा महाराष्ट्र’ (१९३५) हा प्रभाकर पाध्ये व श्री. रा. टिकेकर या लेखकद्वयांचा महत्त्वपूर्ण वैचारिक ग्रंथ आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा वेध घेतो. न. वि. गाडगीळ (१८९६-१९६६) राजकीय, सामाजिक क्षेत्रातील वैचारिक लेखन त्यांच्या अनुभववैविध्यामुळे त्यांचे लेखनही मार्मिक, रोचक झाले आहे. त्यांचे ‘ग्यानबाचे अर्थशास्त्र’ (१९४३), ‘राज्यशास्त्र विचार’ (१९४५) आदी ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांचे समग्र लेखन ११ खंडांत प्रसिद्ध झाले आहे.

**स्त्रियांचे वैचारिक गद्य:**

**गिरिजाबाई केळकर** (१८८६-१९८०) या एक महत्त्वाच्या स्त्रीलेखिका. ‘पुष्पहार’ (१९२१), ‘संसार सोपान’ (१९३१), ‘गृहिणीभूषण अथवा स्त्रीशिक्षणविषयक स्फुट विचारमाला’ (१९१२), ‘स्त्रियांचा स्वर्ग’ (१९२१), ‘गिरिजाबाईंची अध्यक्षीय भाषणे’ ही त्यांची ग्रंथसंपदा. कुटुंबाच्या व समाजाच्या दृष्टिकोणातून स्त्रीजीवनातील समस्या व तिची दुःखे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. स्त्रीस्वातंत्र्याबरोबरच स्त्रियांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, शिक्षण, आदर्श माता, गृहिणी कसे बनावे याचे मर्म त्यांनी सांगितले आहे. त्यांची भाषाशैली ‘सुबोध, सरळ व जरा जोरदार’ असल्याचा अभिप्राय रमाबाई रानडे यांनी दिला होता. काशिबाई हेरलेकर (१८७४-१९३६) यांनी ‘संसारातील गोष्टी’ या पुस्तकामध्ये महिलांना दिवसभराच्या कामाचे नियोजन, नीटनेटकेपणा, जमाखर्च, विणकाम, भरतकाम, बागबगीचा, स्वच्छता, नातीगोती वगैरेंबाबत माहिती दिलेली आहे. सुंदराबाई नवलकर यांनी ‘विविध देशीय स्त्रीवर्णन’ या पुस्तकामध्ये भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान, विवाहपद्धती, चालीरीती, राहणीमान वगैरेंची इतर देशांशी तुलना केली आहे. एखाद्या देशातील लोक किती सुधारलेले आहेत, हे त्यांच्या स्त्रियांच्या स्थितीवरून ओळखता येते, असे मूलभूत प्रतिपादन त्यांनी प्रस्तावनेमध्ये केले आहे.

**प्रेमाताई कंटक** (१९०६-१९८५) यांचे ‘सत्याग्रही महाराष्ट्र’ (१९४०) हे पुस्तक टिळकांच्या मृत्यूपासून फैजपूर काँग्रेस (१९३६) पर्यंतचे महाराष्ट्रातील राजकीय जीवन चित्रित करते. त्यांचा ‘हिंदी स्त्रियांचे जीवन’ (१९४५) हा ग्रंथही प्रसिद्ध आहे. मालतीबाई

बेडेकर (१९०५-२००१) यांच्या 'स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा' (१९३०), 'हिंदू व्यवहारधर्मशास्त्र' (१९३१) या पुस्तकामध्ये स्त्री ही एक व्यक्ती आहे, समाजघटक आहे. यामध्ये रूढींच्या शृंखला तोडून तिला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासाची संधी मिळालीच पाहिजे, असे ठाम प्रतिपादन येते. सामाजिक प्रश्नांविषयी पोटतिडीक, स्त्रीप्रश्नांविषयी आस्था, मानवाबद्दलचा जिव्हाळा, वस्तुनिष्ठ निर्भीड चित्रण आणि विचारप्रवृत्त करणारी शैली, सुबोध भाषा हे त्यांचे विशेष होत. कृष्णाबाई मोटे (१९०३-१९९१) यांनी 'दृष्टीआडच्या सृष्टीत' (१९३९) या पुस्तकामध्ये स्त्रीजीवनातील प्रश्नांचा वेध घेतला. कमलाबाई टिळक (१९०५-१९८९) यांनी 'स्त्रीजीवनविषयक काही प्रश्न' (१९४०) या पुस्तकामधून  बदलणारे नातेसंबंध, त्यातून निर्माण होणारे ताण, स्त्रियांपुढे  झालेले नवे प्रश्न आदी बाबींची मांडणी केली आहे. वसुंधरा पटवर्धन यांच्या 'आमचे स्त्री जीवन' (१९४९) मध्ये भारतीय स्त्रीजीवनातील स्थित्यंतरांचा उहापोह केलेला आहे. विवाहपद्धती, पुनर्विवाह, घटस्फोट ह्या ज्वलंत प्रश्नांवर अभ्यासपूर्ण निरीक्षणे नोंदविली आहेत. एकंदरीत पाहता स्त्रियांचे वैचारिक साहित्य संख्यात्मकदृष्ट्या अत्यल्प असून त्यांचे विषयही स्त्रीजीवनाच्या मर्यादित सुधारणांपर्यंत सीमित असल्याचे दिसते.

१९३० नंतर स्त्रियांची एक पिढी उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडली. त्यांना पाश्चात्त्य ज्ञान व वाङ्मयाचा परिचय झाला. स्त्रियांच्या समस्यांवर कथा, कादंबऱ्या लिहिल्या जाऊ लागल्या. मालतीबाई बेडेकरांनी ठणकावून सांगितले की, 'आतापर्यंत पुरुषांना, स्त्रियांना फक्त गर्भाशयच असते असे वाटत असे. तर त्यांना गर्भाशयाबरोबर मेंदूही असतो हे लक्षात घ्यावे.' अर्थात या काळात स्त्रियांचे वैचारिक साहित्य फारसे निर्माण झाले नाही.

**सत्यशोधकीय / प्रबोधनपर वैचारिक गद्य:**

**सयाजीराव गायकवाड** (१८६३ - १९३९) बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड हे आधुनिक भारतातील एक अत्यंत लोकहितदक्ष व प्रगतिशील विचारांचे राज्यकर्ते होऊन गेले. त्यांनी प्रसंगपरत्वे शेकडो व्याख्याने दिली. 'शिक्षण, धर्म आणि तत्वज्ञान' (पहिला खंड), 'साहित्य, कला आणि संस्कृती' (दुसरा खंड), 'राज्यप्रशासन' (तिसरा खंड) आणि 'निवडक कायदे अर्थात हुजूर हुकूम' या चार खंडामधून महाराजांची भाषणे मराठीत प्रसिद्ध झाली आहेत. यातून त्यांच्या विचारविश्वाचे पैलू उलगडत जातात. 'शिक्षण, धर्म आणि तत्त्वज्ञान' या पहिल्या खंडामध्ये शिक्षणाची पुनर्रचना, शिक्षणाचा उद्देश, स्वरुप, अभ्यासक्रम, शिक्षक, विद्यार्थी, समाज, स्त्रीशिक्षण, वंचितांचे शिक्षण आदी शिक्षणव्यवस्थेशी निगडित घटकांसंबंधी महाराजांचे चिंतन प्रकटते. पुरुषप्रधान समाजरचनेतील स्त्रीचे दुय्यम स्थान, दास्य व रूढीपरंपरांचा पगडा, बालविवाह यामुळे स्त्रियांचे होणारे शोषण थांबविण्याचे विचार त्यांनी मांडले. 'साहित्य, कला आणि संस्कृती' या विषयांवरील भाषणे दुसऱ्या खंडामध्ये संग्रहित केलेली आहेत. लोकभाषा या ज्ञानभाषा व्हाव्यात, सर्वसामान्य जनसमूहांमध्ये वाचनसंस्कृती निर्माण व्हावी, ज्ञानाधिष्ठित समाज आकारास यावा, ही तळमळ त्यांच्या भाषणांतून व्यक्त होते. "जोपर्यंत आमचे पहिल्या प्रतीचे संशोधक आपल्यापेक्षा कमी बुद्धिवान अशा आपल्या बांधवांकडे लक्ष पुरविणार नाहीत व त्यांना सहज समजेल अशा रीतीने देशी भाषांतून आपले संशोधन प्रसिद्ध करणार नाहीत, तोपर्यंत त्यांच्या संशोधनकार्याबद्दल मला पूर्ण समाधान वाटणार नाही" (सयाजीराव गायकवाड : २०१३  : पृ.१२४) संशोधकांसंदर्भात त्यांनी व्यक्त केलेले विचार आजही उपयुक्त आहेत.

'राज्यप्रशासन' या तिसऱ्या खंडामध्ये राजाची कर्तव्ये (राजधर्म), सेवकांची कर्तव्ये, प्रजेचा धर्म, राज्याच्या विकासाची अर्थनीती, प्रशासन, सामाजिक पुनर्रचना, भारतीय राज्यघटना यासारख्या विषयांवरील सयाजी राजांचे विचार आलेले आहेत. मुद्देसूदपणा, नेमकेपणा, आटोपशीरपणा, तौलनिक-चिकित्सक विवेचन, तर्कशुद्धता, मूल्यगर्भता, सोपेपणा, ओघवतेपणा वगैरे गुणविशेषांनी सयाजीराजांच्या भाषा व विवेचन यांना स्वतंत्र शैलीचे रूप प्राप्त झाले आहे

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे** (१८७३-१९४४) भाषाशास्त्रज्ञ, निर्भय समाजसुधारक, उदारमतवादी विचारवंत. 'विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेख, व्याख्याने व उपदेश' (१९३२), 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' (१९३५), 'माझ्या आठवणी व अनुभव' (१९५८), 'शिंदे लेखसंग्रह' (१९६३), 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची रोजनिशी' (१९७९) या ग्रंथांमधून महर्षी शिंदे यांच्या विचारांचे दर्शन घडते. त्यांच्या लेखनामधून त्यांचा सर्वस्पर्शी व्यासंग, संशोधकीय वृत्ती व तत्त्वचिंतकाचा पिंड जाणवतो. भारतीय संस्कृतीवर आर्यपूर्व संस्कृतीचा परिणाम कसा आणि किती व्यापक स्वरूपात झाला होता, हे शिंदे यांनी अनेक पुरावे देऊन दाखविले आहे. 'भागवत धर्माचा विकास' या लेखात त्यांनी भक्तिमार्ग हा आर्यपूर्व होता, असे प्रतिपादन केले आहे. ज्ञान आणि कर्म ही आर्य संस्कृतीची वैशिष्ट्ये असून आर्यपूर्व संस्कृतीची वैशिष्ट्ये योग आणि भक्ती ही होती, असा विचार त्यांनी सप्रमाण मांडला आहे. अस्पृश्यतेची त्यांनी केलेली मीमांसा मूलगामी असून अस्पृश्यता ही आर्यपूर्व संस्कृतीत असली पाहिजे, असे त्यांचे मत आहे. मराठी भाषेच्या उत्पत्तीबाबत त्यांनी लिहिले आहे, 'हल्लीची मराठी ही केवळ महाराष्ट्री असे नाव असलेल्या प्राचीन प्राकृतातून आलेली नसून ती मगध देशातून पश्चिम बंगाल, ओरिसा, तेलंगण, वऱ्हाड आणि एक हजार वर्षांपूर्वीची उत्तर कर्नाटक (कृष्णा आणि गोदावरी यांमधला भाग) या प्रांतांतून प्रवास करीत आलेली एक भाषा असावी, असा माझा पूर्ण ग्रह बनत चालला आहे.' 'मराठ्यांची उपपत्ती' या लेखामध्ये शिंदे यांनी भाषाशास्त्र, समाजशास्त्र आणि अन्य पुरावे यांच्या आधारे मराठे हे शक व पल्लव वंशाचे असावेत, असे म्हटले आहे. 'महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा एकमेव मार्ग' या लेखात त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रातील पुढारलेला बुद्धिजीवी वर्ग हा बुद्धिमान आणि कर्तबगार आहे, परंतु या वर्गाने आपल्या सामाजिक जाणिवा व्यापक करून बहुसंख्य समाजाच्या प्रश्नांचा आत्मीयतेने विचार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या प्रकृतीतील जातिभेद व प्रांतभेद हे गेले पाहिजेत आणि समाज एकात्म बनला पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे. महाराष्ट्राचा विचार करताना व्यापक भारतीयत्वाचा विसर पडून चालणार नाही, असेही शिंदे सांगतात.

महर्षी शिंदे यांनी सामाजिक परिषदा, अधिवेशने, शेतकरी परिषदा वगैरेंच्या अध्यक्षस्थानावरून व्यक्त केलेले विचार समाजाला दिशा देणारे होते. पुण्यात भरलेल्या 'मुंबई इलाखा शेतकरी परिषदे'च्या अध्यक्षस्थानावरून बोलताना त्यांनी शेतकऱ्यांच्या दारूण स्थितीची कारणमीमांसा केली आहे. भारतात आता शेतकरी वर्ग दलित होऊ लागला आहे. अस्पृश्यांची अस्पृश्यता कमी होत असून सरकारने शेतकरीरूपी नवा दलितवर्ग निर्माण करण्याचा चंग बांधला आहे, असे ते म्हणतात. खेड्यात आणि कसब्यात लहान लहान भांडवलाचे मारवाडी, ब्राह्मणादी पांढरपेशा जातीचे लोक अडाणी शेतकऱ्यास आपल्या सावकारी जाळ्यात गुंतवून त्यांच्या जमिनी बळकावून मालक झाले आहेत. यासंदर्भातील स्वतःचे अनुभव विशद करून शेतकऱ्यांच्या विदारक स्थितीचे वर्णन त्यांनी केले आहे. सरकारने मांडलेल्या तुकडेबंदी व सारावाढीच्या विधेयकास विरोध केला आहे.

'अस्पृश्यांची शेतकी परिषद', 'वाळवे तालुका शेतकरी परिषद', 'चांदवड तालुका शेतकरी परिषद' यासारख्या लेखामध्ये शेतकरी, शेती यांच्यासंदर्भात मौलिक विवेचन येते. शेतकरी हा कायम उपेक्षित राहिलेला वर्ग आहे. त्यांनी स्वयंस्फूर्तीने आपला अन्याय दूर करणे आवश्यक आहे. शेतीमालाला रास्त किंमत मिळाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी आग्रहाने मांडली. मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण होऊनही भारतीय शेतकऱ्यांचा साधेपणा, भोळेपणा, अडाणीपणा तसेच संघटनेचा अभाव कायम होता. परिणामतः शेतकरी हा 'कायम गुलामांचा वर्ग' बनल्याचे त्यांचे मत होते. शेतकऱ्यांच्या एकजुटीशिवाय शेती आणि शेतकऱ्याला भवितव्य नाही, असे स्पष्ट प्रतिपादन त्यांनी केले. शेतकऱ्यांच्या एकजूटीमधील अडचणीबाबत ते म्हणतात की, "शेतकरी श्रीमंत झाला की तोच जमीनदार बनतो, मग तो इतर गरीब शेतकऱ्यांशी फटकून वागतो आणि इतर सत्ताधाऱ्यांच्या पंगतीत बसतो." शेतकऱ्यांनी आपसातील मतभेद दूर करून शेतकरी म्हणून एकत्र आले पाहिजे. शेतकऱ्यांची संघटना उभी करणे महत्त्वाचे असून 'बळीराजा उभा राहील तरच स्वराज्याची आशा' अशा निष्कर्षापर्यंत म. शिंदे आल्याचे दिसतात. अर्थकारणावर शेती करणाऱ्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले नाही, तर शेतकऱ्यांच्या दुरावस्थेला पारावार राहणार नाही. म्हणून शेतकऱ्यांनी भोवतालच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक घडामोडींबाबत सदैव सजग राहिले पाहिजे, हे सांगताना शिंदे म्हणतात की, "शेतकऱ्यांनो, तुम्ही नेहमी काबाडकष्ट करणारे नांगरे म्हणूनच काळ न कंठता, राष्ट्राच्या अर्थकारणात तुम्ही आपला एक हात गुंतवून, दुसरा हात त्या उत्पन्न केलेल्या अर्थाची पुढे विल्हेवारी कशी चालली आहे हे पाहून, त्या अर्थगाड्याच्या बैलांची शिंगदोरी खेचण्याकरिता नेहमी मोकळा ठेवणे जरूर आहे. हे जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत मागे गेलेल्या अनंत काळाप्रमाणे, पुढे येणाऱ्या अनंत काळीही तुम्ही भारवाही, केवळ शेपूट व शिंगे नसणारी जनावरे राहणार ह्यात काय संशय!" (मंगूडकर (संपा.) : २००२ : पृ. ३०१-३०२). तत्कालीन शेतकऱ्यांचे प्रश्न व त्यावरील उपाय यांची महत्त्वपूर्ण मांडणी शिंदे यांनी केली आहे. महर्षी शिंदे यांचे लेखन बहुजन समाजास विचारप्रवर्तक, उन्नत व विकसित करणारे आहे.

**मुकुंदराव पाटील** (१८८५-१९६७) मुकुंदराव पाटील यांनी 'विठोबाची शिकवण' (१९२२) या पुस्तिकेमध्ये वारकरी संप्रदायातील संतांच्या चरित्रकथांचा नव्याने अन्वयार्थ लावून श्रमनिष्ठेचा, कर्मपरायणतेचा, उद्यमशीलतेचा संदेश वारकरी संप्रदायाने दिल्याचे प्रतिपादन केले आहे. साधी, सोपी, ओघवती भाषा, व्यावहारिक दाखले, संतचरित्रांतील घटनांचा वस्तुनिष्ठ अर्थ लावण्याची इहवादी दृष्टी, तर्कशुद्ध युक्तिवाद, काव्यात्मक शैली, वाचनीयता यांमुळे हा निबंध वाचकांना विचारप्रवृत्त करतो. त्यांनी 'दीनमित्र' मध्ये १९१० ते १९६७ अशी ५७ वर्षे लिहिलेले अग्रलेख म्हणजे मराठी वैचारिक वाङ्मयाचा मोठा ठेवा आहे. 'विचारकिरण भाग १' (१९५२), 'विचारकिरण भाग २' (१९५६) 'दीनमित्र' निवडक अग्रलेख' (१९९७), 'विचारकिरण - दीनमित्रमधील अग्रलेख १९१०-१९१५' (२००९) या ग्रंथामध्ये त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले आहेत. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, स्त्री, दलित, शेती, शेतकरी, कामगार, साहित्य अशा बहुतेक सर्व क्षेत्रांवरील मुकुंदरावांचे सत्यशोधकीय अन्वेषण अग्रलेखांमधून येते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील शेतकरी बहुजन समाजाची स्थितीगती, त्यांचे प्रश्न, समस्या व सामाजिक चळवळींचा वस्तुनिष्ठ दस्तऐवज म्हणजे 'दीनमित्र'. मुकुंदरावांच्या गद्यशैलीबाबत अशोक एरंडे म्हणतात, "कष्टकरी जीवनाशी एकरूप झाल्यामुळे त्यांच्या लेखनात कमालीची स्वाभाविकता,

भावस्पर्शिता आणि रोखठोकपणा आलेला होता. श्रमजीवींचे शोषण करणाऱ्या सावकार, पुरोहित व धर्मकर्मठ वर्गांबद्दलची चीड त्यांनी दाहक शब्दांत व्यक्त केली आहे. उपरोध, व्याजोक्ती, ग्रामीण म्हणी, वाक्प्रचार यांचा पुरेपूर वापर ते करतात. त्यांची भाषा सहजस्फूर्त, साधी, सोपी, ओघवती, प्रवाही व स्फूर्तिप्रद आहे. त्यांची भाषा ही मराठी मातीतील जीवनसत्त्व शोषून घेऊन जन्मलेली आणि मराठी मातीशी इमान राखणारी अस्सल मराठी वळणाची आहे. संस्कृत इंग्रजीच्या दडपणाचा स्पर्शही नसलेली त्यांची भाषा अस्सल 'मऱ्हाटी' लोकभाषा आहे. स्वाभाविकता, रोखठोकपणा, संवादात्मकता, कथनात्मकता, प्रौढपणा, निर्भीडता, उपहास-उपरोधांवरील विलक्षण हुकमत, अलंकारिकता अशा वाङ्मयीन वैशिष्ट्यांनी युक्त मुकुंदरावांचे लेखन आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे."

**भास्करराव जाधव** (१८९६-१९५०) 'मराठा दीनबंधु'चे संपादक (१९०१). त्यांचे वैचारिक व संशोधनपर लेखन नवा विचारव्यूह देणारे होते. 'गणपती उत्सव' (१९२०) या लेखामध्ये भास्करराव जाधवांनी गणपती उत्सवामागील मूळ कल्पना, सद्यःस्थिती, त्याचे झालेले दुष्परिणाम इत्यादींचा थोडक्यात आढावा घेतला आहे. प्रत्येकाला आपले धार्मिक विधी स्वतः करता यावेत, यासाठी भास्करराव जाधवांनी 'घरचा पुरोहित' (१९२८) या मार्गदर्शनपर पुस्तकाचे लेखन केले. 'मराठे आणि त्यांची भाषा' (१९३२) हा महत्त्वाचा निबंध आहे. मराठ्यांचे देव, शिव व भवानी, पंढरपूरचा विठोबा, मराठ्यांचे कुलस्वामी-ज्योतिबा, खंडोबा, सगोत्र विवाह, देवस्की, चालीरीती, उत्तर व दक्षिण हिंदुस्थानी आर्य स्त्रिया, सौभाग्यालंकार, मंगळसूत्र, कुंकू, शेंदूर, डोकीवर पदर, द्रविडांशी संबंध, मराठ्यांची भाषा अशा विषयांवर संशोधनपर विवेचन केले आहे. मराठे हे आर्य व द्रविड यांच्या सोयर संबंधाने झालेले मिश्रसंस्कृतीचे आहेत. मराठीची उत्पत्ती महाराष्ट्री प्राकृतपासून झाली आहे. 'रामायणावर नवा प्रकाश' (१९३५) हा ग्रंथ भास्कररावांच्या व्यासंगाचे, संशोधनशीलतेचे, चिकित्सक दृष्टिकोणाचे दर्शन घडवतो. 'शंकराचार्यांचे जगद्गुरुत्व' (१९३५) या लेखमालेमध्ये भास्करराव जाधव यांनी आद्य शंकराचार्यांपासून कोणाही आचार्यास धर्मनिर्णयाचे कोणतेही अधिकार नाहीत, हे अधिकार राजाचे आहेत, शंकराचार्यांना जगद्गुरू पदाचा अधिकार नाही, असे परखड प्रतिपादन केले आहे. 'प्राचीन इतिहास' (१९३६) या लेखामध्ये मध्ययुगीन काळातील सेरूण, होयसळ, चालुक्य, काकतीय, यादव इत्यादी राजघराण्यांची माहिती दिली आहे. कर्नाटक व महाराष्ट्रामध्ये भाषाभिन्नत्व असले तरी संस्कृती अभिन्न आहे, हा विचार त्यांनी मांडला आहे. 'वेदोत्पत्तीवर नवा प्रकाश' (१९३७) या लेखामध्ये वेदांचे अपौरूषत्व, ऋषींचे द्रष्टेपण, ऋग्वेदातील मंत्रांचा यज्ञाच्या कामी उपयोग, कर्मकांडाबाबत ऋषीप्रामाण्य याविषयी विचार मांडले आहेत. 'एक लिपी' (१९३८) या लेखामध्ये भारतासारख्या बहुभाषिक देशामध्ये सर्व भारतीय भाषांना एकच लिपी असावी, सर्वांनी रोमन लिपीचा स्वीकार करावा, असा विचार मांडला आहे. 'भगवा झेंडा' (१९३७) या लेखामध्ये शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी भगवा झेंडा शहाजीराजांकडून स्वीकारला होता, असे प्रतिपादन केले आहे. 'लग्नविधी व विवाहविधी' (१९४१) या लेखामध्ये शंकर उर्फ महादेव या देवतेच्या मूलस्वरूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय, 'आर्यांच्या सणाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास', 'श्रीशिवछत्रपती यांच्या राज्याभिषेकाचे महत्त्व', 'शेतकऱ्यांची कर्जबाजारी स्थिती व शेतकऱ्यांच्या पतपेढ्या', 'आर्य संस्कृती व पातिव्रत' अशा विविध विषयांवरील अप्रसिद्ध लेखन उपलब्ध आहे. संस्कृतचा गाढा व्यासंग, संशोधक वृत्ती, सत्यशोधकी दृष्टी, तर्कशुद्ध

मांडणी, विचारांची सखोलता, साधी, सोपी, परिणामकारक भाषा, मुद्देसूद साधार चर्चा आदी त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये दिसून येतात. क्षात्रजगद्गुरु सदाशिव पाटील-बेनाडीकर (१८८५-१९८३) यांची भाषणे 'श्रीमत् क्षात्रजगद्गुरुः विचारदर्शन' या ग्रंथामध्ये प्रसिद्ध झाली आहेत. धार्मिक स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समता, शिक्षण यांचा पुरस्कार करतानाच शेतकरी-कष्टकऱ्यांच्या दुरावस्थेची मीमांसा व त्यांच्या आर्थिक उन्नतीचे उपाय क्षात्रजगद्गुरुंनी सुचविले आहेत.

**केशवराव विचारे** (१८८९-१९५४) 'विद्यार्थीमाला' (१९४२), 'सत्यसंशोधन' (१९४५) या ग्रंथांचे लेखन. 'सत्यसंशोधन' या पुस्तकामध्ये, आपण कोण आहोत, अन्न, युद्ध, मन, शिक्षण, धर्म, नीती, भिन्न विचारप्रणाली, विवाहसंस्था, देव, भक्ती, राजकारण, अर्थशास्त्र, सहकार्य, संघटना अशा विषयांवर विवेचन केले आहे. सत्यशोधक समाज परिषद, मुंबई, अध्यक्षीय भाषण (१९४०), 'शेतकरी बंधूनो संघटित होऊ या', 'कोकणातील शेतकऱ्यांची परिषद वांगणी, अध्यक्षीय भाषण' (१९५०), 'गाव शेतकरी संघाचे नियम', 'अखिल भारतीय किसान जाहीरनामा', (१९३६), 'महाराष्ट्र सहकार परिषद, अध्यक्षीय भाषण' (१९३६), 'एकमेका साह्य करू! या विषयावरील कीर्तन', पोस्टल क्लाससाठीची व्याख्याने या उपलब्ध साहित्यातून त्यांच्या विचारांचे दर्शन घडते.

**भगवंतराव पाळेकर** (१८८२-१९७३) बडोद्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'जागृति' या साप्ताहिकाचे संस्थापक संपादक (१९१७-१९४९). 'नव्या मनुतील मराठा' (१९२१), 'जागृतिकार पाळेकर: आत्मवृत्त आणि लेखसंग्रह' (१९६१), 'जागृतिकार पाळेकर' (१९९६) या ग्रंथांमधून पाळेकरांचे लेखन प्रसिद्ध झाले आहे. शेती व शेतकरी, दारिद्र्य, अज्ञान, शिक्षण, अंधश्रद्धा, स्त्रीदास्य, विवाहसंस्था, कामगारवर्ग, सावकारशाही, सरकारी धोरणे, नोकरशाही, समाजसुधारणा, धर्मचिकित्सा, ग्रामपरिवर्तन, जातिभेद, इतिहास, सामाजिक ऐक्य, राजकारण वगैरे विषयांवर चिंतनशील व विचारगर्भ लेखन.

**श्रीपतराव शिंदे** (१८८३-१९४४) यांनी 'विजयी मराठा' (१९१७-१९४३) मधून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, शेती व शेतकरीविषयक, स्त्रिया, दलित, वाङ्मय आदी विषयांवर विपुल लेखन केले आहे. 'निवडक विजयी मराठा' (१९९३) मध्ये त्यांचे काही अग्रलेख प्रसिद्ध झाले आहेत. दिनकरराव जवळकरांच्या (१८९८-१९३२) 'सवाल पहिला' (१९१९), 'क्रांतीचे रणशिंग' (१९३१) आदी पुस्तकांमधून आक्रमक, धारदार भाषा येते. 'क्रांतीचे रणशिंग' हा त्यांचा ग्रंथ भारतीय शेती व शेतकऱ्यांसंदर्भात अभ्यासपूर्ण मांडणी करतो. केशव सीताराम ठाकरे (१८८५-१९७३) यांनी 'प्रबोधन' (१९२१-१९३०) पत्रातून सामाजिक, धार्मिक विषयांवर प्रभावी लेखन केले. 'कोदण्डाचा टणत्कार' (१९१८), 'ग्रामण्याचा साद्यंत इतिहास अर्थात नोकरशाहीचे बंड' (१९१९), 'देवळांचा धर्म की धर्माची देवळे' (१९१९), 'भिक्षुकशाहीचे बंड' (१९२१), बोटाचे बंड, 'दगलबाज शिवाजी' (१९२६), 'शेतकऱ्याचे स्वराज्य' (१९२९), 'प्रस्थान' (१९३८), 'ऊठ! मऱ्हाठ्या उठ' (१९७३) आदी त्यांची गाजलेली पुस्तके. धार्मिक, सामाजिक क्षेत्रांतील भ्रष्टता, दांभिकता, शोषण, गुलामगिरी, दडपशाही यांवर ठाकरे त्वेषाने तुटून पडले. परखड चिकित्सा, तर्कशुद्ध युक्तिवाद व धारदार भाषा हे त्यांचे वैशिष्ट्य. भावनोद्दीपक, वादविवादात्मक, खंडनमंडनपर विवेचन आणि भारदस्त, रसाळ, तडफदार, आवेशपूर्ण निवेदन यांमुळे त्यांचे लेखन लोकप्रिय ठरले. त्यांनी विरोधकांवर निर्भय, निर्भीड व निःस्पृह

वृत्तीने जोरदार हल्ले चढविले. तरुण पिढीमध्ये नवमतवाद जागृत करण्याच्या हेतूने त्यांनी प्रबोधनपर वैचारिक लेखन केले. बाबुराव यादव (मृत्यू १९३१) यांनी 'गरिबांचा कैवारी' या नियतकालिकामधून तसेच इतर पत्रांमधून सामाजिक व धार्मिक प्रबोधनपर लेखन केले. रा. बा. जाधव (१८९५-१९५२) यांचे 'श्रीमहालक्ष्मी' (१९३७), 'विधिमार्ग' (१९४१), 'रुक्मिणीची नोटीस आणि विठोबाचे उत्तर' (१९३७), आदी लेखन धार्मिक परंपरांची चिकित्सा करणारे आहे. का. बा. देशमुख (१८६०-१९४३) यांची 'क्षत्रियांची वेदोक्त श्रावणी' (१९२२), 'क्षत्रियांचा इतिहास' (१९२७) आदी पुस्तकांमधून क्षत्रियांची स्वतंत्र परंपरा उजागर केली आहे. खंडेराव बागल (१८७२-१९३१) यांचे 'हंटर'मधील निवडक लेख प्रसिद्ध झाले असून त्यामधून त्यांचा धर्मग्रंथांचा व समकालीन सामाजिक परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास व तर्कशुद्ध विवेचनकौशल्य दिसून येते. 'ऋग्वेदा'वर त्यांनी सुमारे पंधरा लेख लिहून ऋग्वेदाचे मर्मग्राही परिशीलन केले आहे. विषयाचा सखोल अभ्यास, साधार मांडणी, बिनतोड युक्तिवाद, खंडनमंडन, वैचारिकता, प्रौढ, परिपक्व भाषा, उपहास-उपरोध आदींमुळे त्यांचे वैचारिक लेखन अभ्यासनीय झाले आहे. आनंदस्वामी उर्फ काशीनाथ रामभाऊ दिवटे (१८९३-१९५२) या जहाल शेतकरी सत्यशोधक नेत्याच्या दैनंदिनी (१९३१) मध्ये तत्कालीन सामाजिक आंदोलनाशी निगडित संदर्भ येतात. हरिश्चंद्र नारायण नवलकर (१८६९-१९३०) यांनी 'सत्यशोधक महासाधू श्री. तुकाराम महाराज (१९२९)' या पुस्तकामध्ये तुकाराम महाराजांच्या अभंगांचे सत्यशोधक समाजतत्त्वाचे तौलनिक परीक्षण करून तुकाराम हे सत्यशोधक होते, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. नवलकरांनी आद्य दलित पुढारी 'शिवराम जानबा कांबळे चरित्र' (१९३०) लिहून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला आहे. रामराव जोतिराव शिंदे यांनी 'शेतकऱ्यांचा कैवारी' (१९३५) या पुस्तकातून शेतकऱ्यांच्या समस्या व त्या सोडविण्यासंदर्भात मौलिक विचार व्यक्त केले आहेत.

**शामराव देसाई** (१८९६-१९७१) बेळगावातील 'राष्ट्रवीर' साप्ताहिकाचे संस्थापक व १९२९ ते १९६० या काळात संपादक. 'राष्ट्रवीर'कार शामराव देसाई : जीवन व कार्य' या ग्रंथात त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. सामाजिक, राजकीय, शेती व शेतकरी, धार्मिक, श्रद्धा, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढिपरंपरा, शिक्षण अशा अनेक विषयांवर त्यांनी प्रबोधनपर वैचारिक लेखन केले आहे. बहुजन समाजाने 'नांगराचे रूमणे, तलवार, तराजू आणि लेखणी' ही आयुधे हाती धरली पाहिजेत, असे त्यांचे मत आहे. साध्या, सोप्या भाषेतून लोकमनाशी संवाद साधण्याचे अनोखे कसब त्यांच्या शैलीमध्ये होते. लोकजीवनातून उगवलेल्या मराठीचे सोपे, सुलभ, नितांतसुंदर रूप त्यांच्या लेखनामधून प्रकटते.

**शंकरराव मोरे** (१८९९-१९६६) यांनी शिक्षणाच्या प्रश्नाचा सखोल अभ्यास व सांगोपांग विचार करून 'प्राथमिक शिक्षण' (१९३७) हा अत्यंत महत्त्वाचा प्रबंधवजा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ ५१६ पृष्ठांचा असून दोन विभागामध्ये त्याची मांडणी केलेली आहे. पहिल्या विभागामध्ये वर्णव्यवस्थेची स्थित्यंतरे, पूर्वकालीन शिक्षणपद्धती, अर्वाचीन काल, स्त्रीशिक्षण, शिक्षणप्रसार, सक्तीचे व मोफत शिक्षण, शिक्षण व खर्च अशी प्रकरणे आहेत. दुसऱ्या भागामध्ये विद्यार्थी, शिक्षक, तपासणी, शाळागृहे व शिक्षणसाहित्य, अभ्यासक्रम, धंदेशिक्षण व क्रमिक पुस्तके, प्रौढशिक्षण, मदतीच्या शाळा, शिक्षणकारभार व हुकूमत अशी प्रकरणे आहेत. हा ग्रंथ भारतातील सामाजिक, शैक्षणिक इतिहासाची बहुजनकेंद्री दृष्टिकोणातून चिकित्सा करतो. महाराष्ट्रातील शेती व शेतकऱ्यांच्या बिकट प्रश्नांचा

बारकाईने अभ्यास करून शंकररावांनी आपले विचार वेळोवेळी मांडले आहेत. 'किर्लोस्कर' मासिकामध्ये (१५ ऑगस्ट १९४७) शंकररावांनी एक विस्तृत लेख लिहून शेतीच्या प्रश्नांचा उहापोह केला आहे. (किर्लोस्कर, १५ ऑगस्ट १९४७). 'बहुजन समाज व स्वातंत्र्य' (नवयुग, २६ जाने. १९४७) या लेखामध्ये बहुजन समाज म्हणजे काय व स्वातंत्र्य म्हणजे काय? या प्रश्नांची चर्चा केली आहे. 'धर्मनिष्ठ व जातिनिष्ठ पक्षांचे भवितव्य' (नवयुग, २१ ऑक्टो. १९४७) या लेखात धर्मनिष्ठ व जातिनिष्ठ पक्षांमुळे देशासमोरील धोके अधोरेखित करून निधर्मी बहुपक्षीय लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. 'दाभाडी प्रबंधा'च्या (१९५०) मांडणीमध्ये शंकरराव मोरे यांचा प्रमुख वाटा होता. या प्रबंधामध्ये आंतरराष्ट्रीय परिस्थिती, हिंदी कम्युनिस्ट पक्षाच्या चुका, शेकापचा जन्म व कार्य, समाजवादी पक्षाचे स्वरूप व शेकापचे पुढील कार्य यांविषयी सविस्तर उहापोह केला आहे. 'धर्मवेड्यांचा बाजार' (नवयुग, १० जाने. १९४८) या ४८ पृष्ठांच्या लेखामध्ये धार्मिक कट्टरवादाचे स्वरूप मांडून भारतीय राजकीय पार्श्वभूमीवर त्याची चिकित्सा केली आहे. 'गावराज्ये स्थापन करा' (१९४७) या लेखामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण व ग्रामराज्याची संकल्पना प्रतिपादन केली आहे. 'नव्या महाराष्ट्रातील शेतकरी' या लेखामध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची दशा व भावी सुधारणेची दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. 'गुन्हेगार समाजाचे शत्रू आहेत काय?' (नवभारत, १५ ऑगस्ट १९४७) या लेखामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीची समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय उकल केली आहे. शंकरराव मोरे यांच्या लेखनातून बुद्धिप्रामाण्यवाद, वैचारिक प्रगल्भता, सर्वस्पर्शी व्यासंग, तर्कशुद्ध चिकित्सक दृष्टिकोण, भाषाप्रभुत्व, वंचितांच्या उद्धाराची कळकळ या वैशिष्ट्यांचा प्रत्यय येतो.

**गाडगे महाराज** (१८७६-१९५६ यांची काही कीर्तने अक्षरबद्ध झाली असून त्यांना वैचारिक व वाङ्मयीन मूल्य आहे. अडाणी, अक्षरशून्य जनसागराला ते कीर्तनातून थेट साद घालीत- "विद्या तिसरा डोळा हाये! शिकून शायने व्हा! पोटाले कपडा बांधा. एक खेप उपाशी रहा. पन पोराले शिकवा! तवा तुमचा पांग फिटल" ऋणमुक्ती, दारिद्र्यमुक्ती, अज्ञानमुक्ती आणि व्यसनमुक्ती या चार मुक्तिधामांच्या माध्यमातून त्यांनी समाजाला आदर्शवत जगण्याचा मार्ग दाखविला. 'कर्ज काढू नका, गाईबैलांची काळजी घ्या, देवाला नवस करू नका, कोंबडी बकरी मारून खाऊ नका, आईबापाची सेवा करा, शिवाशीव पाळू नका, उघड्यानागड्यांना वस्त्र द्या' हा गाडगेबाबांचा उपदेश म्हणजे मानवतावादाचा सार होता. आपल्या खास शैलीमधून कीर्तनाला प्रबोधनाचा आशय देऊन समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनविले.

**पंजाबराव देशमुख** (१८९८-१९६५) ऑक्सफर्ड विद्यापीठातून 'वैदिक वाङ्मयात धर्माचा उद्गम व विकास' या विषयावर डी. फिल. पदवी (१९२७)., 'महाराष्ट्र केसरी' साप्ताहिकाच्या माध्यमातून ग्रामीण समाज, शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी त्यांनी मौलिक विचार मांडले. पंजाबरावांनी १९३२ साली मध्यप्रांतांच्या विधीमंडळात मांडलेले 'देवस्थान संपत्ती बिल' धर्मसंस्था प्रणित शोषण संपविण्याचा कायदेशीर मार्ग होता. त्यांच्या मते, भारतीय समाज धर्मपीठे व देवस्थानांच्या प्रभावामुळे मानसिक गुलाम झाला आहे. हिंदुस्थानातील देवस्थाने व धर्मस्थाने भ्रष्टाचाराचे व अनैतिकतेचे अड्डे बनले आहेत. त्यांच्याकडे प्रचंड प्रमाणात धन आहे. देवस्थानच्या पैशाचा उपयोग शिक्षण, आरोग्य यासाठी केल्यास जनतेच्या जीवनमानाचा दर्जा उंचावेल. खरी कृषकक्रांती शेतकऱ्याला पुरोहितशाही व

भांडवलशाहीच्या जोखडातून मुक्त केल्याशिवाय सफल होणार नाही, असे त्यांचे मत होते. कर्मवीर भाऊराव पाटील (१८८८-१९५९) यांचे विचार व भाषणे समाजपरिवर्तनाची क्रांतिसुक्ते होती. केशवराव जेधे यांचे शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न, दलित मुक्ती लढा, सहकारी संस्था, बहुजनांचे राजकारण, धर्मचिकित्सा, शिक्षण वगैरे विषयांवरील विचार महत्त्वाचे आहेत.

**नाना पाटील** (१९००-१९७६) सातारच्या प्रतिसरकार चळवळीचे अग्रणी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे विचार व भाषणे हा ग्रामीण वैचारिक साहित्याचा रसरशीत पैलू आहे. त्यांची 'शेतकऱ्याची अवस्था', 'मुले कसली नसावीत व असावीत', 'भरमसाठ व्याजाची सावकारी', 'शेतकऱ्यांची व्यसने', 'काय पहावे करून', 'हुकमाची दुरी' इत्यादी भाषणे प्रसिद्ध आहेत. शेतीमालास हमीभाव, कुळांना संरक्षण, शेतीसामग्रीची वाजवी दरात उपलब्धता, सरकारी नोकरशाहीच्या भ्रष्टाचारापासून मुक्तता यांसारख्या ग्रामसफाई, अस्पृश्यतानिवारण, साक्षरता प्रसार, दारूबंदी, हुंडाबंदी, ग्रामराज्य, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षणप्रसार यांसारख्या विषयांवर विचार मांडले. ग्रामजीवनाचे परिपूर्ण आकलन, बोलीभाषेवरील हुकमत, प्रभावी वक्तृत्व, यांमुळे त्यांचे विचार व भाषणे ग्रामजीवनाचा तळ ढवळून काढणाऱ्या विचारगाथा ठरल्या आहेत.

**माधवराव बागल** (१८९८-१९८६) यांनी सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक अशा विविध विषयांवरील पन्नासच्यावर छोटी-मोठी पुस्तके लिहून वैचारिक मंथन केले. 'सत्यशोधकांना इशारा' (१९३१) या वैचारिक ग्रंथामध्ये सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना आपले विचार व कार्य व्यापक ठेवण्याचा सल्ला बागलांनी दिला आहे. 'बेकारी व तीवर उपाय' (१९३३) यांमध्ये शेतकरी व मजूर यांच्या दुःखाची कारणमीमांसा येते. 'सुलभ समाजवाद' (१९५१) या छोटेखानी पुस्तकात समाजवादाची संकल्पना अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितली आहे. 'हंटरकार खंडेराव बागल यांचे निवडक लेख' (१९४९) मध्ये खंडेराव बागल यांचे १९२५ ते १९२९ या काळातील 'हंटर'मधील निवडक लेखांचे संपादन केले आहे. 'भाई बागलांचा विचारप्रवाह' (१९४७) या पुस्तकात माधवरावांची भाषणे व काही लेख आहेत. समाजसुधारणेचा विचार त्यांच्या समग्र लेखनाचे सूत्र आहे.

**पंढरीनाथ पाटील** (१९०३-१९७८) म. जोतीराव फुले यांचे आद्यचरित्रकार. त्यांचे 'म. फुले यांचे चरित्र', 'पंढरीनाथ पाटील यांची राज्यसभेतील भाषणे', 'सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचा इतिहास', 'शाहू महाराज चरित्र', 'रावबहाद्दूर नायडू चरित्र' इत्यादी ग्रंथलेखन. धर्मविधीतील मध्यस्थांचे उच्चाटन, अस्पृश्यता व जातिभेद निर्मूलन, देवस्थानातील संपत्तीचा शिक्षणासाठी विनियोग, लग्नकार्यातील हुंडा व फाजील खर्चास विरोध, बालविवाह बंदी, सावकारशाहीस प्रतिबंध, शिक्षणप्रसार यांसारखे महत्त्वपूर्ण विचार त्यांनी मांडले. 'स्थानिक स्वराज्यसंस्था व त्यांचे हक्क' (१९३६) या निबंधामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण व या संस्थांच्या माध्यमातून खेड्यांचा विकास करण्यावर भर दिला आहे.

**कृ. भा. बाबर** हे सत्यशोधक विचाराचे समाजचिंतक, शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ. त्यांनी १९२० सालापासून राष्ट्रवीर, विजयी मराठा, ज्ञानप्रकाश, कर्मवीर, जागरूक, प्रबोधन,

munotes.in

शेतकी आणि शेतकरी, श्रीशाहू, शिक्षक, खेळगडी वगैरे नियतकालिकांमधून शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक विषयांवर विपुल लेखन केले. बहुजन समाजासाठी व नवसाक्षरांसाठी त्यांनी सोप्या भाषेत, सोप्या विषयावर मोठ्या टाइपात छापलेल्या नियतकालिकाची आवश्यकता ओळखून १९५० साली 'समाजशिक्षणमाला' हे मासिक सुरू केले.

**दलित वैचारिक गद्य:**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर** (१८९०-१९५६) दलित मुक्तिलढ्याचे प्रवर्तक, विचारवंत, संशोधक, संपादक, अर्थशास्त्रज्ञ, मानवी हक्क व अधिकारांचे रक्षक असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. त्यांनी 'मूकनायक' (१९२०), 'बहिष्कृत भारत' (१९२७), 'जनता'(१९३०), 'प्रबुद्ध भारत' ही पत्रे सुरू करून विविध विषयांवर वैचारिक लेखन केले. या पत्रांतील लेखनाने दलित समाजामध्ये आत्मभान निर्माण केले. विद्रोहाची जाणीव उत्पन्न केली व दलितांच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय चळवळींचा उदय झाला. बाबासाहेबांचे बहुतेक ग्रंथलेखन इंग्रजीमध्ये असले तरी वृत्तपत्रीय लेखन, भाषणे मराठीत असून ते आता संकलित स्वरूपात ग्रंथरूपाने प्रकाशित झाले आहे. दलितांना माणूसपणाचे आत्मभान व मानवी प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी लेखन केले. "आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास मूकनायक या पत्राचा जन्म असल्याचे" त्यांनी म्हटले आहे (मून (संपा) : १९९० : पृ.३४७). डॉ. आंबेडकरांनी सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक आदी विषयांवर मूलगामी, विचारप्रवर्तक लेखन वरील नियतकालिकांमधून केले. 'महाड येथील धर्मसंगर', 'हिंदूंचे धर्मशास्त्र', 'महार आणि त्यांचे वतन', 'हिंदू धर्माला नोटीस', 'हिंदू महासभा व अस्पृश्यता', 'खोती उर्फ शेतकऱ्यांची गुलामगिरी', 'आमची कैफियत', 'पुणे येथील पर्वती सत्याग्रह', 'नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही' इ. 'बहिष्कृत भारत'मधील लेखांच्या मथळ्यांवरून त्यांच्या विषयांची व्याप्ती कळून येते. त्यांच्या साऱ्या लेखनाचा केंद्रबिंदू 'अस्पृश्यता निर्मूलन' हाच होता. 'हिंदू धर्म अस्पृश्यांचा अभ्युदय करू शकतो का?' असा प्रश्न विचारून ते लिहितात, "अस्पृश्यता हा गुलामगिरीचाच एक प्रकार आहे. धर्माचा वज्रलेप आधार असलेली चिरकालीन अस्पृश्यता पृथ्वीतलावर फक्त भारतातच सापडेल. दोन समाजांचे एकत्र बसणे, उठणे, राहणेदेखील एकत्र होऊ शकत नाही. तेव्हा हिंदू व अस्पृश्य एक आहेत का? हिंदू धर्मीयांची समाजरचना विषमतेवर आधारलेली आहे. सवर्णांच्या दृष्टीने अस्पृश्य हे हिंदू धर्मांतर्गत असले तरी ते हिंदू समाजांतर्गत नाहीत, वेगळे आहेत." समाजधारणेसाठी आवश्यक असलेली समानता नाकारली जात आहे, हे पाहून त्यांनी धर्मांतराचा इशारा दिला व पुढे प्रत्यक्षातही आणला.

डॉ. आंबेडकर चातुर्वर्ण्य, जन्मसिद्ध उच्चनीचता, ब्राह्मण्य यांसंबंधी प्रखरपणे टीका करतात. उदा. "हिंदू समाज हा एक मनोरा आहे. एक जात म्हणजे त्याचा एक मजला आहे. पण त्या मनोऱ्यास शिडी नाही. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यास जाण्यास मार्ग नाही." (मूकनायक). "जन्मजात उच्चनीचभाव हीच ब्राह्मण्याची खरी व्याख्या होय.'' (बहिष्कृत भारत). गंगाधर पानतावणे यांनी म्हटल्याप्रमाणे, 'मूलगामी चिंतन, तर्ककठोरता, अभ्यास व संशोधनपरता यांचा प्रत्यय आणून देणारे असेच त्यांचे 'बहिष्कृत भारता'तील अग्रलेख आहेत. सामाजिक क्रांतीचे रणशिंग त्यांनी 'बहिष्कृत भारत'मधील लेखनातून फुंकले.

त्यांच्या त्या वेळच्या लेखनातून त्यांच्या वेदना, प्रक्षोभ, विद्रोह, आक्रमकता, चीड, तळमळ आणि स्वाभिमानी व निग्रही मन व्यक्त झाले आहे. त्यांच्या लेखनात तर्कनिष्ठ वादकुशलतेबरोबरच संवेदनाबधिरतेवर घणाघाती प्रहार आहेत. त्यांचे सारेच लेखन विद्वत्प्रचुर असले तरी सुबोध, सुगम, अर्थवाही व शैलीदार आहे.'

'अस्पृश्यता व सत्याग्रहाची सिद्धी' या लेखामध्ये सत्य, सत्याग्रह यांसंबंधी डॉ. आंबेडकरांचे मौलिक चिंतन व्यक्त झाले आहे. 'महार वतनासंबंधी' त्यांनी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. महार वतन हे अस्पृश्यांच्या प्रगतीमधील अडसर आहेत. त्यामुळे स्वाभिमानशून्यता, विचारशून्यता व लाचारी येते, असे त्यांचे मत होते. 'हिंदूंचे धर्मशास्त्र, त्याचे क्षेत्र आणि त्याचे अधिकारी' या लेखामध्ये त्यांनी हिंदू धर्मशास्त्रांची व समाजरचनेची मर्मग्राही चिकित्सा केलेली आहे. हिंदुस्थानच्या गतवैभवाचा अनैतिहासिक गौरव डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हता. "हिंदू समाज हा अनेक वर्षे जगला आहे, तो केवळ गुलामांचे राष्ट्र म्हणून जगला आहे." असे परखड मत त्यांनी व्यक्त केले आहे. निर्भयपणे सत्य सांगणे हा त्यांचा विशेष गुण होता. त्यांची दृष्टी संशोधकाची, पिंड समाजशास्त्रज्ञाचा व वृत्ती समाजहितचिंतकाची होती. ते मानवी अधिकाराचे कट्टर पुरस्कर्ते व रक्षक होते. त्यांच्या संपूर्ण लेखनातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, सहिष्णुता, मानवी प्रतिष्ठा, इहवाद, बुद्धिवाद या आधुनिक जीवनतत्त्वांचा आविष्कार होतो.

डॉ. आंबेडकरांची भाषा रोखठोक, सुस्पष्ट, धारदार, मर्मभेदी आहे. 'मानवद्रोह' हा शब्द त्यांनी समर्पकपणे वापरला आहे. 'बोके संन्याशी', 'चट्टपट्टा', 'धूर्त कावळे', 'पाजी', 'बदमाश' इत्यादी बोलीभाषेतील जिवंत, रसरशीत शब्दांचा वापर करून ते लक्ष्यभेद करतात. त्यांच्या लेखांची शीर्षके अर्थपूर्ण आहेत. 'काकगर्जना', 'दास्यावलोकन', 'अस्पृश्यता निवारणा पोरखेळ', 'आधी कळस मग पाया' यांसारख्या शीर्षकांवरून लेखांच्या विषयाचे आकलन होते.

**गणेश अकाजी गवई** यांनी अमरावती येथून 'बहिष्कृत भारत' (१९२०) हे पत्र सुरू करून अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे लेखन केले. १९१९ ते १९२३ या काळात मध्य प्रांत, वऱ्हाड कौन्सिलचे सदस्य असताना त्यांनी दलितांच्या प्रश्नांवर विचार मांडले. अस्पृश्यांना मोफत शिक्षण, सर्व सवलती, पाणवठे खुले, सरकारी नोकऱ्यांत नेमणुका आदी मागण्या त्यांनी केल्या. धर्मांतर केल्याने जातिभेद नष्ट होणार नाही, असे परखड मत त्यांनी व्यक्त केले. **हरिभाऊ तोरणे** हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे कार्यकर्ते होते. व्यवसायाने शिक्षक असलेल्या तोरणे गुरुजींनी सामाजिक प्रबोधनाचे काम निष्ठेने केले. त्यांनी 'दीनमित्र', 'जनता' आदी पत्रांमधून लेखन केले. 'दीनमित्र'मध्ये 'वेसकर' या टोपणनावाने ते 'काठीचे सपाटे' हे सदर लिहीत. त्यांची 'चावडीतील बैठक' (१९२३), 'चोखामेळ्याची पंढरपूरवर स्वारी' आदी वैचारिक पुस्तके प्रसिद्ध आहेत. संस्कृत व मराठी साहित्याचा अभ्यास, भाषाप्रभुत्व, निर्भीडपणा, सत्यान्वेषी वृत्ती, तार्किक युक्तिवाद, उपहास-उपरोध आदी गुणविशेषांमुळे त्यांचे लेखन प्रभावी झाले आहे.

१९२० नंतरचे दलित वैचारिक साहित्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झाले आहे. या कालखंडातील दलित वैचारिक लेखन मुख्यतः दलितांचे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक प्रश्न मांडते. आंबेडकरांच्या पत्रकारितेची प्रेरणा घेऊन गरुड (संपा.

दादासाहेब शिर्के), 'पतितपावन' (संपा. पतितपावन दास), 'दलित बंधू' (संपा. पां. ना. राजभोज), 'महारठ्ठा' (संपा. एल. एन. हरिदास) इत्यादी पत्रांमधून समकालीन सामाजिक वास्तवाची चिकित्सा व दलित प्रश्नांची मांडणी केलेली आहे.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न: तुमच्या वाचनातील १९२० ते १९४७ या कालखंडातील स्त्रीलेखिकांच्या वैचारिक गद्याचे विशेष नोंदवा.

## ३अ.४ समारोप

१९२० ते १९४७ हा कालखंड आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये राजकीय व सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. या कालखंडात भारतीय स्वातंत्र्यलढा शिगेला पोहोचला व १९४७ साली देशाला स्वातंत्र्यप्राप्ती झाली. म. गांधींचे नेतृत्व व त्यांचे विचार यांचा लोकमानसावर खूप मोठा प्रभाव पडला. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक टप्प्यांमध्ये सर्वसामान्य लोकांचा अभूतपूर्व सहभाग होता. दुसऱ्या महायुद्धामुळे माणसांचा परस्परांवरील विश्वास व मानवी मूल्ये यांना तडा गेला. मानवी हक्क व अधिकारांचा विषय जगभर चर्चिला गेला व मान्यता पावला. या व अशा अनेक घटना-घडामोडींचा प्रभाव व परिणाम या कालखंडातील मराठी गद्यावर झालेला आढळून येतो. तसेच मार्क्सवाद, समाजवाद, गांधीवाद, रॉयवाद, मानवतावाद, हिंदुत्ववाद अशा विविध विचारप्रणाली व त्यांच्या प्रभावातून निर्माण झालेले वैचारिक गद्य मोठ्या प्रमाणावर आढळते.

लो. टिळकांच्या निधनानंतर (१९२०) न. चिं. केळकर, कृ. प्र. खाडिलकर आदींनी टिळकांची जहाल राष्ट्रवादी परंपरा पुढे चालविली. वि. दा. सावरकरांनी हिंदुत्ववादाबरोबरच विज्ञाननिष्ठेचा पुरस्कारही त्यांच्या लेखनातून केला. र. धों. कर्वे, श्री. म. माटे यांनी समाजसुधारणेचा जोरदार आग्रह आपल्या लेखनातून धरला. विनोबा भावे, साने गुरुजी, आचार्य शं. द. जावडेकर, दादा धर्माधिकारी, काका कालेलकर, आचार्य स. ज. भागवत वगैरेंनी गांधीवादी भूमिकेतून वैचारिक लेखन केले. लालजी पेंडसे या मार्क्सवादी विचारवंताने साहित्य आणि जीवन यांचा अनुबंध स्पष्ट करणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहून मार्क्सवादी समीक्षेचा पाया घातला. गं. बा. सरदार, पु. ग. सहस्रबुद्धे, प्रभाकर पाध्ये, द. य. केळकर आदींचे लेखन मराठी वैचारिक गद्याच्या कक्षा विस्तारणारे ठरले. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्म, तत्त्वज्ञान, समाज यांची चिकित्सा करणारे ग्रंथलेखन केले.

प्रेमाताई कंटक, मालतीबाई बेडेकर, कमलाबाई टिळक वगैरे स्त्रियांनी स्त्रीप्रश्नांवर लेखन केले; परंतु एकंदरीत पाहता स्त्रियांचे लेखन अत्यल्प प्रमाणात आढळते.

म. फुले व सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीच्या प्रेरणेतून प्रबोधनपर वैचारिक गद्याची एक परंपरा या काळात विकसित झालेली आढळते. मुकुंदराव पाटील, भास्करराव जाधव, केशवराव विचारे, भगवंतराव पाळेकर, श्रीपतराव शिंदे, के. सी. ठाकरे, खंडेराव बागल, माधवराव बागल, सावित्रीबाई रोडे, शंकरराव मोरे, शामराव देसाई, नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, गाडगे महाराज आदींचे लेखन, भाषणे वगैरेंमधून समाजसुधारणेचा पुरोगामी आशय सातत्याने अभिव्यक्त होत गेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित मुक्ती चळवळीने अस्पृश्यता, गुलामगिरी, शोषण यांची भेदक चिकित्सा करून मानवी समतेचा, बंधुतेचा व प्रतिष्ठेचा जोरदार पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मचिकित्सा, वर्णजातिचिकित्सा, समाजव्यवस्थेची पुनर्मांडणी, दलितांच्या प्रश्नांचे मूलगामी आकलन, आंतरविद्याशाखीय व्यासंग, भाषाप्रभुत्व, तर्कशुद्ध व टोकदार प्रतिपादन वगैरेंमुळे मराठी वैचारिक गद्यास एक वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे. बाबासाहेबांच्या प्रेरणेतून दलित, वैचारिक गद्याची एक परिवर्तनवादी परंपरा मराठीत निर्माण झाली आहे.

एकंदरीत पाहता, या कालखंडात विपुल प्रमाणात वैचारिक गद्यलेखन झालेले आढळते. या कालखंडामध्ये झालेल्या वैचारिक लेखनाने आधुनिक व पुरोगामी महाराष्ट्राची जडणघडण केलेली आहे. या कालखंडातील लेखनाचा प्रभाव आजपर्यंत पडलेला दिसून येतो.

## ३अ.५ सरावासाठी प्रश्न

**अ) बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न:**

१. संततिनियमनाचा प्रसार करण्यासाठी ‘समाजस्वास्थ्य’ हे नियतकालिक कोणी सुरू केले?

अ) र. धों. कर्वे

ब) श्री. व्यं. केतकर

क) श्री. म. माटे

ड) मालतीबाई बेडेकर

२. ‘आधुनिक भारत’ हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ) शं. द. जावडेकर

ब) दादा धर्माधिकारी

क) प्रेमाताई कंटक

ड) साने गुरुजी

३. ‘भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न’ हा महत्त्वपूर्ण ग्रंथ कोणाचा आहे?

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ब) धर्मानंद कोसंबी

क) विठ्ठल रामजी शिंदे

ड) चांगदेव खैरमोडे

४. ‘प्रबोधन’ या नियतकालिकामधून समाजसुधारणेचा विचार आक्रमकपणे कोणी मांडला?

अ) श्रीपतराव शिंदे

ब) मुकुंदराव पाटील

क) केशव सीताराम ठाकरे

ड) भगवंतराव पाळेकर

५. ‘मूकनायक’, ‘बहिष्कृत भारत’, ‘जनता’, ‘प्रबुद्ध भारत’ या नियतकालिकांमधून दलितांच्या प्रश्नांना कोणी वाचा फोडली?

अ) म. फुले

ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) गणेश अक्काजी गवई

ड) गोपाळबाबा वलंगकर

**उत्तरे:**

१. र. धों. कर्वे

२. शं. द. जावडेकर

३. विठ्ठल रामजी शिंदे

४. केशव सीताराम ठाकरे

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**ब) लघुत्तरी प्रश्न:**

१. १९२० ते १९४७ या कालखंडातील स्त्रियांच्या वैचारिक लेखनाचा थोडक्यात परामर्श घ्या.

२. वि. रा. शिंदे यांच्या लेखनाचा परिचय करून द्या.

३. वि. दा. सावरकरांच्या वैचारिक निबंधाचे स्वरूप स्पष्ट करा.

४. १९२० ते १९४७ या कालखंडातील वैचारिक गद्यात स्वातंत्र्यलढ्याचे प्रतिबिंब कसे पडले आहे ते थोडक्यात लिहा.

**क) दीर्घोत्तरी प्रश्न:**

१. १९२० ते १९४७ या कालखंडातील वैचारिक गद्याचा आढावा घ्या.

२. सत्यशोधकीय वैचारिक गद्याची परंपरा स्पष्ट करा.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित वैचारिक गद्याचे स्वरूपविशेष लिहा.

४. मराठी वैचारिक गद्यावरील गांधीवादाचा प्रभाव स्पष्ट करा.

## ३अ.६ संदर्भ ग्रंथ

१. आंबेकर, १९९९ : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास- निबंधवाङ्मय,' खंड पाचवा, भाग पहिला.

२. आळतेकर, म. मा. १९६३ : 'मराठी निबंध', सुविचार प्रकाशन, पुणे.

३. खांडेकर, वि. स., १९८० : 'समाज-चिन्तन'-वैचारिक निबंधांचा संग्रह, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

४. गायकवाड, सयाजीराव, २०१३ : 'सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड २', साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

५. जोग, रा. श्री. व इतर, २००२ : 'प्रदक्षिणा', खंड पहिला, काँटिनेंटल प्रकाशन, पुणे.

६. फडकुले, निर्मलकुमार ,२००४: 'प्रदक्षिणा', खंड २, संपा. अनिरुद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

७. भोळे, भा. ल. (संपा.), २०१० : 'विसाव्या शतकातील मराठी गद्य', खंड १, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

८. मंगूडकर, मा. प. (संपा.), २००२ : 'शिंदे लेखसंग्रह', ठोकळ प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९६३.

९. मून, वसंत (संपा), १९९० : 'डॉ. आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक', डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

१०. रेगे मे. पुं., १९९६ : प्रस्तावना, वैदिक संस्कृतीचा इतिहास, लक्ष्मणशास्त्री जोशी, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई.

munotes.in

११. शेणोलीकर, ह. श्री., १९८८ : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास-वैचारिक वाङ्मय'- खंड सहावा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

१२. सावरकर, वि. दा. १९५० : 'सावरकर साहित्य भाग १', मंगल साहित्य प्रकाशन, पुणे.

## ३अ.७ पूरक वाचन

१. एरंडे, अशोक : 'सत्यशोधक मुकुंदराव पाटील कृत धर्मचिकित्सा', सुगावा प्रकाशन, पुणे.

२. कीर, धनंजय व इतर (संपा.), २००६ : 'महात्मा फुले : समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे.

३. कुलकर्णी, गो. म. (संपा.), २००३ : 'मराठी वाङ्मयकोश', खंड दुसरा, भाग एक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

४. कुलकर्णी, गो. म., कुलकर्णी व. दि., १९८८ : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड सहावा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

५. खांडगे, मंदा व इतर, २००२: 'स्त्रीसाहित्याचा मागोवा', खंड १, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे.

६. गणोरकर, प्रभा व इतर (संपा.), १९९८ : 'संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश', (आरंभापासून ते १९२० पर्यंतचा कालखंड) जी. आर. भटकळ फौंडेशन, मुंबई.

७. डहाके, वसंत, २००८ : 'मराठी साहित्य: इतिहास आणि संस्कृती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

८. दडकर, जया व इतर (संपा.), १९९८ : 'संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश', (आरंभापासून ते १९२० पर्यंतचा कालखंड), जी. आर. भटकळ फौंडेशन, मुंबई.

९. दहातोंडे, भिकाजी नामदेव,: 'महर्षि विठ्ठल रामजी शिंदे : चिकित्सक लेखसंग्रह' पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

१०. देशपांडे, अ. ना., १९९२ : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ व २', व्हीनस प्रकाशन, पुणे.

११. पानतावणे, गंगाधर, १९९५. : 'दलित वैचारिक साहित्य', मुंबई विद्यापीठ, मुंबई.

१२. पानतावणे, गंगाधर (संपा.) : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख', प्रतिमा प्रकाशन, पुणे.

१३. फडके, य. दि. (संपा.), १९९४ : 'केतकर लेखसंग्रह', साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

१४. भोळे, भा. ल. (संपा.), २००६ : 'एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य', खंड २, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

munotes.in

१५. मून, वसंत व इतर (संपा.), २००२ : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे', खंड १८, भाग १, २, व ३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई.

१६. लेले, रा. के., १९८४ : 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', काँटिनेंटल प्रकाशन, पुणे.

१७. शिंदे, अरुण (संपा.), २०१२ : 'सत्यशोधकांचे शेतकरीविषयक विचार', दर्या प्रकाशन, पुणे.

१८. शिंदे, अरुण, २०१९ : 'सत्यशोधकीय नियतकालिके', कृष्णा संशोधन व विकास अकादमी, मंगळवेढा.

*****

munotes.in

# ३आ

## 'जातिसंस्थेचे उच्चाटन' - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**घटक रचना**

३आ.१ उद्दिष्टे

३आ.२ प्रस्तावना

३आ.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन आणि लेखन

३आ.४ 'जातिसंस्थेचे उच्चाटन' ग्रंथाची निर्मितिप्रक्रिया

३आ.५ 'जातिसंस्थेचे उच्चाटन' ग्रंथाचे स्वरूप

३आ.६ 'जातिसंस्थेचे उच्चाटन' ग्रंथामधील वैचारिकता

३आ.७ 'जातिसंस्थेचे उच्चाटन' ग्रंथावरील प्रतिक्रिया

३आ.८ समारोप

३आ.९ सरावासाठी प्रश्न

३आ.१० संदर्भ ग्रंथ

३आ.११ पूरक वाचन

## ३आ.१ उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन आणि वैचारिक लेखन समजून घेता येईल.
- 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथाची मौलिकता लक्षात येईल.
- 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथातील वैचारिकता ध्यानात येईल.
- 'जातिसंस्थचे उच्चाटन' या ग्रंथातील विचारांची समकालीन प्रस्तुतता समजेल.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखानाचे महत्त्व लक्षात येईल.

## ३आ.२ प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील महान दार्शनिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या रूपाने भारताला एक युगप्रवर्तक नेता, उर्जस्वी समाजचिंतक, क्रांतिकारी तत्त्ववेत्ता मिळाला. डॉ. आंबेडकरांनी आपल्या जीवनात केलेले कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. त्यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि वाङ्मयीन स्तरावरील त्यांचे कार्यकर्तृत्व महत्त्वाचे आहे. या कार्याला जोडूनच त्यांनी लिहिलेले ग्रंथ, त्यांची भाषणे, त्यांचा पत्रव्यवहार आणि त्यांचे विचार हे सुद्धा वैचारिक दस्तऐवज आहेत. डॉ. आंबेडकरांचे बहुतांश लेखन हे इंग्रजी भाषेतून आविष्कृत झालेले आहे. फक्त त्यांनी वृत्तपत्रातून लिहिलेले



munotes.in

काही लेखन मराठी भाषेतून आलेले आहे. असे असले तरी ते आज अनुवाद रूपाने मराठी बरोबरच इतर भारतीय भाषांमध्ये भाषांतरित झालेले आहे. विशेषत: शासकीय पातळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीच्या वतीने ते समग्रपणे उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. डॉ. आंबेडकरांच्या समग्र लेखनामधील एक महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'जातिसंस्थेचे उच्चाटन' होय. १९३६ मध्ये हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. विविध भारतीय भाषेमध्ये त्याचा अनुवाद प्रसिद्ध झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय जातिसंस्थेची केलेली मीमांसा मूलगामी स्वरूपाची असून या ग्रंथातून त्यांचे वैचारिक चिंतन आविष्कृत होते. त्यामुळे हा ग्रंथ मराठी वैचारिक साहित्यातील महत्त्वाची उपलब्धी आहे. प्रस्तुत घटकामध्ये आपण 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथाचे स्वरूप, त्यातील आशयसूत्रे आणि वैचारिकता लक्षात घेणार आहोत. मात्र तत्पूर्वी या ग्रंथाचे लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा व लेखन साहित्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

## ३आ.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन आणि लेखन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यांचे मूळ गाव कोकणातील 'आंबडवे', ता. मंडणगड, जि. रत्नागिरी हे होते. परंतु वडील रामजी मालोजी संकपाळ हे सैन्यात कार्यरत असल्यामुळे मध्यप्रदेशातील महू येथे असताना माता भिमाबाईच्या पोटी बाबासाहेबांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव भीमराव. लहानपणापासून भीमराव वडिलांच्या संस्कारात वाढले. शिक्षण घेतले. सातारा येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. पारंपरिक समाजव्यवस्थेतील अस्पृश्यतेचे अनुभव त्यांनाही भोगावे लागले. परंतु न डगमगता भिमरावांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पुढे परदेशी शिक्षण घेऊन उच्चविद्याविभूषीत पदव्या प्राप्त केल्या. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे. सामाजिक लढ्यासाठी त्याचा वापर होऊ शकतो हा विचार केंद्रवर्ती ठेवून बाबासाहेबांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजपरिवर्तनासाठी केला. सामान्यत: १९२० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सामाजिक चळवळीला सुरुवात केली. विविध प्रकारची आंदोलने, सत्याग्रह, निवेदने, ग्रंथलेखन, सामाजिक, राजकीय संघटना स्थापन करून दलितांच्या उत्थानासाठी निर्णायक क्रांतिकारी कार्य केले.

डॉ. आंबेडकरांनी २७ जानेवारी १९१९ मध्ये ब्रिटिशांनी नेमलेल्या साऊथबरी मतदान कमिटीसमोर निवेदनाच्या माध्यमातून सर्वप्रथम अस्पृश्यांच्या न्यायहक्कासाठीची मांडणी केली. त्यामध्ये त्यांनी अस्पृश्यांचे प्रतिनिधी स्वत: अस्पृश्यांनीच निवडलेले असले पाहिजेत अशी भूमिका मांडली. हा दलितांच्या राजकीय हक्काचा लढा बाबासाहेबांनी सुरू केला होता. त्याला सामाजिक परिवर्तनाचे अधिष्ठान होते. डॉ. आंबेडकरांनी पुढे २० जुलै १९२४ मध्ये सामाजिक जागृतीसाठी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' नावाची संघटना स्थापन केली. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे या संघटनेचे ब्रीदवाक्य होते. बाबासाहेबांनी या संघटनेच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी मूलभूत प्रयत्न केले.

डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाला सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी सर्वप्रथम सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला होता. त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून १९ व

२० मार्च १९२७ रोजी महाड येथे अस्पृश्य समाजाची परिषद घेतली. तेथे चवदार तळे सत्याग्रह केला. यामध्ये हजारो दलित सहभागी झाले होते. म्हणूनच या सत्याग्रहाला समतासंगर असे म्हटले जाते. पुढे त्यांनी १९३० मध्ये नाशिक येथील काळाराम मंदिरात सामुदायिक प्रवेश करण्याची घोषणा केली. २ मार्च १९३० रोजी या सत्याग्रहास सुरुवात झाली. तब्बल पाच वर्षे हा लढा चालूच होता. भाऊराव गायकवाड यांनी त्याचे नेतृत्व केले. दरम्यान ब्रिटीश सरकारने भारताला स्वातंत्र्य देण्याच्या भूमिकेतून भावी राज्यघटनेची चर्चा करण्यासाठी जी परिषद बोलावली होती, तिला गोलमेज परिषद असे म्हणतात. या परिषेदच्या एकूण तीन बैठका संपन्न झाल्या. या तीनही बैठकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले होते. पहिली गोलमेज परिषद नोव्हेंबर १९३० मध्ये लंडन येथे भरली. डॉ. आंबेडकरांनी यामध्ये सहभाग घेऊन दलितांच्या राजकीय अस्तित्वाविषयी मांडणी केली. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ तयार करून त्यांच्या मार्फतच अस्पृश्यांचे प्रतिनिधी निवडले गेले पाहिजे. अशी जोरदार भूमिका बाबासाहेबांनी मांडली. परंतु राष्ट्रीय काँग्रेसने या परिषदेवर बहिष्कार घातला. त्यामुळे दुसरी परिषद सप्टेंबर १९३१ रोजी बोलावण्यात आली. म. गांधी यांनी दुसऱ्या बैठकीत सहभाग घेतला. डॉ. आंबेडकरांच्या मागणीला त्यांनी विरोध केला. शेवटी नोव्हेंबर १९३२ मध्ये तिसरी गोलमेज परिषद बोलावण्यात आली. परंतु काँग्रेसने यावरही बहिष्कार घातला. याचा परिणाम म्हणजे ब्रिटिशांनी जातीय निवाडा जाहीर केला. त्याला 'कम्युनल अवार्ड' असे म्हणतात. यामध्ये दलित वर्गासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य करण्यात आली. याला म. गांधी यांनी गोलमेज परिषदेच्या निमित्ताने दलितांना मिळालेल्या स्वतंत्र मतदारसंघाला विरोध केला. सप्टेंबर १९३२ मध्ये ते पुणे येथील येरवडा कारागृहात उपोषणाला बसले. याचाच परिपाक म्हणजे 'पुणे करार' होय. डॉ. आंबेडकर आणि म. गांधी यांच्यात करार झाला. उपोषण समाप्त झाले. मात्र दलितांच्या हिताआड येणाऱ्या हिंदू समाजाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खात्री झाली की, ते दलितांना कधीही न्याय देणार नाहीत. यासाठीच त्यांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला याठिकाणी भरलेल्या प्रांतिक दलित परिषदेत, 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही', अशी घोषणा केली. जी ऐतिहासिक स्वरूपाची होती.

डॉ. आंबेडकरांनी राजकीय पक्षाच्या माध्यमातून आपली राजकीय चळवळ उभारली. १५ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' या राजकीय पक्षाची स्थापना करण्याची घोषणा केली. १९३५ ला ब्रिटीश संसदेने पारित कायद्यानुसार १९३७ मध्ये होणाऱ्या निवडणुका लक्षात घेऊन 'स्वतंत्र मजूर पक्षाची' मांडणी केली होती. याचा फायदा निवडणुकीत झाला. सर्व समाजातील लोकांना घेऊन बाबासाहेब निवडणुकीत उतरले. त्यामध्ये त्यांचे मुंबई विधानसभेत १६ आणि मध्यप्रांत आणि 'बेरार' विधीमंडळात ७ असे एकूण २३ प्रतिनिधी निवडून आले. हा आंबेडकरी चळवळीतील मोठा विजय होता. याचे पडसाद स्वाभाविकच सामाजिक पातळीवर पडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४२ मध्ये नागपूर येथे अस्पृश्यांची एक परिषद बोलावली. त्यामध्ये 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' या नावाचा राजकीय पक्ष स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले. शे.का.फे.च्या स्थापनेमुळे देशातील अस्पृश्य समाजाच्या मनात नवा विश्वास निर्माण झाला. सर्वत्र याची मार्चेबांधणी करण्यात आली. प्रत्येक राज्यात शाखा स्थापन करण्यात आल्या. अधिवेशने भरविण्यात आली. अस्पृश्य समाजाच्या स्वतंत्र राजकीय अस्तित्वाची मांडणी करण्यात

आली. १९४६ला सार्वत्रिक निवडणुका झाल्या. परंतु संयुक्त मतदार संघ पद्धती असल्यामुळे फेडरेशनचे उमेदवार पराभूत झाले. शे.का.फे राजकीय दृष्टिकोणातून अपयशी झाले असले तरी सामाजिकदृष्ट्या दलितांमध्ये एकोपा आणि संघर्ष करत राहण्याची जिद्द मात्र यातून मिळाली. पुढे डॉ. आंबेडकरांनी भारतीय रिपब्लिकन पक्षाची बांधणी केली. खुल्या पत्रातून त्याची घटना मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील एक महत्त्वाची उपलब्धी म्हणजे भारतीय संविधानाची निर्मिती होय. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. या स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यासाठी घटना समितीची स्थापना झाली. याचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. तर घटनेचा मसुदा तयार करण्याच्या समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. बाबासाहेबांनी अनेक दिवस कष्ट, परिश्रम करून लोकशाही विचारांवर आधारित भारतीय घटना तयार केली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी ती घटना मंजूर करण्यात आली. २६ जानेवारी १९५० पासून घटनेचा अंमल सुरू झाला. भारत एक लोकशाही देश म्हणून वाटचाल करू लागला. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. ४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयांयाबरोबर नागपूर येथे बौद्ध धम्माचा स्वीकार केला. वास्तविक हे धर्मांतर नव्हते तर ती एक सांस्कृतिक क्रांती होती, तिला धम्मक्रांती असे म्हणतात. बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर काही दिवसात म्हणजे ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र व्यक्तिमत्त्व आणि कार्यकर्तृत्व अद्वितीय होते. यामध्ये त्यांचे लेखन हा भागही अतिशय महत्त्वाचा आहे. ते उत्तम वक्ते आणि लेखक होते. त्यांच्या लेखन साहित्यात ग्रंथ, पुस्तके, प्रबंध, लेख, भाषणे, स्फुटलेखन, पत्रे, वृत्तपत्रातील लेखन इत्यादींचा समावेश होतो. यातील बहुतांश लेखन इंग्रजी भाषेतून लिहिलेले आहे. तर काही मराठी भाषेतून लेखन केलेले आहे. या सबंध लेखनातून त्यांच्या वैचारिकतेचा दार्शनिक आविष्कार होतो. विशेषत: यामध्ये मानव, समाज, संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान, विविध ज्ञानक्षेत्रांचे जागतिक पातळीवरील संदर्भ अभिव्यक्त होतात. डॉ. आंबेडकरांनी आपल्या ग्रंथातून केलेली विचारमांडणी कालातीत आहे. याचा आशय येथे थोडक्यात लक्षात घेता येईल.

'भारतातील जाती, त्यांची उत्पत्ती आणि विकास' हा डॉ. आंबेडकरांचा महत्त्वपूर्ण संशोधनपर निबंध आहे. ९ मे १९१६ रोजी कोलंबिया विद्यापीठात डॉ.ए.ए.गोल्डनवायझर मानववंशशास्त्र परिषदेत त्यांनी तो सादर केला. यामध्ये डॉ. आंबेडकरांनी भारतीय जातिसंस्थेच्या उत्पत्तीसंबंधीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण केले आहे. जाती कशा निर्माण झाल्या? त्या का टिकून आहेत? याबाबतचे मानववंशशास्त्रीय व समाजशास्त्रीय विवेचन त्यांनी येथे अतिशय मार्मिकपणे केलेले आहे. डॉ. आंबेडकरांनी यात आंतरजातीय विवाहाचा निषेध किंवा विवाह न आढळणे हेच जातिसंस्थेचे मूळ आहे. बहिर्विवाहावर अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच खरे तत्त्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत होत. असा निष्कर्ष मांडलेला आहे. एकंदरीतच भारतीय समाजव्यवस्थेची मूलगामी चिकित्सा त्यांनी अगदी तरुण वयात केली हे अतिशय महत्त्वाचे आहे.

'रुपयाचा प्रश्न' हा ग्रंथ डॉ. आंबेडकरांच्या 'द प्रॉब्लेम ऑफ द रूपी : इट्स ओरिजन अँड इटस सोल्यूशन' या इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद आहे. हा डॉ. आंबेडकरांचा शोधप्रबंध असून तो त्यांनी १९२२ मध्ये 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मध्ये 'डॉक्टर ऑफ सायन्स'च्या पदवीसाठी सादर केला होता. १९२३ मध्ये तो ग्रंथरूपाने प्रकाशित झाला. 'मुद्रा समस्याच्या अंतिम निर्णयात कशाप्रकारे ब्रिटीश शासनाने भारतीय रुपयाच्या किमतीला पाऊंडसोबत जोडून आपला जास्तीत जास्त फायदा होण्याचा मार्ग निवडला. यातून भारतीय नागरिकांना गंभीर आर्थिक समस्येला सामोरे जावे लागले' याची परखड मांडणी या ग्रंथात त्यांनी केलेली आहे.

'प्राचीन भारतातील क्रांती आणि प्रतिक्रांती' हा डॉ. आंबेडकरांचा महत्त्वाचा ग्रंथ आहे. तो त्यांच्या हयातीत अपूर्ण राहिला. परंतु पुढे १९८७ मध्ये 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे' खंड ३ मधून प्रसिद्ध झाला. या ग्रंथामध्ये त्यांनी ४१ प्रकरणे केलेली होती. त्यातील १३ प्रकरणे प्रकाशित झालेली आहेत. यात प्राचीन शासनप्रणाली, आर्यांची स्थिती, ब्राह्मणवाद, बुद्ध, त्यांचा सुधारणावादी दृष्टिकोण, बौद्ध धर्माची अवनती व ऱ्हास, ब्राह्मण धर्म, राज्यहत्या किंवा प्रतिक्रांतीचा जन्म, मनुस्मृतीतील प्रतिक्रांतीचे विचार, कृष्ण आणि गीता, ब्राह्मण विरुद्ध क्षत्रिय, शूद्र आणि प्रतिक्रांती, स्त्री आणि प्रतिक्रांती अशा विविधांगी विषयांवर भाष्य केलेले आहे. हा ऐतिहासिक स्वरूपाचा ग्रंथ आहे.

'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा डॉ. आंबेडकरांचा बहुचर्चित ग्रंथ १९४० मध्ये प्रकाशित झाला. यामध्ये त्यांनी राजकीय विचारांची प्रभावी मांडणी केलेली आहे. त्यावेळी भारताच्या फाळणीचा विषय भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी होता. संपूर्ण देशात अस्वस्थता होती. अशा प्रसंगी अतिशय सम्यक भूमिका घेऊन डॉ. आंबेडकरांनी पाकिस्तानविषयीचे विचार मांडले. पुढे याच ग्रंथाची दुसरी आवृत्ती १९४५ मध्ये 'पाकिस्तान ऑर पार्टिशन ऑफ इंडिया' या नावाने प्रकाशित करण्यात आली. सुरुवातीला हा ग्रंथ 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या नावाने प्रकाशित झाला होता. या ग्रंथाचे वेगळेपण म्हणजे यामधून त्यांनी भारतीय राजकारणातील सांप्रदायिक पैलूंची विश्लेषणात्मक मांडणी प्रभावीपणे केलेली आहे.

'शूद्र पूर्वी कोण होते' हा डॉ. आंबेडकरांचा महत्त्वाचा ग्रंथ १९४६ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथात त्यांनी भारतातील चातुर्वर्णाची परखड चिकित्सा करून शूद्र वर्णाच्या उत्पत्तीच्या इतिहासाचे विश्लेषण केले आहे. शूद्र शब्द हा ऐतिहासिक असून ज्यांना शूद्र म्हटले जाते ते सूर्यवंशी आर्य क्षत्रिय लोक होते, असे प्रतिपादन या ग्रंथातून त्यांनी केलेले आहे. या ग्रंथाचाच दुसरा भाग म्हणजे 'द अनटचेबल्स' हा ग्रंथ होय. शूद्र, अतिशूद्र आणि अस्पृश्य असा पट ते पुढे मांडत जातात.

'स्टेट अँड माइनॉरिटीज' म्हणजेच राज्य आणि अल्पसंख्यांक हा डॉ. आंबेडकरांचा ग्रंथ मार्च१९४७ मध्ये प्रकाशित झाला. यामध्ये त्यांनी भारतीय समाजाची समाजवादी रूपरेषा विशद केलेली आहे. भारतीय संविधानाच्या कलमांद्वारे राज्य समाजवादाला स्थापित केले जावे, त्याला संसदीय लोकतंत्राद्वारे व्यावहारिक पातळीवर घ्यावे, असे विचार मांडले. हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ आहे.

'अस्पृश्य : मूळचे कोण? आणि ते अस्पृश्य कसे बनले?' हा ग्रंथ १९४८ मध्ये प्रकाशित झाला आहे. यात अस्पृश्यता उत्पतीचा मूलगामी शोध घेतलेला आहे. यासाठी त्यांनी

प्राचीन ग्रंथांचे, इतिहासातील संदर्भ दिलेले आहेत. डॉ. आंबेडकरांच्या मते, अस्पृश्यतेचा उगम इ.स. चारशेच्या दरम्यान झाला. बौद्ध धर्म आणि ब्राह्मण धर्म यात श्रेष्ठत्वासाठी जो संघर्ष झाला त्यापासून अस्पृश्यतेचा जन्म झाला असे या ग्रंथात त्यांनी संदर्भासहित सिद्ध केले आहे.

'थॉट्स ऑफ लिंग्विस्टिक स्टेट्स' हा डॉ. आंबेडकरांचा १९५५ मध्ये प्रकाशित झालेला वेगळ्या विषयावरील महत्त्वाचा ग्रंथ आहे. यापूर्वी त्यांनी १९४८ रोजी 'महाराष्ट्र अ लिंग्विस्टिक प्रोव्हिन्स' म्हणजे 'महाराष्ट्र : एक भाषिक प्रांत' हा ग्रंथ लिहिलेला होता. त्यात भाषावार प्रांतरचनेच्या समस्येचा उहापोह केलेला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्याची निर्मिती भाषिक तत्त्वावर करण्यात आली. यातून बरेच पेचप्रसंग निर्माण झाले. यावर डॉ. आंबेडकरांनी आपले चिंतन 'थॉट्स ऑफ लिंग्विस्टिक स्टेट्स' या ग्रंथातून मांडले आहे. पाच भाग व अकरा प्रकरणे आणि त्याच्या स्पष्टीकरणासाठी पाच नकाशे व प्रमुख जातींची आकडेवारी त्यांनी परिशिष्टात दिलेली आहे. डॉ. आंबेडकरांनी राज्यांच्या भाषिक एकत्रीकरणाचे प्रभावी चित्रण केले असून 'एक राज्य, एक भाषा' या सार्वभौमिक सिद्धांताधारे संघटित राष्ट्र निर्माण होऊ शकते अशी व्यापक भूमिका त्यांनी या ग्रंथामध्ये मांडलेली आहे.

'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा डॉ. आंबेडकरांचा शेवटचा ग्रंथ आहे. १९५६ ला तो पूर्ण झाला असला तरी त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर म्हणजे १९५७ मध्ये तो प्रकाशित झाला. ज्याप्रमाणे प्रत्येक धर्माचा धर्मग्रंथ असतो त्याचप्रमाणे बौद्ध धम्माचाही एक धर्मग्रंथ असावा या हेतूने या ग्रंथाची रचना त्यांनी केली. हा ग्रंथ एकूण आठ खंडात विभागलेला आहे. पहिल्या खंडात सिद्धार्थ गौतम हे बुद्ध कसे झाले याचे सविस्तर वर्णन पंचेचाळीस प्रकरणांमध्ये करण्यात आले आहे. दुसरा खंड 'धम्मदीक्षा अभियान' या शीर्षकाचा असून त्यात बुद्धांनी विविध लोकांना दिलेल्या धम्मदीक्षेचा आलेख आलेला आहे. तिसरा खंड बुद्धाची शिकवण मांडणारा आहे. चौथा खंड 'धर्म आणि धम्म' यातील भेद विशद करतो. पाचवा खंड 'संघ' या शीर्षकाचा असून त्यात संघाची कार्ये विशद केलेली आहेत. सहाव्या खंडात बुद्ध आणि त्याचे समकालीन यांची चरित्रे आहेत. सातवा खंड 'महान परिव्राजकाची अंतिम यात्रा' या शीर्षकाचा असून त्यात बुद्धाच्या अंतिम जीवनाचे चित्रण येते. अंतिम आठवा खंड 'महामानव सिद्धार्थ गौतम' या शीर्षकाचा असून यात त्यांचे क्रांतिकारकत्व आविष्कृत केलेले आहे.

वरील सर्व ग्रंथाबरोबरच डॉ. आंबेडकरांचे 'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीती' (१९१५), 'जातीचा पेच आणि तो सोडविण्याचा मार्ग' (१९४६), 'हिंदू धर्मातील कोडे' (१९८७) 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' (१९६५), 'संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य', 'मिस्टर गांधी अँड द इमॅन्सिपेशन ऑफ द अनटचेबल्स' (१९४३) 'रानडे, गांधी आणि जीना', 'गांधी आणि काँग्रेसने अस्पृश्यांसाठी काय केले?' (१९४५) 'स्मॉल होल्डिंग इन इंडिया अँड देअर रेमिडिज' (१९१८) 'पाली व्याकरण' (१९९८), 'बुद्ध की कार्ल मार्क्स वेटिंग फॉर अ व्हिसा' (चरित्रात्मक पुस्तिका १९३५-३६) असे विविधांगी लेखन केलेले आहे. हे सर्व लेखन डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक चिंतनाचा दार्शनिक आविष्कार आहे. त्यातून ऐतिहासिक मांडणी, क्रांतिकारक सिद्धांतन आणि समग्र मानवी कल्याणाचा विचार येतो. त्यामुळे या ग्रंथरचनांना आंबेडकरी विचार साहित्यात पायाभूत स्थान आहे.

munotes.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे झुंजार पत्रकार होते. त्यांनी 'मूकनायक' (१९२०), 'बहिष्कृत भारत' (१९२७), 'समता' (१९२९) 'जनता' (१९३०), 'प्रबुद्ध भारत' (१९५६) ही वृत्तपत्रे चालविली. या पत्रकांमधून त्यांनी मराठीतून लेखन केलेले आहे. डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता ही सामाजिक प्रबोधन आणि सामाजिक न्याय या तत्त्वांचा आग्रह धरणारी होती. तिने जनकल्याणाचा ध्येयवाद जपला होता. या वृत्तपत्रांमधील डॉ. आंबेडकरांचे लेखन म्हणजे शैलीचा उत्तम नमुना आहे. त्यांची भाषाशैली रोखठोक आहे. त्यात वाङ्मयीन सौंदर्याबरोबरच विचारसौंदर्यही आहे. विशेषत: त्यातील संवादीपणा फार महत्त्वाचा आहे. ते आपल्या लेखनातून एकाचवेळी अस्पृश्य व स्पृश्य समाजाशी संवाद साधतात. याबरोबरच त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनात समाजसमीक्षा, रचनात्मकता, दंभस्फोटकता, अमोघ व मार्मिक युक्तिवाद, उपरोधगर्भता, सूक्ष्म निरीक्षण, नि:संदिग्धता, निश्चयात्मकता व निर्धार, समुचित दृष्टांत, कथांचा समर्पक वापर, चिंतनशीलता व विचारभाष्ये, अर्थवाही शब्दयोजना, सुभाषित सदृशता, सूचक व अर्थगर्भ शीर्षके इ. विशेष येतात. असे डॉ. गंगाधर पानतावणे यांनी मांडलेली आहेत. डॉ. आंबेडकरांचे वृत्तपत्रीय कार्य त्यांच्या चळवळीचा अविभाज्य भाग होता. त्यांची वृत्तपत्रे ही चळवळीची मुखपत्रे होती. त्यांना इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे.

डॉ. आंबेडकरांची भाषणे ही आंबेडकरी चळवळीचा दस्तऐवज आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रकाशित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे' या खंडामध्ये ही भाषणे प्रकाशित झालेली आहेत. तत्कालीन सामाजिक जीवनामध्ये असणारे विविध अंतर्विरोध त्यांनी परखडपणे यात मांडलेले असून भारतीय समाजव्यवस्थेची मूलगामी चिकित्सा यात विशद केलेली आहे. डॉ. आंबेडकर हे निष्णात वक्ते होते. त्यांच्या वक्तृत्वाचा आलेख बहुश्रुत होता. चिंतनशील, विश्लेषक, टीकात्मक आणि दूरगामी विचार इ. त्याची वैशिष्ट्ये सांगता येतात.

एकुणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे युगनायक होते. त्यांनी या देशातील दलितांच्याच नव्हे तर भारतीय समाजाच्या जीवनात अमूलाग्र बदल घडविला. आपल्या कार्यातून नवा काळ उभा केला. नवे अस्मितादर्शन घडविले. त्यांनी आपल्या ग्रंथातून, लेखनातून, भाषणातून इतिहास घडविला. त्यामुळेच आंबेडकरपर्व हे भारतीय इतिहासातील सुवर्णयुग आहे.

## ३आ.४ 'जातिसंस्थेचे उच्चाटन' ग्रंथाची निर्मितिप्रक्रिया

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्यकर्तृत्व लक्षात घेतल्यानंतर आपल्या लक्षात येते की, त्यांचे सबंध जीवन भारतातील दलित, शोषित, वंचित समूहांच्या उत्थानासाठी समर्पित होते. या सर्व समूहांना जातिसंस्थेने बंदिस्त केले होते. ही जात या समूहांच्या प्रगतीमधील प्रमुख अडथळा होता. म्हणून डॉ. आंबेडकरांनी सातत्याने जातिसंस्थेची चिकित्सा केली. या चिकित्सेचा मूलगामी आविष्कार म्हणजे त्यांचा 'जातिसंस्थेचे उच्चाटन' हा ग्रंथ होय.

डॉ. आंबेडकरांनी १५ मे १९३६ मध्ये 'अनहिलेशन ऑफ कास्ट' या नावाचे पुस्तक प्रकाशित केले. त्यांचा मराठी अनुवाद पुढे 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या नावाने प्रकाशित झाला. हा ग्रंथ म्हणजे डॉ. आंबेडकरांनी लाहोर येथील जात-पात तोडक मंडळाच्या वार्षिक

अधिवेशनाच्या अध्यक्षीय पदासाठी तयार केलेले भाषण होते. परंतु भाषणातील काही भागाविषयी अधिवेशन संयोजक व डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये मतभेद झाले. अधिवेशन होऊ शकले नाही. मात्र डॉ. आंबेडकरांनी अत्यंत परिश्रम घेऊन तयार केलेले भाषण स्वत: ग्रंथरूपाने प्रकाशित केले. कारण जातिसंस्थेविषयी अत्यंत परखडपणे केलेले चिंतन सर्व लोकांपर्यंत पोहचणे गरजेचे होते. या ग्रंथाच्या निर्मितीची पार्श्वभूमी अत्यंत महत्त्वाची आहे. डॉ. आंबेडकरांनी ग्रंथांच्या उपोद्घातात याची तपशीलवार मांडणी केलेली आहे. या मांडणीतून त्यांची परखड वैचारिक भूमिका दिसते. तसेच प्रस्थापित समूहांचा सामाजिक सुधारणेचा मुखवटाही उजागर होतो.

'जात-पात तोडक' मंडळाची स्थापना १९२२ मध्ये लाहोर येथे झाली. भारतीय वर्णाश्रम धर्मातील जातीय विषमता नष्ट व्हावी यासाठी काही तरुणांनी एकत्र येऊन या मंडळाची स्थापना केली. त्यामध्ये भाई परमानंद, संतराम बी.ए. हे प्रमुख होते. मंडळाचा उद्देश व कार्यपद्धती अत्यंत सकारात्मक असली तरी मंडळातील सदस्यांमध्ये मतभिन्नता होती. संतराम बी.ए आणि डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध होता. कारण डॉ. आंबेडकरांनी जातिसंस्थेच्या विरोधात आंदोलन चालविलेले होते. तसेच आपल्या लिखानातून भारतातील जातींविषयी मूलभूत मांडणी केली होती. 'चवदार तळे सत्याग्रह', 'काळाराम मंदिर सत्याग्रह', 'गोलमेज परिषद' आणि 'पुणे करारा'नंतर डॉ. आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला येथील परिषदेत 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी घोषणा केली. या घोषणेचे पडसाद सर्वत्र उमटले. दरम्यान 'जात-पात तोडक' मंडळाने १९३५ मध्ये डॉ. आंबेडकरांना भाषणासाठी निमंत्रित करण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे १२ डिसेंबर १९३५ रोजी तसे निमंत्रण डॉ. आंबेडकरांना देण्यात आले. या संदर्भात मंडळाचे सचिव श्री. संतराम यांनी डॉ. आंबेडकरांना पत्र पाठविले. त्या पत्रात ते लिहितात, "प्रिय डॉक्टर साहेब, ५ डिसेंबरच्या आपल्या पत्राबद्दल अनेक धन्यवाद. आपल्या संमतीशिवाय, त्यात काही हानीकारक न वाटल्यामुळे, मी ते वृत्तपत्रांना प्रसिद्धीसाठी दिले त्याबद्दल मी आपली क्षमा मागतो. आपण थोर विचारवंत आहात आणि जातीच्या समस्येचा आपल्या एवढा सखोल अभ्यास इतर कुणीही केलेला नाही, असे माझे पूर्ण विचारांती झालेले मत आहे. आपल्या मतांचा मला स्वत:ला आणि आमच्या मंडळाला नेहमी लाभ झालेला आहे. मी त्या मतांचे 'क्रांती' मधून अनेक वेळा स्पष्टीकरण केलेले आहे व त्याचा प्रचार केलेला आहे. तसेच अनेक परिषदांमधून मी त्यावर व्याख्याने दिली आहेत. "जातिसंस्था ज्यावर उभी आहे त्या धार्मिक जाणिवांचा समूळ विनाश केल्याशिवाय जाती निर्मूलन शक्य नाही" या आपल्या नव्या सिद्धांताचे तपशीलवार विवरण वाचण्यास मी अगदी आतूर आहे. कृपया आपल्या सोईने लवकरात लवकर या प्रारूपाचे सविस्तर विवेचन करावे म्हणजे आम्हाला ती समजून घेऊन वृत्तपत्रे तसेच सभा संमेलनामधून तिच्यावर भर देता येईल. सद्या ते प्रारूप आम्हाला पूर्णपणे कळले नाही. आमच्या वार्षिक परिषदेचे अध्यक्षपद आपण भूषवावे असा आमच्या कार्यकारणी समितीचा आग्रह आहे. आपल्या सोयीनुसार आम्ही ठरलेल्या तारखाही बदलू शकतो. पंजाबातील स्वतंत्र विचाराचे हरिजन आपणास भेटून त्यांच्या योजनाबाबत चर्चा करण्यास खूप उत्सुक आहेत. आपण आमच्या विनंतीला मान देऊन परिषदेचे अध्यक्षपद भूषविण्यासाठी लाहोरला येण्याचे मान्य केले तर त्यामुळे दुहेरी उद्दिष्ट साध्य होईल. विभिन्न विचार प्रवाह मानणाऱ्या सर्व हरिजन नेत्यांना आम्ही निमंत्रित करू आणि त्यानिमित्ताने त्यांना आपले विचार ऐकण्याची संधी मिळेल. आपण

munotes.in

आमचे आमंत्रण स्वीकारावे म्हणून पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने मुंबईत ख्रिसमसच्या काळात आपणास भेटून आपल्याशी समग्र परिस्थितीची चर्चा करण्यासाठी मंडळाने आमचे साहाय्यक सचिव श्री. इंद्रसिंह यांची नियुक्ती केली आहे." वरील पत्राप्रमाणे मे १९३६ मध्ये लाहोर येथील अधिवेशनासाठी मंडळाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यक्षपदी निवड केली.

जाती कशा तोडाव्यात? या प्रश्नाची मूलभूत मांडणी डॉ. आंबेडकरांनी करावी अशी मंडळाची अपेक्षा होती. तसेच जातीच्या संदर्भात बऱ्याच वेळा विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना मंडळातील सदस्य समाधानकारक उत्तरे देऊ शकत नव्हती. अशा प्रश्नांची यादी करून ती मंडळाने डॉ. आंबेडकरांना पाठवली होती. या सर्वांचा तपशीलवार आढावा घेत डॉ. आंबेडकरांनी लिखित रूपातील भाषण तयार केले. दरम्यान भाषण कुठे छापावे यावरून संयोजक व डॉ. आंबेडकर यांच्यात चर्चा झाली. डॉ. आंबेडकरांचे मत होते की, ते मुंबईत छापून घ्यावे तर संयोजक ते लाहोरमध्ये छापण्यासाठी आग्रही होते. त्यामागे संयोजकांना भाषणातील आशय अगोदर जाणून घेण्याची इच्छा होती. शेवटी भाषण मुंबईत छापण्याचे ठरले. दरम्यान डॉ.आंबेडकरांच्या येवला येथील घोषणेचा संदर्भ घेऊन मंडळाच्या सदस्यांमध्ये मतभेद निर्माण झाले. भाई परमानंद, महात्मा हंसराज, डॉ. गोकलचंद नारंग, राज नरेंद्रनाथ इ. हिंदू पुढाऱ्यांनी मंडळापासून फारकत घेतली; परंतु मंडळाच्या चालकांनी अध्यक्षपद डॉ.आंबेडकरांनाच देण्याचा आग्रह घेतला. त्यात संतराम आघाडीवर असल्याचे पत्र डॉ. आंबेडकांना पाठविण्यात आले. तसेच मंडळाने हर भगवान यांना ९ एप्रिल १९३६ रोजी मुंबईला पाठवले व भाषणाची प्रत मिळविली. हर भगवान यांनी ती प्रवासात वाचली. व डॉ. आंबेडकांना १४ एप्रिल १९३६ ला पत्र लिहिले. त्यामध्ये ते लिहितात, प्रिय डॉक्टर साहेब, मी आपले भाषण श्री. संतराम यांच्याकडे भाषांतरासाठी दिले आहे. त्यांना ते खूप आवडले. परंतु २५ तारखेपूर्वी छापण्याइतपत लवकर त्याचे भाषांतर करून होईल की नाही याबद्दल त्यांना खात्री नाही. काही झाले तरी त्याला विस्तृत प्रसिद्धी मिळेल. त्यामुळे गाढ झोपेत असलेल्या हिंदू समाजाला ते खडबडून जागे करील अशी आम्हाला खात्री आहे. मी आपल्याला मुंबईत दाखविलेले भाषणातील परिच्छेद आमच्या काही मित्रांनी वाचले. त्यांनाही ते थोडेसे खटकले. ही परिषद निर्विघ्नपणे पार पडावी अशी ज्यांची इच्छा आहे, त्यांना कमीत कमी 'वेद' हा शब्द सध्यापुरता त्यातून वगळावा असे वाटते. ही बाब मी आपल्या सदविचारावर सोडतो मात्र आपल्या समारोपाच्या परिच्छेदामध्ये, भाषणात व्यक्त झालेली मते आपली स्वत:ची आहेत, त्याची कुठलीही जबाबदारी मंडळावर नाही, असे आपण स्पष्ट कराल अशी मला आशा आहे. माझे हे विचार आपण मनावर घेणार नाही तसेच भाषणाच्या एक हजार प्रती पाठवाल अशी आशा आहे.' हर भगवान यांच्या वरील पत्रावरून डॉ. आंबेडकरांच्या भाषणाविषयी मंडळाच्या सदस्यांची नाराजी स्पष्टपणे दिसते. त्यामुळे लगेच २२ एप्रिल १९३६ ला दुसरे पत्र डॉ. आंबेडकरांना आले. हे पत्र दीर्घ असून त्यातून स्पष्टपणे मंडळाने आपली भूमिका मांडलेली आहे. विशेषत: डॉ. आंबेडकरांच्या भाषणातील मताशी असहमती दर्शवून त्यात बदल करण्याचा आग्रह धरला. शेवटी बदल न केल्यास परिषद घेणे आम्हास शक्य नाही असे म्हटले.

डॉ. आंबेडकरांनी 'जात-पात तोडक' मंडळास २७ एप्रिल १९३६ रोजी शेवटचे पत्र लिहिले. त्यामध्ये त्यांनी या परिषदेच्या निमित्ताने झालेल्या सर्व घडामोडींचा त्यामागील मानसिकतेचा परखड शब्दात समाचार घेतला. पत्रात ते लिहितात, 'प्रिय श्री. हर भगवान,

आपले २२ एप्रिलचे पत्र मला मिळाले. मी भाषण जसेच्या तसे छापण्याचा आग्रह धरला तर, जात-पात तोडक मंडळाची स्वागत समिती अनिश्चित काळासाठी परिषद तहकूब करणे पसंत करील हे वाचून खेद वाटला. मला गुळमुळीत शब्द वापरणे आवडत नाही, माझे रोखठोक उत्तर असे आहे की, जर मंडळ आपल्या सोयीनुसार माझ्या भाषणात काटछाट करण्याचा आग्रह धरीत असेल तर मला सुद्धा ती परिषद रद्द झालेलीच आवडेल. आपल्याला माझा निर्णय कदाचित आवडणार नाही. परंतु परिषदेचे अध्यक्षपद भूषविण्याच्या सन्मानाखातर आपले भाषण तयार करण्यात प्रत्येक अध्यक्षाला हवे असलेले स्वातंत्र्य मी गमावू शकत नाही. ज्या परिषदेचे अध्यक्षपद तो भूषवितो त्या परिषदेला त्याच्या मताप्रमाणे योग्य आणि अचूक दिशा देण्याचे अध्यक्षाचे कर्तव्य असते. मंडळाला खूश करण्यासाठी मी त्याचा त्याग करू शकत नाही. प्रश्न तत्त्वाचा आहे आणि त्यात कोणत्याही प्रकारे तडजोड होईल असे काहीही करता कामा नये असे मला वाटते.

स्वागत समितीने घेतलेल्या निर्णयाच्या औचित्यासंदर्भातील वादात मी पडलो नसतो. परंतु आपण जी कारणे दिली आहेत त्यातून माझ्या माथी खापर फोडण्याचे जाणवते म्हणून मला त्याचे उत्तर देणे भाग आहे. भाषणाच्या ज्या भागाला समितीने आक्षेप घेतला त्यातील मते मंडळाला नवीन होती हा समज प्रथमत: दूर केला पाहिजे. आंतरजातीय सहभोजन किंवा आंतरजातीय विवाह नव्हे तर ज्यावर जातिव्यवस्था उभारलेली आहे त्या धार्मिक कल्पनांचा विनाश करणे ही जातिव्यवस्था उद्ध्वस्त करण्याची खरी पद्धत आहे असे श्री. संत राम यांच्या एका पत्राच्या उत्तरात मी म्हणालो होतो, याला श्री. संत राम निश्चितपणे दुजोरा देतील. त्यावर श्री. संत राम यांनी तो अभिनव दृष्टिकोण अधिक स्पष्ट करण्यास सांगितले. पत्रात मी जे एका वाक्यात लिहिले होते ते भाषणात विस्ताराने मांडलेच पाहिजे असे मला पत्रातील सूचनेमुळे वाटले. त्यामुळे व्यक्त केलेली मते नवीन आहेत असे आपण म्हणू शकत नाही. निदान आपल्या मंडळाने स्फूर्तीदाते आणि मार्गदर्शक श्री. संत राम यांच्यासाठी तरी ती नवीन नाहीत. मी याहीपुढे जाऊन असे म्हणेन की माझ्या भाषणाचा भाग मी केवळ अपेक्षित असल्यामुळे लिहिलेला नाही. युक्तिवाद पूर्ण होण्यासाठी तो नितांत आवश्यक आहे असे मला वाटल्यामुळे मी तो लिहिला. समितीला आक्षेपार्ह वाटलेल्या माझ्या भाषणाच्या भागांचे वर्णन आपण 'असंबद्ध आणि मुद्द्यांना सोडून' असे केलेले वाचून मी थक्क झालो. मी एक वकील आहे आणि सुसंबद्धतेचे नियम मला आपल्या समितीच्या कोणत्याही सदस्याएवढेच चांगले माहीत आहेत. मी हे ठामपणे नमूद करू इच्छितो की, आक्षेप घेतला गेलेला भाग हा केवळ सुसंगत आहे एवढेच नव्हे तर तो महत्त्वाचा सुद्धा आहे. भाषणाच्या त्या भागातच मी जातिव्यवस्था मोडण्याचा मार्ग आणि साधने या संबंधी चर्चा केली आहे. जाती विध्वंसाची सर्वोत्कृष्ट पद्धती म्हणून ज्या निष्कर्षाप्रत आलो आहे तो बहुतेक धक्कादायक आणि दु:खदायक ठरला असावा. माझे विश्लेषण चुकीचे आहे असे म्हणण्याचा आपल्याला जरूर अधिकार आहे. परंतु जातीच्या प्रश्नासंबंधी भाषणात जात कशी नष्ट करायची हे सांगण्याची मला मुभा नाही असे आपण म्हणू शकत नाही.

आपली दुसरी तक्रार भाषणाच्या लांबीसंबंधी आहे. या आरोपाबाबत दोषी असल्याचे मी भाषणातच कबूल केले आहे. परंतु त्यासाठी खरोबरच कोण जबाबदार आहे? मला असे वाटते की, आपण या घडामोडींमध्ये थोडे उशिरा सहभागी झाले आहात; अन्यथा आपल्यालाही जाणीव असती की, मुळात मी माझ्या सोयीसाठी छोटे भाषण लिहिण्याचे योजिले होते. कारण सविस्तर प्रबंध लिहिण्यात स्वत:ला गुंतवून ठेवण्याएवढा वेळ आणि

शक्ती या दोन्हीही माझ्याकडे नव्हत्या. मंडळानेच मला विषयाची सविस्तर मांडणी करण्यास सांगितले. मंडळाने मला प्रश्नांची एक यादी पाठविली आणि माझ्या भाषणात मी त्यांची उत्तरे द्यावीत असे सांगितले, कारण मंडळ आणि त्यांच्या विरोधामध्ये होणाऱ्या जातिव्यवस्थेसंदर्भातील सार्वजनिक चर्चेत हे प्रश्न नेहमी उपस्थित केले जात होते आणि मंडळाला त्यांची समाधानकारक उत्तरे देत येत नव्हती. या संदर्भातील मंडळाची इच्छा पूर्ण करण्याच्या प्रयत्नात भाषणाची लांबी वाढली आहे. माझे म्हणणे विचारात घेतल्यानंतर भाषणाच्या लांबीसंबंधीचा दोष माझा नाही याच्याशी आपण सहमत व्हाल अशी मला खात्री आहे.

हिंदू धर्माच्या विनाशाविषयी बोलल्यामुळे आपले मंडळ एवढे अस्वस्थ होईल अशी मला अपेक्षा नव्हती. केवळ मूर्खच शब्दाला घाबरतात अशी माझी धारणा होती. परंतु लोकांचा चुकीचा ग्रह होऊ नये म्हणून मी धर्म आणि धर्माचा विनाश याचा काय अर्थ घेतो ते विस्ताराने मांडण्यासाठी अपार कष्ट घेतले आहेत. माझे भाषण वाचल्यानंतर सोबत स्पष्टीकरण दिलेले असताना सुद्धा निव्वळ 'धर्माचा विनाश इत्यादी' सारख्या शब्दांनीच मंडळाच्या उरात धडकी भरल्यामुळे माझ्या लेखी मंडळाची पत फारशी वाढलेली नाही. जे लोक सुधारकाची भूमिका घेतात आणि ते कृतीत उतरविण्याचे तर सोडा त्याची तर्कशुद्ध निष्पत्ती पहाण्याचेही नाकारतात अशांविषयी कुणालाच आस्था किंवा आदर वाटू शकत नाही.

भाषण तयार करण्यासंदर्भात स्वत:ला कसल्याही प्रकारच्या मर्यादा घालून घेण्याचे मी कधीच मान्य केले नाही याच्याशी आपणही सहमत व्हाल. भाषणात काय असावे किंवा असू नये या प्रश्नासंबंधी मी आणि मंडळामध्ये कधी चर्चासुद्धा झाली नव्हती. त्या विषयावर माझी जी काय मते आहेत ती व्यक्त करण्याचे मला पूर्ण स्वातंत्र्य आहे असेच मी नेहमी गृहीत धरले होते. वस्तुत: तुम्ही ९ एप्रिलला मुंबईस येईपर्यंत मी कोणत्याप्रकारचे भाषण तयार करीत आहे, हे मंडळाला कल्पनाही नव्हती. आपण मुंबईला आलात तेव्हा मी आपणास स्वत:हून सांगितले की, पददलित वर्गाच्या धर्मांतरसंबंधी माझ्या मतांचे समर्थन करण्याकरिता आपल्या मंचाचा उपयोग करण्याची माझी इच्छा नाही. मला असे वाटते की, भाषण तयार करताना ते वचन मी अत्यंत काटेकोरपणे पाळलेले आहे 'मी इथे असणार नाही मी दिलगीर आहे इत्यादी' अशा अप्रत्यक्ष स्वरूपाच्या जाता जाता केलेल्या उल्लेखापलीकडे त्या विषयासंबंधी माझ्या भाषणात मी काहीही म्हटले नाही. अशा ओझरत्या आणि अप्रत्यक्ष उल्लेखालाही आपला आक्षेप आहे असे जेव्हा मी पहातो तेव्हा मला असे विचारावेसे वाटते की, आपल्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारण्यास संमती देण्यात मी पददलितांच्या धर्मांतरासंबंधी माझी मते प्रलंबित करण्यास किंवा सोडून देण्यास संमती देईन असे आपणास वाटले की काय? आपणास तसे वाटले असल्यास, मला आपणास सांगितले पाहिजे की, आपल्याकडून झालेल्या चुकीच्या समजुतीला मी कोणत्याही प्रकारे जबाबदार नाही. अध्यक्ष म्हणून मला निवडून दिलेल्या सन्मानाच्या मोबदल्यात मला धर्मपरिवर्तनाच्या कार्यक्रमाशी माझी बांधिलकी सोडून द्यावी लागेल, अशी अगदी पुसटशी कल्पना आपल्यापैकी कुणी मला दिली असती तर मी आपल्याला अगदी स्पष्ट शब्दात सांगितले असते की आपल्याकडून मिळणाऱ्या कुठल्याही सन्मानापेक्षा मला माझ्या विचारांची अधिक पर्वा आहे.

आपल्या १४ तारखेच्या पत्रानंतर आलेल्या या पत्राचे मला आश्चर्य वाटले, जो कोणी ते वाचेल त्यालाही असेच वाटेल याची मला खात्री आहे. स्वागत समितीचे आपल्या भूमिकेपासून अचानक घुमजाव का केले आहे हे मला कळत नाही. आपण १४ तारखेला पत्र लिहिले तेव्हा समितीसमोर असलेला कच्चा मसुदा आणि ज्यावर समितीने निर्णय घेऊन मी उत्तर देत असलेल्या पत्राद्वारे मला कळविला तो अंतिम मसुदा या दोहोत आशयाच्या दृष्टीने काहीही तफावत नाही. पूर्वीच्या मसुद्यात समाविष्ट नसलेली एकही नवीन कल्पना तुम्ही अंतिम मुसद्यात दाखवू शकत नाही. कल्पना त्याच आहेत. अंतिम मुसद्यात त्या अधिक विस्ताराने काळजीपूर्वक तयार करून मांडल्या आहेत, एवढाच काय तो फरक आहे. जर भाषणात काही आक्षेपार्ह असते तर आपण तसे १४ तारखेला सांगू शकला असता. परंतु, आपण तसे सांगितले नाही. उलट आपण केलेल्या मौखिक सूचना पाळायच्या किंवा नाही हे ठरविण्याचे स्वातंत्र्य मला देऊन आपण माझ्याकडून एक हजार प्रती छापून घेतल्या, त्या आता माझ्याकडे पडून आहेत. आठ दिवसानंतर आपण पत्र लिहून सांगता की भाषणावर आपला आक्षेप आहे आणि जर त्यात दुरुस्त्या केल्या नाहीत तर परिषद रद्द करण्यात येईल. आपणास हे माहीत असायला हवे होते की, भाषणात कोणताही बदल केला जाण्याची अजिबात आशा नव्हती. आपण मुंबईत होता तेव्हा मी आपणास सांगितले होते की, मी स्वल्पविरामसुद्धा बदलणार नाही, मी माझ्या भाषणावर निर्बंध घालू देणार नाही, ते भाषण माझ्याकडून जसे येईल तसे आपल्याला स्वीकारावे लागेल. माझ्या मतांची जबाबदारी घ्यावी लागण्यापासून मंडळाला मुक्त करण्यासाठी मी एवढा उत्सुक होतो की, मी हेही सांगितले होते की, व्यक्त झालेल्या विचारांची जबाबदारी सर्वस्वी माझी आहे आणि जर ते परिषदेला आवडली नाहीत तर परिषदेने त्याचा निषेध करणारा ठराव पास केला तरी मी अजिबात वाईट वाटून घेणार नाही. आपल्या परिषदेशी जिव्हाळ्याच्या संबंधात गुंतू नये या हेतूने मी आपणास असे सूचित केले होते की, माझे भाषण अध्यक्षीय नव्हे तर उद्घाटकीय भाषण समजावे आणि अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी तसेच ठरावासंबंधी कारवाई करण्यासाठी मंडळाने दुसरी व्यक्ती शोधावी. आपल्या संयोजन समितीला १४ तारखेला निर्णय घेण्याची चांगली संधी होती. समिती निर्णय घेण्यात अपयशी ठरली. दरम्यान भाषण छपाईवर खर्च झाला. समितीने थोडा अधिक खंबीरपणा दाखविला असता तर तो खर्च वाचला असता अशी मला खात्री आहे.

समितीने घेतलेल्या निर्णयाशी माझ्या भाषणात व्यक्त झालेल्या मतांचा फारसा संबंध नाही असे मला खात्रीपूर्वक वाटते. अमृतसर येथे झालेल्या शिखर प्रचार संमेलनाला माझ्या उपस्थितीशी समितीच्या निर्णयाचा संबंध असावा असे वाटण्यास भरपूर वाव आहे. १४ आणि २२ एप्रिल दरम्यान समितीने अचानक केलेल्या घूमजावचे समाधानकारक स्पष्टीकरण या शिवाय अन्य असू शकत नाही. तथापि मला हा वाद वाढवायचा नाही आणि आपणास विनंती करायला हवी की, माझ्या अध्यक्षतेखाली होऊ घातलेल्या परिषदेचे हे सत्र रद्द केल्याचे तात्काळ घोषित करावे. एव्हाना सर्व शान लयास गेली आहे. आपल्या समितीने आता जरी भाषण जसेच्या तसे स्वीकारण्यास सहमती दर्शविली तरीसुद्धा अध्यक्षपद भूषविण्यास मी संमती देणार नाही. भाषण तयार करण्यात मी घेतलेल्या परिश्रमाचे मोल आपण जाणले, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. इतर कुणालाच नसला तरी मला त्या परिश्रमाचा निश्चितपणे फायदा झाला आहे. एकच खंत आहे की, परिश्रमामुळे

munotes.in

निर्माण झालेला ताण सहन करण्याएवढी चांगली प्रकृती नसतानाही मला त्या कष्टाला जुंपले गेले. आपला विश्वासू बी.आर.आंबेडकर.

डॉ. आंबेडकरांचे वरील सबंध लेखन एकुणात लाहोर येथील 'जात-पात तोडक' मंडळाच्या परिषदेची पार्श्वभूमी मांडते. या सर्व घटनाक्रमानंतर डॉ. आंबेडकरांनी सदरचे भाषण स्वखर्चाने प्रसिद्ध केले. ज्याची विविध भाषांमध्ये भाषांतरे झाली. महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने २०१५ मध्ये 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट्' या ग्रंथाचा मराठी अनुवाद प्रकाश सिरसट यांच्याकडून 'जातिव्यवस्थेचे निर्मूलन' या शीर्षकाने करून घेऊन प्रकाशित केला.

## ३आ.५ 'जातिसंस्थेचे उच्चाटन' ग्रंथाचे स्वरूप

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथाची मांडणी भाषणाच्या निमित्ताने केली आहे. त्याची पार्श्वभूमी मागे आपण लक्षात घेतली. या ग्रंथाचे स्वरूप वैचारिक आहे. यातील विषय अतिशय महत्त्वाचा असून डॉ. आंबेडकरांच्या समग्र चिंतनातील हे मध्यवर्ती सूत्र आहे. या ग्रंथाची मांडणी सव्वीस भागामध्ये केलेली आहे. ग्रंथाच्या सुरुवातीला डॉ. आंबेडकरांनी उपोदघात लिहिलेला असून त्यामध्ये या ग्रंथाच्या निर्मितीमागील पार्श्वभूमी मांडताना 'जात-पात तोडक' मंडळाशी झालेल्या पत्रांचा आधार घेत आपली भूमिका मांडलेली आहे. त्यामध्ये डॉ. आंबेडकर शेवटी लिहितात, अध्यक्षाची मते पटत नाहीत म्हणून स्वागत समितीने त्यांची निवडच रद्द करण्याचा माझ्या मते, हा पहिलाच प्रसंग आहे. तसे असो अथवा नसो, सवर्ण हिंदूच्या परिषदेला अध्यक्ष म्हणून निमंत्रित केले जाण्याची माझ्या आयुष्यातील निश्चितच पहिली वेळ आहे. त्याचा शेवट दु:खद झाला याचा मला खेद वाटतो. परंतु आपल्यातील सनातनी लोकांना दूर ठेवण्याची इच्छा नसलेला हिंदूमधील सुधारकांचा पंथ आणि सुधारणांबाबत आग्रही राहून त्या घडवून आणल्याशिवाय गत्यंतर नाही असे मानणारा अस्पृश्यांमधला स्वाभिमानी समुदाय यांच्या शोकात्म संबंधांकडून आपण दुसरी कोणती अपेक्षा ठेवू शकतो? (पृ.१२०) डॉ. आंबेडकरांनी जातिसंस्थेच्या निर्मूलनामधील महत्त्वाची अडचण इथे मांडली असून या मानवतावादी विचारांना आव्हान असणाऱ्या प्रश्नाची तपशीलवार मांडणी पुढे केलेली आहे. या ग्रंथामध्ये जे अकरा भाग आलेले आहेत त्यांना ठळक अशी नावे दिलेली नसली तरी क्रमवार मांडणीमधून अभिव्यक्त झालेल्या विचारसूत्रांच्या आधारे त्यातील मुद्दे अधोरेखित करता येतात. त्यामध्ये १. प्रास्ताविक २. सामाजिक सुधारणांचे टीकाकार ३. भारतीय समाजवादी ४. जातिव्यवस्था हे श्रमिकांचे विभाजन ५. जात आणि वंशशुद्धी ६. हिंदू समाज आणि जातिसंस्था ७. ब्राह्मण-ब्राह्मणेतर संबंध ८. आदिवासी समाजाची स्थिती ९. ब्राह्मणेतर समुहातील ब्राह्मण्य १०. हिंदूंमधील धर्मांतर आणि शुद्धिकरणाची चळवळ ११. हिंदू-शीख-मुस्लीम धर्मीयातील तफावत १२. जात: शोषणाचे शक्तिशाली हत्यार १३. जातीतून सामाजिक प्रतिष्ठा नष्ट १४. आदर्श समाज कसा असावा? १५. हिंदू समाजातील श्रेणीबद्ध उतरंड १६. चातुर्वर्ण्यासंबंधी आक्षेप १७.श्रमविभाजनाची व्यवस्था १८. ब्राह्मण–क्षत्रीय संबंध १९. हिंदू-अहिंदूमधील जातसंबंधीचा फरक २०. जात कशी नष्ट करायची? २१. सामाजिक सुधारणा आणि जातीचे पैलू २२. जात आणि अस्पृश्यता २३. धर्म विनाशामागील तत्त्वविचार २४. धर्म सुधारणेसाठी आवश्यक बाबी २५.जातिनिर्मूलनाची चतु:सूत्री २६.समारोप

यांचा समावेश होतो. ही सबंध मांडणी जातिसंस्थेच्या निर्मूलनाचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. त्यातील विचारसूत्रांचा विस्ताराने विचार घेणे अगत्याचे ठरते.

## ३आ.६ 'जातिसंस्थेचे उच्चाटन' ग्रंथामधील वैचारिकता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वस्तुनिष्ठ आणि मूलगामी होते. त्यांच्या समग्र साहित्यातून या वैचारिक तत्त्वांबरोबरच विविधांगी विषयांची मांडणी या ग्रंथांमध्ये पहावयास मिळते. विशेषत: भारतीय समाजाची मीमांसा हे मध्यवर्ती सूत्र त्यामध्ये आहे. भारतीय समाज हा जातिसंस्थेची रचना आहे. या जातीयतेतून समाज विघटीत होऊन अस्पृश्यता, जातिभेद निर्माण झाले. जात ही भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे. त्यामुळे ही जात नष्ट व्हायला हवी. या भूमिकेतून डॉ. आंबेडकरांनी 'जातिसंस्थेचे उच्चाटन' हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथांची वैचारिकता कालातीत असून त्याचे महत्त्व समकालातही अबाधित आहे. याचा समग्र विचार पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

**१. प्रास्ताविक:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ग्रंथांच्या सुरुवातीला भाषणाच्या पहिल्या भागात 'जात-पात तोडक' मंडळाच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना अध्यक्षपदाच्या निवडीवरून मंडळाला सवर्ण हिंदू समाजाकडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची वेळ आल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. तसेच त्यांनी प्रश्न विचारणाऱ्यांना सडेतोड उत्तर देताना लिहिलेले आहे की, माझ्या निवडीमुळे सर्व सामान्य धार्मिक वृत्तीच्या हिंदूना आनंद नक्कीच वाटणार नाही. अध्यक्षाची निवड करताना धर्मशास्त्रांच्या निषेधाज्ञेचा भंग का केला याचे मंडळाला स्पष्टीकरण विचारले जाऊ शकते. धर्मशास्त्रांनुसार तीन वर्णांना गुरू म्हणून ब्राह्मणाची नियुक्ती केलेली आहे. 'वर्णानाम ब्राह्मणो गुरू' अशी धर्मशास्त्रांची आज्ञा आहे. त्यामुळे हिंदूने कुणाकडून मार्गदर्शन घ्यावे आणि कुणाकडून घेऊ नये हे मंडळाला माहीत आहे. केवळ विद्वान आहे म्हणून कुणालाही गुरू म्हणून स्वीकारण्यात धर्मशास्त्रे हिंदूना परवानगी देत नाही. सवर्णांना संबोधित करण्यासाठी मंडळाने मुंबईसारख्या दूरच्या ठिकाणी जाऊन हिंदूंना एवढा तिरस्करणीय व त्यातही एक अस्पृश्य, माणूस निवडण्याएवढे मंडळ अध:पतीत का झाले याची कारणे मंडळालाच माहीत आहेत. माझ्या दृष्टीने म्हणाल तर, आपण हे मान्य कराल की, मी हे निमंत्रण माझ्या स्वत:च्या आणि माझ्या अनेक अस्पृश्य सहकाऱ्यांच्या इच्छेच्या अगदी विरुद्ध स्वीकारले आहे. मला माहीत आहे की, हिंदूंना माझा उबग आलेला आहे. मला माहीत आहे की, त्यांच्यासाठी मी स्वीकारार्ह व्यक्ती नाही. हे सर्व माहीत असल्यामुळे मी स्वत:ला त्यांच्यापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले आहे. स्वत:ला त्यांच्यावर लादण्याची माझी मनिषा नाही. मी माझ्या विचारांना माझ्या स्वत:च्या मंचावरून व्यक्त करीत आलो आहे. त्यामुळे आधीच खूप जळफळाट आणि वैताग निर्माण झाला आहे. आतापावतो माझे विचार दुरून फक्त त्यांच्या कानावर पडत होते, तेच विचार आता साक्षात त्यांच्या समोर मांडण्यासाठी हिंदूच्या मंचावर पाऊल ठेवण्याची माझी इच्छा नाही. मी जो इथे आलो आहे तो आपल्या निवडीमुळे, माझ्या इच्छेखातर नव्हे. आपले कार्य समाजसुधारणेचे आहे. त्या कार्याने मला नेहमीच आकृष्ट केलेले आहे आणि म्हणूनच विशेष करून या कार्याला मी मदत करू शकतो असे आपले मत झाले असताना, त्यास मदत करण्याची संधी नाकारू नये असे मला वाटते. मी आज जे

काही बोलणार आहे त्याचा आपण ज्या प्रश्नांशी झुंजत आहात तो सोडविण्यासाठी काही उपयोग होईल की नाही याचा निर्णय आपणास करावयाचा आहे. केवळ त्या प्रश्नासंबंधी माझे विचार आपल्या समोर मांडण्याचा माझा इरादा आहे. (पृ.१४-१५) डॉ. आंबेडकरांनी पहिल्या भागातच आपली परखड भूमिका मांडलेली आहे. 'जात-पात तोडक' मंडळ हे जातिनिर्मूलनाचे कार्य करणारी संस्था होती. डॉ. आंबेडकरांची सुद्धा हीच भूमिका होती. जातिसंस्थेचे उच्चाटन झाल्याशिवाय सामाजिक सुधारणेला अर्थ नाही. असे ते सतत सांगत होते. त्यामुळेच त्यांनी लाहोर येथील अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वीकारले. जातिसंस्थासंबंधी आपले विचार मांडले.

## २. सामाजिक सुधारणांचे टीकाकार:

डॉ. आंबेडकरांनी भाषणाच्या दुसऱ्या भागात जाती उच्चाटन हा सामाजिक प्रश्न असल्यामुळे भारतातील समाजसुधारणेच्या चळवळीची चिकित्सा केलेली आहे. भारतीय समाज हा विविध जातीपातींमध्ये विभागलेला आहे. त्यामध्ये धार्मिकता मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे कोणत्याही सामाजिक बदलाला इथे वेळ लागतो. डॉ. आंबेडकरांनी सुरुवातीलाच भारतात तरी समाज सुधारणेचा मार्ग स्वर्गाच्या मार्गाप्रमाणे असंख्य अडचणींनी भरलेला आहे, हे विशद केलेले आहे. सामाजिक सुधारणेच्या टीकाकारांविषयी मांडणी करताना ते लिहितात, भारतात सामाजिक सुधारणेला मित्र कमी आणि टीकाकारच जास्त आहेत. हे टीकाकार दोन ठळक वर्गात मोडतात. यातील एक वर्ग राजकीय सुधारकांचा आणि दुसरा समाजवाद्यांचा आहे. (पृ.१५) डॉ. आंबेडकरांनी भारतीय राजकारणातील अगोदर सामाजिक की अगोदर राजकीय स्वातंत्र्य या अतिशय महत्त्वाच्या वादाविषयी आपली भूमिका इथे मांडलेली आहे. सामाजिक सुधारणांविषयी हिंदू समाज नेहमीच उदासीन राहिलेला आहे. तरीसुद्धा एकोणिसाव्या शतकात सामाजिक सुधारणांची चळवळ निर्माण झाली. तिला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. परंतु त्याला मर्यादा होत्या. डॉ. आंबेडकरांनी याविषयी म्हटलेले आहे की, हिंदू कुटुंबाची सुधारणा या अर्थाने सामाजिक सुधारणा आणि समाजाचे पुनर्संघटन आणि पुनर्रचना या अर्थाने सामाजिक सुधारणा या दोहोंमध्ये या संदर्भात फरक करणे आवश्यक आहे. पहिल्याचा संबंध विधवा पुनर्विवाह, बालविवाह इत्यादींशी आहे तर दुसऱ्याचा संबंध जातिव्यवस्था नष्ट करण्याशी आहे. सामाजिक परिषद ही प्रामुख्याने उच्च जातीत हिंदू कुटुंबाच्या सुधारणेशी संबंधित संघटना होती. तिच्यात प्रामुख्याने ज्ञानसंपन्न उच्चजातीय हिंदूचा अंतर्भाव होता. त्यांना जातीअंतासाठी लढ्याची गरज जाणवली नाही अथवा त्यांच्या अंगी ते धाडस नव्हते. त्यांच्यात अस्तित्वात असलेल्या व त्यांची झळ लागलेल्या सक्तीचे वैधव्य पालन, बालविवाह इत्यादी वाईट प्रथा नष्ट करण्याची त्यांची स्वाभाविकच प्रबळ इच्छा होती. त्यांनी हिंदूसमाजाला पूर्णपणे बदलण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. त्यांचा लढा हिंदूकुटुंबाच्या सुधारणेभोवतीच केंद्रीत झाला होता. जातिव्यवस्था मोडण्याच्या अर्थाने सामाजिक सुधारणांशी त्यांचा संबंध नव्हता. हा मुद्दा या सामाजिक सुधारणावाद्यांनी कधीही उपस्थित केला नाही. याच कारणास्तव सामाजिक सुधारणा पक्ष पराभूत झाला. (पृ.२०) डॉ.आंबेडकरांनी इथे सामाजिक सुधारणावाद्यांची तकलादू भूमिका विशद केलेली आहे. तसेच राजकीय सुधारणावाद्यांना त्यांनी रोखठोक प्रश्न विचारले आहेत. ते लिहितात, राजकीय मनोवृत्ती असलेल्या हिंदूंना मी विचारतो की, अस्पृश्यांसारख्या तुमच्या देशबांधवांच्या एका मोठ्या वर्गाला सरकारी शाळेत जाण्याची परवानगी देत नसूनसुद्धा तुम्ही राजकीय सत्तेसाठी

लायक आहात काय? त्यांना सार्वजनिक विहिरींचा वापर करण्याची परवानगी देत नसूनसुद्धा तुम्ही राजकीय सत्तेसाठी लायक आहात काय? त्यांना सार्वजनिक रस्त्यांचा वापर करण्यास मज्जाव करीत असूनसुद्धा तुम्ही राजकीय सत्तेसाठी लायक आहात काय? त्यांना आवडणारे कपडे आणि दागिने घालण्यास मनाई करीत असूनसुद्धा तुम्ही राजकीय सत्तेसाठी लायक आहात काय? त्यांना आवडणारे अन्न खाण्यास परवानगी देत नसूनसुद्धा तुम्ही राजकीय सत्तेसाठी लायक आहात काय? अशा प्रश्नांची मालिकाच मी विचारू शकतो परंतु एवढे प्रश्न पुरेसे आहेत. (पृ.१९) डॉ. आंबेडकरांनी सामाजिक सुधारणांपेक्षा राजकीय सुधारणांचा आग्रह धरणाऱ्यांना अशी प्रश्नावली विचारलेली आहे. ज्यांची उत्तरे हिंदू समाजाला देता येत नाहीत. डॉ. आंबेडकरांनी याच मुद्द्याला अधोरेखित करताना पेशव्यांच्या काळातील अस्पृश्यांची कशी सार्वजनिक विटंबना केली जात होती याची वर्णने दिलेली आहेत. तसेच 'द टाईम्स ऑफ इंडिया'च्या ४ जानेवारी १९२८ मधील अंकात इंदोर राज्याच्या पंधरा गावांनी बलाई लोकांना घालून दिलेले सामाजिक नियमही विस्ताराने दिलेले आहेत. वरील दोन्ही उदाहरणे ही जातिसंस्थेचे विदारक चित्र चित्रित करतात.

डॉ. आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनाचे महत्त्व विशद करताना जागतिक पातळीवरील उदाहरणे दिलेली आहेत जी अत्यंत उद्बोधक आहेत. आयर्लंडचा इतिहास आणि रोमच्या इतिहासाचे दाखले देत त्यांनी शेवटी म्हटलेले आहे की, राजकीय क्रांत्यांच्या अगोदर सामाजिक आणि धार्मिक क्रांत्या घडून येतात याला इतिहास दुजोरा देतो. ल्यूथरने सुरू केलेल्या धार्मिक सुधारणा युरोपातील लोकांच्या राजकीय मुक्तीच्या अग्रदूत होत्या. पूजाविधीचे सुलभीकरण व नियमनाचा आग्रह धरणाऱ्या प्युरिटनीझमने इंग्लंडमध्ये राजकीय स्वातंत्र्यांकडे वाटचाल केली. प्युरिटनीझमने नव्या जगाची स्थापना केली. प्युरिटनीझमने अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध जिंकले आणि प्युरिटनीझम ही एक धार्मिक चळवळ होती. तीच बाब मुस्लिम साम्राज्यालाही लागू पडते. राजकीय सत्ता म्हणून उदयाला येण्यापूर्वी अरबांना प्रेषित महंमदाने सुरू केलेल्या परिपूर्ण धार्मिक क्रांतीच्या प्रक्रियेत जावे लागले. भारतीय इतिहाससुद्धा त्याच निष्कर्षाची पाठराखन करतो. चंद्रगुप्ताने नेतृत्व केलेल्या राजकीय क्रांतीला बुद्धाच्या धार्मिक आणि सामाजिक क्रांतीची पार्श्वभूमी होती. शिवाजीच्या नेतृत्वाखाली झालेल्या राजकीय क्रांतीपूर्वी महाराष्ट्रात संतांनी धार्मिक आणि सामाजिक सुधारणा घडवून आणल्या होत्या. शिखांच्या राजकीय क्रांतीपूर्वी गुरू नानकाच्या नेतृत्वाखाली धार्मिक आणि सामाजिक क्रांती होऊन गेली होती. यात आणखी उदाहरणांची भर घालणे अनावश्यक आहे. एखाद्या समाजाच्या राजकीय कक्षा विस्तारण्यासाठी त्यापूर्वी मन व आत्मा मुक्त होणे आवश्यक आहे हे सिद्ध करण्यासाठी एवढी उदाहरणे पुरेशी आहेत. (पृ.२२) एकुणात डॉ. आंबेडकरांनी जातिनिर्मूलनाचा विचार कसा महत्त्वाचा आहे त्याला सर्वांनी अगोदर प्राधान्य द्यावे अशी भूमिका येथे मांडलेली आहे.

### ३. भारतीय समाजवादी:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ होते. त्यांनी अर्थशास्त्राची सामाजिक बाजूही लक्षात घेतलेली होती. त्यामुळे सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत आर्थिक विचार कसे पूरक व अ-पूरक आहेत याची व्यापक जाण त्यांना होती. जातिसंस्थेच्या प्रश्नांविषयी चिंतन मांडताना त्यांनी या आर्थिक बाजूचाही विचार केलेला आहे. तो करताना त्यांनी भारतीय समाजवाद्यांची परखड मीमांसा केलेली आहे. भारतीय समाजवादी यांनी

युरोपियन विचारांचा आधार घेऊन भारतातील स्थितीचा आढावा घेतला. माणूस हा एक आर्थिक घटक असून संपत्ती समानीकरण करणे गरजेचे आहे. कारण आर्थिक सुधारणेला दुसऱ्या कोणत्याही सुधारणेपेक्षा प्राधान्य दिले पाहिजे. भारतीय समाजवाद्यांच्या या मताचा डॉ. आंबेडकर येथे समाचार घेतात. ते लिहितात, मी आता समाजवाद्यांकडे वळतो. समाजव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडे समाजवादी दुर्लक्ष करू शकतात का? भारतीय समाजवादी त्यांच्या युरोपियन सहप्रवाशांच्या पावलावर पाऊल ठेवून भारतातील वस्तुस्थितीला इतिहासाच्या आर्थिक मीमांसेची पद्धती लावू पहात आहेत. इतर सर्वप्रकारच्या सुधारणांऐवजी आर्थिक सुधारणांना अग्रक्रम दिला पाहिजे. समाजवाद्यांच्या या सिद्धांताच्या उपरोक्त गृहितकातील प्रत्येक बाबीवर आक्षेप घेतले जाऊ शकतात. असा दावा केला जाऊ शकतो की, माणसाला कार्यप्रवण करण्यामागे निव्वळ आर्थिक प्रयोजन नसते. मानवी समाजाचा कुणीही अभ्यासक आर्थिक सत्ता हीच एकमेव सत्ता आहे हे मान्य करणार नाही. व्यक्तीचा सामाजिक दर्जा हाच बऱ्याचदा सत्ता आणि अधिकाराचा स्त्रोत बनतो हे सामान्य माणसांवार असलेल्या महात्म्यांच्या प्रभावावरून स्पष्ट होते. भारतात कोट्याधीश लोक कफल्लक साधू आणि फकिरांच्या आज्ञेचे पालन का करतात? भारतातील कोट्यावधी दरिद्री लोक त्यांची एकमेव संपत्ती असलेले किडूकमिडूक विकून बनारस किंवा मक्केला का जातात? धर्म हा सत्तेचा स्त्रोत आहे हे भारताच्या इतिहासाने सोदाहरण पटवून दिलेले आहे (पृ.२३) म्हणून डॉ.आंबेडकरांनी इथे आर्थिक सुधारणा महत्त्वाच्या असल्या तरी त्याअगोदर सामाजिक सुधारणा होणे गरजेचे आहे. भारतीय समाजवाद्यांनी ही गोष्ट सतत दुर्लक्षित केली. जातीचा प्रश्न त्यांना प्राधान्य वाटला नाही. त्यामुळे सामाजिक सुधारणांच्या प्रश्नाबाबत ते उदासीन राहिले. म्हणूनच शेवटी डॉ. आंबेडकर लिहितात, सामाजिक सुधारणांचा प्रश्न मूलभूत असून त्यापासून त्यांची सुटका नाही. भारतातील प्रचलित समाजव्यवस्था ही अशी बाब आहे की, समाजवाद्याने तिच्यासंबंधी कार्यवाही केलीच पाहिजे. जोपर्यंत तो हे करीत नाही तोपर्यंत त्यांची क्रांती पूर्ण होऊ शकत नाही आणि जरी सुदैवाने ती यशस्वी झाली तर समाजवादाला वास्तविक रूप देण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी त्याला समाजव्यवस्थेशी संघर्ष करावाच लागेल, माझ्या मते हे विधान वादातीत आहे. जर त्यांनी क्रांतीपूर्व जातीचा प्रश्न विचारात घेतला नाही तर त्यांना तो क्रांतीनंतर विचारात घ्यावाच लागेल. वेगळ्या शब्दात सांगायचे म्हणजे तुम्ही कुठल्याही दिशेला वळा, जात हा एक असा महाकाय राक्षस आहे की, तो तुमच्या मार्गात आडवा येणारच. या राक्षसाचा खातमा केल्याशिवाय तुम्हाला राजकीय सुधारणा करता येऊ शकणार नाही. तुम्हाला आर्थिक सुधारणा करता येणार नाहीत. (पृ.२६) डॉ.आंबेडकरांनी येथे जातीचा प्रश्न कसा महत्त्वाचा आहे हे विशद केलेले आहे. त्यामागील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचार विचारात घेतलेले आहेत.

### ४. जातिव्यवस्था ही श्रमिकांचे विभाजन:

डॉ.आंबेडकरांनी जातिसंस्थेचे मूलगामी चिंतन मांडताना त्यातील विविध पैलूंची मांडणी केलेली आहे. जातिसंस्थेच्या समर्थकांच्या मतांप्रमाणे जातिव्यवस्था हे श्रमविभाज आहे. कोणत्याही प्रगत समाजाचे ते वैशिष्ट्य असते. त्यामुळे जातिव्यवस्थेत काहीही गैर नाही. समर्थकांच्या या मताविरोधात डॉ. आंबेडकरांनी परखड विचार मांडलेले आहेत. ते लिहितात, सर्वप्रथम हे आग्रहपूर्वक सांगितले पाहिजे की, जातिव्यवस्था हे फक्त श्रमविभाजन नाही ते श्रमिकांचे विभाजन आहे. प्रगत समाजाला श्रमविभाजनाची

निर्विवादपणे गरज असते. परंतु कुठल्याही प्रगत समाजात श्रमविभाजनासोबतच श्रमिकांचे असे अनैसर्गिक कप्पेबंद विभाजन केलेले नाही. जातिव्यवस्था हे केवळ श्रमविभाजनापेक्षा वेगळे असलेले श्रमिकांचे विभाजन नाही. तर एकाच्या डोळ्यावर दुसरी अशी श्रमिकांची वर्गवारी केलेली ती श्रेणीबद्ध उतरंड आहे. इतर कोणत्याही देशात श्रमविभाजनासोबत श्रमिकांची अशी वर्गवारी केलेली नाही. जातिव्यवस्थेच्या या दृष्टिकोणाच्या विरोधात टीकेचा आणखी एक तिसरा मुद्दाही आहे. भारतातील श्रमविभाजन उत्स्फूर्त नाही, ते नैसर्गिक आवडीवर आधारलेले नाही. सामाजिक आणि वैयक्तिक कार्यक्षमतेची आपल्याकडून अशी मागणी असते की, व्यक्तीला आपले कार्यक्षेत्र निवडून त्याला निर्वाहाचे साधन बनविण्याइतपत व्यक्तीची कार्यक्षमता विकसित केली पाहिजे. जातिव्यवस्थेने लोकांचे व्यवसाय आधीच ठरवून या तत्त्वाचे उल्लंघन केले आहे. व्यवसायाची निवड व्यक्तीच्या मूळ क्षमतेला प्रशिक्षण देऊन नव्हे तर त्याच्या वाड-वडिलांच्या सामाजिक दर्जावरून केलेली आहे. जातिव्यवस्थेचा परिपाक असलेले व्यवसायांचे हे स्तरीकरण निश्चितच घातक आहे. उद्योगविश्व कधीही स्थितीशील नसते. त्यात वेगवान आणि आकस्मिक बदल होत असतात. अशा बदलांमुळे व्यक्तीलासुद्धा तिचा व्यवसाय बदलण्याची मुभा असणे आवश्यक आहे. अशा बदल्यात परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या स्वातंत्र्याशिवाय त्याला उपजिविका चालविणे अशक्य होईल. जातिव्यवस्था हिंदूना, त्या व्यवसायाशी त्यांचा वंशपरंपरेने संबंध नसेल तर, तिथे त्यांची आवश्यकता असली तरी तो निवडण्याची परवानगी देत नाही. एखादा हिंदू त्यांच्या जातीतील नेमून न दिलेले नवे व्यवसाय करण्याऐवजी उपासमार सहन करताना दिसला तर त्याचे कारण जातिव्यवस्थेमध्ये आढळून येईल. व्यवसायात परिस्थितीनुरूप बदलाची परवानगी नाकारून देशात आपल्याला दिसणाऱ्या बऱ्याचशा बेरोजगारीला जातिव्यवस्थाच कारणीभूत ठरते. श्रमविभाजनाची पद्धती म्हणून जातिव्यवस्थेत आणखी एक गंभीर दोष आहे. जातिनिष्ठ श्रमविभाजन व्यक्तीच्या पसंतीवर आधारलेले असत नाही. व्यक्तीगत भावना, व्यक्तीगत पसंती याला त्यात स्थान नाही. ते नियती सिद्धांतावर आधारित आहे. (पृ.२७) डॉ. आंबेडकरांनी जातिसंस्थेची मीमांसा येथे मांडलेली आहे. त्यातील श्रमाधिष्ठित उतरंड कशी सामाजिक विषमता मांडणारी आहे हे त्यांनी सप्रमाण मांडलेले आहे.

### ५. जात आणि वंशशुद्धी:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या ग्रंथाच्या पाचव्या भागात जातीसंदर्भातील जीवशास्त्रीय मतांची चिकित्सा केलेली आहे. जातीच्या समर्थनासाठी वंशशुद्धी आणि रक्तशुद्धी राखणे हे जातीचे उद्दिष्ट असल्याचे जे मत मांडले जाते, याचा समाचार डॉ. आंबेडकर येथे घेतात. ते लिहितात, वंशशास्त्रज्ञाच्या मते, शुद्ध वंशाची माणसे कुठेच अस्तित्वात नाहीत आणि जगात सर्वत्र सगळ्या वंशांची सरमिसळ झालेली आहे. भारतीय लोकांबाबत तर हे विशेषेकरून खरे आहे. श्री. डी.आर.भांडारकर आपल्या 'फॉरीन एलिमॅन्ट्स इन हिंदू पॉप्युलेशन' या निबंधात म्हणतात, "परकीय रक्ताचा अंश नसलेला वर्ग किंवा जात भारतात अभावानेच आढळेल. केवळ रजपूत आणि मराठ्यांसारख्या क्षत्रिय वर्गामध्येच नव्हे तर आपला वंश शुद्ध असल्याच्या गोड गैरसमजात असलेल्या ब्राह्मणांमध्येसुद्धा परवंशीय रक्ताची भेसळ आढळते" रक्तशुद्धीचे साधन म्हणून किंवा वंशभेसळ रोखण्यासाठी जातिव्यवस्था उदयाला आली असे म्हणता येणार नाही. वास्तविक पाहता भारतात रक्त आणि संस्कृती या दोन्ही दृष्टीने विविध वंशांची सरमिसळ झाल्याच्या बऱ्याच काळानंतर जातिसंस्था अस्तित्वात

आली. जाती-जाती मधला फरक वंशा-वंशा मधला फरक आहे असे मानणे आणि भिन्न जातींना ते भिन्न वंश असल्याप्रमाणे वागविणे हा सत्याचा धडधडीत अपलाप आहे. (पृ.२८) डॉ. आंबेडकरांनी येथे जात आणि वंशशुद्धीच्या परस्परसंबंधाचा विचार नाकारलेला आहे. तर जातिव्यवस्था वांशिक भेदाची सीमारेषा निश्चित करीत नाही. जातिव्यवस्था एकाच वंशाच्या लोकांचे सामाजिक विभाजन आहे. जातिसंस्था ही एक नकारात्मक गोष्ट आहे. ती केवळ भिन्न जातीच्या लोकांना आपसात विवाह करण्यास प्रतिबंध करते. रोटीव्यवहार आणि बेटीव्यवहार यातील फरकाचाही त्यांनी येथे समाचार घेतलेला असून शेवटी ते लिहितात, 'जातिव्यवस्थेमध्ये आधुनिक वैज्ञानिकांच्या सुप्रजनन शास्त्राचा अंतर्भाव संबंध नाही. हिंदूमधील एका विकृत वर्गाचा उद्धटपणा आणि स्वार्थीपणाचा समावेश असलेली ती एक समाजव्यवस्था आहे.' (पृ.३०) जातीच्या प्रश्नाबाबत येथे मूलगामी चिंतन आलेले आहे.

### ६. हिंदू समाज आणि जातिसंस्था:

डॉ. आंबेडकरांनी जातिसंस्थेची चिकित्सा करताना जातीमागील विविध संदर्भांचा शोध घेतलेला आहे. शेवटी जातिसंस्था ही भारतीय हिंदू समाजातील निर्मिती आहे, इथपर्यंत ते मांडणी करतात. हिंदू समाजाविषयी ग्रंथाच्या सहाव्या भागात डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट भूमिका मांडलेली आहे. त्यांनी अभ्यासपूर्णरित्या या समाजातील अंतर्विरोधांचा शोध घेतलेला आहे. हिंदू समाज कसा आहे? याविषयी मांडणी करताना ते लिहितात, जातीची परिणती आर्थिक कार्यक्षमतेत होत नाही. जात ही वंश सुधारणा करू शकत नाही आणि तिने असे केलेही नाही, तथापि एक गोष्ट केली आहे. तिने हिंदूना संपूर्णपणे विघटित आणि नाउमेद केले आहे. हिंदू समाज ही एक भ्रामक कल्पना आहे. हिंदू हे नाव सुद्धा परकीय आहे. मुस्लिमांनी आपली वेगळी ओळख दर्शविण्याच्या उद्देशाने स्थानिक लोकांना हे नाव दिले आहे. मुस्लिम आक्रमणापूर्वीच्या कोणत्याही संस्कृत साहित्यकृतीत ते आढळत नाही. त्यांना सर्वांसाठी एक सामान्य नाव असण्याची कधीच गरज वाटली नाही कारण एक एक संघ समाज गठित केल्याची कल्पनाही त्यांना कधी शिवली नाही. हिंदू हा एक समाज या अर्थाने अस्तित्वात नाही. तो केवळ जातींचा एक समूह आहे. (पृ.३०) डॉ. आंबेडकर यांनी हिंदू समाजाच्या स्वरूपाची चिकित्सा करताना त्यातील जातींची उतरंड विस्ताराने सांगितलेली आहे. हिंदू समाजातील ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर संबंधावरही विस्ताराने भाष्य केलेले आहे.

### ७. ब्राह्मण-ब्राह्मणेतर संबंध:

डॉ. आंबेडकर जातीच्या संदर्भात असलेले विचार मांडताना ब्राह्मण-ब्राह्मणेतर संबंधांची मांडणी सातव्या विभागात करतात. इथे त्यांनी समाजविघातक वृत्तीचे तत्त्व विचारात घेऊन ब्राह्मण-ब्राह्मणेतरांमधील जातीच्या संदर्भातील मनोवृत्तीवर भाष्य केलेले आहे. ते लिहितात, हिंदू बऱ्याचदा टोळी किंवा कंपूवर, समाजविघातक वृत्ती असल्याचा आरोप करतात कारण ते समाजापासून वेगळे राहतात, वेगळे अस्तित्व ठेवतात. परंतु ते सोईस्करपणे विसरतात की, ही समाजविघातक वृत्ती हे त्यांच्या स्वतःच्या जातिव्यवस्थेचे सर्वात वाईट वैशिष्ट्य आहे. जर्मनीने मागच्या युद्धात जसे द्वेषगान इंग्लंडच्या विरोधात गाईले तसेच द्वेषगान एक जात दुसऱ्या जातीच्या विरोधात गाण्यामध्ये आनंद मानते. हिंदूचे धार्मिक वाङ्मय एका

जातीला उच्च आणि दुसऱ्या जातींना हीन उत्पत्ती देण्याचा प्रयत्न करणाऱ्या जात्युत्पत्तीच्या काल्पनिक इतिहासाने तुडुंब भरलेले आहे. 'सह्याद्रीखंड' हे अशाच प्रकारच्या वाङ्मयाचे खोडसाळ उदाहरण आहे. ही समाजविघातक वृत्ती केवळ आंतरजाती संबंधापुरतीच मर्यादित आहे असे नाही. ती त्याहून खोल गेलेली आहे आणि तिने उपजातीमधील परस्परसंबंधामध्येसुद्धा विष कालविले आहे. माझ्या प्रांतात गोलक ब्राह्मण, देवरुख ब्राह्मण, कऱ्हाडे ब्राह्मण, पळसे ब्राह्मण आणि चित्पावन ब्राह्मण हे सगळे ब्राह्मणजातीचेच पोटविभाग असल्याचा दावा करतात. मात्र त्यांच्यामध्ये आपापसात अस्तित्वात असलेली समाज विघातक वृत्ती त्यांच्यात आणि ब्राह्मणेतरात अस्तित्वात असलेल्या समाजविघातक वृत्तीएवढीच तीव्र आणि विषारी आहे. यात आश्चर्यकारक असे काहीही नाही. जिथे जिथे एखाद्या गटाचा स्वार्थ साधण्यासाठी समाजातील परस्परसंबंध निषिद्ध केले जातात तिथे तिथे स्वहिताच्या रक्षणार्थ अशा तऱ्हेची समाजविघातक प्रवृत्ती आढळते. ही समाजविघातक स्वार्थपरायण प्रवृत्ती जसे दोन एकाकी राष्ट्रांचे व्यवच्छेदक लक्षण आहे तसेच ते विविध व एकाकी जातींचेही व्यवच्छेदक लक्षण आहे. ब्राह्मणाला ब्राह्मणेतरांच्या हिताविरुद्ध आपल्या हिताचे रक्षण करण्याची मुख्य काळजी असते तर ब्राह्मणेतराला ब्राह्मणांच्या हिताविरुद्ध आपले स्वत:चे हित जोपासण्याची, त्यामुळे हिंदू म्हणजे विविध जातींचा केवळ वर्गवार समूहच नाही तर तो स्वत:साठीच जगणाऱ्या स्वार्थी ध्येयाने प्रेरित युद्धखोर गटांचा समूह आहे. (पृ.३३) ब्राह्मण– ब्राह्मणेतर समूहांच्यामधील ही मानसिकता डॉ. आंबेडकरांनी येथे परखडपणे मांडलेली आहे. शेवटी ते यामागील कारणमीमांसाही मांडतात. जातिसंस्था आणि जातजाणिवेचे अस्तित्व जातींमधल्या भूतकालीन वैराच्या स्मृती ताज्या ठेवण्यास साहाय्यभूत ठरले आणि परिणामी सामाजिक एकसंघतेला प्रतिबंध करण्यास कारणीभूत ठरले आहे. हा डॉ. आंबेडकरांचा निष्कर्ष अतिशय महत्त्वाचा आहे.

### ८. आदिवासी समाजाची स्थिती:

डॉ. आंबेडकरांनी जातिसंस्थेतील प्रत्येक घटकाविषयीचे विचार या ग्रंथामध्ये मांडलेले आहेत. त्यामध्ये या आठव्या भागात आदिवासी समाजाची स्थिती ते मांडतात. आदिवासी हा भारतीय समाजव्यवस्थेतील महत्त्वाचा समूह आहे. त्याच्याकडे सातत्याने दुर्लक्ष झाले. त्यांना सामाजिक उपेक्षित राहावे लागले. त्याला गुन्हेगार ठरवले गेले. त्याचे आयुष्य बहिष्कृत करण्यात आले. यामागे हिंदू समाजातील जातिसंस्था आहे. अशी ठाम भूमिका ते येथे मांडतात. डॉ. आंबेडकरांनी इथे काही मूलभूत प्रश्न मांडलेले आहेत. ते लिहितात, आदिवासींना सुसंस्कृत करून त्यांना अधिक सन्मानजनक व्यवसाय आदिवासीच्या रानटीपणाला त्यांची जन्मजात मंदबुद्धी कारणीभूत आहे असे कदाचित हिंदू म्हणतील. ते बहुधा कबूल करणार नाहीत की, आदिवासी रानटीच राहिले कारण त्यांना सुसंस्कृत करण्यासाठी, त्यांना वैद्यकीय मदत देण्यासाठी, त्यांना सुधारण्यासाठी, त्यांना चांगले नागरिक बनविण्यासाठी हिंदूनी काहीही प्रयत्न केले नाहीत. परंतु समजा आज ख्रिस्ती धर्मप्रचारक या आदिवासीसाठी जे करीत आहेत ते करण्याची हिंदूची इच्छा झाली तर तो तसे करू शकला असता का? मी नम्रतापूर्वक सांगू इच्छितो की, याचे उत्तर नाही असेच आहे. आदिवासींना सुसंस्कृत करणे म्हणजे त्यांना आपले स्वत:चे म्हणून स्वीकारणे, त्यांच्यांत राहाणे, थोडक्यात आपलेपणाची भावना जोपासणे म्हणजे त्यांच्यावर प्रेम करणे होय. एका हिंदूला असे करणे कसे शक्य होईल? त्याचे सबंध आयुष्य म्हणजे जात

जपण्याचा एक चिंतातूर प्रयत्न असतो. जात ही त्याच्यासाठी अशी मौल्यवान मिळकत आहे की, जिचे रक्षण त्याला काहीही झाले तरी केलेच पाहिजे. वैदिक काळातल्या, त्याला ओंगळ वाटणाऱ्या, अनार्यांचा अवशेष असलेल्या आदिवासींशी संपर्क स्थापित करून जात गमावण्याला तो मान्यता देऊ शकत नाही. (पृ.३४) डॉ. आंबेडकरांनी या ठिकाणी आदिवासींचे अनार्यपण मांडलेले आहे. ते अतिशय महत्त्वाचे वाटते. विशेषत: आदिवासींच्या दयनीय स्थितीचे कारण हिंदू समाजातील जातिव्यवस्था असल्याचे डॉ. आंबेडकर येथे ठामपणे मांडतात.

### ९. ब्राह्मणेतर समूहातील ब्राह्मण्य:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील जातीय मानसिकतेची चिकित्सा केलेली आहे. त्यांनी ब्राह्मण-ब्राह्मणेतर भेद केलेला आहे. डॉ. आंबेडकर सातत्याने ब्राह्मण्यावर बोलत आलेले आहेत. ब्राह्मण्य ही मानसिकता असून त्यामध्ये उच्च-निच्च ही भेदरेषा विषमतेवर आधारित आहे. हे ब्राह्मण्य ब्राह्मणांबरोबरच ब्राह्मणेतरांमध्ये मोठ्या प्रमाणात आहे. यांची उदाहरणे या ग्रंथात येतात. त्याविषयी डॉ. आंबेडकर लिहितात, उच्च जातीय हिंदूंनी, हिंदूत्वाच्या परिघात येणाऱ्या खालच्या जातींनाही त्यांची सांस्कृतिक पातळी तथाकथित उच्च जातीएवढी उंचावण्यास हेतूपुरस्सर मज्जाव केला. मी दोन उदाहरणे देईन, एक सोनाराचे आणि दुसरे पाठारे प्रभूचे. हे दोन्हीही समुदाय महाराष्ट्रात सुपरिचित आहेत. इतर समुदायांप्रमाणे आपला दर्जा उंचावण्याची आकांक्षा असलेले हे समुदाय एके काळी ब्राह्मणांच्या काही जीवनशैली आणि सवयी स्वीकारण्याचा प्रयत्न करीत होते. सोनार स्वत:ला देवज्ञ ब्राह्मण म्हणवू लागले. ब्राह्मणांप्रमाणेच निऱ्या घालून कासोटा खोचलेले धोतर नेसू लागले. तसेच अभिवादनासाठी ‘नमस्कार’ हा शब्द वापरू लागले. निऱ्याच्या कासोट्याचे धोतर आणि नमस्कार हे दोन्ही खास ब्राह्मणांची वैशिष्ट्ये होती. ब्राह्मणांना सोनारांनी केलेले त्यांचे अनुकरण आणि ब्राह्मण म्हणून गणले जाण्याचा प्रयत्न आवडला नाही. ब्राह्मणांनी पेशव्याच्या राज्याधिकाराच्या साहाय्याने सोनारांचा आपल्या पद्धती उचलण्याचा प्रयत्न ब्राह्मणांनी यशस्वीरित्या चिरडून टाकला. ईस्ट् इंडिया कंपनीच्या मुंबईतील वसाहतीच्या परिषदेच्या अध्यक्षालाही त्यांनी मुंबईत राहणाऱ्या सोनाराच्या विरोधात याबाबत मनाई हुकूम काढायला लावला. एके काळी पाठारे प्रभू या जाती विधवा पुनर्विवाहाची प्रथा होती. विधवा पुनर्विवाहाची ही प्रथा, विशेषत: ती ब्राह्मणांमध्ये रूढ प्रतीक म्हणून पाहिली गेली. स्वत:च्या जातीचा दर्जा उंचावण्याच्या हेतूने काही पाठारे प्रभूंनी त्यांच्यात अस्तित्वात असलेली विधवा पुनर्विवाहाची पद्धत बंद करण्याचा प्रयत्न केला. जातीमध्ये नवीन पद्धतीच्या बाजूने एक आणि विरोधात एक असे दोन तट पडले. पेशव्यांनी विधवा विवाहाचे समर्थन करणाऱ्यांची बाजू घेतली आणि अशा रितीने पाठारे प्रभूंनी ब्राह्मणाच्या या पद्धतीचे अनुकरण करण्यावर बंदी घातली. (पृ. ३५) हिंदूएतर समूहातील अशा पद्धतीच्या जातीवादी प्रथांचा वाढता प्रसार हा जातिनिर्मूलनातील अडथळा आहे हे डॉ. आंबेडकरांनी येथे प्रभावीपणे सांगितलेले आहे.

### १०. हिंदूंमधील धर्मांतर आणि शुद्धीकरणाची चळवळ:

भारतीय समाजाचा इतिहास पाहिल्यास आपल्याला दिसते की, हा समाज कधीही एकसंघ राहिलेला नाही. त्यामध्ये सातत्याने बदल झालेले आहेत. अनेक वेळा परकीय

आक्रमणांमध्ये इथल्या एतदेशी लोकांनी धर्मांतर केलेले आहे. अशा धर्मांतराला रोखण्यासाठी हिंदू समाजात शुद्धीकरणाची प्रक्रिया राबविली गेली. वास्तविक धर्मांतर आणि शुद्धीकरण या वेगळ्या गोष्टी आहेत. डॉ. आंबेडकरांनी या विषयावर ग्रंथातील दहाव्या भागात प्रकाश टाकलेला आहे. यामध्ये ते लिहितात, जात ही धर्मांतर या कल्पनेशी विसंगत आहे. धर्मांतरामध्ये नवीन धार्मिक श्रद्धा आणि तत्त्वे मनावर ठसविणे ही एकमेव समस्या अंतर्भूत नाही. धर्मांतरिताला नवीन धार्मिक समूहाच्या सामाजिक जीवनात स्थान शोधणे ही दुसरी आणि अधिक महत्त्वाची समस्या धर्मांतराच्या संदर्भात उद्भवते. प्रश्न असा आहे की, धर्मांतरिताला कुठे म्हणजे कोणत्या जातीत स्थान द्यायचे? परधर्मियांना आपल्या धर्माची दीक्षा देण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक हिंदूला गोंधळात टाकणारा हा प्रश्न आहे. क्लबच्या सदस्यत्वाप्रमाणे जातीचे सदस्यत्व तमाम लोकांना खुले नसते. जातीचा नियम तिचे सदस्यत्व जातीत जन्मलेल्या पुरतेच मर्यादित ठेवतो. जाती स्वायत्त आहेत आणि नव्याने आलेल्यांना त्यांच्या सामाजिक जीवनात प्रवेश द्यावा अशी सक्ती एखाद्या जातीला करणारी सत्ता कुठेही नाही. हिंदू समाज जातींचा समुच्चय असल्यामुळे आणि प्रत्येक जात एक बंदिस्त संस्था असल्यामुळे तिथे धर्मांतरितांसाठी स्थान नाही. अशा रितीने धर्माचा विस्तार करण्यास आणि इतरधर्मीय समुदायांना त्यात सामावून घेण्यास हिंदूना जातीनेच आडकाठी केली आहे. जोपर्यंत जात अस्तित्वात आहे तोपर्यंत हिंदूधर्माला मिशनरी स्वरूपाचा धर्म बनविले जाऊ शकत नाही आणि परिणामी शुद्धीकरणाची चळवळ ही केवळ मुर्खपणाचीच नव्हे तर निरुपयोगीही ठरेल. (पृ.३६) डॉ. आंबेडकर यांनी येथे जातीसंस्थेच्या पायामध्ये असलेल्या विविधांगी रूपांना उजागर केलेले आहे. ते सातत्याने समाजमीमांसा करतात. तुलनात्मकरित्या विचारमांडणी करून जातिसंस्थेच्या इमारतीमधील प्रत्येक घटकाची चिकित्सा त्यांनी केलेली आहे.

## ११. हिंदू-शीख-मुस्लीम धर्मीयातील तफावत:

डॉ. आंबेडकरांनी जातीच्या प्रश्नाचा विचार करताना हिंदूएतर धर्मियांच्या बलस्थानांचा विचार केलेला आहे. विशेषत: शीख व मुस्लीम यांच्यामधील सांघिक जीवनशैलीचा ते प्रामुख्याने विचार करतात. हिंदू समाजामध्ये ज्याप्रमाणे शुद्धीकरणाची चळवळ अशक्य आहे त्याचप्रमाणे त्यांच्यात संघटनही अशक्य असल्याचे डॉ. आंबेडकर म्हणतात. याची कारणे विशद करताना ते लिहितात, हिंदूला मुस्लिम आणि शिखापासून दु:खद पळ काढायला लावणारा तसेच स्वत:च्या रक्षणासाठी विश्वासघात व लबाडी सारख्या क्षुद्र मार्गांचा अवलंब करायला लावणारा, हिंदूच्या मनातील भ्याडपणा आणि नामर्दपणा दूर करणे ही त्याच्या संघटन करण्यामागची पायाभूत कल्पना आहे. साहजिकच प्रश्न उपस्थित होतो की, शिख आणि मुसलमानाला शूर आणि निर्भय बनविणारी शक्ती कुठून येते? ती तुलनेत चांगले शारीरिक बळ, आहार किंवा तालीम यामुळे नाही याची मला खात्री आहे. एक शिख संकटात असला तर त्याच्या सुटकेसाठी सगळे शिख येतील आणि जर एका मुस्लिमावर हल्ला झाला तर सगळे मुस्लिम त्याला वाचवायला धावून येतील या भावनेतून त्यांना ती शक्ती मिळते. हिंदूला अशी शक्ती अप्राप्य आहे. त्याचे सहकारी त्याला मदत करण्यासाठी येतील याची त्याला खात्री नसते. तो एक असून, एकटेपणा हीच त्याची नियती असल्याने तो शक्तिहीन बनतो. (पृ.३६-३७) डॉ. आंबेडकरांनी मुस्लीम आणि शिखांमध्ये प्रचलित सांघिक जीवनशैलीमुळे त्यांच्यात आपलेपणा येत असल्याचे म्हटले आहे. हिंदू

समाजात जातिव्यवस्थेमुळे उदासिनता आहे. त्यामुळे त्यांचे संघटन अशक्य असल्याचे ते नोंदवितात.

### १२. जात: शोषणाचे शक्तिशाली हत्यार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीच्या प्रश्नाचा सखोल विचार करत असताना जातिसंस्थेने कशा प्रकारे शोषणव्यवस्थेला बळकटी दिलेली आहे याची मांडणी केलेली आहे. या ग्रंथाच्या बाराव्या भागात त्यांनी जात हे शोषणाचे शक्तिशाली हत्यार असल्याचे म्हटलेले आहे. याविषयी मांडणी करताना ते लिहितात, जर समूह लोकाशी सहिष्णूपणे आणि न्याय बुद्धीने वागणारा असेल तर ते आपली मते व्यक्त करीत रहातील आणि शेवटी आपल्या समाजबांधवांना बदलण्यात यशस्वी होतील. या उलट समूह असहिष्णू असेल आणि अशा लोकांना कोंडमारा करण्यासाठी कोणत्याही टोकाला जाणारा असेल तर ते नाश पावतील आणि त्यांच्या सुधारणा संपुष्टात येतील. जातीला, तिचे नियम मोडणाऱ्यांवर, बहिष्कार टाकण्याचा निर्विवाद अधिकार आहे आणि बहिष्कारात त्या व्यक्तीशी सर्व प्रकारचे सामाजिक व्यवहार पूर्णपणे बंद करण्याचा अंतर्भाव असतो हे लक्षात घेता हे मान्य करावे लागेल की, शिक्षेचा एक प्रकार बहिष्कार आणि मृत्यूदंड या दोहोमध्ये फारसा फरक नाही. हिंदू व्यक्तीला जातीच्या भिंती तोडून आपल्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचा आग्रह धरण्याचे धाडस होत नाही यात कोणतेही आश्चर्य नाही. माणूस कधीकधी सोबत्यांच्या बरोबर चालू शकत नाही पण हेही खरे आहे की, सोबत्याशिवाय तो जगूही शकत नाही. त्याला आपल्या सहकाऱ्यांच्या अटींनुसार वागणारा समूह हवा असतो. जर तो मिळाला नाही तर कुठल्याही, अगदी सपशेल शरणागतीसारख्या अटीवरसुद्धा समूहात राहण्यास तो तयार होतो. याचे कारण तो समूहाशिवाय जगू शकत नाही हे आहे. माणसाच्या या असहाय्यतेचा फायदा घ्यायला जातिव्यवस्था सदोदित तत्पर असते. (पृ.३७) डॉ. आंबेडकरांनी या ठिकाणी जात ही शोषणाची व्यवस्था निर्माण करते. तिला बंदिस्त रूप देते. यातून जात ही शोषणाचे शक्तिशाली हत्यार बनते हे प्राधान्याने अधोरेखित केलेले आहे.

### १३. जातीतून सामाजिक वृत्ती नष्ट:

डॉ. आंबेडकर जातीमीमांसेत जात ही सामाजिक निर्मिती आहे. हे मांडताना हिंदू समाजातील जातीसंस्थेवर परखड भाष्य करतात. जातीमुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात सामाजिक विषमता निर्माण झालेली आहे. ज्यामधून भारतीय समाजव्यवस्थेची हानी होत असल्याचे ते सांगतात. याविषयी मांडणी करताना ते लिहितात, हिंदूच्या नैतिकतेवर जातीचा अगदीच शोचनीय परिणाम झाला आहे. जातीने सामाजिक वृत्ती नष्ट केली आहे. जातीने सामाजिक दातृत्वभावनेचा नाश केला आहे. जातीने जनमत अशक्य केले आहे. हिंदूसाठी समाज म्हणजे त्यांची जात. त्याचे फक्त त्याच्या जातीशीच देणे घेणे असते. त्याची निष्ठा त्याच्या जातीपुरतीच मर्यादित आहे. सद्गुण जातीग्रस्त झालेला आहे. आणि नैतिकता जातीबद्ध झालेली आहे. तिथे गरजू लोकांविषयी सहानुभूती नाही. तिथे गरजवंतांसाठी दातृत्व नाही. दु:खाला प्रतिसाद देण्याची तिथे गरज वाटत नाही. तिथे दातृत्व आहे परंतु ते जातीपासून सुरू होते आणि जातीपाशीच संपते. (पृ.३९) 'जातीसाठी माती खाणे' ही म्हण प्रचलित आहे. त्यातीत भावार्थ काहीही असो परंतु यातून जातीचे प्राबल्य मांडले जाते. जात ही अशी सामाजिक वृत्ती आहे ज्यामधून विषमता निर्माण होते. भेदाभेद निर्माण होतो.

माणसाचे माणूसपण हिरावून घेतले जाते. त्यामुळे जातीय मानसिकता हा एक प्रकारचा देशद्रोहच आहे असे डॉ. आंबेडकरांनी सांगितले आहे.

## १४. आदर्श समाज कसा असावा?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाची चिकित्सा करताना त्यातील विविध अंतर्विरोध मांडलेले आहेत. विशेषत: जातिसंस्थेमुळे उत्पन्न सामाजिक विषमता, अंघटितता, विभाजनाचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या भेदांचा समाचार त्यांनी येथे घेतलेला आहे. या सर्व मांडणीच्या मागे डॉ. आंबेडकरांची व्यापक सामाजिक भूमिका होती. या ग्रंथातील चौदाव्या भागात त्यांनी आदर्श समाज कसा असावा? याची मार्मिक, तात्त्विक मांडणी केलेली आहे. ती अतिशय महत्त्वाची असून यासंबंधी ते म्हणतात, माझा आदर्श समाज स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यावर आधारित असेल आणि का असू नये? बंधुत्वाला काय आक्षेप असू शकतो? मला तरी त्याची कल्पना करता येत नाही. आदर्श समाज परिवर्तनास अनुकूल असला पाहिजे. एका भागात होत असलेले बदल दुसऱ्या भागात पोहोचण्यासाठी त्यात पुष्कळ मार्ग असावेत. आदर्श समाजामध्ये विविध हितसंबंध जाणीवपूर्वक एकमेकांपर्यंत पोहोचवून त्यात भागीदार होता आले पाहिजे. त्यात इतर संस्थांशी संपर्कासाठी विविध आणि मुक्त स्थळे असली पाहिजेत. यालाच बंधुभाव म्हणतात जे लोकशाहीचे दुसरे नाव आहे. लोकशाही ही केवळ शासन पद्धती नाही. मूलत: ती सहजीवनाची पद्धती आहे, परस्पर आदानप्रदानाचा तो एक सहअनुभव आहे. तो मूलत: सहकाऱ्यांप्रती आदर आणि श्रद्धेचा दृष्टिकोण आहे. स्वातंत्र्याला काय आक्षेप असू शकतो? मुक्त संचाराचा अधिकार, जीवित आणि सुरक्षेचा अधिकार या अर्थाने स्वातंत्र्याला क्वचितच कुणी आक्षेप घेईल. शरीर आरोग्यपूर्ण ठेवण्यासाठी उपजीविका कमावण्याच्या हेतूने मालमत्तेचा अधिकार, औजारे आणि साहित्याचा हक्क या अर्थाने स्वातंत्र्याला काही आक्षेप नसतो. व्यक्तीच्या क्षमतेच्या प्रभावी आणि सक्षम वापरातून लाभ होण्यासाठी त्याला स्वातंत्र्य का असू नये? जीवित, सुरक्षा आणि मालमत्तेचा अधिकार या अर्थाने स्वातंत्र्य मान्य करणारे जातीचे समर्थक, स्वातंत्र्याच्या कल्पनेत व्यक्तीच्या व्यवसाय निवडण्याच्या स्वातंत्र्याला तत्परतेने मान्यता देणार नाहीत. तथापि अशा रीतीने स्वातंत्र्याला आक्षेप घेणे गुलामगिरीला चिरंतन स्वरूप देण्यासारखे आहे. कारण गुलामगिरी म्हणजे, ज्यामध्ये काही लोकांची वर्तणूक नियंत्रित करणारी प्रयोजने इतरांकडून सक्तीने स्वीकारावी लागतात. अशी समाजस्थिती असा त्याचा अर्थ आहे. गुलामगिरी जिथे कायदेशीर अर्थाने अस्तित्वात नाही तिथेसुद्धा ही स्थिती असते. जिथे व्यक्तींना, जातिव्यवस्थेप्रमाणे नेमून दिलेले त्यांनी न निवडलेले, व्यवसाय करण्याची सक्ती असते, तिथे ती गुलामगिरी आढळते. समतेला काही आक्षेप? हा फ्रेंच राज्यक्रांतीच्या घोषणेतील स्पष्टपणे सर्वात विवादास्पद भाग आहे. समतेवरील घेतलेले आक्षेप संयुक्तिक असू शकतील आणि आपल्याला सर्व माणसे समान नाहीत हे मान्यसुद्धा करावे लागेल. परंतु म्हणून त्याचे काय झाले? समता केवळ कल्पना असू शकेल तरीसुद्धा तिला नियामक तत्त्व म्हणून स्वीकारले पाहिजे. (पृ.४०) डॉ. आंबेडकरांनी मांडलेली आदर्श समाजाची संरचना मानवतावादी मूल्यांवर अधिष्ठित आहे. ज्यामधून परंपरावादी जातीय विषमतेवर त्यांनी प्रहार केलेले आहेत.

## १५. हिंदू समाजातील श्रेणीबद्ध उतरंड:

डॉ. आंबेडकरांनी जातीसंस्थेच्या उच्चाटनासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांवर भाष्य केलेले आहे. त्यांच्या मते, हिंदू समाजातील जातीयता श्रेणीबद्ध आहे. श्रेणीबद्ध उतरंड ही जातिसंस्थेची पायाभूत गोष्ट असून तिच्या उच्चाटनाशिवाय जातीसंस्थेचे उच्चाटन होणार नाही. याविषयी डॉ. आंबेडकर या ग्रंथाच्या पंधराव्या भागात तपशिलाने लिहितात, सुधारकांचा एक असा गट आहे जो यापेक्षा वेगळा आदर्श मानतो. त्यांनी आर्यसमाज हे नाव धारण केले आहे. अणि सामाजिक रचनेचा त्यांचा आदर्श चातुर्वर्ण्य हा आहे. त्यात समाजाचे विभाजन त्यांनी आपल्याकडे असलेल्या चार हजार जातीऐवजी, चार वर्गात केलेले आहे. या विभागणीला अधिक आकर्षक करण्यासाठी तसेच विरोधकाच्या शिडातील हवा काढून घेण्यासाठी चातुर्वर्णाचे हे पाठीराखे त्यांचे चातुर्वर्ण्य जन्मावर नव्हे तर योग्यतेवर आधारलेले आहे हे सांगण्याची अतिशय काळजी घेतात. सुरुवातीलाच मला कबूल केले पाहिजे की, चातुर्वर्ण्य क्षमतेवर आधारित असल्याचे मान्य केले तरीही, तो आदर्श मला पटत नाही. आर्यसमाजी लोकांच्या चातुर्वर्ण्यात व्यक्तीला हिंदू समाजात तिच्या गुणाप्रमाणे स्थान प्राप्त होणार नाही. आर्यसमाजी लोक माणसांवर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे शिक्के मारण्याचा आग्रह का धरतात हे मला समजत नाही... ही जन्मावर आधारित श्रेणीबद्ध उतरंडीची कल्पना आहे. जोवर ही नावे प्रचलित आहेत तोवर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ही जन्मावर आधारित उच्च व नीच श्रेणीबद्ध रचना आहे असे समजून हिंदू त्याप्रमाणे वर्तन करतील. हिंदूला हे सर्व विसरायला लावलेच पाहिजे परंतु जुनी नावे अस्तित्व ठेवून त्याच्या मनाला सातत्याने या जुन्या कल्पनांची आठवण जागृत करून देत राहिल्यास ते कसे घडेल? लोकांच्या मनात नवीन कल्पना रुजवायच्या असतील तर त्यांना नवीन नावे देणे आवश्यक आहे. जुनीच नावे वापरणे म्हणजे सुधारणा निष्फळ करण्यासारखे आहे. क्षमतेवर आधारित चातुर्वर्ण्याला ब्राह्मण, क्षत्रिय वैश, शूद्र अशा जन्मावर आधारित सामाजिक विभाजनाचा निर्देश करणाऱ्या गलिच्छ् नावाने ओळखणे हा एक सापळा आहे. (पृ.४२) डॉ. आंबेडकरांनी चातुर्वर्ण्य ही विषमतेचे प्रतीक असल्याचे ठामपणे सांगितले आहे. ही सबंध मांडणी परखड आहे. त्यात चिकित्सा येते. मीमांसा येते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या मांडणीत आत्मचिंतन आहे. सामाजिक जाणीव आहे. भारतीय समाजाविषयी विधायकदृष्टी आहे.

## १६. चातुर्वर्ण्यासंबंधी आक्षेप:

डॉ. आंबेडकरांनी जातिसंस्थेच्या मूळांचा शोध घेतलेला आहे. भारतीय समाजातील हिंदू धर्मियांचा बहुसंख्यवाद आणि वर्चस्ववाद हा जातिसंस्थेला प्राधान्य देतो. विशेषत: इथली वर्णव्यवस्था याच्या मुळाशी आहे. डॉ. आंबेडकरांनी या ग्रंथामध्ये यावर आक्षेप घेतलेला आहे. याविषयी ते लिहितात, चातुर्वर्ण्यासंबंधीचे माझे आक्षेप केवळ भावनेच्या आधारावर मांडू इच्छित नाही. त्याला विरोध करण्यासाठी माझ्याकडे अधिक भक्कम कारणे आहेत त्यांचा मी आधार घेतो. या आदर्शाचे बारकाईने निरीक्षण केल्यानंतर माझे मत झाले आहे की, समाज संघटनाची व्यवस्था म्हणून चातुर्वर्ण्य अव्यवहार्य, हानीकारक आहे आणि सपशेल फसलेले आहे. व्यावहारिक दृष्टिकोणातून, चातुर्वर्ण्य व्यवस्था अनेक अडचणी निर्माण करते. त्या तिच्या पाठीराख्यांनी विचारात घेतल्याचे जाणवत नाही. जातीचे पायाभूत तत्त्व वर्णाच्या पायाभूत तत्त्वापेक्षा मूलत: वेगळे आहे. ते केवळ मूलत: वेगळे आहेत

एवढेच नव्हे तर मूलत: परस्पर विरोधीसुद्धा आहे. जात जन्मावर आधारित आहे. क्षमता विचारात न घेता जन्माने उच्च दर्जा प्राप्त झालेल्या लोकांना त्यांचे स्थान सोडण्यास तुम्ही कसे भाग पाडणार आहात? जन्माने हलका दर्जा प्राप्त झालेल्या व्यक्तीचे त्याच्या क्षमतेशी अनुरूप असे उच्च पातळीवर पुनर्गठन मान्य करण्याची सक्ती तुम्ही लोकांना कशी करणार? वर्णव्यवस्था स्थापन करण्याची क्षमता येण्यासाठी सर्वप्रथम तुम्हाला जातिव्यवस्था मोडून टाकावी लागेल. जन्मावर आधारलेल्या चार हजार जातीचा संकोच योग्यतेवर आधारित चार वर्णात तुम्ही कसा करणार? चातुर्वर्ण्याच्या पाठीराख्यांना सर्वप्रथम या अडचणींचा सामना करावा लागेल. (पृ.४३) डॉ. आंबेडकरांनी या मुद्याचे विवेचन करताना चातुर्वर्ण्याच्या व्यवस्थेतील विविधांगी अडचणींचा विचार केलेला आहे. विशेषत: यामधील स्त्रीचे अस्तित्व कसे वंचित ठेवलेले आहे यावर त्यांनी केलेली मांडणी महत्त्वाची आहे.

### १७. श्रमविभाजनाची व्यवस्था:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातिसंस्थेच्या उच्चाटनातील चातुर्वर्ण्याचे विवेचन परखडपणे करतात. चातुर्वर्ण्याला त्यांनी दृष्ट पद्धती असे म्हटलेले आहे. डॉ. आंबेडकरांनी या ग्रंथाच्या सतराव्या भागात जातिव्यवस्थेच्या समर्थनार्थ मांडल्या जाणाऱ्या श्रमविभाजन या प्रमेयाची चिकित्सा केलेली आहे. या संबंधी ते लिहितात, ब्राह्मणाने ज्ञानसाधना करावी, क्षत्रियाने शस्त्र धारण करावे, वैश्याने व्यापार उदीम करावा आणि शूद्राने सेवा करावी हे जणू काय श्रमविभाजनाची व्यवस्था असल्यासारखे वाटते. शूद्राला एखादी गोष्ट करण्याची गरज नाही असे सांगण्याचा या सिद्धांताचा उद्देश होता की त्याने ती करता कामा नये असा दंडक लावण्याचा त्यांचा उद्देश होता हा एक कुतूहलजनक प्रश्न आहे. चातुर्वर्ण्याचे समर्थक त्याचा एक पहिला अर्थ असल्याचे सांगतात. ते म्हणतात, तीन वर्णाचे लोक आधार द्यायला असताना शुद्राने धनसंचयाचे कष्ट कशासाठी घ्यावेत? लिहिण्या-वाचण्याच्या प्रसंग उद्भवल्यास तो ब्राह्मणाकडे जाऊ शकतो मग शूद्राने शिक्षण घेण्याची तसदी का घ्यावी? त्याचे संरक्षण करण्यासाठी क्षत्रिय असताना शूद्राने शस्त्र धारण करण्याची चिंता का करावी? या अंगाने चातुर्वर्ण्याचा सिद्धांत समजून घेतल्यास, तिन्ही वर्णाचे लोक पालक आहेत आणि शूद्राकडे ते पाल्य म्हणून पाहतात असे म्हणता येईल. अशा पद्धतीने अर्थ लावल्यास तो एक सरळ, उदात्त आणि मोहक सिद्धांत आहे. चातुर्वर्ण्याच्या मुळाशी असलेल्या संकल्पनांसंबंधी हे अचूक मत आहे असे गृहीत धरुन, मला असे वाटते की, ती व्यवस्था फसगतीपासूनही सुरक्षित नाही आणि लबाडीपासूनही सुरक्षित नाही. (पृ.४५) डॉ.आंबेडकरांनी चातुर्वर्ण्याधिष्ठित श्रमविभाजनामागील अंतर्विरोधी मांडणी केलेली आहे. यामागील विषमतावादी सूत्र ते मांडतात. विशेषत: या सिद्धांतामागील षडयंत्राचा पर्दाफाश करताना त्यांनी पुढे म्हटलेले आहे की, एका वर्गावर दुसऱ्या वर्गाने अवलंबून राहणे अपरिहार्य आहे. ते मान्य करण्यासारखेसुद्धा आहे. परंतु महत्त्वाच्या गरजांसाठी एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून का ठेवावे? शिक्षण हे प्रत्येकाला मिळालेच पाहिजे. सुरक्षेची साधने प्रत्येकाला जवळ असायलाच हवीत. प्रत्येक व्यक्तीकरिता, स्वत:च्या बचावासाठी, त्या प्रमुख गरजा आहेत. त्याचा शेजारी शिकलेला आणि हत्यारबंद आहे या वास्तवाची अशिक्षित आणि नि:शस्त्र व्यक्तीला काय मदत होईल. हा सगळा सिद्धांत हास्यास्पद आहे. पाल्य आणि पालक संबंध चातुर्वर्ण्याच्या मागची खरी मूळ कल्पना असो वा नसो, प्रत्यक्षात ते मालक आणि नोकर असेच संबंध होते. त्यांच्या आपापसातील संबंधांबाबत फार खुश नसले तरी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्गांनी संगनमताने

काम भागविले. ब्राह्मणांनी क्षत्रियांची खुशामत केली आणि दोघांनीही वैश्यांच्या जीवावर जगण्यासाठी त्याला जगू दिले होते. मात्र शूद्राची अधिक अप्रतिष्ठा करण्यासाठी तिघांचे एकमत होते. (पृ.४६) डॉ. आंबेडकर अत्यंत परखडपणे चातुर्वर्ण्याच्या मुळाशी असलेल्या तत्त्वांचा शोध घेतात. शेवटी त्यांनी बहुसंख्य लोकांना हिनत्वाला पोहोचविणाऱ्या चातुर्वर्ण्याच्या भरभराटीच्या काळाला देशासाठी पराभवाचे आणि अंधारयुग म्हटलेले आहे.

### १८. ब्राह्मण–क्षत्रिय संबंध:

डॉ. आंबेडकरांनी चातुर्वर्ण्याची चिकित्सा करताना त्रेवर्णांनी घेतलेल्या बाजूचा विचार केलेला आहे. या ग्रंथाच्या अठराव्या भागात ते त्रेवर्णांतील अंतर्विरोधाचा विचार करतात. विशेषत: ब्राह्मण–क्षत्रिय यांच्या संबंधावर ते भाष्य करतात. ते लिहितात, ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या झगड्याच्या उदाहरणांनी महाभारत आणि पुराणे ओसंडून वहात आहेत. कुणी कुणाला प्रथम अभिवादन करावे, जेव्हा ब्राह्मण आणि क्षत्रिय रस्त्यात एकमेकांसमोर येतील तेव्हा प्रथम कुणी वाट करून द्यावी, अशा क्षुल्लक प्रश्नांवरूनही ते भांडले. केवळ ब्राह्मण क्षत्रियांच्या डोळ्यात खुपत होते आणि क्षत्रिय ब्राह्मणांच्या डोळ्यात खुपत होते एवढेच नव्हे, तर क्षत्रिय जुलमी झाले होते असे दिसते आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेने नि:शस्त्र केल्यामुळे जनसामान्य क्षत्रियांच्या जुलुमातून सुटकेसाठी परमेश्वराची प्रार्थना करीत होते. 'भागवत' पुराण आपल्याला निश्चितपणे सांगते की श्रीकृष्णाने एक पवित्र उद्देशाने अवतार धारण केला होता आणि तो क्षत्रियांचा नायनाट करणे हा होता. विविध वर्णांमधील आपापसातील हेवेदावे आणि शत्रुत्वाची आपल्या समोरील उदाहरणे पाहता साध्य करावा असा आदर्श म्हणून चातुर्वर्ण्य कोणी कसे टिकवून ठेवील किंवा अशा नमुन्यावर हिंदू समाजाची पुनर्रचना करावी असे उद्दिष्ट कसे ठेवतील हेच मला समजत नाही (पृ.४८) डॉ. आंबेडकरांनी या ठिकाणी सामाजिक विषमतेची मांडणी केलेली आहे. अशा विषम समाजरचनेच्या पुनर्रचनेचा विचार ते करतात.

### १९. हिंदू-अहिंदूमधील जातसंबंधीचा फरक:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातिसंस्थेचा विचार करताना वरील सर्व मुद्यांमध्ये हिंदू समाजाची चर्चा केलेली आहे. परंतु या ग्रंथाच्या एकोणिसाव्या भागात ते हिंदूएतर समाजाविषयी मांडणी करतात. ते लिहितात, हिंदू लोक मुस्लिम, शिख आणि ख्रिश्चनाकडे बोट दाखवितात आणि त्यांच्यातसुद्धा जाती आहेत यात समाधान मानतात. या प्रश्नाचा विचार करताना आपण सुरुवातीलाच हे ध्यानात घेतले पाहिजे की मानवी समाज कुठेही एक अखंड नाही. तो नेहमीच बहुविध आहे. व्यवहारात व्यक्ती एक टोक आहे तर समाज दुसरे. या दोहोंमध्ये कुटुंब, मैत्री, सहकारी संस्था, व्यापारी संघ, राजकीय पक्ष, चोरांच्या आणि दरोडेखोरांच्या टोळ्या अशा कमी अधिक व्याप्तीच्या सर्वप्रकारच्या परस्पर संबंधात्मक व्यवस्था अस्तित्वात असतात. हे छोटे गट साधारणत: घट्टपणे जोडले गेलेले असतात आणि अनेकदा ते जाती इतकेच विशेष असतात. त्यांचे स्वत:चे संकुचित आणि कठोर कायदे असतात जे बहुदा समाजविरोधी असतात... अहिंदूमध्ये असलेली जात हिंदूमधल्या जातीसारखीच आहे की नाही ते आपण या प्रश्नांच्या अनुषंगाने ठरविले पाहिजे. हे निकष एकीकडे आपण मुस्लिम, शीख आणि ख्रिश्चनांमधल्या जातींना आणि दुसरीकडे हिंदूमधल्या जातींना लावले तर आपल्याला हे आढळेल की अहिंदूमधील जात हिंदू मधल्या

जातीहून मूलत: वेगळी आहे. हिंदूंना जाणीवपूर्वक एकमेकांशी बांधून ठेवणारे बंध त्यांच्यात अस्तित्वात नाहीत जेव्हा की अहिंदूमध्ये ते खूप आहेत आणि ते त्यांना एकत्रित ठेवतात. समाजाचे सामर्थ्य त्यातील संपर्काचे मुद्दे आणि त्यात अस्तित्वात असलेल्या विविध गटांमध्ये आदान प्रदानाची शक्यता यावर अवलंबून असते. त्यालाच कार्लाइल जैविक तंतू म्हणजेच विघटित होणाऱ्या घटकांना एकत्र सांधून पुन्हा संघटित करणारा लवचिक धागा, असे म्हणतो. हिंदूमध्ये जातिजन्य विघटना विरुद्ध कृती करुन त्यांना पुन: एकत्रित करणारी शक्ती नाही. अहिंदूमध्ये त्यांना एकत्र बांधणारे तंतू असतात. (पृ.४९) डॉ. आंबेडकरांनी याठिकाणी हिंदू समाजातील जातीचे अस्तित्व ठळकपणे अधोरेखित केले जाते. किंबहुना जातीच्या उल्लेखाशिवाय त्या व्यक्तीची ओळख लक्षात घेतली जात नाही. अहिंदूमध्ये त्यांना केवळ मुस्लीम, शीख, ख्रिश्चन म्हटले की त्यांची ओळख निर्धारित होते. परंतु हिंदूमध्ये प्रत्येकाला जातीचा उल्लेख करावाच लागतो, हे डॉ. आंबेडकरांनी येथे मांडलेले आहे. शेवटी त्यांनी जातीला असलेले धार्मिक अधिष्ठान मांडून जातीनिर्मूलनातील ती मोठी अडचण असल्याचे विशद केलेले आहे.

### २०. जात कशी नष्ट करायची?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या ग्रंथाच्या विसाव्या भागात जातिनिर्मूलनासंबंधी मूलभूत चिंतन मांडलेले आहे. जात कशी नष्ट करायची? असा प्रश्न मांडून त्यांनी याचे उत्तर विशद केलेले आहे. तत्पूर्वी त्यांनी जातीच्या सुधारणेमध्ये पोटजातीचे निर्मूलन आणि सहभोजनाच्या कार्यक्रमांविषयी चर्चा केलेली आहे. त्यांच्या मते या दोन्ही योजना जातिनिर्मूलनासाठी पर्याय ठरू शकत नाहीत. यातून जातीय भावना आणि जातीय जाणीव नष्ट करण्यात यश आलेले नाही असे ते ठामपणे सांगतात. पुढे त्यांनी जात नष्ट कशी करायची? या प्रश्नांचे विश्लेषण मांडलेले आहे. डॉ. आंबेडकर लिहितात, आंतरजातीय विवाह हाच त्यावरचा खरा उपाय आहे अशी माझी खात्री पटली आहे. केवळ रक्ताची सरमिसळच आप्तस्वकीय असल्याची भावना निर्माण करू शकते आणि नातेसंबंधाची, एकसारखे असल्याची ही भावना सर्वात महत्त्वाची ठरल्याशिवाय जातीने निर्माण केलेली विभक्तवादी परका असल्याची भावना नाहीशी होणार नाही. अहिंदूपेक्षा हिंदूच्या सामाजिक जीवनात आंतरजातीय विवाह हा निश्चितपणे अधिक शक्तीशाली घटक असणे आवश्यक आहे. जेव्हा समाज आधीच इतर धाग्यांनी नीटपणे विणलेला असतो तेव्हा विवाह हा आयुष्यातला सामान्य प्रसंग असतो. परंतु जेव्हा समाज दुभंगलेला असतो तेव्हा त्याला सांधणारी शक्ती म्हणून विवाह ही तातडीची गरज बनते. जात मोडण्याचा खरा उपाय आंतरजातीय विवाह हाच आहे. (पृ.५२) डॉ. आंबेडकर जातिनिर्मूलनाच्या प्रश्नाचे उत्तर आंतरजातीय विवाहाच्या रूपात मांडतात. ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. अशा विवाहासाठी स्वत: जात-पात तोडक मंडळ आग्रही असल्याने डॉ.आंबेडकरांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे. शेवटी डॉ. आंबेडकर जातीच्या पायामध्ये असलेल्या धर्माचा शोध मांडून धार्मिक मानसिकता जातसंस्थेला बळकटी देते. त्यामुळे सर्वांना याविरुद्ध आवाज उठवावा लागेल असे डॉ. आंबेडकर येथे ठामपणे मांडतात.

## २१. सामाजिक सुधारणा आणि जातीचे पैलू:

डॉ.आंबेडकरांनी प्रारंभापासून जातीच्या प्रश्नाबाबत सुधारणावादी चळवळींनी दुर्लक्ष केल्याबाबत या ग्रंथामध्ये मांडलेले आहे. इथे एकविसाव्या विभागातही याविषयी ते अधिकपणे विचार मांडतात. त्यांनी सामाजिक सुधारणांची वर्गवारी तीन प्रकारात केलेली आहे. ज्यामध्ये धार्मिक सुधारणा, धर्मसुधारणेच्या विरोधी विचार, धर्माज्ञांचे उल्लंघन म्हणजे पाप अशी भावना असणारा यांचा समावेश होतो. डॉ. आंबेडकांनी यामधून जातीच्या निर्मूलनाचा मार्ग सापडणार नाही असे ठामपणे सांगितलेले आहे. पुढे त्यांनी जातीचे पैलू सांगितलेले आहेत. याविषयी ते लिहितात, जातीचे दोन पैलू असतात हे ध्यानात घेतले तर, कार्य अशक्य आहे असे मी का म्हणतो, याच्या दुसऱ्या कारणाचा आपल्याला उलगडा होईल. तिच्या एका पैलूमध्ये तो माणसांचे विविध समुदायांमध्ये विभाजन करते. दुसऱ्या पैलूमध्ये ती त्या समुदायाचे एकाच्यावर दुसरा अशी, सामाजिक दर्जाच्या अनुसार, श्रेणीबद्ध रचना करते. जातीच्या मोजपट्टीवर आपण इतर काहीपेक्षा वरिष्ठ आहोत यात प्रत्येक जातीला अभिमान आणि समाधानही वाटत असते. या रचनेची बाह्य खूण म्हणून तांत्रिकदृष्ट्या अष्टाधिकार आणि संस्कार असा ज्यांचा उल्लेख केला जातो त्या सामाजिक आणि धार्मिक अधिकारांचेही श्रेणीवार वाटप केलेले आहे. जातीचा दर्जा जेवढा उच्च तेवढी तिच्या अधिकारांची संख्या जास्त आणि जातीचा दर्जा जेवढा खालचा तेवढीच अधिकारांची संख्या कमी. ही श्रेणीबद्ध रचना जातिव्यवस्थेच्या विरोधात संयुक्त आघाडी उघडणे अशक्य करते. जर एखादी जात आपल्या वरच्या जातीसोबत सहभोजन आणि आंतरजातीय विवाहाचा अधिकार मागत असेल तर त्या जातीला काही खोडसाळ लोकांकडून- ज्यात ब्राह्मण बहुसंख्य आहेत- धमाकवले जाते की, परिस्थितीत त्यांना स्वत:पेक्षा खालच्या लोकांशी सहभोजन आणि आंतरजातीय विवाहास सहमतीचा विचार करावा लागेल. सगळेच जातिव्यवस्थेचे गुलाम आहेत. परंतु सगळ्या गुलामांचा दर्जा समान नाही. परंतु विविध जातींना सामाजिक आणि धार्मिक हक्कांचे वाटप ज्या धूर्तपणे झाले आहे त्यामुळे काहींना खूप मिळाले आहे तर काहींना अगदीच कमी. जात ही सार्वभौम गटांची उच्च आणि कनिष्ठ अशी श्रेणीबद्ध रचना तयार करते. ज्यांना इतरांच्या दर्जाबद्दल असुया वाटते आणि जर सर्वसाधारण विसर्जन झाले तर त्यांच्यापैकी काहींना इतरांपेक्षा जास्त प्रतिष्ठा आणि सत्ता गमवावी लागेल, हे त्यांना ज्ञात आहे. म्हणूनच, लष्करी भाषेत सांगायचे तर, जातिव्यवस्थेवर हल्ला करण्यासाठी तुम्ही हिंदूंची जुळवाजुळव करू शकत नाही. (पृ.५८) डॉ. आंबेडकरांनी याठिकाणी जातीच्या निर्मूलनातील विविध आंतरर्विरोध मांडलेले आहेत.

## २२. जात आणि अस्पृश्यता:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या ग्रंथाच्या बाविसाव्या भागात जात आणि अस्पृश्यता या विषयाची मांडणी केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी या दोन्ही घटकातील परस्परसंबंध मांडतानाच त्यातील आंतर्विरोधही विशद केलेले आहेत. या दोन्ही गोष्टींचा मूलाधार हा धार्मिक आहे. हे त्यांनी ठामपणे मांडलेले आहे. हिंदू धर्मग्रंथाचा अभ्यास केल्यास प्रत्यय याचा येतो. डॉ. आंबेडकरांनी या ठिकाणी मनुस्मृती मधील वचनांचा दाखला देत जातिव्यवस्थेला कशाप्रकारे संरक्षित केलेले आहे हे पटवून दिलेले आहे. वेद व स्मृतींनी विवेक, बुद्धीप्रामाण्य, नैतिकता अशा गोष्टींना नाकारून जातीला श्रेष्ठत्वाचे, धार्मिक

आचरणाचे स्वरूप दिलेले आहे. याविषयी भाष्य करताना ते लिहितात, जातीच्या आणि वर्णाच्या संबंधात धर्मशास्त्रे हिंदूना आपल्या विवेकाचा वापर करण्याची परवानगी देत नाहीत एवढेच नव्हे तर जात आणि वर्णावरच्या त्यांच्या विश्वासाचा पाया बुद्धीच्या कसोटीवर तपासण्याचा प्रसंगही येऊ न देण्याची खबरदारी त्यांनी घेतलेली आहे... जात पाळायला आणि शक्य नसल्यास ती मोडल्याबद्दल प्रायश्चित घ्यायला सांगणाऱ्या धर्मशास्त्रांमध्ये सापडते. प्रायश्चित्ताच्या सिद्धांताद्वारे तडजोडीची वृत्ती अनुसरून धर्मशास्त्रांने जातीला चिरंतन पुनर्जीवन बहाल केलेले आहे आणि जातजाणिवेच्या विनाशास कारणीभूत ठरू शकला असता अशा चिंतनशील विवेकाला दडपून टाकलेले आहे. (पृ.६०) डॉ. आंबेडकर या ठिकाणी जातीय मानसिकतेवर प्रहार करतात. वेद, स्मृतीसारख्या ग्रंथामधून ही मानसिकता घडविल्याचे त्यांनी म्हटलेले आहे. यासाठी शेवटी ते लिहितात, तुम्हाला या व्यवस्थेला खिंडार पाडण्याची इच्छा असेल तर विवेकाला नकार देणाऱ्या वेद आणि धर्मशास्त्रांना, नैतिकतेला नकार देणाऱ्या वेद आणि धर्मशास्त्रांना सुरुंग लावलाच पाहिजे हे तुम्ही विसरता कामा नये. तुम्हाला श्रुति आणि स्मृतींचा धर्म नष्ट करावाच लागेल. इतर कशाचाही उपयोग होणार नाही. या प्रकरणाबाबत माझे हे पूर्ण विचारांती बनलेले मत आहे (पृ.६१) डॉ. आंबेडकरांनी जातजाणीव आणि अस्पृश्यतेचे मूळ शोधून त्यावर घाव घातलेला आहे. जो अतिशय महत्त्वाचा असून जातिसंस्थेच्या निर्मूलनातील त्याचे महत्त्व अधोरेखित करणारा आहे. त्यामुळे याला या ग्रंथामध्ये विशेष महत्त्वाचे स्थान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सातत्याने जातीची चिकित्सा करतात. जातींच्या अंतरंगाला उजागर करण्याचा प्रयत्न करतात.

## २३. धर्म विनाशामागील तत्त्वविचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली वरील मांडणी त्यांना धर्मविरोधी ठरण्यासाठी वापरली जाऊ शकते याची खात्री त्यांना होती म्हणून त्यांनी या ग्रंथाच्या तेविसाव्या भागात या शक्यतेचा परामर्श घेतलेला आहे. विशेषत: त्यांचे धार्मिक विचार कसे प्रगतशील होते हे यातून स्पष्ट होते. याविषयी ते लिहितात, धर्माचा विनाश या माझ्या संकल्पनेचा अर्थ कदाचित काहींना कळणार नाही. काहींना ती कल्पना क्षोभजनक वाटेल तर काहींना ती क्रांतिकारी वाटेल. म्हणून मी माझी भूमिका स्पष्ट करतो. तत्त्व आणि नियम या दोहात तुम्ही फरक करता की नाही ते मला माहीत नाही. परंतु मी तो करतो. मी केवळ फरकच करतो असे नव्हे तर तो फरक वास्तविक आणि महत्त्वाचा आहे असेही मानतो. नियम व्यावहारिक असतात. वहीवाटीप्रमाणे कृती करण्याची ती सवयीची पद्धत आहे. परंतु तत्त्वे बौद्धिक असतात. गोष्टींचे परीक्षण करण्यासाठी ती उपयुक्त पद्धत आहे. धार्मिक कृत्य बरोबरच असेल असे नाही मात्र किमान जबाबदारीचे असायला हवे. अशा जबाबदारीच्या धोरणाला वाव देण्यासाठी धर्म ही प्रामुख्याने केवळ तत्त्वाचीच बाब असली पाहिजे. ती नियमांची बाब असू शकत नाही. ज्याक्षणी त्याचे नियमांमध्ये अध:पतन होते त्या क्षणी तो धर्म राहत नाही. कारण तो खऱ्या धार्मिक कृतीचे सार असलेल्या जबाबदारीच्या जाणिवेचा खातमा करतो. हिंदू याला धर्म म्हणतात तो आज्ञा आणि निषेधाज्ञांची गर्दी या व्यतिरिक्त काहीही नाही. खरोखरच वैश्विक असलेला, सर्व वंशांना, देशांना, सर्वकाळात लागू होण्यासारखी अधात्मिक तत्त्वे या अर्थाचा धर्म त्यांच्यात दिसून येत नाही. (पृ.६२) डॉ. आंबेडकरांनी धर्माचे पारंपरिक रूप नाकारले आहे. केवळ वटहुकूम आणि विधी संहितेला ते नकार देतात.

त्याला ते धर्म मानत नाहीत. तर त्यांच्या मते, स्वातंत्र्य आणि उत्स्फूर्ततेचे नैतिक जीवन याला प्राधान्य देणारा धर्म महत्त्वाचा आहे.

### २४. धर्म सुधारणेसाठी आवश्यक बाबी:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या ग्रंथामध्ये जातीच्या निर्मूलनाचा विचार धार्मिक अंगाने किती महत्त्वाचा आहे हे सांगितलेले आहे. त्यांनी इथे हिंदू धर्मातील जातीयतेवर प्रहार करताना धर्माच्या नियमांचा निषेध केलेला आहे. परंतु याचा अर्थ त्यांना धर्माची गरज नाही असा होत नाही. या उलट त्यांनी याठिकाणी बर्क या विचारवंताचे मत उद्धृत करून खरा धर्म काय आहे हे विशद केलेले आहे. या विषयी ते लिहितात, खरोखरच धर्माच्या आवश्यकतेबाबत माझी एवढीच खात्री पटली आहे की, या धर्मसुधारणेअंतर्गत काय आवश्यक बाबी असाव्यात याची रूपरेषा आपणासमोर मांडलीच पाहिजे असे समजतो. माझ्या मते या सुधारणामध्ये पुढील मुद्दे मुख्य असावेत:

१. सर्व हिंदूना स्वीकारार्ह आणि मान्य असा एकच प्रमाण धर्मग्रंथ असावा. याचा अर्थ असा की हिंदू धर्माचे वेद, शास्त्र, पुराणे यासारखे पवित्र आणि प्रमाण मानले गेलेले इतर सर्व ग्रंथ कायद्याने रद्द केले पाहिजेत आणि त्या ग्रंथातील धार्मिक किंवा सामाजिक सिद्धांतांची शिकवण देणे दंडनीय ठरविले पाहिजे.

२. हिंदूमधल्या पुरोहितशाहीचे निर्मूलन झाले तर चांगले. परंतु हे अशक्य दिसते म्हणून किमान पुरोहितपद वंशपरंपरागत नसावे. स्वत:च्या हिंदू म्हणवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला पुरोहितपदासाठी पात्र मानले पाहिजे. सरकारने ठरवून दिलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय आणि त्याला तो व्यवसाय करण्याची सरकारी सनद असल्याशिवाय पौरोहित्य करता येणार नाही अशी कायद्यामध्ये तरतूद करावी.

३. सनद नसलेल्या पुरोहिताने केलेला कोणताही समारंभ विधिसंमत मानण्यात येऊ नये, तसेच सनद नसताना पौरोहित्य करणे शिक्षापात्र गुन्हा ठरविण्यात यावा.

४. पुरोहित सरकारी नोकर करावा. नैतिकता, श्रद्धा आणि उपासना या संदर्भात तो सरकारद्वारे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असावा तसेच त्याला या व्यतिरिक्त इतर नागरिकांप्रमाणे देशाचे कायदे बंधनकारक असावेत.

५. राज्यांच्या गरजेनुसार, आय.सी.एस.च्या संदर्भात असते त्याप्रमाणे पुरोहितांची संख्या मर्यादित असावी.

डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या सूचना जातिसंस्थेच्या मुळावर घाव घालणाऱ्या आहेत. त्यांना खात्री होती की या सर्व सूचना हिंदूंना जहाल वाटतील. त्याला ते नकार देतील. यासाठी त्यांनी भारतातील इतर व्यवसायांची उदाहरणे म्हणजे अभियंता, डॉक्टर इत्यादींची मान्यता घ्यावी लागते याची आठवण केलेली आहे. शेवटी त्यांनी धर्माला नवीन तत्त्वांचा आधार दिला पाहिजे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही ती तत्त्वे आहेत. असे ठामपणे त्यांनी मांडलेले आहे. माणसाचे माणूसपण नाकारणारा धर्मच आपण नाकारला पाहिजे. या भूमिकेचाही त्यांनी येथे उल्लेख केलेला आहे. धर्मांतर हा शब्दप्रयोग करताना त्यांनी त्याला नवजीवन असे म्हटलेले आहे. ते अतिशय मार्मिक आहे.

## २५. जातिनिर्मूलनाची चतु:सूत्री:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ग्रंथाच्या शेवटी सदर ग्रंथातील विषयाच्या संबंधी निष्कर्षात्मक मांडणी केलेली आहे. ते सर्वांना उद्देशून म्हणतात, हिंदू श्रोत्यांसमोर, त्यांच्याशी संबंधित अतिशय महत्त्वाच्या प्रश्नावर हे माझे बहुदा शेवटचे भाषण असेल असा सुतोवाच करतात. जातीचा प्रश्न अतिशय गंभीर असून तो सोडविण्यासाठी त्यांनी सर्व हिंदू समूहाला आवाहन केलेले आहे. जातिसंस्थेच्या निर्मूलनासाठी त्यांनी चतु:सूत्री सांगितलेली आहे. या संदर्भात ते लिहितात, प्रथमत: जगभरातल्या विविध लोकांमध्ये रूढ असलेल्या श्रद्धा, सवयी, नीतिमूल्ये आणि जीवनविषयक दृष्टिकोण यांच्या संदर्भाने त्यांच्यात बऱ्याचदा तफावत असते या व्यतिरिक्त त्यांच्याबद्दल काहीही बोलायचे नाही. अशी मानववंश शात्रज्ञाप्रमाणे सौम्य भूमिका घेणे पुरेसे आहे का, की कोणत्या प्रकारच्या नैतिकता, श्रद्धा, सवयी आणि दृष्टिकोण यांनी उत्तम कार्य केलेले आहे आणि ते बाळगणाऱ्या लोकांची भरभराट करण्यास, त्यांना सशक्त करण्यास, पृथ्वी व्यापण्यास आणि तिच्यावर अधिपत्य गाजवण्यास सक्षम बनविले आहे हे शोधून काढण्याचा प्रयत्न करणे आवश्यक नाही काय? याचा हिंदूंनी सर्वप्रथम विचार केला पाहिजे. (पृ.६६) डॉ. आंबेडकरांनी यासाठी प्रो.कार्व्हर यांच्या निरीक्षणाचा आधार घेतला आहे. नीती आणि धर्म याचे अनुबंध मांडताना एकमेकांप्रती आपुलकीवर ते भर देतात. डॉ. आंबेडकरांनी दुसरा मुद्दा विचारात घेताना म्हटलेले आहे की, दुसरी गोष्ट अशी की, हिंदूंनी त्यांना त्यांचा संपूर्ण सामाजिक वारसा जनत करायचा आहे की, त्यातील उपयुक्त असलेला भाग निवडून फक्त तेवढाच पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवायचा याचा विचार केला पाहिजे. ज्यांचा मी खूप ऋणी आहे असे माझे शिक्षक प्रो. जॉन डयूई म्हणतात, प्रत्येक समाज भूतकाळातील क्षुल्लक, निरुपयोगी व निष्फळ बाबी आणि निश्चितपणे विकृत असलेल्या गोष्टींच्या ओझ्याखाली दबलेला असतो. समाज जसा अधिक प्रबुद्ध होतो तसे त्याच्या ध्यानात येते की, तो सगळ्याच बाबी जतन करण्यास आणि त्यांच्या सगळ्याच उपलब्धी पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यास जबाबदार नाही तर ज्यामुळे भविष्यातील समाजाला अधिक चांगला करण्यास उपयोगी पडतील तेवढ्याच पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यास जबाबदार आहे. (पृ.६७) डॉ. आंबेडकरांनी यामध्ये सामाजिक दायित्वाची भूमिका मांडलेली आहे. तिसरे सूत्र मांडताना त्यांनी म्हटले आहे की, तिसरी गोष्ट अशी की, हिंदूंनी त्यांना आदर्श पुरविणारा स्त्रोत म्हणून भूतकाळाचे जतन करणे थांबविले पाहिजे. (पृ.६७) डॉ. आंबेडकरांनी प्रो. डयुई यांनी इतिहास पूजनाचे घातक परिणाम विशद करताना मांडलेल्या विचारांचा आधार घेतलेला आहे. शेवटी ते म्हणतात, चौथी गोष्ट अशी की कुठलीही गोष्ट निश्चित नाही, कुठलीही गोष्ट शाश्वत नाही. कुठलीही गोष्ट सनातन नाही. प्रत्येक गोष्ट बदलत असते. व्यक्ती तसेच समाजासाठीही बदल हाच जीवनाचा नियम आहे हे मान्य करण्याची वेळ आलेली आहे की नाही याचा हिंदूंनी विचार केला पाहिजे. बदलत्या समाजात, जुन्या मूल्यांत सतत क्रांती घडविली पाहिजे आणि हिंदूंनी हेसुद्धा समजून घेतले पाहिजे की, जसे माणसाच्या कृतीचे मूल्यमापन करण्यासाठी मानक असले पाहिजे तसेच त्या मानकामध्ये बदल करण्याची तयारी सुद्धा असली पाहिजे (पृ.६८) डॉ. आंबेडकरांनी या ग्रंथाच्या शेवटी मांडलेली वरील चतु:सूत्री अतिशय महत्त्वाची असून कोणत्याही सामाजिक प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी ती पूरक ठरणारी आहे.

**२६. समारोप:**

डॉ.आंबेडकरांनी शेवटी सव्वीसाव्या भागात भाषणाचा समारोप केलेला आहे. त्यामध्ये ते भाषण फार लांबलचक झाल्याचे म्हणतात. परंतु विषय अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे त्याची मूलगामी चिकित्सा करणे गरजेचे होते. आपले विचार हे कसे निरपेक्ष आहेत याविषयी ते येथे म्हणतात, आपली परवानगी असेल तर मी हे सांगू इच्छितो की, सत्तेच्या हातचे बाहुले नसलेल्या, मोठेपणाची भाटगिरी न करणाऱ्या व्यक्तीचे हे विचार आहेत. गरीब आणि शोषित जनतेच्या मुक्तीसाठी ज्याचे सगळे सार्वजनिक प्रयत्न हा एक अविरत संघर्ष आहे आणि त्याचे बक्षीस म्हणून राष्ट्रीय वृत्तपत्रे आणि राष्ट्रीय पुढाऱ्यांनी त्याच्यावर निंदा-नालस्ती आणि शिव्यांचा वर्षाव केलेला आहे. कारण काय तर, शोषितांना जुलूम करणाऱ्यांच्या सोन्याने मुक्त करण्याच्या आणि गरिबांना श्रीमंतांच्या पैशाने उभे करण्याच्या, लबाडी हा शब्द मी वापरणार नाही. त्यांच्या चमत्कारात मी सहभागी होण्याचे नाकारले, अशा माणसाचे ते विचार आहेत. (पृ.६८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येथे अत्यंत तळमळीने विचार मांडलेले आहेत. शेवटी तर त्यांनी जाती मुळातून उखडून टाकण्याचे प्रयत्न सर्वांनी केले पाहिजेत असे सांगितले आहे.

## ३आ.७ 'जातिसंस्थेचे उच्चाटन' ग्रंथावरील प्रतिक्रिया

'जात-पात तोडक' मंडळाने निश्चित केलेले अधिवेशन रद्द केल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'जातिसंस्थेचे उच्चाटन' हा ग्रंथ स्वत:च्या खर्चाने प्रकाशित केला. या ग्रंथाच्या प्रकाशनाबरोबर त्याविषयी विविध चर्चा सुरू झाली. विशेषत: हिंदू समूहाने याविरुद्ध जहाल प्रतिक्रिया दिल्या. त्यापैकी काही प्रतिक्रिया प्रसिद्धही झाल्या. महात्मा गांधी यांनीही या ग्रंथाविषयी प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने प्रकाशित केलेल्या प्रा.प्रकाश सिरसट यांनी मराठीमध्ये अनुवाद केलेल्या ग्रंथाच्या परिशिष्टात म. गांधी यांनी दिलेल्या प्रतिक्रिया क्रमश: छापलेल्या आहेत.

म. गांधी यांनी 'हरिजन'च्या दि. ११ जुलै १९३६ मधील अंकात डॉ. आंबेडकरांचे आरोपपत्र –एक, दि. १८ जुलै १९३६ च्या अंकात भाग दोन, आणि दि. १५ ऑगस्ट १९३६ च्या अंकात 'वर्ण विरुद्ध जात' या शीर्षकाचे लेख लिहून डॉ. आंबेडकर यांच्या 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथावर प्रतिक्रिया दिलेल्या आहेत.

म. गांधी यांनी ११ जुलैच्या 'हरिजन'मधील लिहिलेल्या लेखात सुरुवातीला जात-पात तोडक मंडळाचे लाहोर येथील अधिवेशन, डॉ. आंबेडकरांचे भाषण, वादप्रतिवाद आणि शेवटी ग्रंथरूपाने प्रकाशित झालेले भाषण याची मांडणी केलेली आहे. पुढे ते म्हणतात, "कुणीही सुधारक या भाषणाकडे काना डोळा करू शकत नाही. सनातन्यांना ते वाचून लाभ होईल. याचा अर्थ भाषण आक्षेपार्ह नाही असा नव्हे. त्यावर गंभीर आक्षेप घेतले जाऊ शकतात. म्हणूनच ते वाचले पाहिजे." (पृ.७०) म. गांधी यांनी डॉ. आंबेडकरांना हिंदुत्वापुढील आव्हान म्हटले आहे. हे मांडताना हिंदू समाजाने त्यांच्यावर शिक्षणासाठी उपकार केल्याचे ते सांगतात. विशेषत: हिंदू धर्मग्रंथांचा त्यांनी जो आधार घेतलेला आहे. ते ग्रंथ, त्यातील उतारे याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण केलेले आहे. म. गांधींनी १८ जुलै रोजी



munotes.in

लिहिलेल्या लेखात या प्रश्नावर विस्तृत भाष्य केलेले आहे. ते लिहितात, आंबेडकरांनी 'स्मृती'मधून उद्धृत केलेली अवतरणे अधिकृत म्हणून स्वीकारता येणार नाही. जातीचा धर्माशी काहीएक संबंध नाही... वर्ण आणि आश्रम या संस्थांचा जातीशी काडीमात्र संबंध नाही. डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या भाषणात प्रक्षिप्त आणि महत्त्व संशयास्पद असलेले ग्रंथ निवडण्याची तसेच अवनत व त्यांच्या धर्माच्या अप्रतिनिधिक लोकांची उदाहरणे हिंदूचा नमुना म्हणून देण्याची गंभीर चूक केली आहे. (पृ. ७२- ७३) अशी प्रतिक्रिया म. गांधी यांनी प्रस्तुत ग्रंथाविषयी दिली आहे. शेवटी १५ ऑगस्टच्या अंकात म. गांधींनी जात-पात तोडक मंडळाचे सदस्य श्री. संत रामजी यांनी मांडलेल्या मताचा आधार घेत आपल्या विरोधात्मक प्रतिक्रियेची मांडणी केलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म. गांधी यांच्या प्रतिक्रियेचा प्रतिवाद केलेला आहे. गांधीजींची मते सप्रमाण खोडून काढलेली आहेत. यासंदर्भात ते लिहितात, महात्म्याने उपस्थित केलेला पहिला मुद्दा म्हणजे मी संदर्भ दिलेले धर्मग्रंथ अधिकृत नाहीत. या बाबतीत मी जाणकार नाही हे मी कबूल करतो. परंतु मला हे सांगायला आवडेल की, मी संदर्भ दिलेले ग्रंथ स्व. टिळकांच्या लिखाणामधून निवडलेले आहेत. दुसरा मुद्दा असा की, धर्मशास्त्रांचा अन्वयार्थ विद्वानांनी नव्हे तर संत महात्म्यांनी लावला पाहिजे आणि ते संतांनी जसे समजून घेतले तसेच समजून घेतले पाहिजे. माझ्या अभ्यासानुसार संतांनी जात आणि अस्पृश्यतेविरुद्ध कधी मोहिम चालविली नाही. महात्म्याचा तिसरा मुद्दा असा की, चैतन्य, ज्ञानदेव, तुकाराम, तिरुवल्लुवर, रामकृष्ण इत्यादींनी आपला मानलेला धर्म मी सांगितल्याएवढा गुणवत्ताविरहित असू शकणार नाही. या विधानातील प्रत्येक शब्दाशी मी सहमत आहे. परंतु कोणत्याही धर्मातील वाईटाची संख्या एवढी जास्त आणि उत्तम असलेल्यांची संख्या इतकी कमी का आहे? हा प्रश्न आहे. प्रत्येकाने आपला पिढीजात व्यवसाय केला पाहिजे या सिद्धांताला महात्मा का चिकटून आहेत? (पृ.७७-८८) इथे डॉ. आंबेडकरांनी आपली भूमिका परखडपणे मांडलेली आहे. जी मुळातून वाचनीय आहे.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर्तमान पत्रातील वैचारिक लेखनातील वैचारिकता स्पष्ट करा.

munotes.in

## ३आ.८ समारोप

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'जातिसंस्थेचे निर्मूलन' हा अतिशय महत्त्वाचा वैचारिक ग्रंथ आहे. या ग्रंथाची निर्मिती प्रसंगपरत्वे झालेली असली तरी या ग्रंथातील विचारतत्त्वे भारतीय समाजाचा दिशादर्शक अशीच आहेत. डॉ. आंबेडकरांनी हा ग्रंथ इंग्रजीत लिहिलेला असला तरी त्याचे मराठी अनुवाद होऊन त्यांना मराठी वैचारिक साहित्यात मोलाचे स्थान प्राप्त झालेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र लेखन ऐतिहासिक स्वरूपाचे असून ज्यामधून भारतीय समाज, संस्कृती आणि इतिहासाची परखड मीमांसा आविष्कृत होते. या मांडणीत संस्कृत, इंग्रजी, मराठी भाषेतील भारतीय आणि पाश्चात्य विचारवंतांचे संदर्भ येतात. त्यामुळे या ग्रंथाला दार्शनिक महत्त्व प्राप्त होते.

## ३आ.९ सरावासाठी प्रश्न

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक लेखनाचा आढावा घ्या.

२. 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथाची पार्श्वभूमी विशद करा.

३. 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथातील आशयसूत्रे स्पष्ट करा.

४. 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथातील वैचारिकता विशद करा.

५. 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथाचे समकालीन महत्त्व विशद करा.

## ३आ.१० संदर्भ ग्रंथ


१. डॉ. बी. आर. आंबेडकर, २०१५ : 'जातिव्यवस्थेचे निर्मूलन, (मराठी अनुवाद प्रा. प्रकाश सिरसट) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती २०१५.

२. इंगळे, रामचंद्र, १९८७: 'महारांचा सांस्कृतिक इतिहास', अभिजित प्रकाशन, नागपूर.

३. पानतावणे, गंगाधर, १९८७ : 'पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर', प्रतिमा प्रकाशन, पुणे.

४. मुरंजन, सुमंत, १९७३: 'पुरोहित वर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास', प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई.

५. मेश्राम, योगेंद्र, २०११ : 'दलित साहित्य :उद्गम आणि विकास', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६. वाघमारे, जनार्दन, १९९५ : 'समाजपरिवर्तनाच्या दिशा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

७. सरदेसाई, एस. जी., १९८७ : 'भारतीय तत्त्वज्ञान : वैचारिक आणि सामाजिक संघर्ष', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई.


munotes.in

८. सुमंत, यशवंत व पुंडे, दत्तात्रय, १९८८ : 'महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे.

९. डहाट, धनराज, २०१० : 'आंबेडकर ग्रंथायन', संकेत प्रकाशन, नागपूर.

१०. अचलखांब, रुस्तुम, २०१५ : 'डॉ. आंबेडकरांचे ग्रंथलेखन : एक आकलन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

## ३आ.११ पूरक वाचन

१. म. जोतीराव फुले : 'गुलामगिरी'

२. वि. रा. शिंदे : 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न'

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : 'भारतातील जाती : त्यांची रचना, उत्पती आणि विकास'

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : 'शूद्र पूर्वी कोण होते?'

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : 'अस्पृश्य मूळचे कोण होते आणि ते अस्पृश्य कसे बनले?'

*****

munotes.in

# Turnitin Originality Report

Processed on: 2022年11月09日 12:00 IST
ID: 1948994204
Word Count: 85237
Submitted: 1

वैचारिक गद्य-1 By Idol, University Of Mumbai Ma-ii, Sem-iv, Marathi

| Similarity Index | Similarity by Source |
|---|---|
| 0% | Internet Sources: 0%<br>Publications: 0%<br>Student Papers: 0% |

< 1% match (student papers from 02-Sep-2022)
Class: Quick Submit
Assignment: Quick Submit
Paper ID: 1891197818

< 1% match (student papers from 09-Sep-2022)
Class: Quick Submit
Assignment: Quick Submit
Paper ID: 1895819488

munotes.in

Sce. S. (cejeþe)r me$e - IV (CBCS) DeY³eemeHee$fekeÀe ¬eÀ. 10:6 Je®weeejfkeÀ ieÐe - 1 eJfe<e³e keÀe[s : 99109 © UNIVERSITY OF MUMBAI Òee. jJeeêR keÀguekeÀCeea Òe-keÀgueieªg ceybgeF& eJfeÐeeHeeþr, ceybgeF.& Òee. mengeme Hes[CekseÀj keÀgueieªg ceybgeF& eJfeÐeeHeeþr, ceybgeF.& ojt Je cekgelÌe DeOÒ³eee³.evÒeekmmeÀeee®bmbMeLeeueece,keencÀeeybgveFeJ&eejJfeÐeeHeerþ, ce3ybgeF&.1 ÒekeÀuHe mecevJe³ekeÀ : Òee. Deevfeue yevekeÀj keÀuee Je ceeveJ³e MeeKee ÒecegKe, otj Je cekgelÌe DeO³e³eve memblee (Dee³e[eu@e), ceybgeF& eJfeÐeeHeerþ, ceybgeF.& DeY³eeme mecevJe³ekeÀ Je meHbeeokeÀ : [e.@ meecree cemgeUs meene³³ekeÀ ÒeeO³eeHekeÀ, cejeþer eJfeYeeie, otj Je cegkeÌle DeO³e³eve memblee (Dee³e[eu@e), ceybgeF& eJfeÐeeHeeþr, ceybgeF.& menmeHbeeove : Òee. [e.@ iepeeveve DeeHfeves meene³³ekeÀ ÒeeO³eeHekeÀ, cejeþer eJfeYeeie, cee[@ve& ceneeJfeÐeeue³e, eMfeJeepeevreiej, HeCge.s ueKsekeÀ : Òee. [e.@ eifejerMe ceejss men³eeiseer ÒeeO³eeHekeÀ, cejeþer eJfeYeeie, jepeÞeer Meent keÀuee Je JeeeCfep³e ceneeJfeÐeue³e, ©keÀ[e,r lee. nelekeÀCeieue,s epfe. keÀeusneHejt. : Òee. [e.@ DeªCe eMfeobs ÒeeO³eeHekeÀ, cejeþer eJfeYeeie ÒeceKge, veeFì keÀeu@epse, eyfeobt ®eekweÀ, keÀeusneHejt. : : [e.@ meecree cemgeUs meene³³ekeÀ ÒeeO³eeHekeÀ, cejeþer eJfeYeeie, otj Je cegkeÌle DeO³e³eve memblee (Dee³e[eu@e), ceybgeF& eJfeÐeeHeeþr, ceybgeF.& : Òee. [e.@ meejeHre$ge leHgejss meene³³ekeÀ ÒeeO³eeHekeÀ, cejeþer eJfeYeeie, meibeceésej keÀeu@epse, meeuseeHejt. veeJsnyWej 2022, ÒeLece ceêgCe, ÒekeÀeMekeÀ me®beeuekeÀ, otj Je cekgelÌe DeO³e³eve memblee, ceybgeF& eJfeÐeeHeeþr, ceybgeF& - 400098. De#ejpegUCeer ceybgeF& eJfeÐeeHeeþr ceêgCeeue³e, meelbee¬eÀgPe, ceybgeF.& अनकुर्मण कि ा कर्म कां अधय् या पषृठ् कर्म कां घटक १ १अ) वचै रारक गदय् चा े ललतत स ला तिय् पा सानूच े वगेळपेण आशय अल विक्त् चीय् ाअगं ना े १ १आ) सव् तातंर्य्पवूव क ळा ता ली वचै रारक गदय् मा गा ली पर्ेण :ा र जाक यी, स मा लाजक पर्ेण ,ा पर्ब धोन चळवळ ीइ. - पर् .ा ड .ॉ ण रि शी म रो े घटक २ २अ) १८७४-१९२० य ाक लाखडं ता ली वचै रारक गदय् चा ी परपंर ा - पर् .ा ड .ॉ अर णिुशदां े २४ २आ) लनवडक आगरकर- (सपं .ा) ग. पर्. पर्ध ना - ड .ॉ स मी मासुळे ४८ घटक ३ ३अ) १९२०-१९४७ य का लाखडं ता ली वचै रारक गदय् चा ीपरपंर ा - पर् .ा ड .ॉ अर णिुशदां े ७७ ३आ) 'ज लातससंथ्चे े